# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ११/२००६.** **दिनांक २५.११.२००६**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१६०६८-२००६, दिनांक १५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे |
| ०३. | मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०६. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०७. | मा. कॅप्टन सुरेश वासुदेवा | ०८. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ०९. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय | १०. | मा.डॉ.पी.एल.तिवारी |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे, कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक यांनी दूरध्वनीद्वारे तसेच मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.प्रकाश रामदास काळे व मा.श्री समि खतिब यांनी पत्र व फॅक्सव्दारे कळविले आहे,त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित रहाणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दुखवट्याचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

" जेष्ठ गांधीवादी नेते, संत साहित्याचे अभ्यासक, विधानसभेचे माजी अध्यक्ष, माजी सहकारमंत्री आणि थोर स्वातंत्र्यसैनिक बाळासाहेब भारदे यांचे बुधवार दिनांक २२ नोव्हेंबर,२००६ यांचे वयाचे ९३ व्या वर्षी दुखःद निधन झाले. श्री.भारदे यांचे कुटुंबीयांचे दुःखात सर्व विश्वस्त, संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत"

यानंतर या सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून अतिवृष्टीमूळे मरण पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण केली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१ दि.१४.१०.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८७४.** दि.१४.१०.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१) निर्णय क्र.७९४. ड) मध्ये -**

दोन टाटा व्हिक्टा खरेदी कामी एक व्हिक्टा (CX) निम्नतम दर रू.४,४५,५५७.०० असलेले सन्या मोटर्स, प्रा.लि. औ.बाद व एक व्हिक्टा (GX TC) निम्नतम दर रू.६,०२,१९२.०० असलेले मे.हूंडेकरी मोटर्स,अहमदनगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावेत.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे**

ड) एक टाटा सूमो व्हिक्टा CX-10STR खरेदी करण्यात यावे. तसेच एक टाटा व्हिक्टा GX-TC-8STR या वाहनात वाहन चालकाशेजारील बकेट सिट नसलेने ए.सी.बाबत तक्रारी येण्याची शक्यता आहे. त्याकरीता GX-TC-7STR हे वाहन खरेदी करण्यात यावे असे ठरले. त्यात एक टाटा सुमो व्हिक्टा CX-10STR खरेदीकामी निम्नतम दर रुपये ४,४५,५५७.०० असलेले सन्या मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच एक टाटा सुमो व्हिक्टा GX-TC-7STR खरेदीकामी निम्नतम दर रुपये ६,०२,१९२.०० असलेले हुंडेकरी मोटर्स प्रा.लि. अहमदनगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**०२)** श्रीसाईबाबा हॉस्पिटलकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, बी.एस्सी.नर्सिंग पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यासाठी पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यांच्या मुलाखती घेण्यात येऊन, त्यांना रुपये ५०००-८००० या वेतनश्रेणीत रुपये ८०००/- या एकत्रित नियतवेतनावर नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. परंतू बी.एस्सी. नर्सेस या पदाची शासनाकडे वेतनश्रेणी ६५००-१०५०० असल्याने एकही उमेदवार हजर झालेला नसल्याने सध्या हॉस्पिटलची गैरसोय होत आहे. याकरिता नेमणूक पत्र देण्यात आलेल्या उमेदवारांना रुपये ६५००-

१०५०० या वेतनश्रेणीत रुपये १००००/- या एकत्रित वेतनावर फेर नेमणूक आदेश देण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०३) श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक असणारी औषधे दर तीन महिन्यांनी खरेदी करण्यात यावे. तसेच रुग्णालयासाठी आवश्यक असणारे औषधे, मशिनरी,उपकरणे व त्या अनुषंगिक निर्णय घेण्याचे अधिकार मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.डॉ.पी.एल तिवारी यांचे समितीस प्रदान करण्यात यावे. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०२** **दिनांक ०२.११.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.८७५.** व्यवस्थापन समितीचे दि.०२.११.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१.कार्डियाक सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये डॉ.एस.एस.भट्टाचार्य (हृदयरोग तज्ञ) हे वेळोवेळी बायपास शस्त्रक्रिया करतात. त्यांनी त्यांचे पुढील शस्त्रक्रियेसाठी अत्यावश्यक सर्जिकल साहित्याची दि.२१/०९/२००६ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यासाठी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनीही या सर्जिकल साहित्यास शिफारस केलेली आहे.

सदरचे सर्व सर्जिकल साहित्य हे जेइस्टर या कंपनीचे आहे. मे.जेइस्टर मेडीझीनटेकनीक यांनी दि.१२/१०/२००६ च्या फॅक्स पत्रान्वये मे.झेनीथ सर्जिकल,मुंबई हे जेइस्टर या कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत विक्रेते आहेत असे कळविले आहे. तसेच मे.झेनीथ सर्जिकल,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक ZS/११०/२००६-०७ दि.२६/०९/२००६ अन्वये त्यांनी त्याचे दर खालील प्रमाणे पाठविले आहे.

| ITEM | DESCRIPTION | QTY | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|
| 03-4605 | Geister Titanium Micro Needle Holder 1.2 mm | 1 | 59625.00 | 59625.00 |
| 03-4566 | Geister Titanium Micro Needle Holder 0.0 mm | 1 | 53105.00 | 53105.00 |
| 03-4625.08 | Geister Titanium Stream Micro Holder | 1 | 61225.00 | 61225.00 |
| 10-4095 | Geister Titanium Micro Atraum Forceps | 1 | 36640.00 | 36640.00 |
| 10-4015 | Geister Titanium Micro Ring Forceps 6” | 1 | 38475.00 | 38475.00 |
| 10-4013 | Geister Titanium Micro Ring Forceps 7” | 1 | 39315.00 | 39315.00 |
| 10-1901 | Geister Gerais Forceps,18cm Cvd | 1 | 7000.00 | 7000.00 |
| | | | Total - | 295385.00 |
| | | | Vat-12.5 % | 36923.125 |
| | | **Total Amt.Rs.** | | **3,32,308.125** |

तरी उपरोक्त सर्जिकल साहित्य मे.झेनीथ सर्जिकल,मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणारे रु.३,३२,३०८.१२५ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त मे.जेइस्टर मेडीझीनटेकनीक कंपनीचे साहित्य कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रुपये ३,३२,३०८.१२५ चे खर्चास मान्यता देणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२. डायलिसीस विभागाकरिता बायकार्ब सोलूशन खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात डायलिसीस हा विभाग कार्यान्वीत झाला असून त्यासाठी बायकार्ब सोलुशनची अत्यंत आवश्यकता असते. डायलिसीस मशीन जेंव्हा पेशंटला जोडलेले असते तेंव्हा सदच्या सोलुशनची आवश्यकता असते. डायलिसीस पेशंटसाठी बायकार्ब सोलुशन हे ताशी १ लीटर याप्रमाणे लागते.

सदरच्या सोलुशनसाठी डायलिसीस विभागाने त्यांचे पत्र क्र.३३३ दि.१८/१०/२००६ अन्वये मागणी केलेली आहे. वार्षीक मागणी करते वेळेस डायलिसीस विभाग कार्यान्वीत नसल्यामुळे सदरच्या बायकार्ब सोलुशनची वार्षीक औषधे खरेदीमध्ये मागणी केलेली नव्हती. सदरचे बायकार्ब सोलुशन त्यांना दर महिन्याला ७५ कॅन (१ Can = १० Lit) लागतात.

सदरचे बायकार्ब सोलुशन हे एक वर्षाकरिता खरेदी करावयाचे आहे तरी एक वर्षाकरिता ९०० कॅन खरेदी करावे लागतील. सदरचे बायकार्ब सोलुशन खरेदीकामी अंदाजे रु.१,५९,१२०/- चा खर्च अपेक्षित आहे सदरची खरेदी ही विहित पध्दतीने करता येईल.

तरी डायलिसीस विभागासाठी बायकार्ब सोलुशन ९०० कॅन कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.१,५९,१२०/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०३. व्हाल्वोप्लास्टीसाठी शिथ व पंक्चर निडल खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात व्हाल्वोप्लास्टीच्या शस्त्रक्रियेसाठी वरील कन्झूमेबल मटेरिअलची आवश्यकता असते. सदरचे साहित्य आपणाकडे शिल्लक नसल्याने दैंनंदिन व्हाल्वोप्लास्टीच्या शस्त्रक्रियेसाठी सदरचे कन्झूमेबल मटेरिअलची आवश्यक आहे.

त्यासाठी तातडीने मुंबई येथून कोटेशन मागविण्यात आले होते ते खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मे.कार्डिओ प्रोडॅक्ट,मुंबई. | ०२ | मे.शुअरटेक मेडीकल,मुंबई. |
| ०३ | मे.प्लस इंटरनॅशनल,मुंबई. | ०४ | मे.बायो डायनॅमिक्स,मुंबई. |

वरील कोटेशन हे प्रशासन शाखेमार्फत उघडून टपालमार्फत प्राप्त झाले आहे.त्याचा तुलनात्मक दरांचा तक्ता खालील प्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty | Bio Dynamics, Mumbai | Plus International, Mumbai | Suretech Medical, Mumbai | Cardio Products, Mumbai | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Arrow Mullin Sheath 8 Fr. | 5 | 4218.75 | 4275.00 | 4387.50 | **3937.50** | **19687.50** |
| 2 | Transseptal Puncture Needle | 5 | 7592.00 | 7696.00 | 7852.00 | **7488.00** | **37440.00** |
| | | | | | **Total Amt. in Rs.** | | **57127.50** |

तरी वरील तुलनात्मक दरांच्या तक्त्यातील विचार करिता निम्नतम दराने प्रत्येकी ५ नग खरेदीस व त्याकामी येणारे रु.५७१२७.५० च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४. बी एफ डब्ल्यू हेडलाईट सिस्टम खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयामध्ये बायपास सर्जरीसाठी मानद सर्जन डॉ.एस.एस.भट्टाचार्य कार्डियाक सर्जन यांची नियुक्ती करण्यात आली असून ते नोव्हेंबरमहिन्यापासून बायपासच्या शस्त्रक्रिया करणार आहेत. डॉ.भट्टाचार्य यांनी त्यांचे दिनांक १६.०८.२००६ चे पत्रान्वये बी एफ डब्ल्यू हेडलाईट सिस्टम खरेदी करण्याची मागणी मागणी केलेली असून त्यातून पडण्याऱ्या पांढ-या प्रकाशामूळे दिर्घ व अवघड शस्त्रक्रिया करतांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही.

सदरचे लाईट सिस्टमसाठी त्यांनी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचेशी चर्चा केलेली आहे. तसेच त्यांनी सदरचे लाईट सिस्टम ही मे.झेनिथ सर्जिकल,मुंबई यांच्याकडे उपलब्ध असल्याची शिफारस केलेली आहे.

सदरचे सिस्टमसाठी मे.झेनिथ सर्जिकल, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.ZS/७६/२००६-२००७ दिनांक १२.८.२००६ अन्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| ITEM | DESCRIPTION | QTY | RATE |
|---|---|---|---|
| MID-7800 | BF Highbeam classicHeadlight | 01 | 98,000.00 |
| MID-3010 | BFW maxenon Xi 300 w Xenon lightsource | 01 | 3,25.000.00 |
| | | | 4,23,000.00 |
| | + Vat 12.5% | | 59,484.375 |
| | Total Amount | | 4,75,875.00 |

तरी उपरोक्तप्रमाणे बी एफ डब्ल्यू हेडलाईट सिस्टम मे.झेनिथ सर्जिकल, मुंबई यांचेकडून खरेदी करणस व त्याकामी येणारे रुपये ४,७५,८७५.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू विषय तहकुब ठेवण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५. अल्ट्रा सोनिक क्लिनर खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात जनरल ओ.टी.मध्ये लॅप्रोस्कोपीक इन्स्टुमेंटच्या साह्याने शस्त्रक्रिया केली जाते. हे लॅप्रोस्कोपीक शस्त्रक्रियेनंतर इन्स्टुमेंट नियमितपणे साफ करावे लागतात. सदरचे इन्स्टुमेंट हे नाजूक आसल्याने त्यांची जास्त प्रमाणात हाताळणी करु शकत नाही. जास्त हाताळणी केल्याने सदरचे लॅप्रोस्कोपीक इन्स्टुमेंट हे लवकर खराब होऊ शकते.

त्यासाठी जनरल ओ.टी.विभागातील डॉ.कुलदिप वाघ यांनी सदरचे इन्स्टुमेंट साफ करण्यासाठी वरील अल्ट्रा सोनिक क्लीनरची तातडीने मागणी केलेली आहे सदरचे एक नग अल्ट्रासोनिक क्लीनरसाठी अंदाजे रु.६०,७५०/- इतका खर्च येणार आहे.

तरी सदरचे अल्ट्रासोनिक क्लीनर कोटेशन्स मागवून एक नग खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.६०,७५०/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०६. ५ के.व्ही.ए. चा यु.पी.एस खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात डिजिटल रेडीओग्राफी मशिनचा पुरवठा आदेश मे.कोडॅक इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना इकडील पत्र क्रमांक ८०१६ दि.१९/०६/२००६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर मशिनची डिलेव्हरी दि.०१/१०/२००६ रोजी प्राप्त झालेले असून सदर मशिन रुग्णालयात बसवून कार्यान्वीत करणेसाठी एक ५ के.व्ही.ए.चा यु.पी.एस. ची आवश्यकता आहे. सदर कंपनी मशिनसोबत यु.पी.एस.चा पुरवठा करणार नाही असे त्यांना विचारणा केली असता समजले.

रुग्णालयाचे रेडीओलॉजिस्ट डॉ. सचिन आनंद यांनी दि.०६/०९/२००६ चे अर्जामध्ये ५ के.व्ही.ए. हा यु.पी.एस. एक नग खरेदी बाबत कळवले आहे

सदरचे खरेदीकामी रु.९०,०००.०० पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा यु.पी.एस. हा तातडीने आवश्यक असल्याने याकामी खालील अधिकृत विक्रेते / उत्पादक कंपनीचे कोटेशन फॅक्सवर मागविण्यात आले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मे. अे.आर.एम. इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि.,पुणे. | ०२ | मे. कन्सोल कन्सॉलिडेटेड प्रा.लि.,मुंबई. |
| ०३ | मे. भवानी डिजीटल सिस्टम प्रा.लि.,मुंबई. | ०४ | मे. मिनीटेक कॅम्प्युटर शॉपी. |

उपरोक्त कोटेशनचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठा धारकाचे नाव | दर प्रति नग |
|---|---|---|
| १ | मे. अे.आर.एम. इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि.,पुणे. | ६७,६००.०० |
| २ | मे. भवानी डिजीटल सिस्टम प्रा.लि.,मुंबई | ७६९६०.०० |
| ३ | मे. कन्सोल कन्सॉलिडेटेड प्रा.लि.,मुंबई. | ८८,४००.०० |
| ४ | मे. मिनीटेक कॅम्प्युटर शॉपी. | ११९६००.०० |

आपणास १ नग खरेदी करावयाचा असून उपरोक्त दरांचा विचार करता मे. अे.आर.एम. इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि., पुणे यांचे दर हे निम्नतम दिसून येतात. तांत्रीक बाबींचा विचार करता रुग्णालयाचे रेडीओलॉजिस्ट डॉ. सचिन आनंद व बायोमेडीकल इंजिनीअर यांनी मे. भवानी डिजीटल सिस्टम प्रा.लि.,मुंबई या कंपनीचा यु.पी.एस. खरेदी करणे अधिक उपयुक्त होईल असे सुचविले होते. तसेच उपरोक्त यु.पी.एस.ची तातडीने गरज असल्याने मे.भवानी डिजीटल सिस्टम प्रा.लि.,मुंबई यांचेकडून ५ के व्ही.ए.चा एक नग रु.७६.९६०/- ला मा.व्यवस्थापन समितीच्या मंजुरीचे अधीन राहून खरेदी करण्यात आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७. <u>ब्लड गॅस अॅनालायझरचे केमिकल्स खरेदीबाबत.</u>**

श्रीसाईबाबा रुग्णालयात प्रयोगशाळा विभागात रक्त लघवीच्या विविध तपासण्या करणेसाठी मे. रोश डायग्नोस्टीक लि. या कंपनीकडून रु.६,७५,०००/- इतक्या किंमतीत ब्लड गॅस अॅनालायझर मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचे मशिनवर तपासण्या करणेकामी त्यांचेच कंपनीचे केमीकल्स वापरावी लागतात. त्यासाठी मे.रोश डायग्नोस्टीक, मुंबई यांना दुरध्वनी करुन सदरचे केमीकल्सचे पुरवठा करणेबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यांनी मे.टु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि.,मुंबई हे त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून केमीकल्सचे कोटेशन पाठविले होते. त्यांनी पाठविलेल्या कोटेशनमधील दरानुसार दोन महिने पुरु शकतील इतक्या केमीकल्स खरेदीचा रु. ७७०२८.७५/- चा प्रस्ताव उपसमिती सभा दि. २४/०६/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन, सध्या वरीलप्रमाणे खरेदीस मान्यता देण्यात येत आहे. तथापी येथून पुढे सदर कंपनीस पत्र पाठवून त्यांचेकडून इतर अधिकृत विक्रेत्यांचे देखील दर मागविण्यात यावे, असे ठरले.

त्यानुसार मे. रोश डायग्नोस्टीक लि., मुंबई यांना इकडील पत्र क्र. ८४६१ दि. २९/०६/२००६ अन्वये त्यांचेकडून त्यांचे इतर अधिकृत विक्रेते यांचे पुर्ण पत्ते पाठविणेबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यांनी दि. २१/०७/२००६ च्या ई-मेल व्दारे मे. टु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई हे आमचे एकमेव अधिकृत विकेते असल्याचे कळविले आहे. मे. टु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यांनी त्याप्रमाणे मालाचा पुरवठा देखील केलेला आहे. यापुर्वी आपण त्यांचेकडून केमीकल्स खालील दराने खरेदी केलेले आहेत.

| अ.नं. | केमीकल्सचे नाव | मागणी | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Calibration Solution C1 | २ | १०४१५.०० | २०८३०.०० |
| २ | Calibration Solution C2 | २ | १०४१५.०० | २०८३०.०० |
| ३ | Fluid Pack C3 | २ | १३४०५.०० | २६८१०.०० |
| | | | एकुण - | ६८४७०.०० |
| | | | VAT - | ८५५८.७५ |
| | | | एकुण रु. - | ७७०२८.७५ |

वरीलप्रमाणे केमीकल्स हि पुन्हा खरेदी करावयाची आहेत. ती साधारणतः दोन महिने पुरु शकतील. सदर केमीकल्सची वार्षीक खरेदीमध्ये मागणी केली असून ती उपलब्ध होण्यास अजुन दोन महिने लागतील.

वरीलप्रमाणे केमीकल्स मे. टु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व येणारा खर्च रु. ७७,०२८.७५ चे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. उपसमिती सभा दि. ०६/०९/२००६ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन, उपसमितीचे सदस्यांनी दि. ११/०९/२००६ रोजी समक्ष पुणे येथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले होते.

त्यानुसार उपसमितीचे सदस्य मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर व मा. श्री. पांडुरंग ग. अभंग यांनी समक्ष पुणे येथील निरामय हॉस्पिटल येथे जाऊन डॉ. सरनोत यांचेशी चर्चा केली होती. त्यांनी सदरचे केमीकल्स मे. रोश डायग्नोस्टीक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ट्रु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेबाबत सुचविले होते. सदरचे केमीकल्ससाठी वार्षिक निविदेमध्ये मागणी केली होती परंतु त्यासाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. तेंव्हा एक वर्षाकरीता सदर मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. तो खालीलप्रमाणे-

| अ.नं. | केमीकल्सचे नाव | मागणी | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Calibration Solution C1 | १२ | १०४१५.०० | १२४९८०.०० |
| २ | Calibration Solution C2 | १२ | १०४१५.०० | १२४९८०.०० |
| ३ | Fluid Pack C3 | १२ | १३४०५.०० | १६०८६०.०० |
| | | | एकुण - | ४१०८२०.०० |
| | | | VAT - | ५१३५२.५० |
| | | | **एकुण रु. -** | **४६२१७२.५०** |

तरी वरीलप्रमाणे एक वर्षाचे केमीकल्स हे मे. ट्रु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रुपये ४,६२,१७२.५० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८. कलर डॉप्लर मशिनसाठी IMS Software खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात कलर डॉप्लर मशिन सन २००५ साली मे सिमेन्स लि.मुंबई यांचेकडून रु. १९,००,०००/- किंमतीस खरेदी करण्यात आलेले आहे. सदर मशिनवर IMS Software नाही. सदरचे सॉफ्टवेअर बसविल्यास खालील प्रकारे फायदा होऊ शकतो.

१) उच्च दर्जाचे प्रतिबिंब दिसेल व वेगवेगळया प्रतिबिंबाची प्रिंट मिळेल.

२) एकाच वेळी प्रतिबिंब दिसेल व छायाचित्र मिळेल.

३) सजीव छायाचित्राबरोबर पूर्ण माहिती मिळेल.

४) वेगवेगळया छायाचित्रांची, माहितीची, महत्वाची टिप्पणी CD मध्ये राईट करता येतील.

या कामी मे.मेड सिनॅपटीक प्रा.लि.पुणे यांनी त्यांचे पत्र क्रमांक MED/२K६/SP/७२६१ दि.२५/०९/२००६ अन्वये प्रती नग ४०,५६०.०० असे दर कळविले आहेत. त्यावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी शिफारस केली असून रुग्णालयाचे रेडीओलॉजिस्ट डॉ. सचिन आनंद यांनी देखील शिफारस केली आहे.

तरी मे.मेड सिनॅपटीक प्रा.लि.पुणे यांचेकडून सदरचे ISM Software खरेदीस व याकामी येणारे रु.४०,५६०.००चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कलर डॉप्लर मशिनसाठी लागणारे ISM Software चे स्पेसिफिकेशन्स निश्चित करुन याकामी कोटेशन्स मागविण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०९. आय.ओ.एल. लेन्स खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशस उघडणेबाबत.**

श्रीसाईबाबा रुगणालयात नेत्रशल्य चिकित्सा विभागात विविध प्रकारचे लेन्स (भिंग) ची आवश्यकता असते. वार्षीक औषधे खरेदी मध्ये सदरचे लेन्सची मागणी केलेली आहे परंतु त्या साध्या (Indian) आहे. आपल्याला Imported Lens खरेदी करावयाच्या आहे. त्यासाठी खालील कंपन्यांचे कोटेशन दुरध्वनीवरुन मागविले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Sanghavi Enterprise, Mumbai | 02 | Sanghavi Enterprise, Mumbai |
| 03 | Surgicon, Mumbai. | 04 | Crystal Distributors, Surat |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उधडण्यात आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Particular | Saghvi, Mumbai | | Surgicon, Mumbai | |
|---|---|---|---|---|---|
| 01. | INTRA OCULAR LENSES | | | | |
| | | PMMA | 650-990-2449-2709 | | 1200 |
| | | Foldable | 2290-2270-3125-3970-4305-6500 | | 3000 |
| | | Multifocal-Re 300m | | Multifocal | 3000 |
| | | -Array- | 27154(Total Cost) | | |
| | | Tecnic Multifocal | | | |
| | | | | Megacrom | |
| 02. | Opthalmic Sutures | 10-0 Nylon (S)- | 1100 | **१०८% Sodiim** | 1500 |
| | | 10-0 Nylon (D)- | 1800 | **Hydronate** | |
| | | 9-0 Nylon (S)- | 1000 | Visicrom | |
| | | 9-0 Nylon (D)- | 1700 | **२%Of HPMC** | 1100 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 8-0 V.Silk (S)- | 950 | | |
| | | 8-0 V Silk (D)- | 1600 | **Microsurgery Kinfe** | 300 |
| | | Scleral Fixation- | 330 | | |
| | | Sutures | | **Occuat Opthaimic** | 150 |
| 03. | Aurolab Medicine | Visco elastic 3 ml | 53 | **Speciality Biade** | |
| | | Visco elastic 5 ml | 65 | | |
| | | Visco elastic 2 ml | 85 | | |
| | | Trypan Blue ml 0.6% | 90 | | |
| | | Trypan Blue ml 0.15% | 260 | | |
| | | Sillicon Oil | 1750 | | |
| | | PFCL | 2350 | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१०. <u>मायक्रोबायलॉजी विभागाकरिता साहित्य/केमिकल्स खरेदीबाबत.</u>**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागास मायक्रोबायलॉजी हा विभाग कार्यान्वीत करावयाचा आहे. यासाठी श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे पॅथालॉजीस्ट डॉ.न्यायाधीश यांनी सदरच्या विभागासाठी लागणारे साहित्य व केमिकल्सची मागणी केलेली आहे.

मायक्रोबायलॉजी हा विभाग रुग्णालयातील सर्व ओ.टी. निर्जंतुक करण्याचे काम करते तसेच सुक्ष्मदर्शक तपासण्या करणेचे काम करते. त्यासाठी त्यांना खालीलप्रमाणे साहित्य व केमिकल्सची आवश्यकता आहे सदरचे साहित्य व केमिकल्ससाठी अंदाजे खर्च रु.१,९१,२७६.०० इतका येणार आहे.

**Instrument Requirement :**

| Sr.No. | Name Of Medium | Qty.Required | Approx.Price |
|---|---|---|---|
| 1 | Laminar chember<br>Specification : Vertical air flow, size : 2/3 feet<br>UV Light along with Hepa Filters. | 1 | 55,000/- |
| 2 | Digital Weighing Balance<br>Specification : Min 10 gm to max.3 – 4 Kg. | 1 | 2000/- |
| 3 | Distillation Unit<br>Specification : Distillation Capacity 10 Ltrs / Day | 1 | 16,000 to 30,000/- |
| 4 | Microscope<br>Specification : Binocular light Microscope | 1 | 35,000/- |
| 5 | Nutrient Agar Mediun ( Himedia Code No.M001 ) | 1 X 500 gm. | 1250/- |
| 6 | Blood Agar Base No.2 ( Himedia Code No.834 ) | 1 X 500 gm. | 1095/- |
| 7 | MacConkey Agar( Himedia Code No.M008 ) | 1 X 500 gm. | 1090/- |
| 8 | Agar Agar Powder ( Himedia Code No.RM666 ) | 1 X 500 gm. | 195/- |
| 9 | Muller Hinton Agar ( Himedia Code No.M0184 ) | 1 X 500 gm | 1550/- |
| 10 | CLED Agar ( Himedia Code No.M792 ) | 1 X 500 gm. | 1346/- |
| 11 | BHI Medium ( Himedia Code No.M210 ) | 1 X 500 gm. | 1200/- |
| 12 | RCM anerobic medium ( Himedia Code No.M149 ) | 1 X 500 gm. | 1500/- |
| 13 | Sabourod's Dextrose Agar ( SDA ) | 1 X 500 gm. | 2000/- |
| 14 | Peptone ( Himedia Code No.M028 ) | 1 X 500 gm. | 1200/- |
| 15 | Sodium deoxycholate | 1 X 500 gm. | 1000/- |
| 16 | Simon's Citrat Agar | 1 X 500 gm. | 1500/- |
| 17 | Christensen's Urea Medium | 1 X 500 gm. | 1500/- |
| 18 | Kovac's reagent | 1 X 500 ml. | 500/- |
| 19 | Di potassium Hydrogen Phosphate | 1 X 500 gm. | 1000/- |
| 20 | Tryptone | 1 X 250 gm. | 500/- |
| 21 | Mannitol salt Agar | 1 X 500 gm. | 1500/- |
| 22 | NaCl | 1 X 250 gm. | 100/- |
| 23 | Oxidase Reagent Strip | 2 Packs | 1000/- |
| 24 | MR-VP medium | 1 X 500 gm. | 2000/- |
| 25 | TSI medium | 1 X 500 gm. | 2500/- |
| 26 | Mannitol | 1 X 250 gm. | 1500/- |
| 27 | Lactose | 1 X 250 gm. | 1500/- |
| 28 | Sucrose | 1 X 250 gm. | 1500/- |
| 29 | Glucose | 1 X 250 gm. | 1500/- |
| 30 | Blood Culture Bottles (BHI Bottle )<br>Paediatrice ( LQ 003 )- 10 X 20ml.<br>Adult ( LQ003A )- 10 X 70ml. | 20 Bottles<br>20 Bottles | 15000/- |
| 31 | Antibiotic Multi disc<br>a) Gram positive<br>b) Gram negative<br>c) Urinary Tract Infection | 50 each | 300/- |
| 32 | Gram Stain Kit | 1 Pack | 150/- |
| 33 | Acid Fast Stain Kit ( ZN Stain ) | 1 Pack | 150/- |
| 34 | India Ink | 1 X 250 ml. | 100/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | Albert's Stain Kit | 1 Pack | 150/- |
| 36 | Methylene Blue | 1 X 250 ml. | 100/- |
| 37 | Lactophenol Cotton blue | 1 X 250 ml. | 100/- |
| 38 | Giemsa's Stain Kit | 1 Pack | 100/- |
| 39 | Neutral Red | 1 X 250 ml. | 100/- |
| 40 | Phenol Red | 1 X 250 ml. | 100/- |
| 41 | KOH solution | 1 X 250 ml. | 150/- |
| 42 | Methanol | 1 X 250 ml. | 50/- |
| 43 | Paraffin Oil | 1 X 50 ml. | 100/- |
| 44 | Petri Plates ( 18 cm. )<br>a) Glass petri plates<br>b) Plastic petriplates ( autoclavable ) | <br>1 X 100<br>1 X 50 | 2500/- |
| 45 | Test Tubes<br>a) 12 X 75 mm (Small )<br>b) 18 X 150 mm ( big )<br>c) Sugar tubes | <br>1 X 50<br>1 X 50<br>1 X 50 | 1500/- |
| 46 | Conical Flask<br>a) 250 ml.<br>b) 500 ml.<br>c) 100 ml. | <br>6<br>6<br>6 | 7800/- |
| 47 | Micro slides | 50 X 10 | 150/- |
| 48 | Measuring Cylinder ( Plastic )<br>a) 250 ml.<br>b) 500 ml.<br>c) 100 ml. | <br>1<br>1<br>1 | 1500/- |
| 49 | Anerobic culture bottle<br>( Swab culture / RCM ) | 50 | 5000/- |
| 50 | Durham's fermentation tubes | 50 | 500/- |
| 51 | Bulb for BHI medium | 50 | 500/- |
| 52 | Nichrome wire loop | 10 pieces | 200/- |
| 53 | Forcepts | 10 pieces | 200/- |
| 54 | Autoclavable bags ( Plastic ) | 6 bundles | 150/- |
| 55 | Test tube racks ( Stainless Steel ) | 4 pieces | 500/- |
| 56 | Petri plates Tray ( Big ) size – 3 / 2 feet | 4 pieces | 500/- |
| 57 | Marker pens | 4 pieces | 100/- |
| | | App.Total Amt.Rs. | 1,91,276/- |

सदरचे मागणीमधील केमिकल्स हे विभाग सुरु करण्यापुरते मागविले आहे. प्रत्यक्षात त्याचा खप पाहून पुढील मागणी करावी लागणार आहे.

तरी उपरोक्त मायक्रोबायलॉजी साहित्य व केमिकल्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,९१,२७६.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**११. श्री.शिवकुमार शरणप्पा बोलशेट्टी यांना कॅंसर उपचारासाठी अॅडव्हास देणेबाबत.**

श्रीशिवकुमार शरणप्पा बोलशेट्टी यांना तोंडाचा कॅन्सर या आजाराचा त्रास आहे. श्री. बोलशेट्टी हे श्री साईनाथ रुग्णालयातील डॉ. राम नाईक यांचे सल्ल्यानुसार टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, मुंबई येथे कॅन्सर थेरपीचे उपचार घेत आहे. श्री. बोलशेट्टी दि. २७/०४/२००६ रोजी टाटा मेमोरीयल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना केमोथेरपीच्या आणखी सहा सायकल (Cycle) घेण्याबाबतची शिफारस केली होती.

त्यानुसार त्यांनी त्यांचे दि. २९/०४/२००६ चे पत्रान्वये एकुण सहा सायकलसाठी एकुण रु. ४,२०,०००/- इतक्या रक्कमेची मागणी केली होती. दि. १३/०६/२००६ चे मंजुर टिपणी अन्वये आतापर्यंत सहा सायकलसाठी रु. ४,१०,०००/- इतकी आगाऊ रक्कम टाटा मेमोरीयल हॉस्पिटलचे नावाने दिली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| ०१. | दि. १२/०५/२००६ ची टिपणी अन्वये रु. ७०,०००/- |
| ०२. | दि. १३/०६/२००६ ची टिपणी अन्वये रु. ६०,०००/- |
| ०३. | दि. २८/०६/२००६ ची टिपणी अन्वये रु. ७०,०००/- |
| ०४. | दि. २५/०७/२००६ ची टिपणी अन्वये रु. ७०,०००/- |
| ०५. | दि. २६/०८/२००६ ची टिपणी अन्वसे रु. ७०,०००/- |
| ०६ | दि. २६/०९/२००६ ची टिपणी अन्वसे रु. ७०,०००/- |
| | एकुण रु. ४,१०,०००/- |

श्री.बोलशेट्टी यांना त्याच आजारावरील पुढील केमोथेरपीच्या सायकल घेण्यासाठी टाटा मेमोरीयल हॉस्पिटलने दि. ११/१०/२००६ चे पत्रान्वये रु. ९,००,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख) इतका खर्च कळविला आहे. श्री. बोलशेट्टी यांनी त्यांचे दि. १७/१०/२००६ चे अर्जान्वये रु. ९,००,०००/- ची संस्थानकडे अर्थिक मदत मिळणेबाबतची मागणी कलेली आहे. श्री. बोलशेट्टी यांना एकुण १२ सायकल दर सात दिवसाचे अंतराने घ्यावयाचे असून प्रत्येक सायकलसाठी अंदाजे रु. ७५,०००/-

इतका खर्च येणार आहे. तेंव्हा श्री. बोलशेट्टी यांना सदरची रक्कम वेळोवेळी आगाऊ दयावी लागणार आहे. तसेच सदरच उपचारासाठी यापूर्वी अगाऊ दिलेली रक्कम रुपये ४,१०,०००/- असे एकूण १३,१०,००० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**१२. राहाता, कोपरगाव तालुक्यातील पुरग्रस्त रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा देणेबाबत.**

राहाता, कोपरगांव व इतर भागातील पुरग्रस्त रुग्णांना तातडीची सेवा पुरविणेसाठी श्री साईनाथ रुग्णालयात सोय करण्यात आली होती.

सदर पुरग्रस्त लोकांवर एक नैसर्गिक संकट येऊन पडलेले आहे. मानवतेच्या दष्टीकोनातुन सदर पुरग्रस्त रुग्णांवर उपचार करणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे सदर रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयात उपचार केलेले आहे.

तसेच सदर रुग्णांवर मोफत तपासणी व उपचार करण्यात यावेत म्हणून मा. कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १०/०८/२००६ चे साईनाथ रुग्णालयाचे टिपणीने मान्यता दिली आहे.

त्यानुसार खाली नमुद केले प्रमाणे पुरग्रस्त रुग्णांवर तपासणी व उपचार करण्यात आलेले आहेत. त्याकामी रुग्णांचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे रुग्णांचे एकुण बीलाची रक्कम व माफ केलेल्या बिलाची रक्कम दर्शविलेली आहे.

| अ.न. | ओपीडी नं. | आय.पी.नं. | पेशंटचे नाव | गाव | भरलेले बील | माफ केलेली बील | एकुण बील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८९८९५ | ५३८४ | श्री बन्सी मारुती खेरे | एकलहरे | - | २४३/- | २४३/- |
| २ | ८९८९१ | ५३९४ | श्री विठ्ठल गणपत सोनवणे | शिंगवे | - | ४४६/- | ४४६/- |
| ३ | ८९८७८ | ५३८३ | श्री बाबासाहेब पगारे | शिंगवे | - | १०६/- | १०६/- |
| ४ | ८९९०१ | ५३८१ | सौ. जिजाबाई वसंत पवार | शिंगवे | - | ३४६/- | ३४६/- |
| ५ | ९१९५९ | ५४२२ | श्री रामभाऊ नारायण पगारे | शिंगवे | - | ५१९/- | ५१९/- |
| ६ | ९११९९ | ५४२९ | श्री बाबासाहेब गणपत बाभुळके | शिंगवे | २००/- | ६८/- | २६८/- |
| ७ | ८९३९३ | ५३६७ | श्री कपिल बी बनकर | पुणतांबा | २३०/- | - | २३०/- |
| ८ | ८९३२५ | ५३४६ | श्री शांताराम तुळशीराम जगताप | कल्याण | - | २२३/- | २२३/- |
| | | | | | **४३०/-** | **१,९५१/-** | **२,३८१/-** |

वरील प्रमाणे एकुण आठ पुरग्रस्त रुग्णांवर उपचार केले असून त्यांचे एकुण रु. २,३८१/- बील झालेले आहे. त्यापैकी रु. १,९५१/- मात्र माफ केलेले आहे. पैकी दोन रुग्णांनी स्वत:हुन बिलाची रक्कम भरलेली आहे त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**१३. पोर्टेबल अल्ट्रा साऊंड मशिन खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजिस्ट डॉ.सचिन आनंद यांनी दि.२६/०६/२००६ च्या पत्रान्वये १ नग पोर्टेबल अल्ट्रा साऊंड मशिनची मागणी केली होती. सदरचे मशिन खरेदीचा खर्च रु. ४ लाखांचा प्रस्ताव दि.०५/०७/२००६ चे वैद्यकिय समितीच्या सभेपुढे ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार इकडील पत्र क्रमांक ९३९५ दि.०७/०७/२००६ अन्वये दि. ३०/०७/२००६ अखेर एकुण ५ अधिकृत विक्रेते/उत्पादक कंपनीचे कोटेशन मागवण्यात आले होते.त्यापैकी खालील दोन कोटेशन प्राप्त झाले आहेत

१) मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि,पुणे  २) मे. विप्रो जीई मेडीकल,मुंबई.

तरी वरील सिलबंद कोटेशन मा.वैद्यकिय उपसमिती सभा दि.२३/०९/२००६ रोजी समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करणेत आला होता, तो खालीलप्रमाणे

| | L & T | Wipro G.E |
|---|---|---|
| | Model –Selectra LX | Model-Logiq alfa 100mp |
| 01. | Electronic probe convex probe 3.5MHZ & Linear 7.5MHZ | C 36.5 MHz Convex probe |
| 02. | weight-10kg. | Weight- Less than 10 kg |
| 03. | Software Abdomen/obs/Gynec/Cardiology/Urology/small parts | OB/ Gyn/ ABD/ Cardio/ uro |
| 04. | input 230 V/ 5 Amp. A.C. | |
| 05. | Display Screen 7" Noninterlaced | Display screen 7" |
| 06 | Image memory- 100 image, Report memoty- 40 reports, 32 Frame cine memory (optional) | 16 Frame permanent memoty, 32 Frame cine memoty |
| 07. | T.G.C. Provided | T.G.C. Provided |
| 08. | Mode- B, B+B, 4B, B+M, B/M, M | Mode- B, B+M, B+B, M |
| 09. | Gray scale 256 | Gray scale 256 |
| 10. | UPS Provided | UPS Not provided |

| | | |
|---|---|---|
| 11. | Warranty 12 month | Warranty 12 month |
| | Rs 5,22,500.00 | Rs 425000.00 |
| | With Accessaries as follow: | With Accessaries as follow: |
| | | 7.5 MHz Probe- Rs 125000.00 |
| | Sony Thermal Printer – Rs 40,000.00 | Sony Thermal Printer- Rs 45000.00 |
| | | Dual Probe Connector- Rs 25000.00 |
| | Rs 5,62,500.00 | Rs 6,20,000.00 |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करीता मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि,पुणे.यांचे दर निम्नतम आहेत. परंतु सदर मशिनचे टेक्नीकल स्पेशिफिकेशनचा विचार करता रुग्णालयातील रेडीओलॉजिस्ट डॉ.सचिन आनंद यांनी मे.विप्रो जीई मेडीकल,मुंबई यांचे मशिन चांगले असून ते घेण्याची शिफारस केलेली आहे.

वरील दोन्ही पुरवठाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता,पैकी मे.लार्सन ॲण्ड ट्यूब्रो लि.,पुणे हे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा/वाटाघाटी केली असता, त्यांनी देऊ केलेल्या दरात यु.पी.एस.सह ५% सुट देऊ केली आहे. तथापि तांत्रिक बार्बीचा विचार करता मे. विप्रो जीई मेडीकल,मुंबई यांचे दर जरी जास्त दिसत असले तरी मशिन योग्य आहे. तसेच त्यांनी मशिन सोबत देऊ केलेल्या ॲक्सेसरीजच्या किंमतीचा विचार करता मे. विप्रो जीई मेडीकल,मुंबई यांची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१४. <u>जयपूर फुट शिबीर आयोजनाबाबत.</u>**

दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी तर्फे मोफत अपंग शिबीर ( जयपूर फुट शिबीर ) ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांच्या सहकार्याने घेणेत येत असते. परंतु प्रशासन शाखेने दिनांक १४/०८/२००६ चे टिपणी अन्वये उपरोक्तप्रमाणेच विशाखापटटणम येथील, प्रेमा हॉस्पीटलचे श्री. एस. श्रीनिवास यांचे संस्थेमार्फत सदर शिबीर आयोजनाबाबत कळविले होते. या टिपणी अन्वये एस. श्रीनिवास यांनी सदर शिबीरासाठी श्री साईबाबा संस्थानने प्रथम शिबीर आयोजनाची मागणी करणे गरजेचे आहे. मागणी केल्यानंतर आम्ही आपणाला माहिती व सदर शिबीर कामी येणा-या खर्चाबाबत कळवू तसेच या शिबीरासाठी ॲडव्हान्स रक्कम म्हणून रु.२,००,०००/- अगोदर पाठवावे, नंतर शिबीराचे तारखेबाबत निश्चीत कळविले जाईल असे नमुद केले होते. त्यास अनुसरुन विशाखापटटणम येथील, प्रेमा हॉस्पीटलचे श्री. एस. श्रीनिवास यांना जा.नं. एसएसएस/एसएसएच/ १२५२८/२००६ दिनांक १४/०९/२००६ अन्वये पत्र पाठवून शिबीर आयोजनाबाबत माहिती मागविण्यात आलेली होती. परंतु आजपर्यंत त्यांचे कडून कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.

तसेच दरवर्षी सदर शिबीर नोव्हेंबर महिन्याच्या सोईस्कर तारखेस आयोजित केले जाते. चालू वर्षीही सदर शिबीर नोव्हेंबर २००६ चे सोयीस्कर तारखेस आयोजनाबाबतचा प्रस्ताव ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांना जा.नं.एसएसएस/एसएसएच/१११०१/२००६ दिनांक १८/०८/२००६ अन्वये पाठविणेत आलेला होता. त्यासअनुसरुन ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांचा दिनांक २४/१०/२००६ रोजी शिबीर आयोजनाबाबतचा फॅक्स प्राप्त झाला आहे. त्यात त्यांनी सदर शिबीर १८ नोव्हेंबर २००६ पासून आयोजित करता येईल. तसेच शिबीरात तयार केलेल्या पायांचे दर हे मागील वर्षीप्रमाणेच राहतील याबाबत कळविले आहे.

गेल्या १५ वर्षापासून आपण ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांचे सहकार्याने उपरोक्त शिबीर आयोजित करीत आहोत. ही संस्था अपणाला ना नफा - ना तोटा या तत्वावर शिबीर कामी सहकार्य करत आहे. त्यानुसार दिनांक १४/०८/२००६ रोजीचे टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी साहेब व वैद्यकीय अधिक्षिका यांचेत झालेल्या चर्चेप्रमाणे आपले प्रत्येक वर्षीच्या प्रथेनुसार ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांचे मार्फत शिबीर घेणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी निर्देश दिलेले आहे.

या शिबीरात १५० ते २०० रुग्ण लाभ घेतील असा अंदाज आहे. प्रस्तुतचे शिबीरासाठी साधारण खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | अ) गुडघ्याखालील पाय रुपये ८००/- प्रत्येकी १२५ पायांकरिता<br>ब) गुडघ्यावरील पाय रुपये १२५०/- प्रत्येकी ७५ पायांकरिता | १,००,०००/-<br>९३,७५०/- |
| ०२ | वर्कशॉप कामास आलेल्या कुशल तंत्रज्ञ यांना ( १० कारागिरांना) रुपये १००/- प्रत्येक दिवसाला ०८ दिवसाकरिता मानधन रुपये -<br>जेवण, चहा, नाष्टा अंदाजे खर्च रुपये - | ८,०००/-<br>१,५००/- |
| ०३ | रुग्ण व नातेवाईक यांना सकाळी व संध्याकाळी जेवणासाठी प्रसादालयामार्फत शिबीराचे ठि ०८ दिवसाकरिता जेवण व चहा दयावा लागेल. यासाठी<br>अंदाजे खर्च रुपये - १५० रुग्ण व १५० नातेवाईक यांना दोन वेळेकरिता<br>जेवण व दोन वेळेकरिता चहा. | २६,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०४ | या शिबीराच्या प्रचाराकरिता खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.<br>अ) वर्तमान पत्रात जाहिरात (सकाळ, सार्वमत, लोकसत्ता, गावकरी, लोकमत, सामना, पुण्यनगरी यांचे स्थानिक आवत्तीमध्ये) करिता येणारा खर्च रुपये -<br>ब) कापडी बॅनर्स ०६ नग परिसरात लावणेसाठी, व ०१ नग उदघाटन समारंभासाठी चा अंदाजीत खर्च रुपये - | २२,०००/-<br>५,०००/- |
| ०५ | कंत्राटी कर्मचारी - वर्कशॉप करिता ०४ कंत्राटी कर्मचारी ०८ दिवसाकरिता तसेच उदघाटन समारंभाकरिता ०५ कर्मचारी ०१ दिवसासाठी आवश्यक आहे. | ४,०००/- |
| ०६ | फेविकॉल व गॅस सिलेंडर इत्यादीसाठी अंदाजीत खर्च रुपये - | ८,०००/- |
| ०७ | इतर अचानक होणा-या किरकोळ खर्चासाठी रुपये - | ५,०००/- |
| | **एकुण अंदाजीत खर्च रुपये -** | **२,७३,२५०/-** |

वरील प्रमाणे जयपुर फुट शिबीर आयोजित करण्यास अंदाजे रु. २,७३,२५०/- ( अक्षरी रुपये दोन लाख त्र्याहत्तर हजार दोनशे पन्नास ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर शिबीर दिनांक २५/११/२००६ पासून आयोजित करावे असे ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांनी कळविले आहे.

तरी वरीलप्रमाणे जयपूर फुट शिबीर ग्रामिण आरोग्य प्रकल्प, जामखेड यांचे मार्फत आयोजित करणेस व येणा-या अंदाजे रुपये २,७३,२५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**१५. <u>प्रसादालयातील कामगारांची वैद्यकीय तपासणीकामी केमिकल्स खरेदीबाबत.</u>**

श्रीसाईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागातील एकुण ७६० कर्मचाऱ्यांची वैद्यकिय तपासणी करणेकामी श्री साईनाथ रुग्णालय विभागात त्यांचे १४/१०/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे. सदरचे वैद्यकिय तपासण्यामध्ये खालील प्रकारच्या तपासण्या करण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १) एच.बी. | ३) युरिन | ५) विडाल |
| २) सी.बी.सी. | ४) स्टुल | ६) एक्स - रे चेस्ट. |

श्री साईनाथ रुग्णालय विभागातील प्रयोगशाळा विभागाने खालील केमिकल्सची मागणी केलेली आहे. सदरचे केमिकल्ससाठी सन २००६-०७ या वर्षा करिता वार्षिक ऑर्डर देण्यात आलेल्या आहे. सदरचे मंजुर दराने सबंधीत पुरवठाधारकांकडून केमिकल्स खरेदी करता येईल. ते खालीलप्रमाणे-

| अ.नं. | केमिकल्सचे नाव | मागणी | मंजुर दर | एकूण किंमत | पुरवठा धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Auto dil | 5 x 20 Ltr. | 1649.4489 | 8247.2445 | Universal Chemi, Nashik |
| 2 | Auto clean | 2 x 2 Ltr. | 568.4810 | 1136.962 | Universal Chemi, Nashik |
| 3 | Auto lyse | 5 x 500 ml | 2485.5620 | 12427.81 | Universal Chemi, Nashik |
| 4 | Leshmain Stain | 1 Bottle | 139.65 | 139.65 | J.S.P. Surgical, Nashik. |
| 5 | Slide Box | 10 Box | 30.40 | 304.00 | J.S.P. Surgical, Nashik. |
| 6 | Paper Roll 5.5 | 10 Roll | 9.975 | 99.75 | J.S.P. Surgical, Nashik. |
| 7 | Cover slips | 1 pack(22x66) | 46.0845 | 46.0845 | Vijay trading, Shrirampur |
| 8 | Benedict Soln | 2 x 5 Ltr. | 360.00 | 720.00 | Kapil Medi, Jalgaon |
| 9 | Sulphosalicylic Acid | 2 Bottle | 44.688 | 89.376 | J.S.P. Surgical, Nashik. |
| 10 | Multistrips ( BAYER ) | 8 | 980.00 | 7840.00 | Kapil Medi, Jalgaon |
| 11 | Haem Test | 2 Kit | 353.780 | 707.56 | J.S.P. Surgical, Nashik. |
| 12 | Widal Test Kit | 10 Kit | 270.00 | 2700.00 | Jay Ent.,Latur |
| 13 | Blood sugar Kit | 1 Kit | 534.10 | 534.00 | Milan Ent., Nagar |
| 14 | Blood Urea | 2 Kit | 637.00 | 1274.00 | Milan Ent., Nagar |
| 15 | R.A. Kit | 1 Kit | 283.00 | 283.10 | Universal Chemi, Nashik |
| 16 | S.Creatinine | 2 Kit | 858.00 | 1716.00 | S.S.Markt,Aurangabad. |
| | | | **एकुण किंमत-** | **38265.53** | |

तरी उपरोक्त केमीकल्स हे मंजुर दराने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या खर्च रु.३८,२६५.५३ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**१६. <u>HP कलर डॉप्लर प्रिंटर खरेदीबाबत.</u>**

दिनांक २३/०९/२००६ रोजी आयोजित केलेल्या मा.व्यवस्थापन HP कलर उसमितीचे सभेतील विषय क्र.०१ अन्वये HP कलर डॉप्लरप्रिंटर व टोनर खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकूण अंदाजे किंमत रू ८५०००चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. दि. १५/०५/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग जवळजवळ सुरू झालेले आहेत. हॉस्पिटलमधील C.T. SCAN, या विभागास कलर डॉप्लर ची तातडीची गरज आहे. हॉस्पिटल सुरू झाल्यापासूटन कलर डॉप्लर प्रिंटर नसल्यामुळे त्यावरील काम बंद आहे. सदर कलर डॉप्लर पेशंटचे रिपोर्टस देण्यासाठी

आवश्यक आहे. हया विभागातील मागणी नुसार रूग्णांचे मेडीकल रिपोर्ट (PHOTO, DOPPLER इ. ) साठी कलर डॉप्लर प्रिंटरची आवश्यकता आहे. त्यासाठीसाठी प्रिंटर्सची खरेदी करणे कामी कोटेशन्सची मागणी केली होती, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे सात कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| | |
|---|---|
| 1) Sai Infosystems, Ahmedabad | 2) President Computer Services, Mumbai |
| 3) Perfect Systems, Mumbai | 4) ITV Computers Pvt. Ltd Mumbai. |
| 5) Minitek Computer Shoppe, Nasik | 6) Dream Machines, Dombivali |
| 7) Allied Digital Services Ltd., Mumbai | |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असून कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr.No. | Name | Amount |
|---|---|---|
| 01 | SAI INFO SYSTEMS,AHMEDABAD | 46,400.00 |
| 02. | PRESIDENT COMPUTER SERVICES,MUMBAI | 46,750.00 |
| 03. | PERFECT SYSTEM,MUMBAI | 48,500.00 |
| 04. | ITV COMPUTERS PVT.LTD,MUMBAI | 45,650.00 |
| 05. | MINITEK COMPUTER SHOPPE,NASIK | 44,500.00 |
| 06. | DREAM MACHINES DOMBIVALI | 40,000.00 |
| 07. | ALLIED DIGITAL SERVICES LTD,MUMBAI | 45,425.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन DREAM MACHINES DOMBIVALI यांचे निम्नतम दराचे कोटेशन्स स्वीकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१७. बांधकाम विभाग सिक्यूरिटी कॅबीन खरेदीबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दि.१९.८.२००६ चे सभेतील निर्णय क्र.५४० अन्वये समाधी मंदिराची सुरक्षा वाढविण्याचे दृष्टीने चारही महाद्वारांजवळ फायबर कॅबिन्स खरेदी करणेस व याकामी येणार अंदाजे रक्कम रुपये २,१६,०००/-पर्यंचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू खरेदी तातडीची असल्याने पुणे व मुंबई येथील फायबर कॅबिनच्या पुरवठादारांशी संपर्क साधून ७'x७'x९' साईजच्या केबीनचे त्वरीत दरपत्रके पाठविण्यात यावी असे सांगण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.प्रणित पॉलिमर्स, वसई |
| ०२ | मे.लिंक एन्टरप्राईजेस, पुणे |
| ०३ | मे.गौरव एन्टरप्राईजेस,मुंबई |
| ०४ | मे.यंत्र इंजिनिअरिंग,मुंबई |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेंत. मात्र सर्व कोटेशनसादरकर्त्यांनी ८'x८'x९' या साईजचे दर दिलेले असून ७'x७'x९' ऐवजी दिलेल्या ८'x८'x९' साईजच्या केबीन्सचे दर स्वीकारणेत यावे, असे ठरले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.प्रणित पॉलिमर्स, वसई | १,०५,०००.००+ १२.५% व्हॅट | १,००,०००.००+ १२.५% व्हॅट |
| ०२ | मे.लिंक एन्टरप्राईजेस, पुणे | १,५८,९००.००+ व्हॅट | १,५८,९००.००+ व्हॅट |
| ०३ | मे.गौरव एन्टरप्राईजेस,मुंबई | १,५७,०००.००+ व्हॅट | १,४१,३००.००+ व्हॅट |
| ०४ | मे.यंत्र इंजिनिअरिंग,मुंबई | १,६९,०००.००+ व्हॅट | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे प्रणित पॉलिमर्स,वसई यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. मे.प्रणित पॉलिमर्स, वसई यांना सभेपुढे समक्ष बोलविण्यात येऊन त्यांना १।। महिण्याचे आत कॅबिन्स पुरविणेबाबत सांगणेत आले. तसेच वाढीव साईजमुळे येणाऱ्या एकूण रुपये ४,५०,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**१८. साईबाबा रुग्णालय ब्लँकेट खरेदीबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ निर्णय क्र.६४९ नुसार श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक असणारे ४०० नग ब्लँकेट (चाही बाजुंनी कडा बंद असलेले) व ओसवाल, रेमंड व नवदुर्गा कंपनीचे खरेदीस व त्या ाकामी येणारे रक्कम रु.१,२०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-रुग्णालय/ १२५२७, दि.१४.०९.२००९ अन्वये दि.२०.०९.२००६ अखेर दरपत्रके व नमुने मागणी करणेत आलेली होती. त्याचा तपशिल-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गाव |
|---|---|
| ०१ | मे.सारडा इंटेरीअर, अहमदनगर |
| ०२ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०३ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर |
| ०४ | बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गाव | कंपनी/टाईप | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.सारडा इंटेरीअर,<br>अहमदनगर | नवदुर्गा कोझी<br>नवदुर्गा अभिषेक<br>नवदुर्गा सनफ्लॉवर<br>रेमंड मेघदूत<br>रेमंड गगनदूत<br>ओसवाल | ४५०.००<br>३८५.००<br>२४५.००<br>४३०.००<br>५००.००<br>२७०.०० | ४५०.००<br>३४६.५०<br>२२०.५०<br>३८७.००<br>४५०.००<br>२४३.०० |
| ०२ | मे.राज सेल्स कार्पोरेशन,<br>नाशिक<br>(सर्व नमुने रेमंड कंपनीचे) | डिलाईट २ एसएस<br>डिलाईट ४एसएस<br>मार्शल ४ एसएस<br>कमांडर ४ एसएस<br>पोलर फ्रींज<br>पोलर फ्रींज ४ एसएस<br>पोलर फ्रींज वियर २ एसएस<br>पंपरर ४ एसएस<br>प्रिन्स २ एसएस<br>प्रिन्स ४ एसएस<br>गुळमग फ्रींज<br>गुळमग ४ एसएस<br>गगनदूत फ्रींज<br>गगनदूत ४ एसएस<br>मेघदूत २ एसएस<br>मेघदूत ४ एसएस<br>डिप्लोमॅप ४ एसएस<br>सिनेटर ४ एसएस<br>कॅरोमिन | ५८४.५०<br>६०६.३०<br>५५१.६०<br>५३४.००<br>६६६.३०<br>७०४.६०<br>६८२.७०<br>५३४.००<br>६८७.३०<br>६९९.००<br>४०९.७०<br>४४७.९०<br>३६५.९०<br>४०४.१०<br>३३८.७०<br>३६०.४०<br>५४०.६०<br>५४०.६०<br>६८२.५० | ५८४.५०<br>६०६.३०<br>५५१.६०<br>५३४.००<br>६६६.३०<br>७०४.६०<br>६८२.७०<br>५३४.००<br>६८७.३०<br>६९९.००<br>४०९.७०<br>४४७.९०<br>३६५.९०<br>४०४.१०<br>३३८.७०<br>३६०.४०<br>५४०.६०<br>५४०.६०<br>६८२.५० |
| ०३ | मे.शिंगी ट्रेडींग कंपनी,<br>अहमदनगर | ओसवाल-२६०<br>ओसवाल-३४०<br>रेमंड-२००० | ११९.००<br>१८२.००<br>१२७१.०० | ११९.००<br>१७५.००<br>व्हॅटसह<br>१२७१.०० |
| ०४ | मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे | ओसवाल | ४९९.०० | फॅक्सद्वारे ४७५.००<br>+४% व्हॅट |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले दर तसेच त्यांनी देऊ केलेल्या वूलन ब्लँकेटच्या नमून्यांची पहाणी करुन मे.शिगी ट्रेडींग कंपनी,अहमदनगर यांचे ओसवाल-३४० व मे.बांठीया एन्टरप्राईजेस,पुणे यांचे ओसवाल हे ब्लँकेट नमूने सदस्यांना पसंत पडलें. मे.बांठीया हे सभेस अनुपस्थित असल्याने त्यांना दूरध्वनीद्वारे दर कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी निविदेत दिलेले दर रुपये ४९९.०० ऐवजी रुपये ४७५.०० + ४% व्हॅट प्रती असा दर देऊ केल्याने मे.शिंगी ट्रेडींग कंपनी,अहमदनगर यांचे ओसवाल-३४० व मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे यांचे ओसवाल या नमुन्यांचे दर स्वीकारण्यात येऊन त्यांना प्रत्येकी २०० ब्लॅकेटचा पुरवठा आदेश देण्यात येऊन वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१९. मानधन व फिक्स वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्याबाबत.**

सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीची सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**२०. संस्थान कर्मचाऱ्यांना उपचारासाठी साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल करुन घेणेबाबत.**

याबाबत सविस्तर नियमावली तयार करुन ती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावी असे ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**२१. संस्थान कर्मचाऱ्यांसाठी समुह जनता अपघात विमा योजना लागू करणेबाबत.**

गुंतागुंतीची दिनचर्या,वेगवान प्रवास व त्यामुळे वाढते अपघात यामुळे सर्वसाधारणतः जीवन असुरक्षीत होत आहे. त्यातच एकत्रीत कुटुंब पध्दतीचे विघटन होत असुन कमवत्या व्यक्तीचे व पर्यायाने संस्थान कर्मचा-यांचे कुटुंब प्रमुख म्हणून वैयक्तीक जबाबदारी अधिकाअधिक वाढत आहे.वाढत्या जबाबदा-या पूर्ण करण्यासाठी होणा-या धावपळीमुळे या कर्मचा-याची जोखीम ही वाढत आहे.कर्मचा-यांचे

कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुख व कमवता घटक बहुतेक तो स्वत: आहे.त्यामुळे कर्मचा-याला व्यक्तीगत कुटुंबाच्या भविष्याची मोठी काळजी असतांना ती पुरेशा तन्मयतेने व उत्साह एकाग्रतेने त्याला नेमून दिलेल्या कामामध्ये सहभागी होऊ शकणार नाही.त्यामुळे त्याच्या कुटुंबाच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेविषयी काही योजना राबविणे आवश्यक ठरते.

याबाबत पूर्वीच्या मा.विश्वस्त मंडळाचे कार्यकालात दि.२२-१०-२०००चे सभेतील निर्णय क्रं.४४४(२) अन्वये "समुह जनता अपघात योजना" राबविण्यात आलेली आहे.किमान आर्थिक भार व अधिकाअधिक अर्थिक संरक्षण या दृष्टीने"समुह जनता अपघात योजना"अत्यंत सुयोग्य अशी आहे.ही योजना संस्थानचे अस्थापनेवर असणा-या सर्व ११०० कर्मचा-यांसाठी लागू करण्यात आलेली आहे.सर्वसाधारणपणे चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांची स्पर्धात्मक दरपत्रके मागवुन न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा श्रीरामपूर यांना प्रत्येक एक लाख रुपये विमा राशीसाठी रु.१६१/-प्रती व्यक्ती या न्युनतम दराने पाच वर्षासाठी दि.३१-१०-२००५ अखेर देण्यात आले होते.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे पुर्व मान्यतेने १०५० कायम संस्थान कर्मचा-यासाठी प्रत्येकी रु.५३/- या दराने रुपये एक लाख विम्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.सदरची मुदत दि.३१-१०-२००६ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील पाच वर्षोसाठी संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना विमा संरक्षण देण्यासाठी इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/१३६९४/२००६ दि.०४-१०-२००६ अन्वये विमा महामंडळाच्या अंगीकृत कंपन्याकडून दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यानुसार

खालील विमा कंपन्यानी त्यांची दरपत्रके इकडेस सादर केलेली आहे.त्यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे प्रतीमाणसी दर सादर केलेले आहेत.

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नाव** | **प्रतिमाणसी दर रु.१ लाख रक्कमेसाठी** | |
|---|---|---|---|
| | | **एक वर्षासाठी** | **पाच वर्षासाठी** |
| १ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.,शाखा राहूरी | रु.५१ | रु.२०४ |
| २ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.,शाखा-शिर्डी | रु.४६.५० | रु.१८६ |
| ३ | दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.शाखा-राहुरी | रु.५२ | रु.२१० |
| ०४ | दि ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि.,शाखा-संगमनेर | रु.६० | रु.१८६ |
| ०५ | न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.,शाखा-श्रीरामपूर | रु.५२.७३ | रु.२१०.९० |

ही योजना लागु झालेनंतर ५ वर्षपर्यंत दि.०१-११-२००६ ते दि.३१-१०-२०११या कालावधीत प्रत्येक संस्थान कर्मचा-यांसाठी रुपये एक लाख चे अपघात विमा संरक्षण लागु राहील.तसेच वरिल अ.नं.२,४,५ यांचे पत्रानुसार अपघाती अपंगत्व येणा-या व्यक्तीस देखील विमा संरक्षण दिलेले आहेत

सध्याचे संस्थान कर्मचारी अधिक श्री साईबाबा रुग्णालयाकडील नव्याने नेमलेल्या कर्मचा-याचा समावेश होणे आवश्यक आहे.याकामी दि.१४-१०-२००६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार"समुह जनता अपघात विमा" योजनेबरोबरच कामगारांसाठी मेडीक्लेम पॉलिसी व साईभक्तांसाठी विमा उतरविण्यासाठी दरपत्रके मागविण्यात यावी सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले.तसे त्यावेळी उपस्थित विमा कंपनीचे प्रतिनिधींना समक्ष सांगणेत आलेले आहे.त्यानुसार -

०१) दि ओरिएन्टल इंश्युरन्स कंपनी लि.शाखा-कोपरगांव,

०२) युनायटेड इंडिया कं.लि.शाखा-शिर्डी,

०३) दि न्यु इंडिया एंश्योरन्स कं.लि.शाखा-श्रीरामपूर

उपरोक्त कंपन्यांनी सादर केलेली दरपत्रके उघडण्यात येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेतपुढे सादर करण्यात आला होता. तसेच कंपन्यांचे प्रतिनिधींना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

**<u>समुह जनता अपघात विमा योजना -</u>**

| अ.नं. | विमा कंपनीचे नाव | विमा राशी रुपये प्रत्येकी | दर प्रती व्यक्ती टॅक्ससह विमा हप्ता रुपये (५ वर्षे कालावधी करीता ) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | |
| ०१ | दि ओरिएन्टल इंश्युरन्स कंपनी लि.शाखा-कोपरगांव, | १ लाख<br>२ लाख<br>३ लाख | १८५.००<br>३७२.००<br>५५८.०० | १८५.००<br>३७२.००<br>५५८.०० | १) १ लाख विमा लाभासाठी मृत्यू -१ लाख<br>२) दोन पाय दोन हात रु.१ लाख एक हात एक पाय एक डोळा रु.५० हजार संपूर्ण अपंगत्व रु.१ लाख |
| ०२ | युनायटेड इंडिया कं.लि. शाखा-शिर्डी, | १ लाख | १८४.०० | १८०.०० | |
| ०३ | दि न्यु इंडिया एंश्योरन्स कं. लि. शाखा-श्रीरामपूर | १ लाख<br>७५ जार<br>५०हजार | २१०.९०<br>१५८.१६<br>१०५.४४ | १७९.००<br>१५८.१६<br>१०५.४४ | १) १ लाख विमा लाभासाठी मृत्यू -रुपये १ लाख<br>२) दोन पाय दोन डोळे किंवा एक पाय व एक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २५हजार | ५२.७२ | ५२.७२ | डोळा रु.५० हजार संपूर्ण अपंगत्व रु.१ लाख |

## नागरिक सुरक्षा विमा योजना (साई भक्तांसाठी)-

| अ.नं. | विमा कंपनीचे नाव | विमा राशी रुपये प्रत्येकी | दर प्रती व्यक्ती टॅक्ससह विमा हप्ता रुपये | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | |
| ०१ | दि ओरिएन्टल इंश्युरन्स कंपनी लि.शाखा-कोपरगांव, | १ लाख<br><br>२ लाख<br><br>३ लाख<br><br>४लाख<br><br>५ लाख | २६६.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>५३२.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>७९०.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>१०६४.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>१३३१.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी | २६०.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>५२५.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>७८०.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>१०५५.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी<br>१३२०.०० (४ वर्ष) ०१ व्यक्तीसाठी | अपघाती मृत्यू व अपघातामुळे होणारा दवाखान्याचा खर्च मिळतो. |
| ०२ | युनायटेड इंडिया कं.लि. शाखा-शिर्डी, | ५ लाख<br><br>२ लाख | २८०६०००/- (१वर्ष ) १०० व्यक्तींसाठी<br>११,२२,४००/-(१वर्ष ) १०० व्यक्तींसाठी | २८०६०००/- (१वर्ष ) १०० व्यक्तींसाठी<br>११,२२,४००/-(१वर्ष ) १०० व्यक्तींसाठी<br>५,६१,२००/- (१वर्ष ) १०० व्यक्तींसाठी | |
| ०३ | दि न्यु इंडिया एंश्योरन्स कं. लि. शाखा-श्रीरामपूर | १ लाख<br><br>१० हजार | १९५/- (१ वर्ष ) ०१ व्यक्तीसाठी<br>१९५/- (१ वर्ष ) ०१ व्यक्तीसाठी | | |

## मेडिक्लेम-

| अ.नं. | विमा कंपनीचे नाव | विमा पॉलिसी | | दर प्रती व्यक्ती टॅक्ससह विमा हप्ता रुपये (१ वर्ष ) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | रुपये | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | |
| ०१ | दि ओरिएन्टल इंश्युरन्स कंपनी लि.शाखा-कोपरगांव, | गुड हेल्ड | ५० हजार<br><br><br>१ लाख | ५०५.००<br>८०८.००<br>७८३.००<br>१२२८.०० | ४९५.००<br>७९०.००<br>७७५.००<br>१२००.०० | वय वर्ष ४५ पर्यंत<br>वय वर्ष ४६ ते ६०<br>(काही आजार पहिल्या वर्षी मिळत नाहीत)<br>वय वर्ष ४५ पर्यंत<br>वय वर्ष ४६ ते ६० |
| ०२ | युनायटेड इंडिया कं.लि. शाखा-शिर्डी, | मेडिक्लेम (कामगारांसाठी ) | ५० हजार<br>१ लाख | ९५४.००<br>१८४६.०० | ९५४.००<br>१८४६.०० | कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील पती पत्नी व दोन मुलांसाठी (एकुण ४ व्यक्ती) |
| ०३ | दि न्यु इंडिया एंश्योरन्स कं. लि. शाखा-श्रीरामपूर | ग्रुप मेडिकल क्लेम | ५० हजार<br><br><br><br><br><br><br><br>१ लाख | ६७६.०० (३५ वर्ष )<br>७३६.०० (३६ते४५ वर्ष )<br>१०५५.०० (४६ते५५ वर्ष )<br>११९९०० (५६ते६५ वर्ष )<br>१३१०.०० (३५ वर्ष )<br>१४२५.०० (३६ते४५ वर्ष )<br>२०३९.०० (४६ते५५ वर्ष )<br>२३२२.०० (५६ते६५ वर्ष ) | ६००.०० (३५ वर्ष )<br>६५३.०० (३६ते४५ वर्ष )<br>९३७.०० (४६ते५५ वर्ष )<br>१०६५.०० (५६ ते ६५ वर्ष )<br>११६३.०० (३५ वर्ष )<br>१२५३.०० (३६ते४५ वर्ष )<br>१८१०.०० (४६ते५५ वर्ष )<br>२०६१.०० (५६ते६५ वर्ष ) | अधिक १२.२४% सर्व्हिस टॅक्स<br>डिस्काऊंट<br>१०१ ते ५०० व्यक्ती २.५%<br>५०१ ते १००० व्यक्ती ५%<br>१००१ ते २००० व्यक्तींसाठी ७.५% सर्व्हिस टॅक्स<br>२००१ ते १०००० व्यक्ती १० %<br>कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील पती पत्नी व तीन मुलांसाठी (एकूण ५ व्यक्ती) |

यावर सविस्तर चर्चा होऊन,

**०१)** **<u>समुह जनता अपघात विमा योजना-</u>**याकामी दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि.,शाखा श्रीरामपूर यांची प्रत्येकी रुपये एक लाख विमा राशीसाठी पाच वर्षासाठी प्रती व्यक्ती रुपये

१७९.०० ही निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**०२) <u>नागरिक सुरक्षा विमा योजना (साई भक्तांसाठी)-</u>** याकामी युनायटेड इंडिया इन्शूरन्स कंपनी लि.,शाखा शिर्डी यांची १०० व्यक्तीं १ वर्षासाठी रुपये ५,६१,२००.०० ही निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना तसे लेखी पत्र व प्रिमियम रक्कम देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**०३)<u>मेडिक्लेम-</u>** याकामी सविस्तर फेर प्रस्ताव मागविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**२२. <u>वैद्यकीय सेवांच्या दरपत्रकातील सुधारणांबाबत.</u>**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधे दि. १५/०५/२००६ पासून लागू केलेल्या दर पत्रकास मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३२८ दि.३/०६/२००६ अन्वये पुढील सुधारणा होईपर्यंत लागु करण्यास मान्यता देण्यात आली होती.

सदर दर पत्रकात सुधारणा करुन त्याची अमंलबजावणी दि. २६/०७/२००६ पासून करण्यात आली आहे. व त्यास मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. ५५० दि. १९/०८/२००६ अन्वये मान्यता देण्यास आलेली आहे.

तसेच दि. २६/०७/२००६ पासुन अमलात आलेल्या सुधारित दरपत्रकात काही सेवांच्या दरात वाढ दर्शविली होती तथापि, मा.अध्यक्ष महोदय, यांनी मा. वैद्यकीय प्रशासक यांचेशी चर्चा करून खालील प्रमाणे सुधारणा सुचविल्या होत्या.

| अ.नं | शस्त्रक्रियेचे नाव | मंजुर दर पत्रक परिशिष्ट अ | सुचविलेल्या सुधारणे प्रमाणे सध्या लागू असलेले दर |
|---|---|---|---|
| १. | ॲन्जीओप्लास्टी | ५५,०००/- | **५०,०००/-** |
| २. | पेरीफेरल ॲन्जीओग्राफी | ६,०००/- | **४,५००/-** |
| ३. | बी.एम.व्ही (ह्दय शस्त्रक्रिया) | ३५,०००/- | **२५,०००/-** |
| ४. | पीडीए लिगेशन | ३५,०००/-ते २०,०००/- | **२०,०००/-** |
| ५. | सी.ए.बी.जी (बायपास सर्जरी ) | ६५,०००/- | **६०,०००/-** |

त्यास अनुसरून मंजूर दरांऐवजी सुचविलेल्या दरांची अंमलबजावणी दि. २६/०७/२००६ पासून करण्यात आलेली आहे. मंजूर दरपत्रकात उपरोक्त प्रमाणे सुधारणा होणे आवश्यक आहे.

तसेच Pathology विभागातील तपासण्यांचे दर आनंदऋषी हॉस्पिटलपेक्षा जास्त आहेत असे पत्रकारांनी मा. अध्यक्ष महोदय, यांचे निदर्शनास आणल्यामुळे सदरचे दर कमी करुन आनंदऋषी हॉस्पिटल, अहमदनगर यांचेपेक्षा कमी ठेवावेत, असाही आदेश दिला होता. त्याप्रमाणे सुधारणा केल्यामुळे प्रस्तावीत दर पूर्वीच्या मंजुर दरापेक्षा जवळजवळ ६०% पर्यंत कमी झाले आहेत. व त्यास निर्णय क्र. ५५० दि. १९/०८/२००६ अन्वये मान्यता मिळून दि. २६/०७/२००६ पासून अमंलबजावणी करण्यात आली आहे.

तथापि, डॉ. न्यायाधिश, पॅथॉलॉजिस्ट, यांच्या मते Pathology चे दर आनंदऋषी हॉस्पिटलपेक्षा खूप कमी झालेले आहेत. आपल्या हॉस्पिटलची मशिनरी अदयावत आहेत व तपासण्यासठी वापरत असलेले किटस् उच्च दर्जाचे असतात. त्यामुळे काही तपासण्याचे दर मूळ खर्चा पेक्षाही कमी झालेले आहेत. तपासण्याचा दर्जा राखुन आनंदऋषी हॉस्पिटलच्या दरांची तुलना करता साधारणतः ९० टक्के तपासण्याचे दर आनंदऋषी इतकेच, किंबहुना काही तपासण्यांचे दर कमी तर ५ ते १०% तपासण्यांचे दर थोडया प्रमाणात जास्त असतील असे प्रस्तावित दर परिशिष्ट अ मध्ये सादर केले आहेत.

तरी उपरोक्त सर्वबाबींचा विचार करता त्या पुढीलप्रमाणे-

अ) दि. १९/०८/२००६ चे सभेत प्रस्तावित केलेल्या दर सुची प्रमाणे डॉक्टरांच्या मोबदल्यांचा अंतर्भाव करून मिळणेस विनंती.

ब) मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचविल्या प्रमाणे लागु केलेल्या कमी दरांचे अवलोकन होउन त्यास मान्यता असावी.

क) पॅथोलॉजी विभागासाठी खालीलप्रमाणे दरांचे अमंलबजावणी दि. १५/११/२००६ पासुन करण्यास मान्यता असावी.

| Items | Comparitive Charges | | | Sanctioned Rates From 15.05.06 Resolution . No.328/ 3.06.06 | Sanctioned Rates from 26.07.06 Resolution No.550/ 19.08.06 | Proposed By Pathologist for "NO PROFIT NO LOSS BASIS" | Proposed rates As Compare to Anand R. i.e. Minus is Less & + is Greater than Anand Rushigi Hospital |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Niramay | Ruby | Anand R | Semi Pvt | Semi Pvt | Semi Pvt | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| CBC | 80 | 90 | 80 | 90 | 20 | 50 | 20 | 30 | Rs.10 More than Anand Rushiji |
| ESR | 25 | 35 | 75 | 75 | 10 | 20 | 10 | 10 | |
| Blood Sugar | 40 | 50 | 80 | 80 | 20 | 40 | 20 | 25 | 5 |
| Glycosylated Hb | 300 | 320 | 400 | 435 | 300 | 300 | 120 | 200 | Rs. -100 Less tham Anand Rushiji |
| LFT | | | | | 180 | | 200 | | -180 |
| S.Bilirubin | 70 | 85 | 150 | 150 | 40 | 100 | 40 | 60 | 20 |
| SGOT | 60 | 70 | 150 | 175 | 40 | 110 | 40 | 60 | 20 |
| SGPT | 60 | 70 | 150 | 175 | 40 | 110 | 40 | 60 | 20 |
| S.Proteins | 60 | 70 | 100 | 125 | 80 | 80 | 40 | 80 | |
| LDH | | | | | 80 | 130 | 50 | 80 | |
| CPK | | | | | 80 | 120 | 50 | 80 | |
| RFT | | | | | | | 200 | | |
| B.Urea | 50 | 60 | 100 | 125 | 30 | 70 | 30 | 35 | 5 |
| S. Creatinine | 60 | 70 | 120 | 150 | 40 | 80 | 40 | 40 | |
| S. Electrolytes | 200 | 220 | 250 | 300 | 200 | 250 | 100 | 200 | |
| S. Phosphorus | 70 | 80 | | | 60 | 70 | 50 | 50 | -10 |
| Lipid profile | | | | | 180 | | 150 | 250 | 70 |
| S. Cholestrol | 70 | 80 | 150 | 150 | 40 | 100 | 40 | 50 | 10 |
| HDL, LDL, VLDL | 350 | 370 | 600 | 700 | 150 | 500 | 50 | 200 | 50 |
| S.Triglycerids. | 80 | 90 | 175 | 190 | 80 | 110 | 100 | 80 | |
| | | | | | | | | | |
| Urine Protines 24 Hrs. | 100 | 110 | | | | | | | |
| S. Ammonia | 300 | 320 | | | | | | | |
| S. Amylase | 150 | 170 | 250 | 275 | 100 | 150 | 60 | 100 | |
| S. Alk. Phosphatase | 60 | 70 | 175 | 175 | 50 | 120 | 50 | 60 | 10 |
| S. uric Acid | 80 | 90 | 150 | 175 | 50 | 120 | 50 | 50 | |
| S. acid Phospatse | 120 | 140 | 200 | 200 | 50 | 140 | 55 | 60 | 10 |
| Urine-Routine | 40 | 50 | 60 | 75 | 10 | 40 | 10 | 25 | 15 |
| Sputun AFB | 35 | 60 | 125 | 150 | 30 | 65 | 20 | 40 | 10 |
| Stool Routine | 40 | 50 | 60 | 60 | 10 | 20 | 10 | 25 | 15 |
| Stool Hanging Drop | | | | | 20 | 20 | 25 | 20 | |
| Stool Occult Blood | 30 | 40 | | | 10 | 30 | 10 | 20 | 10 |
| Malarial Parasite | 30 | 40 | 125 | 125 | 30 | 60 | 25 | 30 | |
| Sickle Test | | | 100 | 100 | 50 | 60 | 25 | 50 | |
| Hb. Electro Phoresis | | | 350 | 350 | 450 | 400 | 200 | 450 | |
| G6PD | | | 175 | 175 | 150 | 150 | 60 | 120 | -30 |
| ASO Titre | 120 | 140 | 200 | 250 | 80 | 150 | 50 | 80 | |
| HBV | 150 | 170 | 150 | 150 | 100 | 140 | 100 | 100 | 0 |
| HCV | 600 | 650 | 350 | 350 | 400 | 400 | 150 | 200 | -200 |
| HIV | 250 | 270 | 350 | 350 | 100 | 250 | 100 | 150 | 50 |
| HIV Western Blot | | | | | 1400 | 1400 | 500 | 1200 | -200 |
| CRP | 140 | 160 | 175 | 175 | 80 | 110 | 50 | 80 | |
| Direct Coombs | 100 | 110 | 125 | 125 | 250 | 180 | 100 | 125 | -125 |
| Indirect Coombs | 120 | 140 | 125 | 125 | | | | | |
| Widal Test | 100 | 110 | 150 | 150 | 30 | 60 | 25 | 30 | |
| VDRL | 75 | 85 | 160 | 175 | 30 | 60 | 25 | 30 | |
| UPT | 100 | 110 | 80 | 980 | 40 | 120 | 50 | 50 | 10 |
| RA Factor | 120 | 140 | 125 | 125 | 50 | 100 | 50 | 50 | |
| ANA | 800 | | | | 750 | 700 | 250 | 250 | -500 |
| LECells | | | 150 | | 60 | 80 | 50 | 60 | |
| T3, T4, TSH | 550 | 600 | 1100 | 1100 | 450 | 600 | 250 | 450 | |
| M.T. | 50 | 60 | 100 | 100 | 40 | 60 | 25 | 40 | |
| CSF | | | | | 150 | 150 | 50 | 150 | |
| Ascitic Fluid | 180 | 200 | 200 | | 150 | 150 | 50 | 200 | 50 |
| Pleural Fluid | | | | | 150 | 150 | 50 | 200 | 50 |
| Bronchial Fluid | | | | | 150 | 150 | 50 | 200 | 50 |
| Semen Analysis | 100 | 110 | 125 | 125 | 150 | 120 | 50 | 150 | |
| BL. Gases | 300 | 320 | 350 | 350 | 240 | 300 | 100 | 240 | |
| IgG | | | | | | | | 300 | -600 |
| IgA | 600 | 650 | | | 900 | 700 | 300 | | |
| IgM | | | | | | | | | |
| CPK | 150 | 170 | 225 | 225 | 120 | 150 | 60 | 120 | |
| CPK MB | | | 600 | 600 | 150 | 300 | 150 | 150 | |
| Digoxin Level | 600 | 650 | 300 | 300 | | 400 | 160 | 400 | 400 |
| TORCH | | | 2500 | 2700 | 2200 | 2500 | 1000 | 2200 | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Dengue Test | 600 | 650 | 1000 | 1000 | 550 | 700 | 250 | 550 | |
| BT, CT, PT, PTT. | 100 | 100 | 775 | 800 | 160 | 180 | 75 | 160 | |
| S. Fibrinogen | 300 | 320 | 350 | 350 | | 300 | 150 | 150 | 150 |
| Trop- T | | | 700 | 700 | 800 | 700 | 500 | 700 | -100 |
| HbsAg | | | 80 | | | 120 | 50 | 100 | 100 |

Figures shown in this box are assumed which test's rete are not available in Anand Rushiji Hospital

Minus figures are shows Proposed rates are less than Anand Rushiji Hospital

Proposed Semi Pvt. Rates are shown here Next Category will increas 15 % to the preceding category.

तरी उपरोक्त अ,ब,क या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली व पॅथलॉजीचे वरीलप्रमाणे सुधारित दर दिनांक ०१.०१.२००७ पासून लागू करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२३. क्ष-किरण विभागात स्प्लिट ए.सी. बसविणेबाबत.**

उपरोक्त विषयी, श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष - किरण विभागाकडील डी. पी. ने डार्क रुम मध्ये २ टन क्षमतेचे दोन स्प्लिट ए. सी. बसवून मिळणेबाबत कळविलेले आहे.

सध्या डार्क रुम मध्ये एक ए. सी. कार्यरत आहे. परंतु सदर ए.सी. नेहमी बिघडून बंद पडत असतो. त्यामुळे कामात वेळोवेळी अडथळा येत असतो. म्हणून सदर ठिकाणी २ टन क्षमतेचे दोन स्प्लिट ए.सी. बसवून मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे सध्या असलेल्या एका ए.सी. वर लोड येणार नाही व वारंवार बिघडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

तरी क्ष - किरण विभागातील डार्क रुम मध्ये २ टन क्षमतेचे २ स्प्लिट ए. सी. खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याच वेळेस श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील नविन डेन्टल विभाग तसेच नविन एक्स-रे विभाग यासाठी वैद्यकीय सचालक यांनी तसेच श्री साईनाथ रुग्णालयामधील इ.एन.टी.ऑपरेशन थिएटर तसेच एक्स-रे रूम व आय.सी.सी.यु विभाग यासाठी वैद्यकीय अधिक्षिका यांनी नविन ए.सी. खरेदी करून बसवून द्यावेत म्हणून मागणी केली आहे. ए.सी.चा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| **अ)** | **श्री साईबाबा हॉस्पिटल** | | | |
| ०१ | **नविन डेन्टल विभाग -**<br>व्होल्टास मेक स्प्लिट , वॉल माऊंटेड एअरकंडीशनर-<br>रोटरी कॉम्प्रेसरसह (२.० टन प्रत्येकी क्षमता ) | ०२ नग | ३०,०००.०० | ६०,०००.०० |
| ०२ | **नविन एक्स-रे विभाग-**<br>व्होल्टास मेक स्प्लिट , वॉल माऊंटेड एअरकंडीशनर -<br>रोटरी कॉम्प्रेसरसह (२.० टन प्रत्येकी क्षमता ) | ०३ नग | ३०,०००.०० | ९०,०००.०० |
| **ब)** | **श्री साईनाथ रुग्णालय -** | | | |
| ०१ | **इ.एन.टी.ऑपरेशन थिएटर-**<br>व्होल्टास मेक स्प्लिट , वॉल माऊंटेड एअरकंडीशनर - रोटरी कॉम्प्रेसरसह (२.० टन प्रत्येकी क्षमता ) | ०२ नग | ३०,०००.०० | ६०,०००.०० |
| | **एक्स-रे विभाग-**<br>व्होल्टास मेक विंडो माऊंटेड एअरकंडीशनर -<br>रोटरी कॉम्प्रेसरसह (२.० टन प्रत्येकी क्षमता ) | ०२ नग | ३०,०००.०० | ६०,०००.०० |
| | **आय.सी.सी.यु. विभाग-**<br>व्होल्टास मेक विंडो माऊंटेड एअरकंडीशनर-<br>रोटरी कॉम्प्रेसरसह (२.० टन प्रत्येकी क्षमता ) | ०२ नग | ३०,०००.०० | ६०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम रुपये :- | ३,३०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन यापूर्वी मुंबई कार्यालयासाठी ०६ नग स्प्लिट ए.सी. खरेदी करण्यात आलेले होते. मुंबई कार्यालयाचे नूतनीकरण प्रस्तावित आहे, त्यामुळे मा. अध्यक्षसाहेब व मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील सध्या नादुरुस्त झालेल्या दोन ए.सींच्या जागी नविन आलेल्या ०६ पैकी ०२ ए.सी. बसविण्यात यावेत व उरलेल्या ०४ नग ए.सींची त्याठिकाणी सध्या आवश्यकता नसल्याने हे ०४ नग स्प्लिट ए.सी. परत शिरडी येथे आणून घ्यावेत. श्री साईबाबा रुग्णालयाचे मेडीकल स्टोअर व प्रशासकीय कार्यालय हे तळघरात असल्याने याठिकाणी सफोकेशन होते. याकरीता मुंबई कार्यालयातून आणण्यात येणारे चार स्प्लिट ए.सी. श्री साईबाबा रुग्णालयाचे मेडीकल स्टोअर व प्रशासकीय कार्यालय याठिकाणी आवश्यकतेनुसार बसविण्यात यावेत. व उपरोक्त प्रस्तावात नमूद

केलेले ११ नग ए.सी. खरेदी करणेस व त्यासाठी कोटेशन्स मागविणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/विद्यूत विभागप्रमुख)

**२४. तातडीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात दि.१८.०२.२००६ पासून ॲन्जीओग्राफीची तपासणी व ॲन्जीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया कार्यान्वीत झालेल्या आहे. सदरचे तपासणीकामी लागणाऱ्या डायग्नोस्टीक कॅथेटर, गाइडींग वायर, बलून, स्टेन्ट व्हाल्व, इत्यादी खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ चे सभेत निर्णय क्र.१३१ अन्वये अंदाजे ३० रुग्णांचा हिशोब धरुन मागणी मंजूर करुन घेण्यात आली होती व त्यानुसार वरील साहित्य मे.रेणूका सर्जीकल, औरंगाबाद यांचेकडून वेळावेळी खरेदी केलेली आहे. ती खरेदी पुर्ण झालेली असून वार्षीक औषधे खरेदीमध्ये सदरच्या सर्व साहित्याची मागणी केलेली आहे. सदरचे खरेदीकामी सन २००६-०७ या वर्षामध्ये अंदाजे रु.३,०५,१३,५१८/- इतका खर्च प्रस्तावित केलेला आहे.

त्यानुसार याकामी निविदा प्राप्त होऊन संबंधीतांना दि.१२.१०.२००६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तोपर्यंत लागणारे स्टेन्ट व्हाल्व, साहित्य तातडीने खरेदी केलेले आहे. त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Renuka Surgical Systems,Aurangabad. | 235 | 07/09/2006 | 13000.00 |
| 2 | Renuka Surgical Systems,Aurangabad. | 233 | 07/09/2006 | 4000.00 |
| 3 | Renuka Surgical Systems,Aurangabad. | 234 | 07/09/2006 | 17000.00 |
| 4 | Renuka Surgical Systems,Aurangabad. | 232 | 07/09/2006 | 6750.00 |
| 5 | Renuka Surgical Systems,Aurangabad. | 231 | 07/09/2006 | 24900.00 |
| 6 | Advance Medical Devices Pvt.Ltd.,Thane. | 111 | 08/09/2006 | 22880.00 |
| 7 | Advance Medical Devices Pvt.Ltd.,Thane. | 84 | 31/08/2006 | 22880.00 |
| 8 | DVS Medical Systems, Pune. | 19/B/06 | 17/08/2006 | 23343.00 |
| | | | **Total Amt.Rs.** | **134753.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.१,३४,७५३.०० (रु. एक लाख चौतीस हजार सातशे त्र्येपन्न मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२५. समाधी मंदिर परिसरातील महाव्दारांजवळ सुशोभित चप्पल स्टॅंण्ड करणे बाबत.**

संस्थानचे समाधी मंदिर परिसरात चार महाव्दारांची उभारणी करण्यात आलेली आहे. तसेच महाव्दारांना कास्ट आयर्न गेटही बसविण्यात आलेले आहे. साईभक्तांना मंदिर परिसराचे बाहेर पादत्राणे ठेवता यावीत याकरीता चारही महाव्दाराजवळ संस्थान मार्फत विनामुल्य चप्पल स्टॅण्डची तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करण्यात आली आहे. सदर ठिकाणी कायम स्वरुपी आकर्षक चप्पल स्टॅण्डची व्यवस्था करणेकामी आर्किटेक्ट लॅण्डमार्क कन्सल्टंट, राहुरी यांनी ३.६ मी x २.१० मी. साईजचे कौलारु छत असलेले व एम.एस.फ्रेम व जाळीचे चप्पल स्टॅण्डचे प्लॅन व एस्टिमेट सादर केले आहे. त्यानुसार एका चप्पल स्टॅण्डकरीता रु.५०,०००/- मात्र याप्रमाणे एकूण ०४ चप्पल स्टॅण्डकरीता रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे चप्पल स्टॅंड कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत चर्चा होऊन, फायबर मटेरिअल मध्ये ४.९० मी x २.४५ मी साईजचे आकर्षक चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी निविदा मागविण्यात याव्यात. ४.९० मी x २.४५ मी साईजमध्ये फायबर मटेरिअलमध्ये एक चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी अंदाजे रुपये १,५०,०००.०० याप्रमाणे चार चप्पल स्टॅण्डकरीता ६,००,०००.०० खर्च अपेक्षित आहे. सदरचे स्टॅण्ड कॅबीन खरेदीकामी निविदा मागविण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२६. आय.टी.आय विभागातील प्रशिक्षणार्थी गणवेष खरेदी बाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३६६(ब)अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना गणवेष खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक १८.१०.२००६ अखेर दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. मात्र मुदतीअंती एकच दरपत्रक प्राप्त झाल्याने गणवेष पुरवठाधारकांशी संपर्क साधून दरपत्रके पाठविण्यास सांगणेत आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | जगदिश गारमेंटस,कोपरगांव |
| ०२. | रिलायन्स गारमेंटस,नाशिक |
| ०३. | आर.के.कलेक्शन,नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव | मुलांसाठी ड्रेस (दर प्रति) | मुलींसाठी अॅप्रन (दर प्रति) |
|---|---|---|---|
| ०१. | जगदिश गारमेंटस,कोपरगांव | ३५५.००(पोद्दार मिल्स)<br>रु.३६०.०० फेला मिल्स व्हीक्टोरी)<br>रु.३५७.०० स्वदेशी मिल्स<br>रु.३४५.०० सनफ्लॅग | १३०.००<br>रु.१२५.००<br>रु.११५.०० |
| ०२. | आर.के.कलेक्शन,नाशिक | रु.२९५.०० पोद्दार मिल | रु.१२०.०० पोद्दार मिल |
| ०३. | रिलायन्स गारमेंटस,नाशिक | रु.२६१.०० पोद्दार/स्वदेशी मिल<br>(रु.२३५.०० सुटसह) | रु.११०.००<br>(रु.९९.०० सुटसह) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, न्यूनतम दराने गणवेश खरेदी करावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**२७. प्रयोगशाळा विभागासाठी मशिनरी खरेदी बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील कार्डीयक सर्जन डॉ.विद्युतकुमार यांनी रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागामध्ये त्यांचे रुग्णांसंबधी करावयाचे रक्ताच्या तपासणीकामी असलेले ए.बी.जी मशिन हे वारंवार बंद पडत असल्यामूळे एक पुर्ण स्वयंचलित नियंत्रित बायोकेमिस्ट्री अॅनालायझर पर्यायी असणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केलेले आहे. तसेच सध्या रक्तातील P.T {prothrombin time } ही तपासणी मॅन्युअल पध्दतीने करण्यात येते त्यासाठी खालीलप्रमाणे मशिनरी खरेदी करणेबाबत विनंती केली असून त्यास पॅथोलॉजिस्ट यांनी सहमती दिली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. सदर मशिन विहित पध्दतीने कोटेशन मागणी करुन खरेदीस मान्यता देण्यात यावी , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| Sr.No | Name of Machines | Approximate Amount |
|---|---|---|
| 01. | ABG MACHINE | 7,00,000.00 |
| 02 | R.A.50(SEMI AUTO ANALYSER) | 3,00,000.00 |
| 03. | COAGULOMETER | 2,05,000.00 |
| 04. | URINOMETER | 40,000.00 |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२८. श्री साईबाबा रुग्णालयात संस्थानचे औषध दुकान चालू करणेबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालवणेस देणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१.०४.२००६ निर्णय क्र.२४८ अन्वये श्री.राजेंद्र खिवराज मुथ्था,चिंचवड, पुणे यांना दरमहा भाडे रु.२,७१,०००/- ने देणेबाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार श्री. मुथ्था यांचेकडून रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा करुन घेणेबाबत ठरलेले आहेत. श्री. मुथ्था यांना इकडील पत्र क्र.५०१३ दि.१५.०४.२००६ अन्वये करार-नाम्याचा मसुदा व कार्यादेश पाठवण्यात आला होता. त्यानुसार श्री. मुथ्था यांनी रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दि.२०.०५.२००६ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

त्यांनी सदर दुकान चालवणेकामी स्वतःचे फर्निचर तयार करुन घेतलेले आहे. तसेच संस्थानतर्फे लाकडी काऊंटर देखील तयार करुन झालेले आहे. परंतू संस्थानतर्फे त्यांना दुकान प्रत्यक्षात चालू करणेबाबत अद्याप कळविण्यात आलेले नाही.

सदरचे दुकान संस्थानतर्फे चालविणेकामीचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६/०९/२००६ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. सदर विषयावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थानचे जुने रुग्णालयात औषधे विक्रीसाठी किमान १० X १० स्केअर फुट जागा श्री.राजेंद्र खि. मुथ्था यांना देण्यात यावी व नविन रुग्णालयातील दुकान त्वरीत चालु करावे यासाठी संबंधीतांना उपसमितीचे समक्ष आमंत्रित करुन कालावधी व भाडे याबाबत निर्णय घेण्यात यावा असे ठरले आहे.
तसेच याबाबत मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी याना वैद्यकिय संचालक यांनी दि. ३०/१०/२००६ रोजी फॅक्सवर पत्र पाठवून औषधाचे दुकान संस्थानतर्फे चालवावे किंवा कसे? याबाबत आपले आदेश दयावे असे कळविले होते. त्यावर डॉ. तिवारी यांनी संस्थानचे औषध दुकान त्वरीत चालु करावे असे आदेश दिलेले आहे.

दि. १६/०९/२००६ चे सभेत ठरलेप्रमाणे श्री. मुथ्था यांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी संस्थानचे जुने रुग्णालयात औषधे विक्रीसाठी किमान १० X १० स्केअर फुट जागेसाठी त्यांनी रुपये ३०,०००.०० प्रति महिना हा दर देऊ केला. त्यांना सभेने साईबाबा हॉस्पिटलकडील औषध विक्री दुकान दिनांक १५ नोव्हेंबर २००६ पासून सुरु करणेबाबत सांगितले. तसेच साईनाथ रुग्णालयाकडील दुकान एक वर्ष कालावधीसाठी चालविण्यास देण्यात यावे. यासाठी करानामा करुन घेण्यात यावा असे ठरले होते.

परंतू आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, सदरचे औषधे दुकान भाडे तत्वावर चालविण्यास न देता ते संस्थानमार्फत चालविण्यात यावे. याकामी श्री मुथ्था यांचे संस्थानकडे ठेवलेली अनामत रक्कम त्यांना परत करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**२९. <u>गुंतवणूकीबाबत</u>**

दक्षिणापेटीतून दि.२० ऑक्टोबर २००६, दि.२८ ऑक्टोबर,२००६, व दि.१ नोव्हेंबर २००६ रोजी अनुक्रमे रुपये ९७,२०,८८७.००, रुपये १,४२,३२,९५८.०० व रुपये ६३,३६,९८६.०० इतक्या मोठ्या प्रमाणात रक्कम प्राप्त झाल्याने संस्थानच्या बचत खात्यामध्ये सध्या ६ कोटीपेक्षा जास्त रक्कम जमा झालेली आहे.

उपरोक्त रकमेपैकी साधारणत: दैनंदिन खर्च व कर्मचारी वेतनासाठी रुपये २ कोटी एवढी रक्कम राखून ठेवून गुंतवणूकीसाठी रुपये ४ कोटी इतकी रक्कम उपलब्ध होत आहे. सदरची रक्कम व्यवस्थापन समितीची सभ होईपर्यन्त राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागवून अल्प मुदतीसाठी (३० ते ४५ दिवस) उच्चतम व्याज देणाऱ्या बँकाकडे गुतवणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दैनंदिन खर्चासाठी आवश्यक असणारी रक्कम रुपये २ कोटी व्यतिरिक्त पुरवठादारांच्या येणाऱ्या बीलांसाठीही आवश्यक ती रक्कम राखुन ठेवुन उर्वरित रक्कम उच्चतम व्याज देणाऱ्या बँकांमध्ये ४६ दिवसांसाठी विभागुन गुंतविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**३०. <u>डॉ.प्रतिभा विनोद तांबे, यांची श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओ.पदावर नेमणूक देणेबाबत.</u>**

डॉ.प्रतिभा विनोद तांबे, संगमनेर यांनी त्यांचे दिनांक २.११.२००६ चे अर्जान्वये त्यांनी पुणे विद्यापिठातून M.B.B.S. ही पदवी सन २००१ मध्ये घेतली असून, सन २००२ मध्ये श्रीसाईनाथ रुग्णालयात इंटर्नशिप पूर्ण केलेली आहे. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओ. या पदावर नेमणूक देणेची विनंती केली असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग )

**३१. <u>गुरुस्थान मंदिराबाबत-</u>**

गुरुस्थान मंदिरातील पवित्र निंबवृक्षाच्या बुंध्याच्या/खोडाच्या लगतच्या श्रीं च्या पादुकांकरीता आर.सी.सी.चे छोटे मंदिर बांधण्यात आलेले आहे. निंबवृक्षाच्या नैसर्गिक वाढीमुळे या छोटया मंदिराच्या एका खांबास तडा गेल्याचे आढळून आले आहे. छोटया मंदिराचे वरुन पुन्हा आर.सी.सी. मंदिराची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर मंदिराच्या छताच्या मधून फांद्या जाण्यासाठी छिद्र (मोकळी जागा) ठेवण्यात आले आहे. छताचे छिद्र लहान आकाराचे असल्यामुळे फांद्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होत आहे.

तसेच मंदिरावरील कौलारु छत उन-पावसापासून साईभक्तांना संरक्षण मिळण्यास अपुरे पडते याबाबत व्यवस्थापन मंडळाचे दि.१६/११/२००२ चे सभेत छताचा आकार वाढविणे व त्याच्या नूतनीकरणाबाबत विषय ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होवून आर्किटेक्ट श्री.बॉबी विजयकर व पुरातन वास्तु तज्ञ डॉ.श्री.गोरक्षकर यांनी स्थानिक विश्वस्तांच्या उपस्थितीत पहाणी करुन तयार केलेला कच्चा आराखडा आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड कापरे यांना दाखवून त्याबाबत त्यांचे मत घेणेचे ठरले होते. त्यानुसार आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड कापरे यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

निंबवृक्षाच्या वाढीमुळे गुरुस्थान मंदिराचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरीता सध्याचे गुरुस्थान मंदिर व त्याच्या आतील छोटे मंदिर काढणे आवश्यक आहे. पवित्र निंबाचे झाडास साईभक्तांना हात लावता येणार नाही तशा अंतरावर ग्रील मध्ये झाडाच्या बाजुंनी स्ट्रक्चर उभारण्यात यावे. निंबवृक्षाचे बाजूने सध्या असलेली जाळी काढून घेण्यात यावी. सध्या असलेला फोटो व मूर्ती नवीन म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात यावे. निंबवृक्षाचे बाजूने दर्शनरांगेसाठी स्टेनलेस स्टीलचे रेलिंग बसवावे. यासाठी रुपये १.८ लाख खर्च अपेक्षित आहे. त्यावर मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२-१३/०७/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१५ अन्वये चर्चा होवून आर्किटेक्ट यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार गुरुस्थान मंदिराचे आर.सी.सी. मंदिर व आतील छोटे मंदिर काढणे, पवित्र निंबवृक्षाचे झ ाडास साईभक्तांना हात लावता येणार नाही तशा अंतरावर ग्रीलमध्ये झाडाचे बाजूने स्ट्रक्चर उभारणे,

सध्या असलेली जाळी काढून घेणे, सध्या असलेली मूर्ती म्युझियम हॉलमध्ये ठेवणे, मात्र फोटो व श्री महादेवाची पिंड गुरुस्थान मंदिरातच ठेवणे, निंबवृक्षाचे बाजूने दर्शनरांगेकरीता स्टेनलेस स्टिलचे रेलिंग बसविणे, तसेच समक्ष पहाणीमध्ये ठरलेप्रमाणे सध्या असलेल्या कौलारु छताचे बाहेरील बाजूस भिंत बांधणे. या तपशीलानुसार सुधारीत खर्चाचे प्लॅन व एस्टिमेट मागविणेस मान्यता देण्यात आली.

तत्कालिन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१/०३/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देवून मंदिर परिसरातील इतर कामा बरोबरच गुरुस्थान मंदिराचे कामाची मे.विश ऑन ॲण्ड असो., यांची निम्नतम दराची निविदा स्विकारण्यात आली होती. त्यानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला होता. मात्र मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/११/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९ अन्वये गुरुस्थान मंदिराचे काम स्थगित ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे.

याबाबत आर्किटेक्ट बॉबी विजयकर, मुंबई यांना पुन्हा पहाणी करुन प्लॅन सादर करणेस विनंती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.३१/१०/२००६ रोजी समक्ष पहाणी करुन सविस्तर प्रस्ताव व ले-आउट प्लॅन सादर केला आहे.

आर्किटेक्ट यांनी दि.२५/१०/२००६ रोजीचे प्रस्तावात खालीलप्रमाणे बाबी सुचविलेल्या आहेत.

०१ निंबवृक्षाशी धार्मिक भावना निगडीत असल्याने, त्यास कोणत्याही प्रकारची बाधा पोहचणार नाही.

०२ साईभक्तांना गुरुस्थान पादुकांचे दर्शन विनासायास होणार असल्याने, गर्दीचे नियंत्रण करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. त्यामुळे या ठिकाणचे मनुष्यबळ दुसऱ्या कामासाठी वापरता येईल.

०३ ज्या साईभक्तांना पादुकांना हस्तस्पर्श करुन दर्शन घ्यावयाचे आहे, त्यांना फक्त एक पायरी चढून दर्शन घेता येईल.

०४ श्रीं च्या पादुकांची स्थापना निंबवृक्षाजवळ नविन हिरव्या रंगाचे संगमरवर फरशीचा चौथरा बांधून त्यावर करण्यात येईल.

०५ गुरुस्थानच्या चौथाऱ्यावर योग्य अशी सोय करुन, श्रीं च्या पादुकांवर चांदीची छत्री बसविता येईल.

०६ गुरुस्थानच्या कॉलम्समध्ये रेलिंग करुन, साईभक्तांच्या दर्शनाची सोय करता येऊ शकेल.

०७ गुरुस्थान मंदिराचे आतील बाजूस असलेले बांधकाम काढून घ्यावे लागेल.

तरी उपरोक्त प्रमाणे आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर व यापुर्वी तत्कालीन व्यवस्थापन मंडळाचे झालेल्या निर्णयाबाबत पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०३ व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८..२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.८७६.** दिनांक १९.०८.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता ऑक्टोबर,२००६.**

**(ब) माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे ऑक्टोबर,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.८७७.** (A) माहे ऑक्टोबर,२००६ मधील जमा रुपये १०,८४,११,०७४.०२ खर्च रुपये ८,२२,७७,०२९.९६ चे तक्ते, माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये २३,१२,३७७.०० चे खर्चाचे तक्ते माहे १३ नोव्हेंबर,२००६ अखेरीस रुपये २,५०,७०,५१,३२१.२० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे ऑक्टोबर,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ३,९३,७३,५२१.९० देणगीचा तक्ता, माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,११,८९९.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे ऑक्टोबर, २००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ८७७.(B).** माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये ७७,६६,७६४.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ८७७.(C).** माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता अंतररुग्ण रुपये १६,९३०.०० ,बाह्य रुग्ण ३०,३५१.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये २१,८००.०० ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे ऑक्टोबर,२००६ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीबाबत.**

**निर्णय क्र. ८७७.(D).**माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ४,७३,६२१/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०५. माहे ऑक्टोबर,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ८७७.(E)** माहे ऑक्टोबर , २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४२,८८१ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ८७७.(F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली. तसेच तक्ता 'ब' मध्ये नमूद केलेली खालील अंतिम बिले अदा करणेसाठी मंजुरी देण्यात आली.

०१) मंदिर परिसर दक्षिण बाजू कंपाउंड भिंत उंची वाढविणे व दक्षिण बाजूस आकर्षक महाव्दार बनविणे - अंतिम बिल रक्कम रु. ९,७३,११४.००

०२) मंदिर परिसरातील महाव्दार कास्ट आयर्न गेट बसविणे- अंतिम बिल रक्कम रु.१५,१५,६८९.००

०३) रथ-पालखी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे - अंतिम बिल रक्कम रु. ८०,१८,९७८.००

०४) शिर्डी स.क्र.१२४/१ मध्ये नविन मध्यवर्ती भांडार इमारत बांधकाम करणे - सदर कामापैकी सिव्हील वर्कचे मोठे काम ठेकेदार यांनी विहीत मूदतीत पूर्ण केलेले होते. फक्त विद्युतीकरणाचे काही किरकोळ कामासाठी विलंब झालेला आहे. तसेच इमारतीचा प्रत्यक्ष वापर दि. ३०/१२/२००५ पासून सुरु करण्यात आलेला आहे. त्यामुळे ठेकेदार यांना दंड आकारणी करु नये असे ठरले. त्यानुसार याकामासाठी दि. ३०/१२/२००५ अखेर पर्यंतचे मुदतवाढीस व अंतिम बिल रक्कम रु. ६१,५६,२७४.०० मात्र अदा करणेसाठी मंजुरी देण्यात आली.

०५) नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे- या कामाबाबत तक्ता 'ब' खाली नमूद केलेल्या टिपणीवर सविस्तर चर्चा करणेत येऊन, M-१५ कॉंक्रीट पडदीचे बाबीसाठी मा.श्री.सी.डी. फकीर व आर्किटेक्ट यांनी केलेल्या शिफारशीनुसार रु.३,७४२.००/cum हा सुधारीत दर मंजूर करणेत आला. तसेच त्यानुसार येणारे रु. ८,००,५६८.०० मात्रचे वाढीव खर्चास मंजुरी देणेत आली. M-१० पेव्हींग ब्लॉक, वॉटर टेबल, फुटपाथ कर्बस्टोन व RCC NP2 pipe 600 mm या साईटवर शिल्लक राहीलेल्या मटेरीअलसाठी आर्कीटेक्ट यांनी शिफारस केलेल्या दराने पेमेंट करणेस मंजुरी देणेत आली. सदर कामाचा वाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने ठेकेदार यांना विहीत मूदतीत काम पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे आर्किटेक्ट

यांचे शिफारशीनुसार दि.३१/०५/२००६ अखेर पर्यंतचे मूदतवाढीस मंजुरी देणेत आली.

अशाप्रकारे सदर कामासाठी यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या भाववाढीसह एकूण रु.३,६६,६२,९९५/- मात्रचे खर्चासह अंतिम बिल अदा करणेस मंजुरी देणेत आली. तसेच त्याव्यतिरिक्त VAT कराबाबत मा.श्री सी.डी फकिरसाहेब यांनी केलेल्या शिफारसींनुसार अतिरिक्त बाबींवर भरावा लागणारा VAT कर ठेकेदार यांना आदा करण्यात यावा असे ठरले. सदर अंतिम बिलाची रक्कम अदा करणेपुर्वी ठेकेदार न्यु महावीर कन्स्ट्रक्शन यांचेकडून काहीही तक्रार नसलेबाबत तसेच आता कुठल्याही प्रकारची बाकी नसलेबाबत लेखी घेण्यात यावे.(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. ८७७.(G)** माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं. ०५ मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदीबाबत निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८७८.** श्री साईबाबा आणि श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे मशिनरी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ चे सभेत प्लॅस्टीक सर्जरी इन्ट्रुमेंट, इक्वीपमेंट, फिजीओथेरपी मशिनरी / उपकरणे, एक्स-रे मशिन बायबॅक ऑफर, इ.एन.टी इन्स्टुमेंट तसेच साईबाबा रुग्णालयासाठी लागणाऱ्या मशिनरी उपकरणे खरेदीस निर्णय क्रमांक ५३५(१), ५३५(९), ५४८, ५७५, ६४३ व न्युरो सर्जरीचे हत्यारे खरेदीस मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०९/२००६ निर्णय क्र. ६९५ अन्वये

| अ.नं. | विषय | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | फिजिओथेरपी विभागासाठी उपकरणे / साहित्य खरेदी बाबत. | ४१,१०,०१०.०० |
| २ | प्लॅास्टिक सर्जरीसाठी मशिनरी साहित्य / हत्यारे इ.खरेदी बाबत. | २०,००,०००.०० |
| ३ | क्ष-किरण मशिन खरेदी बाबत. | ३०,००,०००.०० |
| ४ | इ.एन.टी. शस्त्रक्रिया करणेसाठी मशिनरी /उपकरणे /हत्यारे खरेदी बाबत. | ३५,०१,०००.०० |
| ५ | मशिनरी /उपकरणे खरेदीबाबत. | ९९,६२,५००.०० |
| ६ | न्युरो सर्जरीसाठी लागणारे हत्यारे खरेदीबाबत. | ३६,०५,५०५.६० |
| | **अंदाजे एकुण किंमत** | **२,६१,७९,०१५.६०** |

वरील प्रमाणे अंदाजे रु.२,६१,७९,०१५.६० च्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०७.१०.२००६ अखेर बंद पाकिटात कोटेशन (निविदा) मागविण्यात आले होते. सदरच्या मशिनरी / उपकरणे / हत्यारे खरेदी साठी मुंबई कार्यालयाकडून १० व शिर्डी येथील कार्यालयाकडून २ अशा एकुण १२ अधिकृत विक्रेते / कंपन्यांचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. ते खालील प्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | बी.पी.एल.लि., मुंबई | २ | इसबी डायनामेड प्रा.लि, मुंबई |
| ३ | हीन्टेक इलेक्ट्रॅानिक्स प्रा.लि., दिल्ली | ४ | सिमॅडझु प्रा.लि., मुंबई |
| ५ | श्री वेंकटेस सर्जीकल, मीरज | ६ | बायो-टेक, मुंबई |
| ७ | रेकॉर्डर्स ॲण्ड मेडीकेअर सिस्टीम प्रा.लि., चंदीगड | ८ | बी.एल.लाईफ सायन्स प्रा.लि., दिल्ली |
| ९ | बायोमेडीकॉन सिस्टीम प्रा.लि., मुंबई | १० | नितिश डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि., मुंबई |
| ११ | ग्राफीक डिव्हासेस, मुंबई | १२ | मेडटेक, मुंबई |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या १२ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १४/१०/२००६ रोजी समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचे तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो सोबत सादर केला आहे.

**<u>अ) न्युरो सर्जरीचे हत्यारे खरेदीकामी</u>** प्राप्त निविदाधारकांचे तुलनात्मक दरांचे तक्त्याचा अभ्यास केला असता त्यांचे मते मे. नितीश, मुंबई व मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांनी सर्वच हत्यारांकरीता दर दिलेले आहे. त्यामध्ये मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांनी Asculap या जर्मन कंपनीचे हत्यारांकरीता दर दिलेले आहे. मे. नितीश, मुंबई यांनी कंपनीचे नाव नमुद केलेले नाही. मे. बी.एल.लाईफसायन्स यांनी Mizhuh या जर्मनस्थित कंपनीचे ठराविक हत्यारांकरीता दर दिलेले आहे. तथापी न्युरोसर्जन डॉ. टिंगरे यांनी मे. नितीश, मुंबई व मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवावे व हत्यारे हि Codman या कंपनीचे हत्यारे घ्यावीत असे सुचविले आहे. तथापी Codman या कंपनीचे हत्याराकरीता कोणाचेही दर आलेले नाही. न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारा ऑपरेशन टेबल मे. ईसबी डायनामेड, मुंबई या निविदाधारकाने Maquet या जर्मनस्थित कंपनीचे Alphastar या मॉडेलचे दर ६७४७४ Uro सर्व ॲक्सेसरीजसह अंदाजे रु. ४५१३४४३/- इतके दिलेले आहेत.

डॉ. टिंगरे साहेब यांनी प्राप्त झालेल्या दरामध्ये काही हत्यारे मे. बायोमेडीकॉन तर काही हत्यारे मे. नितीश यांचेकडून घेण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यांचे शिफारशीनुसार हत्यारे खरेदीसाठी रु. ४१,९३,२६९.१९ खर्च येणार आहे तर ऑपरेशन टेबलकरीता रु. ४५१३४४३/- असे दोन्ही मिळून सदरचे खरेदीकामी एकुण रु. ८७०६७१२.१९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) फिजीओथेरपी मशिनरी / उपकरणे** खरेदीकामी एकुण ०४ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तो रुग्णालयातील फिजीओथेरपीस्ट डॉ. संजय कोते व डॉ. सुरेश नवसुपे यांना दाखविला असता त्यांनी प्राप्त कोटेशनचा अभ्यास करुन एकुण ४० आयटम्सपैकी ३२ आयटमसाठी चांगल्या दर्जाची मशिनरी / उपकरणे यांची शिफारस केलेली आहे व त्यासाठी रु. ५१,५०,९०५.२५ इतका खर्च येणार आहे. उर्वरीत ०८ आयटम्ससाठी त्यांनी (अ.नं. ७,१०,११,१३,१४,२४,२६,२८) या उपकरणांची सध्या आवश्यकता नसल्याचे कळविले आहे त्यामुळे सोबतच्या तक्त्यात ती घेण्याबाबत शिफारस करण्यात आलेली नाही.

**क) प्लॅस्टिक सर्जरी हत्यारे खरेदीकामी** एकुण ०३ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून त्यातील एकुण ४१ आयटम्सपैकी १६ आयटम्सकरीता दर प्राप्त झालेले आहे. (अ.नं. १, २, ७, ९ ते १८,२० ते २३) परंतु त्यासाठी इतर निविदाधारकांचे तुलनात्मक दर प्राप्त झाले नाही. डॉ. करमरकर यांनी सदरची हत्यारे हि प्राप्त झालेल्या निविदाधारकाकडून घेण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यासाठी रु. २,७८,०७,१५१.३६ इतका खर्च येणार आहे. उर्वरीत २५ हत्यारे खरेदीकामी कोणाचेही दर आलेले नाही त्यासाठी त्यांनी फेर कोटेशन मागवावे अशी शिफारस केलेली आहे.

**ड) एक्स-रे मशिन बायबॅक करणेकामी** मे. सिमेन्झु, मुंबई या एकाच निविदाधारकाची निविदा प्राप्त झालेली आहे. आपण सिमेन्स कंपनीचे ५०० एम.ए. चे जुने मशिन परत करुन (Buyback) नविन मशिन घेण्याबाबत दर मागविण्यात आले होते. तर पोर्टेबल एक्स-रे मशिन नविन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. वरील दोन्हीही मशिनसाठी मे. सिमेन्झु, मुंबई यांनी त्यांचे दर दिलेले आहे.

५०० एम.ए. एक्स-रे मशिनकरीता (Buyback) जुने मशिनची किंमत रु. ७५०००/- इतकी देऊ केलेली असून नविन मशिनची किंमत रु. ४५,७५,०००/- इतकी देऊ केलेली आहे. जुने मशिनची किंमत रु. ७५०००/- वजा जाता नविन मशिनवी निव्वळ किंमत रु. ४५,००,०००/- इतकी आहे.
पोर्टेबल एक्स-रे मशिनसाठी त्यांनी रु. १०,००,०००/- इतकी कळविली आहे.

याबाबत श्री साईनाथ रुग्णालयातील रेडीओलॉजिस्ट डॉ. केसरकर यांनी एक्स-रे मशिन सिमेन्स कंपनीचेच घ्यावे अशी शिफारस केलेली आहे तर पोर्टेबल मशिन नामांकित व दुरुस्ती देखभाल सेवा तत्पर असणाऱ्या कंपनीचेच घ्यावे अशी शिफारस केली आहे. परंतु सिमेन्स कंपनीचे कोटेशन आपणास प्राप्त झालेले नाही तेंव्हा यासाठी फेर कोटेशन मागवावे लागतील. आतापर्यंत आपणाकडे सिमेन्स कंपनीचेच एक्स-रे मशिन असून त्यांची विक्रीनंतरची सेवा व देखभाल हि चांगल्या प्रकारची आहे. तेंव्हा त्यांचेकडून फेर कोटेशन मागवून दोन्हीही मशिन खरेदी करावे असे मत आहे.

**इ) ई.एन.टी. इन्स्ट्रुमेंट** करीता एकुण ०३ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त निविदाधारकांचा तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो श्री साईनाथ डॉ. आर. के. कुलकर्णी यांना दाखविण्यात आला होता. तथापी डॉ. कुलकर्णी यांचे मते प्राप्त झालेले कोटेशन हे तुलनात्मक दृष्टया पुरेसे नसून त्यामध्ये बऱ्याचशा मशिनरी / उपकरणे / हत्यारे खरेदीकामी दर प्राप्त झालेले नाहीत ज्या हत्यारांसाठी दर प्राप्त झालेले आहेत ते दर हे इम्पोर्टेड हत्यारांसाठी दिलेले आहे. तेंव्हा त्यासाठी फेर कोटेशन मागवावे अशी शिफारस केलेली आहे.

**ई) श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मशिनरी / उपकरणे** करीता एकुण ०५ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे. त्यातील एकुण ११ आयटम्सपैकी अ.नं. १, ४, ५, ६, ८, ९, १० करीता कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. अ.नं. २ Defibrillator करीता मे. बी.पी.एल. लि., मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. यांनी एकुण ५ प्रकारचे मॉडेलकरीता दर दिलेले आहे. अ.नं. Pulse Oxymeter करीता मे. बी.पी.एल. लि., मुंबई व मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांचे दर प्राप्त झालेले आहे. अ.नं. ७ Digital Torniquet करीता मे. नितीश, मुंबई यांचे एकमेव दर प्राप्त झालेले आहे. अ.नं. ११ Orthopedic Operation Table करीता मे. श्री व्यंकटेश, मीरज व मे. ईसबी डायनामेड, मुंबई यांचे दर प्राप्त झालेले आहे.

यापैकी मे. श्री व्यंकटेश, मीरज यांनी संस्थानचे जाहिरातीस अनुसरुन निविदा खरेदी केलेली नाही. त्यामुळे त्यांची निविदा विचारात घेऊ नये असे मत आहे. मे. ईसबी डायनामेड, मुंबई यांनी Maquet या जर्मनस्थित कंपनीचे Alphastar या मॉडेलचे दर (९७२९६ युरो) सर्व ॲक्सेसरीजसह दिलेले आहे. त्याची / पयात अंदाजे किंमत रु. ५८,३७,८७५/- इतकी होते. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२२००६ चे सभेतील निर्णय क्र. ४१८(२) अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ०१ आर्थोपेडीक ऑपरेशन टेबल (Buyback) खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ०२ आर्थोपेडीक ऑपरेशन टेबलची मागणी करण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे निम्नत्तम दर व एकमेव निविदेतील दरानुसार रु. १२२३२९९८.९२ इतका खर्च येणार

आहे. ज्या आयटम्ससाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत त्यासाठी फेर कोटेशन मागवावे लागणार आहे.

तरी उपरोक्तपैकी **अ, ब, क** करीता प्राप्त झालेल्या निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यास तर **ड, इ, ई** इत्यादीचे खरेदीकामी फेर कोटेशन मागविण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मशिनरी / उपकरणे खरेदीकामी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, कॅप्टन वासुदेवा, श्री. शैलेश कुटे, श्री. पांडुरंग ग. अभंग यांनी पुरवठा धारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा असे ठरवण्यात आले. त्यानुसार मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे मशिनरी / उपकरणे खरेदीसाठी चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्या.

**०१) न्युरो सर्जरी हत्यारे व ऑपरेशन टेबल-**

न्युरो सर्जरी हत्यारांसाठी मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई, मे. बी.एल. लाईफसायन्स, नवी दिल्ली, मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांनी दर दिलेले आहेत. तर ऑपरेशन टेबलसाठी मे. एसबी डायनामेड, मुंबई यांनी मॅक्वेट कंपनीचे दर दिलेले आहेत.

पुरवठा धारकांशी चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्यात. त्यामध्ये मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई यांनी Boss (USA) या कंपन्याचे दर दिलेले आहेत. त्यांनी जवळपास सर्व हत्यारांसाठी दर दिलेले आहेत. त्यांनी आजचे सभेपुढे ३% सुट देऊ केलेली आहे. तसेच ज्या काही हत्यारांसाठी त्यांनी टेंडरमध्ये दर दिलेले नाही ती हत्यारे ते आपणास मोफत देणार आहेत. तसेच सर्व हत्यांराची वॉरंटी दोन वर्षाची देणार आहे.

मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांनी सर्व प्रकारच्या हत्यारांसाठी दर दिलेले आहे. त्यांची हत्यारे (Asculab) या कंपनीचे असून त्यांनी आजचे सभेत १२% सुट देऊ केली असून ५% इतक्या रक्कमेची १ वर्षाकरीता बँक गँरटी देणार आहे.

मे. बी.एल. लाईफसायन्स, नवी दिल्ली यांनी ७१ हत्यारांकरीताच दर दिलेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडून आपणास पुर्ण सेट उपलब्ध होऊ शकणार नाही. तसेच त्यांनी सभेपुढे कोणतीही सुट देऊ केलेली नाही.

| **A) Neurosurgery SetSkull Set Adult** | Total Item | Quoated item | Not Quoated Item | Total Cost |
|---|---|---|---|---|
| Nitish Dist.Mumbai | 64 | 63 | 1 | 1521989.42 |
| B.L.Lifesciense,Delhi | 64 | 31 | 33 | 646470.00 |
| Biomedicon,Mumbai | 64 | 64 | Nil | 1237125.60 |
| | | | | |
| **B) Craniotomy Set No.1.** | | | | |
| Nitish Dist.Mumbai | 77 | 74 | 3 | 2099703.46 |
| B.L.Lifesciense,Delhi | 77 | 20 | 57 | 852720.00 |
| Biomedicon,Mumbai | 77 | 77 | Nil | 2033943.40 |
| | | | | |
| **C) New Laminectomy Set** | | | | |
| Nitish Dist.Mumbai | 68 | 68 | Nil | 2115481.59 |
| B.L.Lifesciense,Delhi | 68 | 20 | 48 | 704550.00 |
| Biomedicon,Mumbai | 68 | 68 | Nil | 1883511.60 |
| | | | | |
| | A | B | C | Total |
| Nitish Dist.Mumbai | 1521989.42 | 2099703.46 | 2115481.59 | **5737174.47** |
| B.L.Lifesciense,Delhi | 646470.00 | 852720.00 | 704550.00 | **2203740.00** |
| Biomedicon,Mumbai | 1237125.60 | 2033943.40 | 1883511.60 | **5154580.60** |

न्युरोसर्जरी ऑपरेशन टेबलकरीता मे. एसबी डायनामेड लि., मुंबई यांची एकमेव निविदा आलेली आहे. त्यांनी त्यांचे निविदामध्ये सदरचे ऑपरेशन टेबलकरीता सर्व ॲक्सेसरीजसह Maquet या जर्मन कंपनीच्या टेबलचे (Model-Alphastar) दर दिलेले आहे. त्यांनी एका टेबलची किंमत सर्व ॲक्सेसरीजसह ६७४७४ युरो दिलेली आहे. त्याचे रुपयात अंदाजे किंमत प्रती युरो रु. ६०/- प्रमाणे तसेच कस्टम डयुटी क्लीयरन्स चार्जेस इत्यादी धरुन रु. ४५,१३,४४३.८१ इतकी होते. तर आर्थोपेडीक ऑपरेशन टेबलसाठी अंदाजे रु.५८,३७,८७५.२२१ इतकी किंमत दिलेली आहे. आजचे सभेत चर्चा/वाटाघाटीमध्ये एक टेबल न्युरोसर्जरीसाठी व एक टेबल आर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी घेणेबाबत निर्णय घेण्यात आला व दोन टेबलसाठी मे. एसबी डायनामेड, मुंबई यांचेशी चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्या मे. एसबी डायनामेड, मुंबई यांनी दोन टेबलकरीता अंतीम किंमत रु. ८९,१९,०००/- इतकी रक्कम देऊ केलेली आहे. सदरची किंमत हि न्युरो सर्जरी टेबल व ॲक्सेसरीजसाठी लागणारी कस्टम डयुटी ९.३% व आर्थोपेडीक टेबलच्या ॲक्सेसरीजसाठी ३७% कस्टम डयुटी धरुन आहे. तसेच दोन वर्षाची वॉरंटी देऊ केलेली आहे.

तसेच त्यांनी Spine सर्जरीसाठी लागणाऱ्या ॲक्सेसरीज ज्याची अंदाजे किंमत रु. अडीच लाख आहे. त्या ते मोफत देणार आहेत. एकुण किंमतीचे ५% बँक गॅरंटी २ वर्षाकरीता देणार आहे. सदरचे पेमेंट

त्यांना लेटर ऑफ क्रेडीटच्या स्वरुपात अदा करावयाची आहे. कस्टम क्लियरन्ससाठी लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता संस्थानने करुन द्यावी. यावर चर्चा होऊन सदरचा टेबल हा Maquet या नामांकित कंपनीचा असून कामकाजाच्या दृष्टीने उत्कृष्ट असल्याने व न्युरो सर्जरी हा विभाग तातडीने सुरु करावयाचा असल्यामुळे फेर जाहिरातीचा खर्च व होणारा विलंब लक्षात घेता सदरचे २ टेबल मे.ईसबी डायनामेड, मुंबई यांचेकडून खरेदी करावा तसेच न्युरो सर्जरीची हत्यारे व टेबल एकाच वेळी खरेदी करणे आवश्यक असल्याने न्युरो सर्जरीची हत्यारे हि मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ५७,३७,१७४.४७ चे खर्चास, तर ऑपरेशन टेबल मे. एसबी डायनामेड लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु. ८९,१९,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

**०२) <u>फिजीओथेरपी मशिनरी / उपकरणे</u>** - सदरचे मशिनरी / उपकरणे खरेदीकामी मे. बायोटेक-मुंबई, मे. मेडटेक-मुंबई, मे. ग्राफीक- मुंबई, मे. हिन्टेक-दिल्ली यांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदरचे ०४ निविदाधारक आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| **Physiotherapy Machinery / Equipments** | Total item | Quoated item | Not Quoated Item | Total Cost |
|---|---|---|---|---|
| Biotech, Mumbai | 40 | 18 | 22 | **1132738.88** |
| Medtech, Mumbai | 40 | 39 | 1 | **4974732.95** |
| Graphic, Mumbai | 40 | 1 | 39 | **128520.00** |
| Hintek, Delhi | 40 | 7 | 33 | **4360489.00** |

एकुण मागणीपैकी मे. बायोटेक-मुंबई यांनी ४० पैकी १८ मशिनरी / उपकरणे करीता दर दिलेले आहे. त्यांचेशी चर्चा / वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी त्यांचे कोटेशन क्रमांक १३४४ मध्ये असलेल्या मशिनरी / उपकरणेवर १५% सुट तर कोटेशन क्रमांक १३४३ मध्ये असलेल्या मशिनरी / उपकरणेवर २०% सुट देऊ केलेली आहे.

मे.मेडटेक-मुंबई यांनी ४० पैकी ३९ मशिनरी / उपकरणेकरीता दर दिलेले आहे. त्यांनी आजचे सभेत चर्चा / वाटाघाटीनंतर ५% सुट देऊ केलेली आहे.

मे.हिन्टेक, दिल्ली यांनी ४० पैकी ७ मशिनरी / उपकरणेकरीता दर दिलेले आहे. त्यांनी आजचे सभेत चर्चा / वाटाघाटीनंतर ८% सुट देऊ केलेली आहे.

मे.ग्राफीक, मुंबई यांनी ४० पैकी १ मशिनरी / उपकरणेकरीता दर दिलेले आहे. त्यांनी आजचे सभेत चर्चा / वाटाघाटीनंतर कोणत्याही प्रकारची सुट देऊ केलेली नाही.

यावर चर्चा होऊन मे. मेडटेक, मुंबई यांनी सर्व मशिनरी / उपकरणे यांचे दर दिलेले आहेत उर्वरीत ३ निविदाधारकांनी पुर्ण सेटचे दर दिलेले नाहीत, त्यामुळे कामकाजाच्या सोईचे दृष्टीने एकाच कंपनीचे सर्व मशिनरी / उपकरणे असावीत म्हणून फिजीओथेरपीचे सर्व मशिनरी / उपकरणे मे. मेडटेक-मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु. ४९,७४,७३२.९५ खर्चास मान्यता देण्यात आली.

**०३) <u>प्लॅस्टिक सर्जरी हत्यारे</u>** - यामधील इलेक्ट्रिक ड्रिल याकामी मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली होती. त्यांनी Sodem या कंपनीचे दर रु. १४०५९७८.८८ इतके दर दिलेले होते. सदरचे ड्रिल हे न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रियेसाठी तसेच प्लॅस्टिक सर्जरीच्या शस्त्रक्रियासाठी एकत्रित वापरता येऊ शकते. आजचे सभेत इलेक्ट्रीक ड्रिल ऐवजी न्युमेटीक ड्रिल जे इलेक्ट्रीक ड्रिल पेक्षा अधिक चांगल्या प्रकारचे आहे. इलेक्ट्रिक ड्रिल हे इलेक्ट्रिकवर चालणारे असल्यामुळे ते वारंवार नादुरुस्त होते तर न्युमेटीक ड्रिल हे काम्प्रेसरवर चालते त्याचा मेंटेनन्स खर्च देखील कमी असतो व त्यामध्ये अदयावत तंत्रज्ञाचा समावेश आहे त्यामुळे इलेक्ट्रिक ड्रिलऐवजी न्युमेटीक ड्रिल घेणेबाबत निर्णय घेण्यात आला. मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई यांनी आजचे सभेत सदर न्युमेटीक ड्रिलसाठी रु. १४,०६,६८०/- अधिक विक्रीकर ४% इतकी किंमत देऊ केली होती व त्या किंमतीवर त्यांनी ३% सुट दिलेली आहे. शिवाय सदर ड्रिलसाठी लागणाऱ्या सर्व ॲक्सेसरीज मोफत, २ वर्ष वॉरंटी, ५% बँक गॅरंटी २ वर्षाकरीता देऊ केलेली आहे.

वरीलप्रमाणे सदरचे इलेक्ट्रिक ड्रिल हे मे. नितीश डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई यांचेकडून खरेदी करावेत, तर उर्वरीत हत्यारांसाठी भारतीय कंपन्याकडुन कोटेशन मागविण्यात यावीत असे ठरले.

**०४) <u>क्ष-किरण मशिन</u>** - याकामी समाधानकारक व नामांकित कंपनीचे दर प्राप्त झालेले नसल्याने मे. सिमेंन्स लि., मुंबई यांचेकडून कोटेशन मागवून घेण्यात येऊन त्यांना चर्चा / वाटाघाटीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे बोलवून खरेदीबाबत निर्णय घेण्यात यावा.

**०५) <u>इ.एन.टी. इन्स्ट्रुमेंट</u>** - याकामी फेर कोटेशन मागविण्यात येऊन कोटेशनधारकांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष बोलवून निर्णय घेण्यात यावा.

**०६) <u>मशिनरी / उपकरणे -</u>** सदरचे मशिनरीपैकी डेफिब्रीलेटर ५ नग व पल्स ऑक्सीमीटर ५ नग यासाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीस अनुसरुन मे. बी.पी.एल. मुंबई या एकमेव नामांकित कंपनीचे दर प्राप्त झाले होते. सदरचे डेफिब्रीलेटर व पल्स ऑक्सीमीटर हे तातडीने आवश्यक असल्याने याकामी

अजुन मे. पॅमट्रान्स, मुंबई व मे. मेशटेक, मुंबई यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. सदरचे कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले. त्यांचे तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| S. N. | Name of Items | Qty | Make / Model | BPL Ltd., Mumbai | Make / Model | Pamtrons, Mumbai | Make / Model | Mestech, Mumbai | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Defibrillator | **4** | **Medtronic Biphasic Lifepack 20** | **392852.00** | Medtronic Biphasic Lifepack 20 | 425000.00 | Medtronic Biphasic Lifepack 20 | 430000.00 | 1571408.00 |
| | | **1** | **Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer** | **464286.00** | Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer | 525000.00 | Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer | 530000.00 | 464286.00 |
| | | | Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer and SPo2 | 535714.00 | Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer and SPo2 | 575000.00 | Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer and SPo2 | 585000.00 | |
| | | | BPL Monophasic DF2509 without Recorder | 121500.00 | BPL Monophasic DF2509 without Recorder | 135000.00 | BPL Monophasic DF2509 without Recorder | 135000.00 | |
| | | | BPL Monophasic DF2509 with Recorder | 157500.00 | BPL Monophasic DF2509 with Recorder | 170000.00 | BPL Monophasic DF2509 with Recorder | 175000.00 | |
| 2 | Pulse Oximeter | **5** | **BPL Pulse Oxymeter CLEO** | **50000.00** | BPL Pulse Oxymeter CLEO | 55000.00 | BPL Pulse Oxymeter CLEO | 60000.00 | **250000.00** |
| | | | | | | | | **Total** | **2285694.00** |

उपरोक्त प्रमाणे मे. बी.पी.एल. मुंबई या कंपनीचे दर सर्व मॉडेल्सकरीता निम्नत्तम आहेत. तसेच त्यांनी आजचे सभेत ७.५% सुट देऊ केली असून त्यांचे Medtronic Biphasic Lifepack 20 या मॉडेल्सचे ४ नग व Medtronic Biphasic Lifepack 20 with pacer चे १ नग डेफीब्रीलेटर व BPL Pulse Oxymeter CLEO या मॉडेलचे ५ पल्स ऑक्सीमीटर खरेदीकामी ७.५% सुट वजा जाता रु. २११४२६६.९५ चे खर्चास मान्यता देण्यात आली, तर उर्वरीत मशिनरी / उपकरणासाठी फेर कोटेशन मागविण्यात यावीत, असे ठरले.

सदरचे मागणीमधील डिजीटल टूर्नीकेट करीता मे.नितीष डिस्ट्रीब्यूटर्स,मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली होती. त्यांनी सिंगल डिजीटल टूर्नीकेट करीता रु.३८५७४८.५० इतके दर दिलेले होते. आजचे सभेपुढे मे. इंट्रा मेडीकल सिस्टीम ली.मुंबई यांचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. त्यावर चर्चा होऊन मे. इंट्रा मेडीकल सिस्टीम ली.मुंबई यांचे दर हे प्राप्त निविदेतील दरापेक्षा कमी असून त्याची किंमत रु. २९२५२०/- आहे. सदरचे टूर्नीकेट मे. इंट्रा मेडीकल सिस्टीम लि.मुंबई यांचेकडून घेण्यात यावे. असे ठरले.

**०७) आर्थोस्कोप सेट** - आर्थोस्कोप सेट खरेदीबाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १४/१०/२००६ निर्णय क्र. ७८५ (७) अन्वये आर्थोस्कोप सेट खरेदीकामी विहित पध्दतीने निविदा मागणी करुन आर्थोस्कोप सेट खरेदी करावा असे ठरले आहे.

त्यानुसार मुंबई येथून ३ बंद कोटेशन प्राप्त झाले आहेत ते खालीलप्रमाणे-

**०१.** मे. बायोमेडीकॉन सिस्टिम, मुंबई **०२.** मे. मल्टीलिंक सर्जीकल, मुंबई **०३.** मे. इमरजन्ट मेडी-टेक, मुंबई वरील तीन कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले होते. त्यांचे तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Product Code | Biomedicon, Mumbai | Multilink, Mumbai | Emergent, Mumbai | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5.5 mm Head Reamer Cannulated | 2 | FO055R | **23111.42** | 40000.53 | 28889.27 (5mm) | 46222.84 |
| 2 | 10.5 mm Head Reamer Cannulated | 2 | FO060R | **23111.42** | 40000.53 | 28889.27 (10mm) | 46222.84 |
| 3 | Timecut Wide Str 5x3.5mm 3.4 Diam | 1 | FO751R | **93797.87** | 162342.46 | 117247.33 | 93797.87 |
| 4 | Timecut Str 5x2.3mm 3.4 Diam | 1 | FO750R | **90320.78** | 156324.43 | 112900.98 | 90320.78 |
| 5 | Timecut Wide Upbiter 5x3.5m 3.4 mm | 1 | FO755R | **97272.57** | 168356.37 | 121590.71 | 97272.57 |
| 6 | Timecut Upbiter 5x2.5mm 3.4 Diam | 1 | FO754R | **93797.87** | 162342.46 | 117247.33 | 93797.87 |
| 7 | Arthoscope 4mm/150mm Length $30^0$ | 1 | PE514A | **242725.97** | 420102.63 | 303407.46 | 242725.97 |
| 8 | Arthoscope 4mm/150mm Length $0^0$ | 1 | PE484A | **213912.08** | 370232.45 | 267390.10 | 213912.08 |
| 9 | Arthoscope 4mm/150mm Length $70^0$ | 1 | PE524A | **225839.49** | 390876.04 | 282299.36 | 225839.49 |
| 10 | Standard Sheath ID2.7mm/OD3.8mm | 1 | EJ560R | **57362.39** | 99281.06 | 71702.99 | 57362.39 |
| 11 | Trocar Sleeve W/Valve 4.5mm 60mm | 1 | EJ434R | **32932.16** | 56997.97 | 41165.20 | 32932.16 |
| 12 | Meniscotome 4mm | 1 | FO734R | **7302.36** | 12638.70 | 9127.95 | 7302.36 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | Incision Knife Pointed Meniscus | 1 | FO731R | **7302.36** | 12638.70 | 9127.95 | 7302.36 |
| 14 | Meniscus Trimmer W/Probe Tip 5mm | 1 | FO741R | **8916.89** | 15433.07 | 11146.44 | 8916.89 |
| 15 | Caspar Rongeur str serr 3x | 1 | FF503R | **61708.41** | 106803.02 | 77135.52 | 61708.41 |
| 16 | Probe Hook Length 3mm 230mm | 1 | FO701R | **10102.15** | 17802.32 | 12627.69 | 10102.15 |
| 17 | Probe Hook Total Length 180mm Hook 2.0mm | 1 | FO699R | **10285.78** | 17484.49 | 12857.23 | 10285.78 |
| 18 | CCD Camera PAL,W.SVHS/BNC Cable, W/O Lens | 1 | PV140 | **457887.75** | 792498.03 | 572359.68 | 457887.75 |
| 19 | Xenon Light Source 180 watt | 1 | OP930 | **356135.51** | 616388.38 | 445169.38 | 356135.51 |
| | | | | | **Total in Rs.** | | **2160048.07** |

मे.बायोमेडीकॉन, मुंबई यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करण्यात आल्या.तथापि याकामी विहित पध्दतीने निविदा मागणी करुन खरेदी करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८) औषधे खरेदी व मेडिकल स्टोअर्स-**

यानंतर श्री साईबाबा रुग्णालयात संस्थानचे औषध दुकान त्वरीत चालु करण्यात यावे व त्यासाठी लागणारा कर्मचारी वृंद व कार्यपध्दती इत्यादी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निश्चित करावी तसेच सन २००६-२००७ या वर्षाकरीता निविदेतील मंजुर दराने अजुन ३ महिनेकरीता औषधांचा पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच रुग्णालयात शस्त्रक्रिया तातडीचे उपचार इत्यादीसाठी पुरवठा धारकांकडून काही कारणास्तव मालाचा पुरवठा न झाल्यास औषधे, साहित्य तातडीने खरेदी करणेत येऊन कार्योत्तर मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ०६** **श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथे फर्निचर व ॲल्युमिनिअम कामासाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.८७९.** वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे काही फर्निचर व ॲल्यु. पार्टीशनची कामे करुन मिळणेबाबत कळविले होते. त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेऊन आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचे कडून प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले. याप्रमाणे अंदाजपत्रकानुसार सदर कामास रु. ५,७४,४९३.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त फर्निचर व ॲल्यमिनिअम पार्टीशनची कामे करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०९/२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३८६ अन्वये येणारे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणे करीता मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन कोऱ्या निविदा विक्रीची मूदत दि. १३/११/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोऱ्या निविदा खरेदी केलेल्या आहेत.

**०१.** डॅश इंटेरीअर, मुंबई **०२.** एस.पी.गोडसे, संगमनेर **०३.** सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.ली.,नाशिक

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. १६/११/२००६ अखेर मूदत देण्यात आलेली होती. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा खालीलप्रमाणे-

**०१.** डॅश इंटेरीअर, मुंबई **०२.** एस.पी.गोडसे, संगमनेर **०३.** सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.ली.,नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | डॅश इंटेरीअर, मुंबई | ४,४५,०६०.०० | ४,४५,०६०.०० |
| ०२. | एस.पी.गोडसे, संगमनेर | ४,५२,१७३.८० | ४,६७,७०८.०० |
| ०३. | सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.ली.,नाशिक | ३,५१,७८७.५० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०३चे निविदासादरकर्ते मे.सुदर्शन फ्लेक्झ ीबल पॅकेजींग प्रा.लि.,नाशिक यांचे दर कमी आहेत. परंतू ते चर्चा/वाटाघाटीसाठी अनुपस्थित आहेत. त्यांनी संस्थानचे यापूर्वी काम केलेले असल्याने त्यांची निविदा मान्य करण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ०७** **व्दारकामाईचे दक्षिण बाजूकडील नाट्यगृहाचे जागेवर व चावडीचे पूर्व बाजूस शिल्प उभारणे बाबत.**

**निर्णय क्र.८८०.** **(अ)**श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून दररोज हजारो भक्त भेट देत असतात. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे समाधी मंदिर हे मुख्य मंदिर असून, बाबांच्या सान्निध्याने पवित्र झालेली गुरुस्थान, व्दारकामाई, बाबांची चावडी, लेंडीबाग आदि महत्वाची मंदिरे ही आहेत.

मा.व्यवस्थापन समितीने विविध निर्णयान्वये, मंदिर व मंदिर परिसराचे सुशोभीकरण करणेसाठी व्दारकामाईचे दक्षिणेकडील खुल्या जागेत एक व चावडीचे पुर्वेकडील खुल्या जागेत एक असे दोन शिल्पे उभारण्याचे ठरविलेले आहे. या शिल्पउभारणीसाठी संस्थानमार्फत सर्वसमावेशक कामांची विहित पध्दतीने निविदा तयार करुन, खालील तीन शिल्पकारांकडून सिलबंद दरपत्रके मागविणेत आलेली होती.

०१. क्रिएटिव्ह आर्टस्, पुणे. ०२. धनंजय आर्टस्, पुणे ०३. प्रमोद कांबळी, (कलाश्री क्रिऐशन )अहमदनगर

उपरोक्त शिल्पकारांकडून प्राप्त झालेली दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे उघडणेत आलेली आहेत.

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२० अन्वये, शिल्प उभारणीबाबत प्राप्त होणारी दरपत्रके, शिल्पकारांनी दिलेल्या दरांची तपासणीसाठी कला संचानालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यांत यावीत, असा निर्णय झालेला आहे. सदरची दरपत्रके तपासणीसाठी कला संचानालय, मुंबई यांचेकडे जा.क्र. वशी/बांधकाम/ १०७२४ दि. ११/०८/२००६ अन्वये पाठविण्यात आली होती.

याबाबत कला उपसंचालक (प्रशा) कला संचानाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी क्रमांक डिओओ २००६/दोन/२२३१ दि. ०९/१०/२००० चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

"संचालनालयातर्फे केवळ पुतळयाच्या क्ले मॉडेलची तपासणी करुन क्ले मॉडेल कलात्मक दृष्टया योग्य असल्यास ते ब्रॉन्झ धातूत रुपांतर करण्यास परवानगी देण्यात येते. दरपत्रकात छाननी व तपासणी संस्थानचे स्तरावर करणे संयुक्त होईल. असे कळविले आहे".

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४/०३/२००६ निर्णय क्र. १२० अन्वये उघडण्यात आलेल्या शिल्पकारांच्या दराचां तपशील खालील प्रमाणे आहे.

**१) व्दारकामाई जवळ शिल्प उभारणे दर पत्रक तपशिल :-**

| अ.नं. | शिल्प कामाचा तपशिल | धनजंय आर्ट, पुणे | क्रेएटीव्ह आर्ट , पुणे | कलाश्री क्रेएशन (प्रमोद कांबळी, अ.नगर ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सिव्हील काम | ८,९१,९००.०० | ८,६२,१७०.०० | ८,०२,७११.०० |
| ०२ | फॉन्टनचे काम | ८,२०,०००.०० | ६,१९,८७५.०० | ५,४९,२३४.०० |
| ०३ | इलेक्ट्रीक काम | ८,०६,०००.०० | ७,३९,२००.०० | ५,२३,२९०.०० |
| ०४ | कोरीव नक्षीकाम | ११,७७,९००.०० | १०,४५,०००.०० | ९,७५,०००.०० |
| | एकुण खर्च रुपये | ३६,९५,८००.०० | ३२,६६,२४५.०० | २८,५०,२३५.०० |
| | अधिक १२.५% | ४,६१,९७५.०० | ४,०८,२८०.०० | ३,५६,२८०.०० |
| | एकूण रुपये | ४१,५७,७७५.०० | ३६,७४,५२५.०० | ३२,०६,५१५.०० |

**२) <u>चावडी जवळ शिल्प उभारणे दर पत्रक तपशिल</u> :-**

| अ.नं. | शिल्प कामाचा तपशिल | धनजंय आर्ट, पुणे | क्रेएटीव्ह आर्ट , पुण | कलाश्री क्रेएशन (प्रमोद कांबळी, अ.नगर ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सिव्हील काम | ६,८३,८५०.०० | ६,६१,०५५.०० | ६,१५,४६५.०० |
| ०२ | फॉन्टनचे काम | ६,८०,०००.०० | ८,२९,८००.०० | ६,६४,४३०.०० |
| ०३ | इलेक्ट्रीक काम | ३५६९००.०० | ३,२८,४००.०० | २,९७,८५०.०० |
| ०४ | कोरीव नक्षीकाम | १४,२५,०००.०० | १३,७५,०००.०० | १२,५०,०००.०० |
| ०५ | पार्श्वभुमी (Back Ground ) | ३,६४,०००.०० | ३,५३,०००.०० | ३,००,०००.०० |
| | एकूण खर्च रुपये | ३५,४८,४६८.०० | ३५,४७,२५५.०० | ३१,२७,७४५.०० |
| | अधिक १२.५% | ४,३८,७१८.०० | ४,४३,४६०.०० | ३,९०,९६८.०० |
| | **एकूण रुपये** | **३९,४८,४६८.००** | **३९,९०,७१५.००** | **३५,१८,७१३.००** |

उपरोक्त दरपत्रकावरुन असे दिसून येते कि, शिल्पकारांपैकी कलाश्री क्रिऐशन (प्रमोद कांबळी) अ.नगर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे दिसून येतात शिल्पकार यांनी दरपत्रासोबत खालील अटी घातलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. ऑर्डर सोबत ५०% ॲडव्हान्स देण्यात यावा

०२.पहिल्या भागाचे काम पूर्ण झाल्यानंतर ३०% रक्कम अदा करणे

०३.काम पूर्ण होत आल्यानंतर उर्वरित २०% रक्कम अदा करणे

यावर सविस्तर चर्चा होऊन, कलाश्री क्रिऐशन, अ.नगर (श्री.प्रमोद कांबळी ) यांचे दर मान्य करण्यात येऊन, त्यांना ॲडव्हान्स न देता कामाच्या प्रगतीनुसार वेळोवेळी त्यांनी सादर केलेली बीलाची रक्कम अदा करावी शिल्पाचे काम पूर्ण झाल्यावर कलासंचालनालय,मुंबई यांचेकडून कलात्मक दृष्टया योग्य असलेची तपासणी करुन तसा त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंतिम बील अदा करण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०८** **अपारंपारिक उर्जेअंतर्गत पवनचक्की उभारणीकामी प्राप्त झालेल्या निविदांवर विचार विनिमय होणे बाबत.**

**निर्णय क्र.८८१.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीचे मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांकः- ०३-०५-२००५ च्या सभेत अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प ऊभारणेकामी चर्चा होऊन मेडा, पुणे यांचेकडुन पवनऊर्जेविषयी सविस्तर माहिती व प्रोजेक्ट रिपोर्ट मागवावा असे ठरले होते. यानुसार पवनऊर्जेविषयी सविस्तर माहिती व प्रोजेक्ट रिपोर्टचा अहवाल मिळणेसाठी मेडा ,पुणे यांचेशी संपर्क साधण्यात आला होता. मेडा, पुणे यांनी पत्र क्र. आयडीडी-०९१ / शिर्डी साईबाबा संस्थान /०५-०६ / ३३४७ / दिनांक०७-०७-२००५ पाठविले होते. या पत्रात त्यांनी, संस्थानची सध्याची वीजेची गरज ४० लाख युनिटस् आहे. त्या आधारे संस्थानने २.५ मेगावॅटचा पवनऊर्जा प्रकल्प उभारल्यास संस्थानच्या वीजेची पूर्ण गरज भागू शकेल. व या कामी अंदाजे एकुण खर्च रू.१३,००,००,०००.०० (रु.तेरा कोटी मात्र) + प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके महाउर्जाचे सल्लागार शुल्क इतका अपेक्षित असल्याचे कळविले होते.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८-०९-२००६ च्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं०६ निर्णय क्र. ५३८ अन्वये अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प ऊभारणेकामी रु.१३ कोटी + प्रकल्पाच्या

किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके महाउर्जाचे सल्लागार शुल्क, इतक्या खर्चास व मेडा यांचेकडून टेंडरफॉर्म तयार करुन घेऊन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर / बीड मागविणेस मान्यता मिळालेली होती.

अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प उभारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मेडा, पुणे यांचेकडून टेंडर डाक्युमेंट मागवून टेंडर मागविण्यात आलेले आहेत. येणा-या टेंडरमधील बाबींच्या तपासणीसाठी तसेच प्रोजेक्ट उभारणी होतांना पवनचक्की क्षेत्रातील तज्ञामार्फत तपासणी होणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाची मिटकॉन ही संस्था प्रोजेक्ट उभारणी, तसचे सर्व आर्थिक बाबींची योग्य पडताळणी / तपासणी करते. पवनचक्की प्रकल्पामध्ये गुंतवणूक मोठया स्वरुपात असल्याने तज्ञामार्फत प्रोजेक्टची क्रॉस चेकींग होणे गरजेचे आहे.म्हणून दिनांक १६-०९-२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ६५ निर्णय क्र. ७७६ अन्वये मिटकॉन, पुणे यांची खालील कामासाठी पवनचक्की प्रकल्पाचे तज्ज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. मिटकॉनमार्फत केल्या जाणाऱ्या कामामध्ये खालीलप्रमाणे बाबींचा समावेश आहे. :-

०१) आलेली बीड्स (टेंडरस) संस्थानकडून घेऊन त्याची माहीती घेणे.

०२) आलेल्या बीड्सचा ( टेंडर्सचा ) अभ्यास करणे व त्यातील राहून गेलेल्या बाबींबाबत अहवाल तयार करणे.

०३) आलेल्या बीड्सचा (टेंडर्सचा) टेक्नो-कमर्शिअल इव्हाल्युएशन रिपोर्ट तयार करणे.

०४) आलेल्या बीड्सबाबत (टेंडर्सबाबत) संस्थानला देणेसाठी रिपोर्ट तयार करणे. व तो संस्थानला देणे.

०५) आलेल्या बीड्समधून (टेंडर्समधून) सर्वात उत्तम क्षमताधारक प्रोजेक्ट सप्लायरची निवड करणे.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर / बीड मागविलेनंतर खालीलप्रमाणे ०३ टेंडर (बीड) प्राप्त झाले आहेत. बीड्सादरकर्त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

(०१) मे.सुझलॉन एनर्जी लिमिटेड, दिल्ली , (०२) मे.व्हेस्टास आर.पी.बी, पुणे, (०३) मे.एनईजी मायकॉन, चेन्नई

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले बीडस आजचे सभेत उघडणेत येऊन बीडसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. तसेच पवनचक्की प्रकल्पाचे तज्ज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक झालेल्या मे. मिटकॉन, पुणे यांनाही त्यांच्या कामाबाबत माहिती देणेसाठी बैठकीत बोलाविण्यात आले होते. मे. मिटकॉन, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. झाडे हे बैठकीस उपस्थित होते. त्यांनी या पवनचक्की प्रकल्पाबाबत तसेच या प्रकल्पासंबंधी मिटकॉनमार्फत करावयाचे कामाबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना सविस्तर माहिती देऊन शंका निरसन केले. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीचे मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बीड सादरकर्त्यांचे टेक्नीकल बीड हे पवनचक्की प्रकल्पाचे तज्ज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक झालेल्या मे. मिटकॉन, पुणे यांचेकडे तपासणीसाठी देण्यात यावेत व मिटकॉन, पुणे यांनी त्वरीत संबंधीत टेक्नीकल बीड अभ्यासून त्यावर स्पष्ट अहवाल व अभिप्राय मागवून येत्या व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-विद्युतविभागप्रमुख)

**विषय नं. ०९ नविन प्रसादालय प्रकल्पाचे इलेक्ट्रिकल कामाकरिता प्राप्त झालेली निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८८२.** नविन प्रसादालयाचे बांधकाम प्रगतीपथावर असून प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचे इलेक्ट्रीफिकेशनचे कामासाठी टेंडर मागविणे गरजेचे होते. दिनांक ०४-०३-२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषयांकित कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी नविन प्रसादालय प्रकल्पाचे इमारतीचे आर्किटेक्ट मे.शक्ति परमार ॲड असोशिएटस, ३०७, राम निमि बिल्डींग, ८, मंडलीक रोड, कोलाबा कॉजवे, मुंबई - ४०० ०३९ यांचेकडून आलेल्या या इमारतीच्या इलेक्ट्रिकलच्या कामाच्या संबंधित इस्टिमेटची तांत्रिक पडताळणी सा.बां.विद्युत विभाग यांचेकडून करून घेण्याचे ठरले आहे. त्यानुसार मा. अधिक्षक अभियंता (विद्युत) सा.बां.विद्युत विभाग, औरंगाबाद यांनी वेळोवेळी सुचविलेल्या इस्टिमेटमधील त्रूटी दुरुस्त करुन देण्यात आल्यानंतर कामाच्या इस्टिमेट्ची एकुण रक्कम रु. २,९६,५८,२०६.०० ( रु. दोन कोटी शहान्नव लाख अठ्ठावन्न ह्जार दोनशे सहा मात्र) इतकी झाली आहे.

त्यानुसार प्रसादालयाचे इलेक्ट्रीफिकेशन कामाच्या अंदाजित रु. २,९६,५८,२०६.०० ( रु. दोन कोटी शहान्नव लाख अठ्ठावन्न ह्जार दोनशे सहा मात्र) इतक्या खर्चास तसेच या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यासाठी मान्यता मिळणेस दिनांक:- १४-१०-२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीपुढे आयत्या वेळच्या विषयात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात आला आहे. याकामासाठी येणारे खर्चास व या कामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ टेंडर प्राप्त झाले आहेत. टेंडरसादरकर्त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

(१) मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि, हैद्राबाद

(२) मे.योगीराज इलेक्ट्रीकल्स, नवी मुंबई

(३) मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर आजचे सभेत उघडणेत येऊन बीडसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन, टेंडर सादरकर्त्यांचे टेक्नीकल बीडस हे आर्किटेक्ट मे.शक्ती परमार, मुंबई यांचेकडे तपासणीसाठी देण्यात यावेत व आर्किटेक्ट मे.शक्ती

परमार, मुंबई यांनी त्वरीत संबंधीत टेक्नीकल बीड तपासून, अभ्यासून त्यावर स्पष्ट अहवाल व अभिप्राय मागवून येत्या व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. १० नविन प्रसादालयाचे गॅस प्लँट उभारणीकरीता तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करणेकामी आलेल्या दरपत्रकानुसार वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८८३.** नविन प्रसादालयाकरीता गॅस प्लँट उभारणीसाठी आवश्यक सल्ला/मार्गदर्शन घेणेकामी एल.पी.गॅस चे क्षेत्रातली अनुभवी एजन्सीची सल्लागार म्हणून नेमणूक करणे गरजेचे आहे. सल्लागार म्हणून नेमणूक करतांना सदर सल्लागाराची शैक्षणिक व तांत्रिक पात्रता, विस्फोटक विभागाची मान्यता, गॅस प्लँट उभारणी कामाचा अनुभव, सल्लागारास किती मानधन द्यावे लागेल, याशिवाय आणखी काही पात्रता असते काय? याबाबत माहिती मिळणेकामी जा.नं.एस.एस.एस.वशि/प्रसाद/२८११/०६ दि.१८/९/२००६ ने सयुक्त मुख्य विस्फोटक नियंत्रक, नवी मुंबई यांना पत्र देण्यात आलेले होते. मात्र त्यांचेकडून सदर पत्रास काहीही प्रतिसाद मिळत नाही असे दिसून आल्यामुळे दि.११/१०/२००६ रोजी दुरध्वनीद्वारे उपरोक्त पत्राबाबत चौकशी केली असता मा.श्री सिंग साहेब दुरध्वनीवर भेटले. त्यांनी सांगितले की, नविन गॅस प्लँटबाबत संपूर्ण कार्यवाही मुख्य विस्फोटक,नागपुर या कार्यालयामार्फत होते. नवी मुंबई कार्यालयाकडून फक्त परवान्याचे नुतनीकरण होते. त्यानूसार मुख्य विस्फोटक, नागपुर कार्यालय यांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता मा.श्री गाडेकर साहेब दुरध्वनीवर भेटले. त्यांचेशी नविन प्रसादालयाचे गॅस प्लँट उभारणी, सल्लागार नेमणूक बाबत चर्चा केली असता त्यांनी सुचित केले की, आपण श्री कैलास लखानी, द्वारा ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रायव्हेट लि. मुंबई यांना मुंबई येथे समक्ष भेटा ते आपल्याला मार्गदर्शन करतील व विस्फोटक विभाग, भारत सरकार, नागपुर या कार्यालयाचे परिपत्रकाची छायांकित प्रत देतील. श्री गाडेकर साहेब मुख्य विस्फोटक कार्यालय नागपुर यांचे सुचनेप्रमाणे दि.१६/१०/०६ रोजी श्री पी.बी. बोरावके- खरेदी अधिक्षक, श्री रामदास कोते-वरिष्ठ लिपीक, व श्री अमृत जगताप- मशिनरी मेन्टनन्स् इंजिनीअर यांनी श्री कैलास लखानी साहेब मुंबई यांची समक्ष भेट घेतली.

श्री लखानी साहेब यांचेशी गॅस प्लँट उभारणीकामी लागणारी जागा, तज्ञ सल्लागार नेमणूकीबाबत माहीती विचारली असता त्यांनी श्री गाडेकर साहेब, मुख्य विस्फोटक विभाग, नागपुर यांचेशी चर्चा करुन खालीलप्रमाणे मार्गदर्शन केलेले आहे.

| मुद्दा | मार्गदर्शन |
|---|---|
| १) तज्ञ सल्लागाराची नेमणूक करतांना विस्फोटक विभागाची मान्यताप्राप्त अधिकृत यादी असते काय ? | १) विस्फोटक विभागाने एल.पी.जी. चे क्षेत्रात तज्ञ व अनुभवी एजन्सीची निवड केलेली आहे. त्याची यादी विस्फोटक विभागाचे दि. २१/९/०४ चे परिपत्रकामध्ये प्रसिध्द केलेली आहे. |
| २) तज्ञ सल्लागाराचे शैक्षणिक व तांत्रिक पात्रता :- | विस्फोटक विभागाने प्रसिध्द केलेल्या यादीतील एजन्सीजने विस्फोटक विभागाच्या सर्व नियम /अटीची पुर्तता केलेली असते. त्याची शैक्षणिक /तांत्रिक पात्रता पाहुनच अशा कर्तव्यदक्ष एजन्सीचा यादीत समावेश केलेला आहे. |
| ३) तज्ञ सल्लागाराचे निवडीबाबत | १) विस्फोटक विभागाचे यादीतील एजन्सीनांच विचारणा करावी. त्यातील कमी दराचे एजन्सीची निवड करावी.<br>२) वृत्तपत्रात जाहिरात दिल्यास कुणीही अनुभव नसलेले / विस्फोटक विभागाची मान्यता नसलेल्या / क्षमता नसलेल्या एजन्सीज दरपत्रक भरतील. त्यामुळे दराची तुलना करतांना अडचणी येतील.<br>३) अनुभव / क्षमता / मान्यता नसलेल्या एजन्सी काम मिळावे म्हणून कमी रकमेचे दरपत्रक सादर करतील मात्र त्यामुळे कामाची गुणवत्ता मिळणार नाही. |

श्री कैलास लखानी, ग्लोब गॅस इक्वीपमेंटस् इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेसाठी वृत्तपत्रातून जाहीर निवीदा न मागविता विस्फोटक विभाग भारत सरकार, नागपुर यांचे दि.२१/९/२००४ चे परिपत्रामध्ये समाविष्ट असलेल्या व फक्त महाराष्ट्रातील खालील एजन्सींना जा.नं.एस.एस.एस.वशि/प्रसाद/१५०७७/०६ दि.२७/१०/२००६ ने पत्र पाठविलेले आहेत. महाराष्ट्र बाहेरील दुरवरच्या एजन्सींना सल्लागार म्हणून नियुक्त केल्यास वेळोवेळी तातडीचेकामी बोलविणे अडचणीचे ठरेल. म्हणून फक्त महाराष्ट्रातील ७ एजन्सींना पत्र पाठविण्यात आलेले आहेत.

1) M/s Lloyd,s Register Asia, Apeejay Commercial Complex, Plot 87,Sector-17, Vashi, New Mimbai-73.
2) M/s Bureau Veritas Industrial Services (India) Pvt.Ltd, The Leela Galleria 5th Floor, Andheri- Kurla Road, Andheri (E) Mimbai-59.
3) M/s Met Lab Services Pvt.Ltd., 17-C/18, Shivshakti Industrial Estate, LBS Marg, Ghatkopar, Mumbai-26.
4) M/s Tata Consulting Engineers, Matulya Centre-A, 249, S.B. Marg, Lower Parel, Mumbai-13.
5) M/s Chempro Inspection (P) Ltd.,203 Trade Corner,Sakinaka, Mimbai-72.
6) M/s Safess Quality Management Pvt. Ltd., X121, PN Kothari Estate, LBS Marg, Bhandup, Mumbai-400 078.
7) M/s Bax Counsel Inspection Bureau Pvt.Ltd., 2, New Veena, 357, 16th Road, Bandra, Mumbai-50.

वरीलप्रमाणे ७ एजन्सींना जा.नं.एस.एस.एस.वशि/प्रसाद/१५०७७/०६ दि.२७/१०/२००६ ने दि.८/११/२००६ अखेर पावेतो दरपत्रक सादर करण्यास सांगितले होते. मात्र दि.८/११/२००६ अखेर केम्प्रो इन्स्पेक्शन प्रा.लि. मुंबई यांचेच दरपत्रक आलेले आहे. सल्लागार नियुक्ती करणेसाठी दराची तुलना

करणेकामी कमीत कमी ३ दरपत्रक असणे आवश्यक असल्याने उर्वरीत एजन्सींना दुरध्वनीवर संपर्क साधून पत्रामध्ये नमूद केलेल्या तारखेनंतरही दि.२३/११/०६ पर्यंत दरपत्रक पाठविणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे प्रसादालय इमारतीचे बांधकाम वेगाने चालू आहे. प्रसादालय इमारतीचे बांधकामा बरोबरच गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम होणे गरजेचे आहे. गॅस प्लॅन्ट उभारणीकामी सल्लागाराची नियुक्ती होताच गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम लगेचच सुरु होणसाठी विस्फोटक विभाग, भारत सरकार नागपूर कार्यालयाने दि. २१/०९/२००४ चे परिपत्रकान्वये मान्य केलेल्या एजन्सीकडून सिलबंद निविदा मागविता येतील.नविन प्रसादालयाचे गॅस प्लॅन्ट उभारणीकामी अंदाजे रु. ८०,००,०००/- (ऐंशी लाख) खर्च येईल. असे श्री लखानी , ग्लोब गॅस इक्वीपमेंटस इंडस्ट्री प्रा.लि. , मुंबई यांनी सांगितले आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

०१) मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स,मुंबई

०२) मे.केम्प्रा इन्स्पेक्शन प्रा.लि.मुंबई

०३) मे.सफेस क्वालिटी मॅनेजमेंट प्रा.लि.मुंबई

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं. ११ सिंडीकेट बँकेमार्फत श्री साईबाबा संस्थानसाठी देणगी गोळा करण्याची योजना आणि दक्षिणा पेटी मोजणीस येण्यासाठी सिंडीकेट बँक,शिर्डी यांना परवानगी देणे बाबत.**

**निर्णय क्र.८८४.** सिंडीकेट बँकेने दिनांक ११ नोव्हेंबर २००६ रोजीच्या संस्थानला पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे त्यांनी त्यांच्या देशभरातील शाखांमध्ये संस्थानसाठी श्री साईभक्तांकडून देणगी स्वीकारण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यांच्या प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे :

०१. श्री साईभक्तांना बँकेच्या देशभरातील शाखांमध्ये संस्थानसाठी देणगी स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.

०२. देणगी सुविधांसाठी बँक कोणताही आकार आकारणार नाही.

०३. बँकेमार्फत स्वीकारण्यात येणाऱ्या देणगीची मोठ्या प्रमाणात जाहीरात बँक स्वत: करेल.

०४. बँकेला देणगी स्वीकारण्याचे कमीत कमी तीन वर्षासाठीचे खास हक्क देण्यात यावेत.

०५. जमा झालेली देणगी रक्कम सिंडीकेट बँकेच्या शिर्डी शाखेमधील संस्थानच्या स्वतंत्र बचत खात्यावर जमा करण्यात येईल.

०६. देणगी स्वरुपात बँकेत जमा झालेली रक्कम संस्थानने कमी/जास्त कालावधीच्या मुदतठेवीमध्ये रक्कम ठेवण्यात यावी.

०७. श्री साईभक्तांनी बँकेच्या शाखेत देणगी दिल्यानंतर त्याची पावती बँकेमार्फत ताबडतोब भक्तास देण्यात येईल.

०८. अशा स्वरुपाची देणगी स्वीकारण्याची योजना बँकेने तिरुपती बालाजीसाठी नव्यानेच सुरु केली आहे.

उपरोक्त प्रस्तावानुसार सिंडीकेट बँकेमार्फत श्री साईभक्तांकडून संस्थानला देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास ती साधारणपणे पुढीलप्रमाणे असावी की जेणेकरुन संस्थानच्या हितास बाधा पोहचणार नाही व देणगी मिळालेली संपूर्ण रक्कम सुरक्षितपणे संस्थानच्या खात्यावर वेळच्यावेळी जमा होईल.

०१. श्री साईभक्तांना बँकेने त्यांच्या देशभरातील सर्व शाखांमध्ये देणगी स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करण्यात यावी. याप्रमाणे बँकेने त्यांच्या स्वखर्चाने दर्शनी भागात बोर्ड लावावेत.

०२. बँकेने संस्थानकडून तसेच श्री साईभक्तांकडून देणगी व्यतिरीक्त कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आकार आकारु नये.

०३. शिर्डी येथील बँकेच्या शाखेत संस्थानने देणगी रक्कम जमा होण्यासाठी स्वतंत्र बचत खाते उघडावे.

०४. बँकेमार्फत देशभरात जमा होणारी देणगी स्वरुपातील संपूर्ण रक्कम शिर्डी येथील बँकेच्या संस्थान बचत खात्यामध्ये दुसऱ्या दिवशीच जमा करावी.

०५. बँकेच्या शिर्डी येथील शाखेने संस्थानला जमा झालेल्या देणगी रकमेचे स्टेटमेंट ज्यामध्ये भक्ताचे संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, देणगी रक्कम व देणगी कोणत्या फंडासाठी दिली आहे याचे स्वतंत्र बिनचूक स्टेटमेंट देणे आवश्यक आहे.

०६. संस्थानने बँकेसोबत तीन वर्षाचा करार करण्यास हरकत नाही, परंतु बँकेला देणगी स्वीकारण्याचे खास अधिकार मात्र देता येणार नाहीत.

०७. श्री साईभक्तांकडून देणगी स्वरुपात बँकेच्या विविध शाखांमध्ये जमा झालेल्या रकमेच्या सुरक्षिततेबाबत बँकेने संस्थानला हमी देणे आवश्यक आहे.

०८. श्री साईभक्तांना देण्यात येणाऱ्या पावत्यां बँकेने संस्थानकडून प्रमाणीत करुन घ्याव्यात व त्याचा हिशोब संस्थान मागेल त्यावेळेस देणे आवश्यक आहे.

०९. बँकेच्या शिर्डी शाखेने संस्थानची सध्या प्रत्येक आठवड्याला होत असलेली दक्षिणापेटी

मोजणीपैकी काही ठरावीक दक्षिणापेटी मोजणी घेऊन संस्थानला विनातक्रार सेवा पुरविणे आवश्यक आहे.

१०. बँकेमध्ये जमा झालेली देणगी रक्कम सिंडीकेट बँकेतच कमी/जास्त मुदतीसाठी ठेवणे संस्थानवर बंधनकारक नसावे.

११. संस्थानला देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या धनादेश, धनाकर्ष यावर बँकेने कोणताही आकार लावू नये.

१२. बँकेने संस्थानला "मल्टीसिटी" चेकबुक द्यावे.

श्री साईभक्तांना संस्थानला देणगी देणे सुलभ व्हावे व संस्थानचेही हित अबाधीत राहावे यादृष्टीने बँकेचा आलेला प्रस्ताव वर नमूद केल्याप्रमाणे स्वीकारण्यास व त्याप्रमाणे त्यांच्याशी करार करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं. १२ सन २००५-०६ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व प्रशासकीय अहवाल सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.८८५.** मे. शरद एस. गायकवाड अ‍ॅड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (Statutory Audit Report) व लेखापरिक्षीत लेखे (Audited Accounts) तसेच प्रशासकीय (वार्षिक) अहवालाच्या प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. अधिनियम, २००४ मधील तरतूदीनुसार सदर अहवालाच्या प्रती शासनाकडे तसेच मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं. १३ मंदिर परिसरातील आंध्र बँकेच्या ATM साठी दिलेल्या जागेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८८६.** आंध्र बँकेच्या सर्व ATM वर श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा व्हावी या हेतूने मा. व्यवस्थापन समितीने बँकेच्या ATM साठी मंदिर परिसरात ११ महिन्याच्या करारावर मासिक भाडे रुपये १०,०००/- घेऊन बँकेस जागा भाड्याने दिली आहे. या जागेच्या करारनाम्याची मुदत दिनांक २५ नोव्हेंबर २००६ रोजी संपत आहे. आंध्र बँकेने दिनांक २१.०९.२००६ च्या पत्रान्वये सदर करारनाम्याची मुदत वाढवून मिळण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आंध्र बँक संस्थानला पुरवीत असलेल्या सेवांचा विचार करीता बँकेच्या ATM साठी मंदिर परिसरामध्ये पूर्वीच्याच भाडे आकारणी रुपये १०,०००/- प्रमाणे पुढील एक वर्षासाठी करारनामा नुतनीकरण करावे असे मत आहे. सदर कराराचे नुतनीकरण संस्थानच्या विधी विभागाकडून करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे आंध्र बँकेच्या ATM साठी मंदिर परिसरात पूर्वीच्याच ठिकाणी पूढील एक वर्षासाठी बँकेस जागा पूर्वीच्याच मासिक भाडे रुपये १०,०००/- प्रमाणे देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**विषय नं. १४ आयकर कायदा १९६१ मधील तरतूदीनुसार संस्थानचे सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासूनचे अखर्चित उत्पन्नाचे खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.८८७. अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा, १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतुदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पूढीलप्रमाणे आहे.

"Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub clause (v) [or sub clause (vi) or sub clause(VIA)]

(a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the $1^{st}$ day of April, 2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years"

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे तसे शक्य न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चीत रक्कम त्या पूढील पाच आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहीत पद्धतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील पाच आर्थिक वर्षात सदरची अखर्चीत रक्कम संस्थानच्या कोणकोणत्या उद्दीष्टांवर खर्च करण्यात येईल या विषयी मा. व्यवस्थापन समितीने नियोजनाबाबत निर्णय घेऊन तो संस्थानच्या आयकर विवरण पत्रासोबत आयकर विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**ब)** उपरोक्त तरतुदीनुसार सन २००१-०२ ते २००४-०५ या आर्थिक वर्षातील संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करतांना दर्शविण्यात आलेले एकूण अखर्चीत उत्पन्न, दि. ३१ मार्च, २००५ अखेर त्यातून केलेला खर्च व शिल्लक अखर्चीत उत्पन्न याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे :

| आर्थिक वर्ष | एकूण अखर्चीत उत्पन्न रु. | दि. ३१.०३.२००५ अखेर दर्शविण्यात आलेला खर्च | दि. ३१.०३.२००५ अखेर शिल्लक अखर्चीत उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २२,९५,९३,६०६.०० | १५,४९,३७,२४८.०० | ७,४६,५६,३५८.०० |
| २००२-०३ | २८,०८,३६,२१२.०० | ३,६२,९७,१८८.०० | २४,४५,३९,०२४.०० |
| २००३-०४ | ३२,५७,९९,१९५.०० | -- | ३२,५७,९९,१९५.०० |
| २००४-०५ | ३७,१०,९०,७७६.०० | -- | ३७,१०,९०,७७६.०० |

उपरोक्त नमुद खर्च तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार दर्शविण्यात आलेला असून त्याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. एन.पी.रेडीज ॲंड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई यांचा सल्ला घेण्यात आला आहे.

**क)** सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मे. शरद एस. गायकवाड अँड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई यांनी पुर्ण केले असून मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ७९६ अन्वये संस्थानचे आयकर विवरणपत्र, आयकर कार्यालयाकडे दि. ३१ ऑक्टोबर, २००६ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. सदरचे आयकर विवरणपत्र दाखल करतांना सन २००१-०२ व सन २००२-०३ या आर्थिक वर्षातील शिल्लक राहिलेल्या अखर्चीत उत्पन्नापैकी अनुक्रमे रु. ७,४६,५६,३५८.०० व रु. १३,६२,०५,१६१.०० एवढी रक्कम संस्थानच्या ध्येय व उद्दिष्ठांवर तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णयानुसार सन २००५-०६ या आर्थिक वर्षात खर्च केल्याचे दर्शविण्यात आले असून त्याबाबतचा तपशील सोबत **परिशिष्ट "अ"** म्हणून ठेवण्यात आला आहे. याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. शरद एस. गायकवाड ॲंड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई यांचा सल्ला घेण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे मागील आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाचा काही भाग खर्च झाल्याचे दर्शविल्यानंतर सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील एकूण अखर्चीत उत्पन्न रु. ४३,४६,६२,१२१.०० एवढे दर्शविण्यात आले आहे. सदरचे अखर्चीत उत्पन्न मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८५७ अन्वये पूढील पाच आर्थिक वर्षात संस्थानच्या ध्येय व उद्दिष्टांवर खर्च करणे बंधनकारक आहे.

**ड)** वरील परिच्छेद **"ब"** व **"क"** मध्ये नमुद केल्यानुसार दि. ३१ मार्च, २००६ अखेर शिल्लक राहिलेले अखर्चीत उत्पन्न व ते खर्च करण्यासाठी उपलब्ध कालमर्यादा पुढीलप्रमाणे :

| आर्थिक वर्ष | दि. ३१.०३.०६ रोजी शिल्लक अखर्चीत उत्पन्न रु. | खर्च करण्यासाठी उपलब्ध कालमर्यादा |
|---|---|---|
| २००१-०२ | निरंक | -- |
| २००२-०३ | १०,८३,३३,८६३.०० | सन २००७-०८ पर्यंत |
| २००३-०४ | ३२,५७,९९,१९५.०० | सन २००८-०९ पर्यंत |
| २००४-०५ | ३७,१०,९०,७७६.०० | सन २००९-१० पर्यंत |
| २००५-०६ | ४३,४६,६२,१२१.०० | सन २०१०-११ पर्यंत |

वरील तक्त्यात नमुद करण्यात आलेले अखर्चीत उत्पन्न त्या समोर दर्शविण्यात आलेल्या आर्थिक वर्षाअखेर खर्च करणे, आयकर कायदा, १९६१ मधील तरतुदींन्वये संस्थानवर बंधनकारक आहे. सदरची अखर्चीत रक्कम वर दर्शविलेल्या कालावधीमध्ये खर्च न झाल्यास उर्वरीत अखर्चीत रक्कम त्यापुढील आर्थिक वर्षात करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील कलम ४ अन्वये करपात्र म्हणून धरलेल्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने (Maximum Rate) आयकर आकारणी केली जाईल. त्यासाठी आयकर तरतुदीनुसार उपलब्ध कालमर्यादेतच सदरचे अखर्चीत उत्पन्न खर्च करण्याच्या दृष्टीने नियोजन होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

**इ. १.** उपरोक्त परिच्छेद **"ब"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००१-०२ ची अखर्चीत रक्कम रु. ७,४६,५६,३५८.०० व सन २००२-०३ च्या अखर्चीत रक्कम रु. २४,४५,३९,०२४.०० यापैकी रु. १३,६२,०५,१६१.०० मात्र सन २००५-०६ या आर्थिक वर्षात खर्च झाल्याचे दर्शविणेबाबत .

०२. उपरोक्त परिच्छेद **"ड"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००५-०६ या वर्षातील अखर्चीत रक्कम रु. ४३,४६,६२,१२१.०० एवढी दर्शविणेबाबत.

तरी परिच्छेद "ड" मध्ये नमुद केल्याप्रमाणे शिल्लक अखर्चित उत्पन्न व ते खर्च करण्यासाठी दर्शविण्यात आलेल्या कालमर्यादेची नोंद घेण्यात आली. तसेच परिच्छेद **"इ"** अ.नं. १ व २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं. १५ धर्मशाळा इमारत सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थेबाबत**

**निर्णय क्र.८८८.** संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं. १४८/२ मध्ये धर्मशाळा इमारतीचे सांडपाणी शुद्धीकरण करुन त्याचा टॉयलेट फ्लशींग व गार्डनींगसाठी पुर्नवापर करणे करीता एस.आय.बी.एफ सिस्टीम (Solid immobilised Bio Filter) उभारण्यात आलेली आहे. सदर सिस्टीमसाठी सिव्हील कामाव्यतीरिक्त एकूण रुपये १०,६८,०००.०० मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर सिस्टीम दि. ०७/०२/२००० पासून कार्यान्वीत करण्यात आलेली होती. सदर सिस्टीमचे उभारणीसाठी डीझाईन ड्रॉईंग पूरविणे, बायोमेडीअमचा पुरवठा करणे, लॅब सपोर्ट व कमीशनींग ही कामे मे. एन.आर.जी. टेक, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आले आहे.

सिस्टीम कार्यान्वीत केल्यानंतर मे २००१ अखेर पर्यंत (१५ महिने ) तीचे कार्य चांगल्या प्रकारे चालू होते. परंतू त्यानंतर दुर्गधींचे प्रमाण वाढल्याने एन आर जी टेक यांना पाहणीसाठी बोलावण्यात आले त्यांचे सल्ल्यानुसार सदर सिस्टीमची दुरुस्ती करुन दि.११/०४/२००२ रोजी सिस्टीम पुन्हा कार्यान्वीत करण्यात आली. सदर दुरुस्तीमध्ये ७.०० मे.टन बायोमेडीयमची भर टाकण्याचे कामाचा समावेश होता. त्यासाठी रु. ८८,०००/- मात्र इतका खर्च आला. अशा प्रकारे सदर सिस्टीमसाठी आजपावेतो सिव्हील वर्क व्यतिरिक्त एकूण रु. ११,५६,०००.०० मात्र इतका खर्च करण्यात आलेला आहे.

उपरोक्त रिसायलींग सिस्टीमची दैनंदिन देखरेख व देखभाल ही पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येते.पाणीपुरवठा विभाग यांनी दि.०३/११/०६ चे टिपणीद्वारे सदर पाण्यास दुर्गंधी येत असल्याने ते पाणी झाडांना अगर लॉनला देता येत नाही. पाणी उष्ण असल्याने झाडांना दिल्यास झाडे जळुन जाण्याचा संभव आहे. त्यासाठी सदर प्लॅन्ट बंद करून त्याठिकाणी सेप्टीक टँक तयार करावा व त्याचे पाणी ड्रेनेजला जोडणेत यावे,असा प्रस्ताव दिला आहे.

सदर सिस्टीमच्या कलेक्शन टँकचे सेप्टीक टँकमध्ये रुपांतर करणेसाठी त्यामध्ये पार्टीशन भिंतीचे बांधकाम करुन आर.सी.सी. स्लॅबचे आच्छादन करावे लागेल त्यासाठी आर.सी.सी. स्लॅब, वीट बांधकाम, मॅनहोल्स, ड्रेनेज कनेक्शन इ. अनुषंगिक कामांसाठी दोन कलेक्शन टँकसाठी मिळून एकूण रु.२,४०,०००.०० मात्र इतका खर्च येईल. याप्रमाणे सेप्टीक टँकमधून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर सिस्टीममध्ये उपलब्ध असणाऱ्या बायोफिल्टर्सव्दारे पुन्हा प्रक्रिया करता येईल, तथापी त्यासाठी सदर सिस्टीमचे सल्लागार एनर्जी टेक,सोल्युशन्स प्रा.ली.,पुणे यांचेमार्फत सदर बायोफिल्टर्स बाबत मार्गदर्शन घेता येईल. दरम्यान सेप्टीक टँकमधून बाहेर पडणारे पाणी सरळ ड्रेनेजला जोडता येईल.
या कामाबरोबच दोन्ही धर्मशाळा इमारतींचे पाठीमागील भागात स्वच्छता रहावी यासाठी सोलींग,पी.सी.सी. व पेव्हींग ब्लॉक बसविणे, ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे ही कामेही करणे आवश्यक आहे. सदर कामे व उपरोक्त प्रमाणे सेप्टीक टँकचे कामासाठी धर्मशाळा इमारतीचे आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन, एस्टीमेट तयार करणे व इतर अनुषंगिक सल्ला सेवा घेता येईल. त्यासाठी मंजुरी मिळणेस विनंती. तसेच वरीलप्रमाणे कामांसाठी येणारे योग्य त्या खर्चास व वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. १६ नवीन प्रसादालय इमारत बांधकामाचे आतिल भागास जिप्सम प्लॉस्टर करणेसाठी मान्यता मिळणेकामी ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल. यांनी केलेल्या विनंतीबाबत**

**निर्णय क्र.८८९.** संस्थानचे निमगांव -कोऱ्हाळे येथील गट नं.८०,८५ पै.मधिल नविन प्रसादाल इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल.इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्ट लि., पुणे यांचेमार्फत चालू असून सध्या बुंदी किचन भागातील स्लॅबचे काम पूर्ण, विट बांधकाम सुरु आहे. टॉयलेट ब्लॉकचे R.C.C. आणि विट बांधकाम प्लास्टरचे काम पूर्ण झाले आहे. अन्नदान हॉलचे RCC काम पूर्ण आणि दर्शन रांगेच्या स्लॅबचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत भागात फुटींग, प्लिंथ बिम सोलींग फिलींग फ्लोअरींग p.c.c. इ.कामे प्रगती पथावर आहेत.

ठेकदार यांनी दिनांक १२/१०/२००६ रोजीचे पत्रान्वये सध्या शिर्डी व परिसरातील भागात बांधकामासाठी वाळु उपलब्ध होवू शकत नसल्यामुळे इमारतीचे आतील भागास जिप्सम प्लास्टर करणेस मान्यता मिळणेबाबत विनंती केली आहे. याबाबत आर्किटेक्ट मे.शक्ती परमार यांचे प्रतिनिधी श्री.योगेश चव्हाण यांनी ठेकेदार यांचेमार्फत तयार करण्यात आलेल्या जिप्सम प्लास्टरच्या नमुन्याची पहाणी दि. २२/०९/२००६ रोजी करुन दि. १८/१०/२००६ चे पत्राव्दारे सदर प्लास्टर करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच सस्थानमार्फत नेमणूक करण्यात आलेले कन्सल्टंट टि.सी.ई. कन्सल्टींग इंजिनियर्स लि. यांचे शिर्डी साईटवरील श्री.हर्षल वझे यांनी देखील दि. २५/१०/२००६ चे पत्राव्दारे त्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यांनी कळविल्यानुसार जिप्सम प्लास्टरचे फायदे खालील प्रमाणे आहेत.

०१. जिप्सम प्लास्टरसाठी नैसर्गिक वाळूची आवश्कता नाही.
०२. जिप्सम प्लास्टर वजनास हलके आहे.
०३. जिप्सम प्लास्टरला क्युरिंगची आवश्यकता नाही.
०४. जिप्सम प्लास्टरला तडे जात नाहीत.
०५. जिप्सम प्लास्टरला निरु किंवा सिमेंट घोटाई करण्याची आवश्यकता नाही. सदर प्लास्टर सरफेसवर रंगकाम करु शकतो.
०६. जिप्सम प्लास्टरमुळे सिलिंग व भिंतीचा सरफेस अतिशय मऊ व सुशोभित होतो.
०७. जिप्सम प्लास्टरचे मटेरीअल व पाण्याचे प्रमाण योग्य ठेवल्यास कामगारांना हाताळण्यास सोयीचे होते. त्यामुळे कमी कामगारांमध्ये जास्त काम करता येते.
०८. जिप्सम प्लास्टर १३ mm ते ३८ mm इतक्या जाडीपर्यंत करता येते.
०९. जिप्सम प्लास्टरचे आयुष्य दिर्घकालीन आहे. इत्यादी.

टी सी ई यांनी कळविल्यानुसार जिप्सम प्लास्टरचा दर रु. १४७.९० प्रती चौ.मि. इतका असून निविदेनुसार (आयटेम क्र. ३२,३५ ) निरु प्लास्टरचा दर रु. ११२.७१ प्रती चौ.मि. इतका आहे. ठेकेदार हे

जिप्सम प्लास्टरचे काम निविदेतील निरु प्लास्टरचे दरात करण्यास तयार असलेबाबत त्यांनी दि. १४.११.२००६ चे पत्राव्दारे कळविले आहे. त्यामुळे अतिल भागास निरु प्लास्टरऐवजी जिप्सम प्लास्टर केल्यास कुठलाही जादा खर्च येणार नाही.

तरी वरीलप्रमाणे प्रसादालय इमारतीचे अतिल भागास निरु प्लास्टरऐवजी जिप्सम प्लास्टर करणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे नमुद केलेले जिप्सम प्लास्टरचे फायदे अर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार यांचा अभिप्राय तसेच निरु प्लास्टरचे निविदा दरातच ठेकेदार आय.व्ही.आर.सी.एल. पुणे काम करणेस तयार असल्याने प्रसादालयाचे आतील भागात जिप्सम प्लास्टर करणेस मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. १७ श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथे रुग्णांचे नातेवाईकांना थांबणेसाठी ए-बिल्डींग टेरेसवर व औषध दुकानगाळयासमोर शेड उभारणे बाबत.**

**निर्णय क्र. ८९०.** श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कार्डीयाक रिकव्हरीचे समोर रुग्णांच्या नातेवाईकांची गर्दी होते. त्याकरीता जुन्या रुग्णालय इमारतीचे छतावर (सध्या जेथे सोलर सिस्टीम युनीट आहे त्याचे शेजारी ) पत्र्याचे शेड करुन त्यात नातेवाईकांची उन,वारा व पाऊस यापासून संरक्षण होईल अशी व्यवस्था करुन व शेडमध्ये बाके बसविणेत यावीत तसेच मेडीकल स्टोअर दुकानगाळ्यासमोर पूर्व बाजूस शेड तयार करणेबाबत वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी कळविलेले आहे.

सध्या वातानुकुलीत (AC) यंत्रणेच्या मशिनरीकरीता शेड बनविणेबाबत कार्यवाही चालू आहे. त्यासाठी काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांनी डीझाईन दिलेले आहे. त्याचप्रमाणे आर्किटेक्ट यांचेकडून उपरोक्त विषयांकीत कामासाठी डिझाईन तयार करुन घेण्यात आले आहे. सदर कामी आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या नकाशाप्रमाणे टेरेसवर १६.४४mx६.७६m आकाराचे शेड तयार करता येईल. तसेच तळमाळ्यावर मेडीकल दुकानगाळ्यासमोर १२.९०m x ६.४५ m आकाराचे शेड तयार करता येईल. असे एकूण दोन शेड तयार करण्याचे नियोजन आहे सदर शेडमध्ये रुग्णांचे नातेवाईकांना बसण्यासाठी श्री साईबाबा हॉस्पिटल यांना खरेदी विभागामार्फत मलटीसीटर चेअर्स खरेदी करता येतील.

उपरोक्त शेडचे बांधकामासाठी आर्किटेक्ट यांनी कळविल्यानुसार अंदाजे रु. ५,८२,९००.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच मल्टीसीटर चेअर्स खरेदी करणेकामी अंदाजे रु. ४०,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल टेरेसवर व मेडीकल स्टोअर समोर वरिलप्रमाणे रुग्णांचे नातेवाईकांसाठी शेड तयार करणे व मल्टीसिटर चेअर्स खरेदी करणेसाठी एकूण अंदाजे रु. ६,२२,९००.०० मात्र (अक्षरी रुपये सहा लक्ष बावीस हजार नऊशे) मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर खर्चास तसेच शेड उभारणीसाठी यापुर्वी ए.सी. यंत्रणेच्या शेडसाठी ज्या ठेकेदारांनी निविदा सादर केल्या होत्या त्यांचेकडून कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,याकामी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१८ शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारतींमध्ये काही वाढीव सुविधा करणेविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.८९१.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे शिर्डी येथील सर्व्हे क्र.०६ (आरक्षण क्र.०८) या जागेत जिल्हा परिषद शाळा या नविन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या नूतन इमारतीत दि.२८/०८/२००६ पासून शाळेचे कामकाज सुरु झालेले आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जा.क्र.कार्या-४/बांध/७३७/२००६ दि. १८/१०/२००६ रोजीचे पत्रान्वये शाळेच्या नवीन इमारतीत काही वाढीव सेवा सुविधा पूरविणेबाबत कळविले असून सदर पत्र सोबत अवलोकनार्थ ठेवले आहे.

त्यानुसार मागणी केलेल्या सुविधा व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल व संबंधीत विभाग | अंदाजे अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१ | नविन इमारतीत ध्वजस्तंभ उभारणे (बांधकाम, विद्युत विभाग) | ८,०००.०० |
| ०२ | संगणक प्रयोगशाळेत संगणक ठेवण्यासाठी टेबल तयार करणे (बांधकाम विभाग) | ६५,०००.०० |
| ०३ | संगणक प्रयोगशाळेत भिंतीला २५ संगणक संच जोडणेसाठी लाईट फिटींग व लॅन फिटींग करणे. (विद्युत विभाग) | १५,०००.०० |
| ०४ | शाळेमध्ये ५ वी ते ७ वी ची विद्यार्थी संख्या ३५० पेक्षा जास्त असल्याने विद्यार्थांना आवश्यक संगणक संच उपलब्ध नाही. त्यामुळे शाळेला २० संगणक संच व संगणक खुर्च्या उपलब्ध करुन देणे. (माहिती तंत्रज्ञान व खरेदी विभाग ) | ५,०७,०००.०० |
| ०५ | संगणक कक्षामध्ये सर्व खिडक्यांना गडद रंगाचे पडदे लावणे. | १२,०००.०० |

| | | |
|---|---|---|
| | (बांधकाम विभाग) | |
| ०६ | हॉल मध्ये सामुदायीक कार्यक्रमासाठी शिक्षक व पालक यांना बसण्यासाठी ०४ मोठ्या सतरंज्या देणे. (खरेदी विभाग) | १६,०००.०० |
| ०७ | वर्ग खोल्यांसाठी ४० ऑफिस टेबल, ४० फायबर खुर्च्या व १० स्टील कपाटे देणे. (खरेदी विभाग) | ४,००,०००.०० |
| ०८ | शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी इमारतीपासून बाजुला शेड तयार करणे. (बांधकाम विभाग व विद्युत विभाग ) | ४५,०००.०० |
| ०९ | अपंग मुलांकरीता रँप तयार करणे.(विद्युत विभाग) | ५०००.०० |
| १० | वाचनालय व संगणक लॅबमध्ये विद्यार्थांना बसण्यासाठी छोट्या फायबर खुर्च्या (१०० नग ).(खरेदी विभाग) | ३५,०००.०० |
| ११ | सामुदायीक प्रार्थना व शालेय नियंत्रण यासाठी सर्व वर्गात साउंड सिस्टीम बसविणे. एल.सी.डी.स्क्रीन-०२ नग (ध्वनीक्षेपन विभाग) | २,००,०००.०० |
| | **एकूण अपेक्षित अंदाजे खर्च रुपये** | **१३,०८,०००.००** |

वरील बाबींव्यतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाळेची जागा क्षेत्र ५७ आर ६५ चौ.मी.चे ७/१२ उताऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अ.नगर नांव लावलेले नाही, असे कळविले आहे. सदर नूतन इमारत जागेसह हस्तांतरीत करणेसाठी मान्यतेकरीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, यांचेकडेस जा.नं.वशी-बांधकाम/७३९३/२००६ दि.०६/०६/२००६ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळालेनंतर याबाबत कार्यवाही करता येईल.

तरी जिल्हा परिषद शाळा, शिर्डी नविन इमारतीत वरीलप्रमाणे सोयी पुरविण्यासाठी अंदाजे रु.१३.०८ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त सोयी जिल्हा परिषद शाळा,शिर्डी यांना पुरविण्याचे असल्याने त्यासाठी संस्थानचे निधीतून खर्च करण्यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम - २१ पोट कलम (२) अन्वये राज्यशासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद शाळेसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये प्राथमिक शाळेचे वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत. जिल्हा परिषदेने मागणी केलेले उपरोक्त साहित्य उपलब्ध नसल्याने शाळेचे दैनंदिन कामकाज करण्यास अडचणी येऊ नयेत म्हणून संस्थानमार्फत सदरहू साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच दरम्यान विहित पद्धतीने शासनाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी/आय.टी.विभाग प्रमुख/ विद्युत विभाग प्रमुख/ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**विषय नं. १९ निमगाव कोऱ्हाळे येथील जमिनीत हेलीपॅड बांधणेबाबत.**

**निर्णय क्र. ८९२. (अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १९२ अन्वये शिर्डी गांवालगत मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट क्रमांक १८३ मधील जागेत हेलीपॅडचे बांधकाम संस्थान खर्चाने करणेस तत्वत: मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार मौजे निमगांव कोऱ्हाळेमधील गट क्रमांक १८३ मधील जमिनीत कायमस्वरुपी हेलीपॅडचे बांधकाम करणेसाठी आवश्यक असा बांधकाम आराखडा व त्यासाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रक मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले आहे.

**(ब)** मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी कायमस्वरुपी हेलीपॅडचे बांधकाम करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे :

| Sr.No. | Description of Item | Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Construction of RCC Pendol with Toilet Block and Furniture including RCC framed structure, brick masonary RCC Columns, Beams, Slab, Plastering, Pointing etc. complete. | 09,00,000/- |
| 02 | Construction of Helipad including Land Leveling with BT Surface (03 Nos) | 12,00,000/- |
| 03 | Construction of Internal Roads and approch Roads including earthwork, WBM, BBM Carpet and Seal Coat<br>(A) Width 3.00 Mtr … 0.600 meter<br>(B) Width 7.00 Mtr … 0.500 meter | 11,70,000/- |
| 04 | Contiengencies & Computerisation Charges | 02,28,900/- |
| | Total Rs. | 34,98,900/- |
| | **Say Rs.** | **35,00,000/-** |
| | **(In words Rs. Thirthy Five Lacks only)** | |

उपरोक्तप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेमार्फत अंदाजपत्रकानुसार कायमस्वरुपी ०३ हेलिपॅड व इतर अनुषंगिक बांधकाम करुन घेणेस अंदाजित रक्कम रुपये ३५ लाख मात्र इतका खर्च येईल.

**(क)** उपरोक्त परिच्छेद ब मध्ये दर्शविल्यानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८३ मधील जागेत कायमस्वरुपी ०३ हेलिपॅडचे बांधकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ३५ लाख मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,जगसन एअर लाईन्स लिमिटेड, नवी दिल्ली यांचे मार्फत शिर्डी येथे हेलिकॅप्टर सेवा प्रस्तावित आहे. याकरीता त्यांचेकडून तांत्रिक सल्ला घेण्यात यावा. त्यानंतर ३ ते ४ हेलिकॅप्टर एकाचवेळी उतरु शकतील अशा क्षमतेचे मोठे हेलिपॅड बांधणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. तसेच वरीलपैकी एक हेलीपॅड मे.जगसन एअरलाईन्स,दिल्ली यांना दैनंदिन वापरासाठी देण्यात यावे . (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २०** **शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेअंतर्गत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना भूसंपादन कार्यवाहीसाठी निधी उपलब्ध करून देणे.**

**निर्णय क्र.८९३.** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी गांवातील व परिसरातील एकुण २५ रस्ते प्राधान्य क्रमाने तीन टप्प्यात विकसित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरलेले आहे. तसेच इकडील पत्र जा.क्र. बांधकाम/८९१३/ २००६, दिनांक ०७ जुलै,२००६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सदरील प्रकल्पास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**(ब)** तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांन्वये, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेशी शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या प्रकल्पासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजी शिर्डी येथे मरारविम यांचे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे मुख्याधिकारी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी समझोता करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील (Article-III : Funds and Payment to the Corporation) अटी-शर्तीनुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पासाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**(क)** उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार व समझोता करारनाम्यास अनुसरुन, शिडी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे पत्र क्र.बांध/कावि५/९६७/२००६, दि. १० ऑक्टोबर, २००६ अन्वये, प्रथम टप्प्यातील ११ रस्त्यांच्या कामांच्या संदर्भात भुसंपादन प्रस्ताव सादर करणेकामी संयुक्त मोजणी फी भरणे, सर्व्हेक्षण करणे, इलेक्ट्रीक व टेलिफोन पोल्स शिफ्टींग करणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी प्राथमिक खर्च रुपये २०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लाख मात्र) चा निधी ‘ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ’ यांना तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा, म्हणून विनंती केलेली आहे.

**(ड)** तरी उपरोक्त परिच्छेदांमध्ये मध्ये नमुद केल्यानुसार, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ११ रस्ते विकसित करणेकामी भूसंपादन कार्यवाही व इतर अनुषंगिक कामकाज सुरु करणेसाठी समझोता करारनाम्यांतील तरतुदीनुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी रक्कम अदा करणेस आणि रक्कमेच्या विनियोगाबद्दल शिर्डी नगरंपचायत, शिर्डी यांचेकडून प्रमाणित कागदपत्रे प्राप्त करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२१** **नियोजित सुपरस्पेशालिटी रुग्णालय व वैद्यकीय अधिकारी निवासस्थाने बांधकाम प्रकल्पासाठी आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे फी बाबत.**

**निर्णय क्र.८९४.** **(अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४ पै, १२५ पै व १२६ पैकी मधील जागेत नियोजित सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व कर्मचारी निवासस्थान उभारणेबाबत आर्किटेक्ट म्हणून हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जून, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३३४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

या निर्णयानुसार, आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचेशी संपर्क साधून नियोजित सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व कर्मचारी निवासस्थाने उभारणेबाबत बांधकाम आराखडे तयार करणेबाबत तसेच याकामी प्रकल्प अहवाल पाठविणेबाबत सांगणेत आले होते.

**(ब)** आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांच्या असोसिएट आर्किटेक्ट स्वाती डी. पंडीत यांनी नियोजित सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व कर्मचारी निवासस्थाने उभारणेबाबत बांधकाम आराखडे तसेच इतर अनुषंगिक कामासाठी आर्किटेक्ट फीबाबत दिनांक २३ सप्टेंबर, २००६ रोजी प्रस्ताव दिलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

| Sr.No. | Architectural Services | Rates for Architectural Services only. |
|---|---|---|
| ०१ | Housing | २.०% of total cost of construction. |
| ०२ | Hospital<br>(Does not include any interior) | २.०% of total cost of construction. |

उपरोक्त आर्किटेक्ट फी मध्ये खालील बाबींचा समावेश नाही :

०१) स्थानिक प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी पाठवावयाचे बांधकाम आराखडे व इतर नकाशे बनविणे व त्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे पाठपुरावा करणे.

०२) हॉस्पीटलचे अंतर्गत सजावटीकरणाचे काम.

०३) संपूर्ण प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून काम करणे व दैनंदिन पर्यवेक्षण करणे.

०४) स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीकल, प्लंबिग आणि सॅनिटरी HVAC व इलेव्हेटर कन्सल्टन्सी.

०५) ठेकेदार यांची बिले तपासणी व प्रामाणित करणे कामाबाबत उपरोक्त प्रस्तावात काहीही उल्लेख नाही.

तसेच आर्किटेक्ट फी व्यतिरिक्त खालील सुविधा आर्किटेक्ट यांना संस्थानमार्फत द्याव्या लागणार आहेत :

०१) आर्किटेक्ट फी दोन वर्षासाठी निश्चित राहिल. प्रथम दोन वर्षानंतर आर्किटेक्ट फीमध्ये १० टक्के वाढ द्यावी लागेल. त्यानंतरच्या प्रति वर्षास आर्किटेक्ट फीमध्ये ५ टक्के वाढ द्यावी लागेल.

०२) आर्किटेक्ट फी शिवाय टॅक्सी भाडे / वातानुकुलीत प्रथम श्रेणीचे रेल्वेचे अथवा विमानाचे प्रवास भाडे , मुक्कामासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च.

०३) सद्य:स्थितीतील सर्व्हि टॅक्स १२.२४ टक्के किंवा केंद्र / राज्य सरकारच्या नियमानुसार वेळोवेळी बदलणारा सर्व्हिस टॅक्स अतिरिक्त.

**(क)** सध्या चालू असलेल्या संस्थानचे इतर प्रकल्पांसाठी नेमणूक करण्यात आलेल्या आर्किटेक्ट्सना प्रकल्पाचे किंमतीचे दोन टक्के इतकी फी देण्यात येते. त्यामध्ये प्रोजक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सीचा समोवश नसतो. तथापी स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीकल, प्लंबिंग आणि सॅनिटरी यासाठी डीझाईन व कन्सल्टन्सी सेवांचा समोवश सदर आर्किटेक्टचे स्कोपमध्ये आहे. तसेच ठेकेदार यांची बिले तपासून प्रामाणित करण्याचे कामाचाही समावेश आहे.

**(ड)** आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचे उपरोक्त प्रस्तावानुसार दोन टक्के फी फक्त आर्किटेक्चरल डीझाईन व ड्रॉईंगसाठी द्यावी लागेल. स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीकल, प्लंबिंग ॲण्ड सॅनटरी, HVAC, इलेव्हेटर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट यासाठी स्वतंत्र कन्सल्टंट्स नेमावे लागतील व त्यांना अतिरिक्त फी अदा करावा लागेल. यासाठी हॉस्पिटल बांधकामाचे क्षेत्रातील काही नामांकीत आर्किटेक्टसना विनंती पत्राव्दारे फी बाबत विचारणा करता येईल.

**(इ )**आर्किटेक्ट फीबाबत मा.विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साो. यांचेशी समक्ष चर्चा केली आहे. त्यानुसार त्यांनी असे सुचविले आहे की, हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांना प्रकल्पासाठी येणाऱ्या संपूर्ण बांधकाम खर्चाचे ०२ टक्के इतकी रक्कम आर्किटेक्ट फी म्हणून देण्यात यावी. स्थानिक प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी बांधकाम आराखडे, इतर नकाशे व कागदपत्रांची पूर्तता करणे याकामी स्वतंत्र परवानाधारक आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावी. तसेच सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल व कर्मचारी निवासस्थाने उभारणी करणे या प्रकल्पासाठी स्वतंत्ररित्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमण्यात यावा. याकामी त्यांना स्वतंत्ररित्या आर्किटेक्ट अथवा कन्सल्टंट फी देण्यात यावी.

तरी आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांना फक्त आर्किटेक्चरल डीझाईन व ड्रॉईंगसाठी फी ठरविणेबाबत, तसेच स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीकल, प्लंबिग आणि सॅनिटरी, HVAC, इलेव्हेटर व प्रोजेक्ट मॅनेजमेंट यासाठी स्वतंत्र कन्सल्टंटस् नेमणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या भव्य प्रकल्पाची व्याप्ती लक्षांत घेता, नामांकित आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांना आर्किटेक्टच्या कामापोटी २ टक्के फी अधिक प्रचलित दराने कर अदा करण्यात यावी. तसेच आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांना आर्किटेक्ट फी व्यतिरिक्त खालील बाबींना मान्यता देण्यात आली.

०१. आर्किटेक्ट फी दोन वर्षासाठी निश्चित राहील. प्रथम दोन वर्षानंतर आर्किटेक्ट फी मध्ये १० टक्के वाढ द्यावी लागेल. त्यानंतरच्या प्रती वर्षास आर्किटेक्ट फी मध्ये ५ टक्के वाढ द्यावी लागेल.

०२. आर्किटेक्ट फी शिवाय टॅक्सी भाडे/वातानुकूलीत प्रथम श्रेणीचे रेल्वेचे अथवा विमानाचे प्रवास भाडे, मुक्कामासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती

०३. सद्य:स्थितीतील सर्व्हिस टॅक्स १२.२४ टक्के किंवा केंद्र/राज्य सरकारच्या नियमानुसार वेळोवेळी बदलणारा सर्व्हिस टॅक्स अतिरिक्त अदा करण्यात यावा.

याशिवाय सुपर स्पेशालिटीचे आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांच्या आर्किटेक्ट फी मध्ये समाविष्ट नसणाऱ्या बाबींसाठी स्वतंत्ररित्या आर्किटेक्ट अथवा कन्सल्टंन्सी एजन्सी नेमणेबाबतच्या प्रस्तावास खालील बाबींचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.

०१. स्थानिक प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी पाठवावयाचे बांधकाम आराखडे व इतर नकाशे बनविणे व त्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे पाठपुरावा करणे.

०२. हॉस्पिटलचे अंतर्गत सजावटीकरणाचे काम

०३. संपूर्ण प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून काम करणे व दैनंदिन पर्यवेक्षण करणे.

०४. स्ट्रक्चरल, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग आणि सॅनिटरी HAVC व इलेव्हेटर कन्सल्टंशी

०५. बांधकाम ठेकेदार यांची बीले तपासणी व प्रमाणित करणे.

यावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी असे सुचविले की, टाटा कन्सल्टंशी इंजिनिअरिंग, पुणे हे १.५० टक्के ते २ टक्के फीमध्ये काम करण्यास तयार आहेत, असें सांगितले. याबाबत त्यांचेकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात येऊन, मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर करण्यात यावा, असें ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २२ भक्तनिवासस्थान येथे तळमाळयाला साईभक्तांकरीता वाढीव संडास बाथरुमची व्यवस्था करणे बाबत.**

**निर्णय क्र.८९५.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे निवासासाठी सन १९९३ साली प्रसाधनगृहासह ५०० खोल्या असलेली भक्तनिवास इमारत बांधण्यात आली आहे. याच इमारतीत दोन जनरल हॉलसह ११ मोठे हॉल्स व्यवस्था या इमारतीमध्ये करण्यात आली आहे.

दोन जनरल हॉलमध्ये सध्या सुमारे २०० साईभक्तांची व्यवस्था करण्यात येते सदर हॉलसाठी १२ संडास व १२ बाथरुमची व्यवस्था करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त इतर ११ हॉलचा वापरही साईभक्तांना राहण्यासाठी करण्यात येतो. मात्र सदर हॉल करीता जनरल संडास बाथरुमची व्यवस्था नसल्यामुळे दोन जनरल हॉलसाठी असलेल्या जनरल संडास बाथरुमचा वापर साईभक्तांना करावा लागतो.

गर्दीचे कालावधीत रुम व हॉल व्यतिरिक्त प्रतिक्षा हॉल, गॅलरी या ठिकाणीही साईभक्त थांबतात. सदरची संख्याही सुमारे १००० पर्यंत असणे. तसेच या व्यतिरिक्त मंडप व्यवस्थाही करण्यात येते. या सर्व साईभक्तांसाठी जनरल संडास बाथरुमची व्यवस्था कमी पडते त्या करीता भक्तनिवास इमारतीचे "BC" विंगचे तळमजल्यावर असणाऱ्या हॉलमध्ये जनरल संडास बाथरुम व्यवस्था करता येईल.

याकामी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी BC विंग मध्ये नव्याने स्वतंत्र पुरूषांकरिता ८ बाथरुम व ७ संडास तसेच ८ वॉश बेशिन, वॉशिंग प्लेस, युरिनल व स्टोअरसह टॉयलेट ब्लॉक तयार करणे कामी अंदाजे रु. ८,४५,७७५.०० मात्र खर्चाचे एस्टीमेट व प्लॅन सादर केले आहे. तसेच सध्या स्त्री व पुरुषांसाठी असलेल्या जनरल टॉयलेट ब्लॉकचा वापर फक्त स्त्रीया साठीच ठेवणेचे यादृष्टीने त्यामध्ये वाढीव ४ बाथरुम करीता रु. ८०,३५२.०० मात्र खर्च येईल अशा प्रकारे एकुण रु. ९,२६,१००.०० मात्र खर्चाचे एस्टीमेट सादर केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन,निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २३ जगसन एअरलाईन्स,नवी दिल्ली यांचेमार्फत मुंबई-शिर्डी व पुणे-शिर्डी व परत हेलिकॉप्टर सेवा सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र. ८९६. (अ)** जगसन् एअरलाईन्स लिमिटेड,नवी दिल्ली यांनी त्याचेकडील पत्र क्रमांक जेए/व्हीपीजीएसएमएस/एसएसबी/०६/११/०४९,दिनांक १३ नोव्हेंबर,२००६ रोजीचे मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये मुंबई / पुणे ते शिर्डी व परत अशी हेलिकॉप्टरची हवाई सेवा जगसन् एअरलाईन्स यांचेमार्फत सुरु करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये जगसन् एअरलाईन्स यांचा हवाई सेवा सुरु करणेचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे येत्या व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे ठेवणेबाबत कळविलेले आहे.

**(ब)** जगसन् एअरलाईन्स लिमिटेड ही जगसन् इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीची शाखा असून, या कंपनीमार्फत गेल्या १४ वर्षापेक्षा जास्त काळ हवाई सेवा देण्यात येत आहे. या कंपनीकडे Donier २२८ या मॉडेलची ३ हेलिकॅप्टर्स व MI-१७२ या २६ आसनी क्षमता असलेली २ हेलिकॅप्टर्स आहेत. या कंपनीने विस्तारीकरणाच्या कार्यक्रमांतर्गत हवाई सेवेच्या फेऱ्या वाढविण्याचे ठरविलेले आहे.

जगसन् एअरलाईन्स लिमिटेड, नवी दिल्ली यांनी साईभक्तांसाठी, व्यावसायिक प्रवाशांसाठी, तसेच शिर्डी येथील रुग्णालयात उपचार घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांकरीता अत्यंत माफक व सवलतीच्या दरात मुंबई / पुणे ते शिर्डी व परत अशी हेलिकॉप्टरव्दारे हवाई सेवा देण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

जगसन् एअरलाईन्स यांनी हवाई सेवा सुरु करणेकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे :

| | | |
|---|---|---|
| ०१. | हेलिकॉप्टर प्रकार | MI-१७२ |
| ०२. | आसन क्षमता | सर्वसाधारण या एकाच श्रेणीतील २४ आसने |
| ०३. | इतर सेवा | संकेतस्थळावरुन तिकिट बुकींग व आरक्षण आदि सुविधा |
| ०४. | हवाई सेवेचे दिवस | एका आठवडयात सहा दिवस -मुंबई /पुणे ते शिर्डी व परत अथवा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचे सुचनेनुसार |
| ०५. | हवाई प्रवास भाडे | धार्मिक, पर्यटन स्थळाला भेट देणेसाठी अत्यंत माफक व सवलतीचे प्रवास दर कंपनीने ठरविलेले आहेत. |
| | | मुंबई ते शिर्डी (एका बाजूचे) रुपये ५,२५०/- |
| | | मुंबई ते शिर्डी (परतीच्या प्रवासासह) रुपये ८,७५०/- |

| | | |
|---|---|---|
| | | पुणे ते शिर्डी (एका बाजूचे) रुपये ३,२५०/- |
| | | पुणे ते शिर्डी (परतीच्या प्रवासासह) रुपये ५,७५०/- <br> या प्रवास दरात सरकारी कर, इंधन खर्च, प्रवासी विमा ई.चा समावेश आहे. |
| ०६. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून हवे असलेले सहकार्य / अपेक्षा : <br> संस्थानमार्फत अंदाजे १०० मीटर बाय १०० मीटरचे हेलिपॅड बनविणेसाठी सपाट जागा. या जागेवर सरकारी मार्गदर्शक तत्वानुसार या जागेवर जगसन् एअरलाईन्स यांचेमार्फत हेलिपॅड तयार केले जाईल. मात्र प्रतिक्षागृह, व्हीआयपी कक्ष, संरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदी इत्यादी संस्थानमार्फत करुन मिळाव्यात. हेलिपॅडसाठी आवश्यक असणारी जागा भाडेतत्वावर संस्थानमार्फत मिळावी | |
| ०७. | जगसन् एअरलाईन्स यांचेशिवाय संस्थानला इतर हवाई सेवा देणाऱ्या कंपन्यांना परवानगी देता येणार नाही. यदाकदाचित प्रवासाच्या अंतिम स्थळात बदल करावयाचा असेल अथवा प्रवासी फेऱ्या वाढविणे अपेक्षित असेल तर तो नाकारण्याचा हक्क सर्वप्रथम कंपनीला राहिल. | |
| ०८. | कंपनीच्या हेलिकॉप्टरव्दारे येणाऱ्या साईभक्तांना शक्य झाल्यास विशेष दर्शनाची सोय करावी. | |
| ०९ | धार्मिक अथवा पर्यटन स्थळ भेट देणेकामी सरकार कडून इंधन खर्चात अथवा इतर करात काही सूट अथवा सवलत मिळाल्यास त्याचा थेट लाभ प्रवाशांना कंपनीमार्फत देण्यात येईल. | |
| १०. | प्रवासी व्यवसायवृध्दीसाठी करावा लागणारा सर्व खर्च कंपनी करेल. | |

उपरोक्त प्रमाणे शिर्डी येथे मुंबई/पुणे येथून हेलिकॉप्टर हवाई सेवा सुरु करणेसाठी प्रस्तावाचा सकारात्मक दृष्टीने विचार करावा, असे त्यानी पत्रात सुचविलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, हेलिकॅप्टर हवाई सेवा शिर्डी येथे सुरु झाल्यास देश-विदेशातून तसेच भारतातील विविध महानगरातून येणाऱ्या साईभक्तांची सोय होऊन त्यांचे प्रवासाचे वेळेत बचत होऊन त्यांना दर्शनाचा लाभ घेता येईल करीता सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.निमगांव कोऱ्हाळे शिवारात ३ ते ४ हेलिकॅप्टर एकाचवेळी उतरु शकतील अशा क्षमतेचे मोठे हेलिपॅड संस्थानमार्फत बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी एक हेलिपॅड मे.जगसन एअरलाईन्स, नवी दिल्ली यांना वापरण्यास देता येईल, याकामी सविस्तर चर्चा करणेकामी, जगसन् एअरलाईन्स लिमिटेड,नवी दिल्ली यांचे प्रतिनिधीस व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चेस बोलविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २४ धर्मशाळा इमारत -०१ मधील लेडीज बाथरुमजवळ ॲल्युमिनियम पार्टीशन तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.८९७.** धर्मशाळा विभागाने दि.३१/१०/२००६ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास तिनही माळ्यावर महिला मुतारी शेजारी भिंत घालून महिलांना कपडे बदलण्यासाठी सोय करुन मिळावी असे कळविले आहे. उपरोक्त पत्रात सध्या असलेल्या बाथरुम समोरील मोकळ्या जागेत महिला मुतारी शेजारी तिनही माळ्यावर उत्तर दक्षिण व पूर्व-पश्चिम अशी ५'-०" फुटापर्यंत भिंत बांधल्यास महिलांना सोयीचे होईल असे कळविले आहे.

धर्मशाळा इमारत नं. १ मध्ये तिनही माळ्यावर दोन बाजूस मुतारी आहे, अशा एकूण ०६ मुतारी आहे. सदर जागेवर समक्ष पाहणी केली असता ज्या ठिकाणी भिंत बांधणे आवश्यक आहे तेथे स्लॅबमध्ये बीम नसल्याने भिंत बांधणे ऐवजी ॲल्युमिनियम पार्टीशन करणे सोयीचे आहे. सदर काम हे ५२.१४ चौ.मी. इतके असून त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. १,१४,७०८.०० मात्र इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, धर्मशाळा इमारत -०१ मधील लेडीज बाथरुमजवळ ॲल्युमिनियम पार्टीशन तयार करणे कोटेशन्स मागविण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१४,७०८.००चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २५ कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे ठेकेदार मे.आस्मिता कन्स्ट्रक्शन यांचे पत्राबाबत**

**निर्णय क्र.८९८.** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २६ साईनिवास अतिथीगृह व साईबाबा रुग्णालय समोरील जागेत लॅंडस्केप करणे बाबत**

**निर्णय क्र. ८९९. (अ)** दि.१९/०८/०६ रोजीच्या मा.व्य.समितीच्या सभेतील निर्णय क्र ५३९ अन्वये नविन व्ही.आय.पी. जवळील जागेत लॅंड स्केपिंग करणेकामी आर्किटेक्ट अमृता पवार यांचेकडून लॅंड स्केपिंग करुन घेण्यात यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रसादालय परिसरात साईप्रसाद क्र.२ चे पाठीमागील बाजूस भक्तांच्या निवासासाठी तसेच व्ही. आय.पी., व्ही.व्ही.आय.पी. करिता साईनिवास अतिथीगृह (वातानुकूलित) बांधणेत आलेले आहे. सध्या या अतिथीगृहात २४ व्ही.आय.पी. सूटस आहेत. या अतिथीगृहात साधारणपणे दररोज व्ही.आय. पी.,व्ही.व्ही.आय.पी.निवासासाठी येत असतात. तसेच या अतिथीगृहात मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यही निवासासाठी असतात. याच इमारतीत सभागृह बांधलेले असून, या ठिकाणी नेहमी मा.व्यवस्थापन समितीच्या तसेच शासकीय अधिकाऱ्यांच्या तथा सल्लागार परिषदेच्या सभा होत असतात.

या इमारतीचे प्रांगणात सध्या डांबरीकरण करण्यात आलेले आहे. या इमारतीत निवासासाठी येणाऱ्या व्ही.आय. पी.,व्ही.व्ही.आय.पी. व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत असे वातावरण अनुभवयास मिळावे

या दृष्टीने या इमारती सभोवतालील प्रांगणात (खुल्या जागेत) लॅण्डस्केपिंग करावयाचे असून, यासाठी अमृता पवार,लॅण्डस्केप आर्किटेक्ट यांनी खुल जागेत थोडेसे बांधकाम करुन त्यामध्ये हिरवळ,पाण्याचा कारंजा फुलझाडे अशा प्रकारे सुशोभिकरण करता येईल असे सुचविले आहे. भांडार समोरील सर्व मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे दाखविलेले आहे. याकरिता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१. | व्ही.आय.पी.समोरील जागेत कारंजा, भिंतीवर स्टोन क्लॅडीग व फुलझाडे इत्यादी | ११,३६,७७५.०० |
| ०२. | नगर-मनमाड रस्ता ते व्ही.आय.पी.गेट व व्ही.आय.पी.समोरील मोकळया जागेत इंटरलॉकींग ब्लॉक फुलझाडे व मोठी झाडे इत्यादी | ७,४१,४०१.०० |
| | एकूण | १८,७८,१७६.०० |

उपरोक्तप्रमाणे यासाठी एकत्रित अंदाजे खर्च रुपये १८,७८,१७६/- (रुपये अठरा लाख अठ्याहत्तर हजार एकशे शहात्तर) मात्र अपेक्षित असून, आर्किटेक्ट अमृता पवार यांनी ३ % फी ची मागणी केलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे अंदाजे रक्कम रुपये १८,७८,१७६/- मात्रचे खर्चास तसेच आर्किटेक्ट अमृता पवार यांना ३ % फी देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**(ब)** तसेच दि.१९/०८/०६ रोजीच्या मा.व्य.समितीच्या सभेतील निर्णय क्र ५४१ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलच्या समोरील जागेत गार्डन करणेबाबत या विषयावर चर्चा होवून त्यामध्ये नाशिकचे लॅन्डस्केप आर्कीटेक्ट.श्री. अमृता पवार यांच्या कडून लॅन्डस्केपींग करुन घेण्यात यावे व येणा-या खर्चास मान्यता असावी असे ठरले आहे.

श्री.साईबाबा हॉस्पीटल (सुपर स्पेशालिटी) या हॉस्पीटल मध्ये येणा-या रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच इतर व्यक्तींना प्रसन्न व प्रंफुल्लीत असे वातावरण अनुभवास मिळावे तसेच रुग्णांना धुळीचा व प्रदुषणाचा त्रास होवू नये, या दृष्टीने या जागेवर लॅन्डस्केप करावयाचे आहे.

यासाठी नाशिक येथील लॅन्डस्केप आर्कीटेक्ट. आमृता पवार यांनी या खुल्या जागेत थोडेसे बांधकाम करुन त्यामध्ये हिरवळ, पाण्याचा कारंजा, फुलझाडे व समोरिल बाजूने भितीवरुन पाण्याचे झरे व फुलझाडे अशाप्रकारे सुशोभीकरण करता येईल, असे सुचवलेले आहे. या मध्ये रुग्ण व नातेवाईक यांना पेव्हींग ब्लॉक टाकून बसण्याची सोय करावयाची आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे स्वरुप** | **रक्कम** |
|---|---|---|
| ०१ | लॅन्डस्केपींग करावयाची जागा | १४४७६४.०० |
| ०२ | पाण्याचा कारंजा | ४००००.०० |
| ०३ | बांधकाम व इलक्ट्रीकल खर्च | ३६८८०२.३२ |
| | | **५,५३,५७२.३२** |

या कामी एकत्रीत खर्च अंदाजे रु. ५,५३,५७२.३२ (अक्षरी रुपये पाच लाख त्रेपन्न हजार पाचशे बाहत्तर पैसे बतीस) मात्र अपेक्षित आहे. तसेच याकामी आर्किटेक्ट अमृता पवार यांनी ३ % फी ची मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावित **"अ"** नुसार नविन व्ही.आय.पी. जवळील जागेत लँड स्केपिंग करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १८,७८,१७६/- चे खर्चास त्याचप्रमाणे **"ब"** नुसार श्रीसाईबाबा हॉस्पीटलच्या समोरील जागेत गार्डन करणेकामी अंदाजे रु. ५,५३,५७२/- चे खर्चास तसेच वरील दोन्ही कामासाठी ३ % फी आर्किटेक्ट अमृता पवार यांना देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं. २७ समाधी मंदिर दक्षिण बाजू कंम्पाऊंड भिंत वाढीव खर्चाबाबत**

**निर्णय क्र.९००.** मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील भिंतीची उंची संरक्षणाचे दृष्टीने वाढविणेबाबत कळविले होते. भिंतीची उंची वाढविणे व ग्रील बसविणे याकामाकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०४/२००६ रोजीचे निर्णय क्र.१९४ अन्वये रु.६,३७,७८४/- मात्रचे खर्चास व सदरचे काम मंदिर परिसरातील काम करत असलेले ठेकेदार मे.नितीन बी.औताडे, पोहेगांव यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०५/२००५ रोजीचे निर्णय क्र.२३१ अन्वये दक्षिण बाजुकडील कमानीचे ठिकाणी आकर्षक महाव्दार बनविणेस मान्यता देण्यात आली आहे.

नितिन बी.औताडे, पोहेगांव यांनी कंम्पाउंड भिंतीचे उंची वाढविणे व दक्षिण बाजु महाव्दाराचे काम पूर्ण केले असून याकामी रु.९,७३,११४.०० रकमेचे मात्रचे अंतिम बील आर्किटेक्ट माथूर ॲण्ड कापरे नवी दिल्ली यांनी प्रमाणीत केले आहे. कमानीचे कामाचा व लेंडीबागेतील संरक्षणाचे दृष्टीने धबधब्याजवळ रेलिंगचे ऐवजी भिंतीचे बांधकाम करण्यात आले. या वाढीव कामामुळे रु. ३,३५,३५०.०० मात्र जादा खर्च झाला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे जादा येणारे खर्चास व आर्किटेक्ट यांचे तपासणीनुसार ठेकेदार यांचे अंतिम बील अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही -बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २८ समाधी मंदिर परिसरात Awning शेड उभारणे बाबत.**

**निर्णय क्र.९०१.** संस्थानचे समाधी मंदिर परिसरात साईभक्तांच्या सोयीकरीता प्रसादालय महाव्दाराजवळ लाडु प्रसाद विक्री काउंटर उघडण्यात आलेले आहे. तसेच नगरव्दाराजवळ उदी वाटप, देणगी काउंटर व आंध्रा बँकेचे ए.टी.एम चालू करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. याठिकाणी साईभक्तांचे उन, वारा व पावसापासुन संरक्षण होणेकरीता सदर काउंटरसमोर शेड (Awning) टाकून मिळणेबाबत कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी समक्ष चर्चेअंती सांगितले आहे.

तसेच सदरचे Awning Shed हे सुबक व सुव्यवस्थित दिसत असल्याने मंदिर परिसरात शोभुनही दिसतात. सदरील शेड हे ॲडजेस्टेबल असून उन,वारा व पाउस यापासून भक्तांचे संरक्षण होईल.

सध्या सुरक्षितेच्या दृष्टीने लाडू प्रसाद काउंटर्स मंदिरासमोरील इमारती ऐवजी प्रसादालय महाव्दाराजवळ सुरु करणेत आलेले आहे. याठिकाणी साईभक्तांचे उन,वारा व पाउस यापासून संरक्षण होणेकरीता सध्या कापडी मंडप टाकणेत आलेला आहे. सदरचा कापडी मंडप नेहमीच्या वापराने खराब होतो तसेच सदर मंडपाचे नेहमी कापड बदलावे लागते. यासाठी भक्तांच्या सोयीच्या दृष्टीने Awning Shed टाकणे अत्यंत गरजेचे आहे.

यापुर्वी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयासमोर ठेकेदार डेकोर फ्लेक्स, मुंबई या कंपनीमार्फत शेड अशाच प्रकारचे (Awning) तयार करण्यात आलेले आहे. त्यांचेकडील मागील मंजुर दर रुपये १२५/- प्रती चौ.फुट याप्रमाणे २०' x१०' व ३०' x१०' मापाचे शेड (Awning) तयार करणेकामी अंदाजे रुपये ६२,५००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर परिसरात Awning शेड उभारणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६२,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. २९ श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता तातडीची औषधे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९०२.** **अ)** दि १५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा रुग्णालय कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॅस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी जनरल ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक वार्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर वार्ड मध्ये काही वार्ड नवीनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वार्ड मध्ये लागणारी औषधे सर्जीकल साहित्य, जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती ती आपणास नाशिक, मुंबई, कोपरगाव, संगमनेर, शिरडी, औरंगाबाद आणि पुणे येथून उपलब्ध करावी लागली आहे. मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत निर्णय क्र.३४८ अन्वये वैद्यकिय संचालक यांनी मा.उपसमितीच्या सभेत मान्यता घेऊन तातडीचे खरेदीस विहीत पध्दतीने आवश्यक ती औषधे / साहित्य / सर्जिकल साहित्य / किरकोळ साहित्य दरमहा रु.१,००,०००.०० पर्यंत शक्य आसल्यास क्रेडीटवर अथवा रोखीने खरेदी करुन तातडीची गरज भागवावी, असे ठरले आहे. तथापी वार्षीक औषध खरेदीची कार्यवाही अद्याप पुर्ण न झाल्याने व औषधाची ऑर्डर न गेल्याने सध्या दोन्ही रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,००,०००/- चे तरतूदी व्यतिरिक्त माहे ऑगस्ट-२००६ मध्ये केली आहे.त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Life Line Surgical Kopargaon | 404 | 24/08/2006 | 6200 |
| 2 | Life Line Surgical Kopargaon | 407 | 24/08/2006 | 2525 |
| 3 | Life Line Surgical Kopargaon | 399 | 24/08/2006 | 6712 |
| 4 | Life Line Surgical Kopargaon | 438 | 25/08/2006 | 7214 |
| 5 | Life Line Surgical Kopargaon | 364 | 05/08/2006 | 1664 |
| 6 | Maureen Surgical Aurangabad | 424 | 24/08/2006 | 1810 |
| 7 | Maureen Surgical Aurangabad | 419 | 23/08/2006 | 17789 |
| 8 | Bafna Medico Sangamner | 164674 | 26/07/2006 | 14195 |
| 9 | Bafna Medico Sangamner | 168586 | 23/08/2006 | 21786 |
| 10 | Om Medical Stores, Shirdi | 883 | 26/08/2006 | 160 |
| 11 | Om Medical Stores, Shirdi | 886 | 26/08/2006 | 2200 |
| 12 | Pharmacea Link, Pune | 5846 | 14/07/2006 | 12100 |
| 13 | Pharmacea Link, Pune | 6258 | 09/08/2006 | 11455 |
| 14 | Pharmacea Link, Pune | 6435 | 24/08/2006 | 2066 |
| 15 | Pharmacea Link, Pune | 6436 | 24/08/2006 | 3204 |
| 16 | Vijay Medical Stores, Shirdi | 15108 | 24/08/2006 | 347 |
| 17 | Vijay Medical Stores, Shirdi | 15111 | 25/08/2006 | 1400 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 18 | Vijay Medical Stores, Shirdi | 15116 | 26/08/2006 | 114 |
| 19 | Vijay Medical Stores, Shirdi | 15117 | 26/08/2006 | 126 |
| 20 | Kanchan Drugs, Pune | 1233 | 28/08/2006 | 10400 |
| 21 | Kanchan Drugs, Pune | 5003 | 18/08/2006 | 12438 |
| 22 | Kanchan Drugs, Pune | 5217 | 24/08/2006 | 12375 |
| 23 | Kanchan Drugs, Pune | 5219 | 24/08/2006 | 12029 |
| 24 | Kanchan Drugs, Pune | 1119 | 28/08/2006 | 45000 |
| 25 | Sandeep Agencies,Kopargaon | 16520 | 22/08/2006 | 19100 |
| 26 | Sandeep Agencies,Kopargaon | 16561 | 25/08/2006 | 12650 |
| 27 | J.S.P.Surgical,Nashik | 7690 | 23/08/2006 | 5084 |
| 28 | J.S.P.Surgical,Nashik | 7963 | 26/08/2006 | 3940 |
| 29 | Universal Chemical, Nashik | 5597 | 14/08/2006 | 1602 |
| 30 | Universal Chemical, Nashik | 5564 | 18/08/2006 | 23800 |
| 31 | Universal Chemical, Nashik | 5565 | 18/08/2006 | 3150 |
| 32 | Vishal Agencies, Ahmednagar | 3,120 | 01/09/2006 | 11701 |
| 33 | Vishal Agencies, Ahmednagar | 3,121 | 01/09/2006 | 12852 |
| 34 | Rookee Distributors,Mumbai | 89506 | 29/08/2006 | 6899 |
| 35 | Abhishek Enterprises, Beed | 125 | 23/08/2006 | 3188 |
| 36 | The Parel Chemist, Mumbai | 993715 | 24/07/2006 | 352.5 |
| 37 | L.P.Corporation, Pune | 2081 | 22/07/2006 | 44000 |
| 38 | Alpha Enterprises, Mumbai | 2078 | 22/08/2006 | 1430 |
| | | | **Total Amt.** | **355057.50** |

**ब)** दि.१५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॅस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी जरनल ॲन्जीओग्रॉफी आन्जीओप्लास्टी कार्डीयाक वार्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर वार्ड मध्ये काही वार्ड नवीनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वार्ड मध्ये लागणारी औषधे सर्जीकल साहित्य, जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती ती आपण नाशिक, मुंबई कोपरगाव संगमनेर शिरडी आणि पुणे येथून खरेदी केलेली आहे. मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत निर्णय क्र. ३४८ अन्वये वैद्यकिय संचालक यांनी मा. उपससमितीची सभेत मान्यता घेऊन तातडीचे खरेदीस विहित पध्दतीने आवश्यक ती औषधे / साहित्य / सर्जिकल साहित्य / किरकोळ साहित्य दरमहा रुपये १,००,०००/- पर्यंत शक्य असल्यास क्रेडीटवर अथवा रोखीने खरेदी करुन तातडीची गरज भागवावी, असे ठरले आहे.तथापी वार्षीक औषध खरेदीची कार्यवाही अद्याप पुर्ण न झाल्याने व औषधांचे ऑर्डर न गेल्याने सध्या दोन्ही रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे सदरची खरेदी ही ऑगस्ट-२००६ या महिन्यातील असून ती वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा रु.१,००,०००/- चे तरतुदी व्यतिरिक्त करावी लागलेली आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Universal Traders,Pune | 1893 | 25.08.2006 | 148185.00 |
| 2 | Laxmianand Medical,Shirdi. | 1876 | 28.07.2006 | 193.00 |
| 3 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5194 | 24.08.2006 | 4050.00 |
| 4 | Vijay Treding Co.Shrirampur | 291 | 07.08.2006 | 726.00 |
| 5 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15107 | 25.08.2006 | 2570.00 |
| 6 | Centenial Surgical Suture Ltd.,Mumbai | 481 | 16.08.206 | 25704.00 |
| 7 | Lifeline Systems Pvt.Ltd.,Delhi | 1439 | 23.08.2006 | 6380.00 |
| 8 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15109 | 25.08.2006 | 641.00 |
| 9 | Life Line Surgical,Kopargaon | 447 | 28.08.2006 | 2205.00 |
| 10 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15120 | 29.08.2006 | 120.00 |
| 11 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15121 | 29.08.2006 | 425.00 |
| 12 | Life Line Surgical,Kopargaon | 457 | 31.08.2006 | 2018.00 |
| 13 | Life Line Surgical,Kopargaon | 451 | 30.08.2006 | 6183.00 |
| 14 | J.S.P.Surgical,Nashik | 7699 | 02.09.2006 | 4064.00 |
| 15 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15123 | 30.08.2006 | 530.00 |
| 16 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15124 | 30.08.2006 | 4750.00 |
| 17 | Bhagwati Distributor ,Nashik | 391 | 30.08.2006 | 17500.00 |
| 18 | Zenith Surgical,Mumbai | 601604 | 30.08.2006 | 8030.00 |
| 19 | Life Line Surgical,Kopargaon | 456 | 31.08.2006 | 550.00 |
| 20 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15129 | 31.08.2006 | 985.00 |
| 21 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15130 | 31.08.2006 | 694.00 |
| 22 | Life Line Surgical,Kopargaon | 460 | 31.08.2006 | 11104.00 |
| 23 | Life Line Surgical,Kopargaon | 467 | 01.09.2006 | 390.00 |
| 24 | Chacha Medical Agencies,Nashik | 1530 | 26.08.2006 | 8316.00 |
| 25 | J.S.P.Surgical,Nashik | 7692 | 26.08.2006 | 10490.00 |
| 26 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15113 | 26.08.2006 | 1428.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | Om Medical Stores,Shirdi. | 891 | 28.08.2006 | 4284.00 |
| 28 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5299 | 26.08.2006 | 7622.00 |
| | | | Total Amt. | 280137.00 |

**क)** दि.१५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॅस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी, जनरल ॲन्जीओग्रॉफी, आन्जीओप्लास्टी, कार्डीयाक वार्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर वार्डमध्ये काही वार्ड नवीनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वार्ड मध्ये लागणारी औषधे, सर्जीकल साहित्य जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती ती आपण नाशिक, मुंबई, कोपरगाव, संगमनेर, शिरडी आणि पुणे येथून खरेदी केलेली आहे. मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत निर्णय क्र. ३४८ अन्वये वैद्यकिय संचालक यांनी मा. उपसमितीची सभेत मान्यता घेऊन तातडीचे खरेदीस विहित पध्दतीने आवश्यक ती औषधे / साहित्य / सर्जिकल साहित्य / किरकोळ साहित्य दरमहा रुपये १,००,०००/- पर्यंत शक्य असल्यास क्रेडीटवर अथवा रोखीने खरेदी करुन तातडीची गरज भागवावी, असे ठरले आहे.

तथापी वार्षीक औषध खरेदीची कार्यवाही अद्याप पुर्ण न झाल्याने व औषधांचे ऑर्डर न गेल्याने सध्या दोन्ही रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे सदरची खरेदी ही सप्टेंबर-२००६ या महिन्यातील असून ती वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा रु.१,००,०००/- चे तरतुदी व्यतिरिक्त करावी लागलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5560 | 02.09.2006 | 8804.00 |
| 2 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5470 | 31.08.2006 | 8883.00 |
| 3 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5947 | 12.09.2006 | 340.00 |
| 4 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5942 | 12.09.2006 | 15480.00 |
| 5 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 1511 | 05.09.2006 | 5560.00 |
| 6 | Life Line Surgical,Kopargaon | 506 | 12.09.2006 | 2043.00 |
| 7 | Life Line Surgical,Kopargaon | 471 | 02.09.2006 | 5916.00 |
| 8 | Pharmacea Link,Pune | 6666 | 08.09.2006 | 4035.00 |
| 9 | Lifeline Systems Pvt.Ltd.,Delhi | 1504 | 29.08.2006 | 25520.00 |
| 10 | Critical Care Systems,Pune | 518 | 01.09.2006 | 6300.00 |
| 11 | Perk Pharmaceutical Services,Pune | 15 | 25.08.2006 | 399.00 |
| 12 | B.L.Lifesciences Pvt.Ltd.,Mumbai | 5575 | 29.08.2006 | 9900.00 |
| 13 | Meena Agencies,Nashik | 5341 | 08.09.2006 | 20353.00 |
| 14 | Rohit Enterprises,Pune | 1832 | 13.09.2006 | 9280.00 |
| 15 | Nirmala Dinani Trust ,Nashik | 238 | 28.08.2006 | 233.00 |
| 16 | Nirmala Dinani Trust ,Nashik | 237 | 28.08.2006 | 233.00 |
| 17 | Nirmala Dinani Trust ,Nashik | 236 | 28.08.2006 | 233.00 |
| 18 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15138 | 01.09.2006 | 124.00 |
| 16 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15137 | 01.09.2006 | 5.00 |
| 20 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15135 | 01.09.2006 | 1750.00 |
| 21 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15134 | 01.09.2006 | 160.00 |
| 22 | J.S.P.Surgical,Nashik | 7696 | 02.09.2006 | 9390.00 |
| 23 | J.S.P.Surgical,Nashik | 7697 | 02.09.2006 | 3970.00 |
| 24 | Raman & Weil Pvt.Ltd.,Mumbai | 1176 | 18.08.2006 | 3600.00 |
| 25 | Raman & Weil Pvt.Ltd.,Mumbai | 2115 | 18.08.2006 | 10500.00 |
| 26 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15141 | 02.09.2006 | 157.00 |
| 27 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5563 | 02.09.2006 | 2704.00 |
| 28 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5564 | 02.09.2006 | 6094.00 |
| 29 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5562 | 02.09.2006 | 2912.00 |
| 30 | Life Line Surgical,Kopargaon | 477 | 04.09.2006 | 1050.00 |
| 31 | Life Line Surgical,Kopargaon | 470 | 02.09.2006 | 2425.00 |
| 32 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15146 | 04.09.206 | 121.00 |
| 33 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15152 | 05.09.2006 | 722.00 |
| 34 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15151 | 05.09.2006 | 10.00 |
| 35 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15150 | 05.09.2006 | 1015.00 |
| 36 | Life Line Surgical,Kopargaon | 492 | 08.09.2006 | 1840.00 |
| 37 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 39 | 06.09.2006 | 77000.00 |
| 38 | Devi Surgical,Ahmednagar | 68 | 02.09.2006 | 2000.00 |
| 39 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15147 | 04.09.2006 | 714.00 |
| 40 | Life Line Surgical,Kopargaon | 482 | 05.09.2006 | 4891.00 |
| 41 | Life Line Surgical,Kopargaon | 483 | 05.09.2006 | 1598.00 |
| 42 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15166 | 06.09.2006 | 300.00 |
| 43 | Chacha Medical Agencies,Nashik | 1526 | 25.08.2006 | 20700.00 |
| 44 | Vijay Treding Co.Shrirampur | 379 | 07.09.2006 | 363.00 |
| 45 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15157 | 07.09.2006 | 240.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 46 | J.S.P.Surgical,Nashik | 7908 | 07.09.2006 | 5328.00 |
| 47 | Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 5693 | 06.09.2006 | 6885.00 |
| 48 | Maureen Surgical,Aurangabad | 455 | 29.08.2006 | 936.00 |
| 49 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15164 | 08.09.2006 | 3853.00 |
| 50 | Nirmal Agencies,Rahuri | 4024 | 08.09.2006 | 3656.00 |
| 51 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15165 | 08.09.2006 | 1250.00 |
| 52 | Life Line Surgical,Kopargaon | 495 | 08.09.2006 | 16861.00 |
| 53 | Pharmacea Link,Pune | 6664 | 08.09.2006 | 3204.00 |
| 54 | Life Line Surgical,Kopargaon | 499 | 09.09.2006 | 3770.00 |
| 55 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15168 | 09.09.2006 | 146.00 |
| 56 | Anand Medical,Rahata | 499 | 07.09.2006 | 631.00 |
| 57 | Life Line Surgical,Kopargaon | 504 | 12.09.2006 | 4760.00 |
| 58 | Vishal Agencies,Ahmednagar | 3284 | 11.09.2006 | 11796.00 |
| 59 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15173 | 12.09.2006 | 640.00 |
| 60 | Kaustubh Enterprises,Mumbai | 837 | 08.09.2006 | 4838.00 |
| 61 | Universal Traders,Pune | 2179 | 12.09.2006 | 4800.00 |
| 62 | Maureen Surgical,Aurangabad | 502 | 12.09.2006 | 360.00 |
| 63 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15177 | 13.09.2006 | 315.00 |
| 64 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15185 | 14.09.2006 | 40.00 |
| 65 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15184 | 14.09.2006 | 2203.00 |
| 66 | Rajkumar Agencies,Kopargaon | 708 | 14.09.2006 | 1117.00 |
| 67 | Life Line Surgical,Kopargaon | 578 | 29.09.2006 | 3128.00 |
| | | | **Total Amt.** | **360384.00** |

वरील अ, ब, क तक्त्यातील एकुण रक्कम खालीलप्रमाणे -

अ) रक्कम रु. ३५५०५७.५०

ब) रक्कम रु. २८०१३७.००

क) रक्कम रु. ३६०३८४.००

**एकुण रक्कम रु. ९९५५७८.५०**

तरी उपरोक्तप्रमाणे एकुण रक्कम रु.९,९५,५७८.५०/- (रु. नऊ लाख पंच्यान्नव हजार पाचशे अठ्ठयाहत्तर आणि पैसे पन्नास मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३० ऑपरेटींग मायक्रोस्कोप खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९०३.** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये न्युरो शस्त्रक्रिया हा विभाग कार्यान्वीत करावयाचा आहे. यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६/०९/२००६ निर्णय क्रमांक ६९५ अन्वये रु.३६,०५,५०५.६० ची हत्यारे खरेदी बाबत निर्णय झालेला आहे. याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात आलेल्या आहेत. सदरच्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १४/१०/२००६ चे सभे पुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदरच्या न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकिय संचालक डॉ. टिंगरे हे स्वत: करणार आहेत. महाराष्ट्र शासनाचे जीवदायी योजने अंतर्गत बायपास, न्युरो सर्जरी शस्त्रक्रियेसाठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळत असते. आपल्या रुग्णालयात डॉ. टिंगरे हे नामांकित न्युरो सर्जन असून ते आपल्या रुग्णालयात न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रिया करणार आहेत. आपणास देखील न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रिया केल्यानंतर शासनाकडून अनुदान मिळू शकेल व त्यासाठी त्यांना एक कार्ल झेईस या जर्मनस्थित नामांकित कंपनीचा ऑपरेटींग मायक्रोस्कोप ॲक्सेसरिजसह लागणार आहे. सदरचे मायक्रोस्कोपसाठी अंदाजे रू. ५८,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार दि. १२/१०/२००६ च्या पत्रान्वये सदरच्या न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रिया करणेकामी त्यांनी ऑपरेटींग मायक्रोस्कोप १ नग (कार्ल झेइस) ची मागणी केलेली असून मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी त्यावर शिफारस केलेली आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मायक्रोस्कोप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३१. HP कलर प्रिंटर CD/DVD WRITER, HARD DISK खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.९०४.** दिनांक२.०९.२००६ रोजी आयोजित केलेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.०९ अन्वये हॉस्पिटलमध्ये १११ संगणक व १० प्रिंटर विविध विभागात बसविण्यात आलेले असून त्यांचे कामकाज सुरळीत सुरु आहे. सदर प्रिंटर कार्यालयीन कामासाठी उपयुक्त आहेत. हॉस्पिटलमधील CARDIC LAB, PATHOLOGY LAB, SKIN SPECIALIST, GENERAL SURGEON, BIO-MEDICAL, BLOOD BANK, MARKETING इत्यादी ठिकाणी मेडिकल कामासाठी त्यांच्या मशिनरीच्या बनवाटीनुसार प्रिंटर्स CD/DVD WROTER तसेच CD ROM ची आवश्यकता आहे आणि डाटा ट्रान्सफरसाठी एक्टर्नल हार्ड डिस्कची आवश्यकता आहे.

सदरचे खरेदीस व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे दिनांक २३.९.२००६ चे सभेत अंदाजे रुपये ५.५० लाख खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तरी सदरची कोटेशन्स उघडण्यास मान्यता देण्यात आली.

हया विभागातील मागणीनुसार रुग्णांचे मेडिकल रिपोर्ट (ANGIO TEST PHOTO) इत्यादी साठी मशिनरुप प्रिंटर्सची खरेदी करणेकामी कोटेशन्सची मागणी केली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे सहा कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| 01 | SAI INFOSYSTEMS, AHMEDABAD |
| 02. | PRESIDENT COMPUTER SERVICES,MUMBAI |
| 03. | PERFECT SYSTEM , MUMBAI |
| 04. | ITV COMPUTERS PVT. LTD MUMBAI |
| 05. | MINITEK COMPUTER SHOPPE , NASHIK |
| 06. | DREAM MACHINES, DOMBIVALI |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना आजचे सभेत चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्ससादरकर्ते आजचे सभेस चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| 01 | MINITEK COMPUTER SHOPPE , NASHIK |
| 02 | DREAM MACHINES, DOMBIVALI |

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात किती सुट देणार याबाबत लेखी देणेबाबत सांगणेत आले. त्यानुसार कोटेशन्स सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केलेले आहेत.

STATEMENT SHOWING THE COMPARITIVE RATES FOR PRINTER/CD/DVD WRITER / HARDDISK

| DEALERNAME | QTY | SAI INFOSYSTEM, AHEMDABAD | PRESIDENT COMPUTERS, MUMBAI | PERFECT SYSTEM, MUMBAI | ITV COMPUTERS PVT. LTD., MUMBAI | MINITEK COMPUTER SHOPPEE, NASIK | | DREAM MACHINES, DOMBAVALI | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ITEM | | 1 | 2 | 3 | | 5 | AFTER NEGOTIATIO N INCLUDING ALL TAXES | 6 | AFTER NEGOTIATIO N INCLUDING ALL TAXES |
| HP LASER JET 3055 | 2 | 48,488.00 | 47,700.00 | 48,500.00 | 45,700.00 | 46,176.00 | 46,488.00 | 43,500.00 | **41,800.00** |
| TONNER / CARTRIDGE | 2 | | | | | | **5,896.00** | 6,100.00 | 5,950.00 |
| HP LASER JET 3392 | 2 | 92,220.00 | 89,700.00 | 90,500.00 | 87,700.00 | 88,400.00 | **84,656.00** | | |
| TONNER / CARTRIDGE | 2 | | | | | | **6,032.00** | | |
| HP C4188 | 7 | 62,363.00 | 60,550.00 | 61,500.00 | 56,875.00 | 57,512.00 | 56,420.00 | 53,480.00 | **52,150.00** |
| TONNER / CARTRIDGE | 7 | | | | | 18,200.00 | 18,200.00 | 11,375.00 | **11,200.00** |
| HP PHOTOSMART 3108 | 1 | 15,420.00 | 14,750.00 | 15,250.00 | 14,150.00 | 14,820.00 | 14,248.00 | 13,400.00 | **13,300.00** |
| TONNER / CARTRIDGE | 1 | | | | | 1,175.00 | **1,175.00** | 3,025.00 | 2,975.00 |
| HP LASER JET 1020 | 10 | 75,600.00 | 76,500.00 | 78,500.00 | 73,000.00 | 70,720.00 | 69,680.00 | 67,500.00 | **66,000.00** |
| TONNER / CARTRIDGE | 10 | | | | | 29,484.00 | **29,484.00** | 30,500.00 | 29,750.00 |
| DOT MATRIX LQ 300+ | 5 | 51,040.00 | 51,250.00 | 52,250.00 | 49,750.00 | 49,920.00 | 50,440.00 | 44,000.00 | **43,500.00** |
| CD/ CDVD COMBO WRITER | 15 | 33,900.00 | 31,500.00 | 32,500.00 | 26,250.00 | 28,860.00 | 21,060.00 | 28,500.00 | **19,500.00** |
| EXT. HDD 160 GB | 2 | | 11,000.00 | 11,300.00 | 9,900.00 | 8,320.00 | **6,968.00** | 8,100.00 | 7,900.00 |
| | | **379,031.00** | **382,950.00** | **390,300.00** | **363,325.00** | **413,587.00** | **410,747.00** | **309,480.00** | **294,025.00** |
| | Negotiation rates Total Amount : | | | | | | **134,211.00** | | **247,450.00** |
| | GRAND TOTAL | | | | | | : | **381,661.00** | |

यावर सविस्तर चर्चा होऊन, MINITEK COMPUTER SHOPPE, NASIK व DREAM MACHINES, DOMBIVALI यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असें ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं. ३२** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना संस्थानमार्फत कॉन्फरन्सला हजर रहाणे बाबत.**

**निर्णय क्र.९०५.** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध स्पेशॉलिटीज् व सुपर स्पेशॉलिटीज् सुरु झालेल्या आहेत. वैद्यकीय ज्ञान व तंत्रज्ञान यात सतत नवनवीन बदल घडण्याची प्रक्रिया चालू असते व साधारणतः दर ४-५ वर्षानंतर आजचे तंत्रज्ञान कालबाहय ठरते.

या वैद्यकीय तंत्रज्ञानातील नवनवीन बदलांची माहिती व त्यासंबंधीचे Training डॉक्टरांना देणे अत्यंत जरुरीचे असून त्यांचा मोठा फायदा रुग्णांना होउ शकतो. देशात व परदेशात विविध ठिकाणी Conferences, workshops, symposiums अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात असतात व अशा माध्यमातूनच डॉक्टरांना अदययावत ज्ञान उपलब्ध होउ शकते.

श्री साईबाबा सुपरस्पेशॉलिटी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले बहुतेक स्पेशालिस्ट्स सध्या संस्थानच्या कायम सेवेत सामावून घेतलेले नाहीत. परंतु तसे घडेपर्यंत पुढील सुविधा डॉक्टर्सना उपलब्ध असाव्यात, असे नम्र मत आहे.

**अ)** General Specialists ना वर्षातून एक वेळा देशांतर्गत व

**ब)** Super Specialists ना वर्षातून एक वेळा देशांतर्गत व एक वेळा परदेशी जाण्यास अनुमती असावी व त्याचा श्री साईबाबा संस्थानने आर्थिक अधिभार उचलावा.

या विषयाबाबतीत श्री साईनाथ रुग्णालयाकरिता पुर्वीचे मा.व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेली नियमावली पुढीलप्रमाणे, वैद्यकीय ज्ञानात होणारे नवनवीन बदलांची माहिती रुग्णालयातील

कर्मचाऱ्यांना व्हावी व त्या ज्ञानाचा उपयोग रुग्णालयातील रुग्णांना व्हावा या उद्देशाने पुर्वीचे व्यवस्थापन मंडळाने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता संस्थान मार्फत (संस्थान खर्चाने) वर्षातून एकदा देशात कोठेही कॉन्फरन्स/परिषद/परिसंवादास हजर राहणेकामी अनुमती दिली आहे. त्याप्रमाणे रुग्णालय कर्मचारी संस्थान खर्चाने कॉन्फरन्स/ परिषद/ परिसंवादास हजर रहात असतात.

दिनांक २४ ऑगष्ट,२००४ पासून संस्थानचा कारभार हा श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी,या नावाने महाराष्ट्र शासन अधिनियम - २००४ नुसार चालू असल्यामुळे सदर अधिनियमातील पान नं. १४ कलम १७ (२-घ) नुसार यापुढे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना अशा कॉन्फरन्स/परिषद/परिसंवादास खालील नियमावली नुसार हजर राहता येईल व ती बंधनकारक राहील.

**१)** एकाच प्रकारच्या परिसंवादास एकाच कर्मचाऱ्यास कामाच्या सोईनुसार पाठविणेत येईल.

**२)** एका कर्मचाऱ्यास दोन वर्षातुन एकदा संस्थान मार्फत परिसंवादास हजर राहता येईल व परिसंवादास संस्थान मार्फत उपस्थित राहिल्यास किमान एक वर्ष संस्थान सेवा सोडता येणार नाही. संस्थान सेवा सोडल्यास परिसंवादासाठी संस्थानने केलेला खर्च कर्मचाऱ्याने संस्थानला अदा करावा लागेल.

**३)** परिसंवादाची रजिष्ट्रेशन फी ही पहिल्या मुदतीत जी असेल तीच परिसंवादाहून आल्यानंतर संस्थान मार्फत अदा करण्यात येईल व संस्थान नियमाप्रमाणे प्रवास व वास्तव भत्ता अदा केला जाईल.

**४)** ही सुविधा फक्त रुग्णालय सेवेत कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच दिली जाईल.

**५)** परिसंवादास हजर राहणे अगोदर संबंधीत कर्मचाऱ्याने कमीतकमी एक महिना अगोदर रुग्णालय आस्थापनेकडे परवानगी अर्ज दाखल करणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्त नियमावलीचे अधिन राहूनच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनाही उपरोक्त **अ** आणि **ब** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सेवा-सुविधा पुरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनाही उपरोक्त **अ** आणि **ब** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सेवा-सुविधा पुरविणेस मान्यता देण्यात आली.परदेशी कॉन्फरन्सहून आलेवर कमीतकमी पाच वर्षे व देशांतर्गत कॉन्फरन्सवरुन आलेवर कमीतकमी तीन वर्ष संस्थान सेवा सोडता येणार नाही. संस्थान सेवा सोडल्यास परिसंवादासाठी संस्थानने केलेला खर्च कर्मचाऱ्याने संस्थानला अदा करावा लागेल असा लेखी बॉण्ड संबधित कर्मचाऱ्याकडून करवून घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३३ प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करण्यास परवानगी मिळणेबाबत जगदंबा एज्युकेशन सोसायटी ता.येवला जि.नाशिक यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.९०६.** जगदंबा एज्यूकेशन सोसायटी, ता. येवला, जि. नाशिक,यांनी त्यांचे येथे नर्सिंग महाविद्यालय तसेच महिला महाविदयालय सुरू करणेचे प्रस्तावित असलेबाबत दि.२२/०९/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे.

सदरकामी त्यांनी शिर्डी संस्थानचे ५०० कॉटचे हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीससाठी परवानगी मिळावी, असे पत्र पाठविले असून सदर पत्रात त्यांनी खालील मजकूरात परवानगी दयावी, अशी विनंती केली आहे. तथापि, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये २१५ कॉट व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये १८५ कॉट असे एकूण ४०० कॉटस् उपलब्ध आहेत.

जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला, यांना नर्सिंग महाविदयालय, महाराष्ट्र शासन व केंद्रशासनाने मंजूर केल्यास साईबाबा शिर्डी संस्थानचे हॉस्पिटल प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करण्यास उपलब्ध करून देवू.

जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला, यांना महिला वैद्यकीय महाविदयालय, महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने मंजूर केल्यास साईबाबा शिर्डी संस्थानचे हॉस्पिटल प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करण्यास उपलब्ध करून देवू.

तरी जगदंबा एज्युकेशन सोसायटीस त्यांचे मागणीप्रमाणे उपरोक्त अ.नं. १ व २ प्रमाणे परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**विषय नं. ३४ श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता कार्यालयीन फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९०७.** श्री साईनाथ रुग्णालयाने त्यांचे पत्र क्र. ७८९४ दि. ०३/१०/२००६ अन्वये एकुण ९ प्रकारचे फर्नीचरची मागणी केलेली आहे. त्यात प्रामुख्याने टेबल, कपाटे, रॅक, ड्रेसींग ट्रॉली इत्यादींचा समावेश आहे. त्यांनी मागणी केलेल्या फर्नीचरपैकी ऑफीस टेबल, डिलेव्हरी टेबल, स्क्रिन पडदे इत्यादी आपल्याकडे श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी केलेले आहे. त्यातील फर्नीचर शिल्लक असल्यामुळे ती त्यांना देता येतील. उर्वरित खालीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,१२,३०१.८० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

| अ.नं. | नाव | मॉडेल | खरेदीची किंमत | मागणी | एकुण किंमत | पुरवठाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रिव्हालव्हींग चेअर | HB००७ | ५९५३.६५ | २० | ११९०७३.०० | मे. खिरा, अहमदाबाद |
| २ | रिव्हालव्हींग चेअर | HB००२ | ५७५३.२० | १५ | ८६२९८.०० | मे. खिरा, अहमदाबाद |
| ३ | पेशंट चेकींग टेबल | १८०७ | ६४४५.९८ | १० | ६४४५९.८० | मे. जनक, मुंबई |
| ४ | काचेचे दरवाजा असलेले कपाट | | ६९३१.४० | १५ | १०३९७१.०० | मे. निकिता एंटर., पुणे |
| ५ | स्लॉटेड अँगल रॅक्स | | ५५४०.०० | २५ | १३८५००.०० | मे. निकिता एंटर., पुणे |
| | | | | **एकुण -** | **५१२३०१.८०** | |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयासाठी लागणारे वरिलप्रमाणे फर्निचर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,१२,३०१.८० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

याचवेळी संस्थानचे मिटींग हॉलसाठी आवश्यक २५ नग रिव्हॉल्व्हींग चेअर्स खरेदी करण्यात याव्यात. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/वैद्यकीय संचालक/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ३५ श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता प्रयोगशाळा विभागाकरीता उपकरणे खरेदी बाबत**

**निर्णय क्र.९०८.** श्री साईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ पासून कार्यान्वित करण्यात आले असून रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात दैनंदिन तपासण्या सध्या असलेल्या मशिनवर करण्यात येत आहेत. याशिवाय काही अदयावत तपासण्या करणेकामी खालीलप्रमाणे उपकरणांची पॅथोलॉजिस्ट डॉ. न्यायाधीश यांनी डि.पी. क्र. २७२५ दि. २६/०६/२००६ अन्वये मागणी केलेली आहे. त्यासाठी अंदाजे खर्च रु.१,३०,११,५१२/- अपेक्षित आहे.

| Sr.No. | Name of Instrument | Technical works | Make | Approx Cost. |
|---|---|---|---|---|
| 1 | Variant Electrophoresis | Hb- Electrophoresis | BIO-RAD | 1550000.00 |
| 2 | HPLC | Drug Assay & Electrophoresis | BIO-RAD | 2050000.00 |
| 3 | Semi Automatic Biochemistry Analyser (STAR 21 Plus) | Glycosylated Hb RA, CRP, ASO | Cuvesta Care USA | 250000.00 |
| 4 | Miniwidas | Harmone Assays | Trivitron | 1050000.00 |
| 5 | Gamma Counter (RIA) | Tumor Marker, Harmones | EC of India | 300000.00 |
| 6 | Fluorescent Microscope | ANA / TPI | Carl/ Zeils/ Nilcon/ Olympus | 350000.00 |
| 7 | Automatic Tissue Processor 1L-1.5L Vol | Histopathology | Micromabcon, Panchal | 968750.00 |
| 8 | Cyto Centrifuge | Cytology | Sakura, Labcon | 563000.00 |
| 9 | Elisa Washer + Plate Recorder | Stat Fax-2600 | Ranbaxy, Ark, Thermo | 342875.00 |
| 10 | Coagulometer | PT/ APTT Facturs | Tulip, Merck | 115000.00 |
| 11 | Automatic Urine Strip Reader | Routine Urine Analysis | Ranbaxy, Merck, Baver | 71887.00 |
| | | | **Total -** | **7611512.00** |

सदरच्या मशिनरी खरेदी केल्यास आपणाकडे काही अदयावत तपासण्या सदरचे मशिनवर करता येतील. सदरच्या प्रस्तावावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांची फॅक्सव्दारे मान्यता घेण्यात आली असून त्यांनी एकुण मागणी केलेल्या १३ मशिनरी / उपकरणांपैकी अ.नं.७ (Flow Cytometer) अ.नं. ८ ( P.C.R. Centrifuge) या दोन मशिन वगळून इतर मशिनरी घेण्याबाबत शिफारस केलेली आहे.

सदरच्या दोन मशिनरी/ उपकरणे वगळता उर्वरित अकरा मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.७६,११,५१२/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी हि विहित पध्दतीने कोटेशन / निविदा मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी बाहेरिल तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात येऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३६ श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता कोलोनोस्कोप सेट व हार्मोनीक स्कालपेल खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.९०९.** श्री साईबाबा रुग्णालयात जनरल सर्जन डॉ.सतीष रेड्डी यांनी दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी उपरोक्त कोलोनोस्कोप सेटची मागणी केलेली आहे. यापूर्वी श्री साईबाबा रुग्णालयात गॅस्ट्रोस्कोपी शस्त्रक्रिया करणेकामी ओ.जी.डी.स्कोपी हे मे.साऊथ इंडिया सर्जिकल, मुंबई यांचेकडून Pentax कंपनीचा घेतलेला आहे. तेंव्हा डॉ.रेड्डी यांनी वरील कोलोनोस्कोप हा देखील Pentax कंपनीचा घेतल्यास अधिक उपयुक्त राहिल असे डॉ.रेड्डी यांनी सुचविले आहे. यासाठी मे.साऊथ इंडिया सर्जिकल,मुंबई यांना दुरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यांनी कोलोनोस्कोपसाठी अंदाजे खर्च रु.८,५०,०००.०० तसेच हार्मोनीक स्कालपेल सेट करिता अंदाजे रु.१६,००,०००.०० इतका खर्च कळविला आहे.

तरी वरील प्रमाणे कोलोनोस्कोप सेट व हार्मोनीक स्कालपेल सेट विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे एकूण रु.२४,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३७ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये टी.व्ही.खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१०.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे सर्वच विभाग आता जवळ-जवळ सुरळीतपणे सुरू होउन उर्वरित विविध विभागही लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर आहेत.

सदर हॉस्पिटलचे मा.वैद्यकीय संचालक, यांनी हॉस्पिटलसाठी विविध मागण्या केल्या आहेत.त्यात हॉस्पिटलमधील सर्व डिलक्स व ए.सी.रुम्समध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांचे करमणुकीसाठी उपरोक्त २० रुम्समध्ये दूरदर्शन संच असावेत,अशी सूचना केली होती. त्यावर मा. प्रशासकीय अधिकारी, यांनी सी.सी.टि.व्ही. विभागाने याबाबत खुलासा कळवावा, असा शेरा मारला होता. त्याप्रमाणे सी. सी. टी. व्ही. विभागाने खालीलप्रमाणे खुलासा कळविला आहे.

**१)** सोनी कंपनीचे फ्लॅट २१" मॉ.नं. KV-HM २१ M-८० या टि.व्ही.ंची प्रत्येकी अंदाजे किंमत १२०००/- रू.असल्याचे दिनांक १३.०९.२००६ रोजी कळविले होते.मात्र याबाबत पुन्हा चौकशी केली असता कंपनीने सदर टी.व्ही.चे फ्लॅट २१" मॉ.नं. KV-SW-२१२ M-८० असा मॉडेल नं. केला असल्याचे कळविले आहे. तसेच सोनी कंपनीच्या दूरदर्शन संचाची पिक्चर क्वॉलिटी इतर कंपन्यांच्या दूरदर्शन संचापेक्षा चांगली असून, त्यातील इलेक्ट्रॉनिक किटची कार्यक्षमताही चांगली आहे.तसेच इतर कंपन्यांपेक्षा सोनी कंपनी नामांकित असून सदर कंपनीचे सर्व्हीस सेंटर नाशिक व अहमदनगर येथे आहे. स्पेशल व डिलक्स रूममध्ये पुर्वीचे देणगीदाखल प्राप्त झालेले तीन दूरदर्शन संच वगळता आणखी इतर एकूण १७ दूरदर्शन संच बसविणे गरजेचे आहे. सदर दूरदर्शन संच खरेदीकामी अंदाजे एकूण रू.२,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**२)** सदर टि.व्ही खरेदी झालेनंतर ध्वनीनिक्षेपण विभागामार्फत साईच्छा केबल, शिर्डी यांचेकडून केबल कनेक्शन जोडून घेणेस मंजूरी घेउन पूर्तता करणेत येईल, असाही अभिप्राय त्यांनी कळविला आहे.

तरी स्पेशल व डिलक्स रूम्समध्ये पुर्वीचे देणगीदाखल प्राप्त झालेले तीन दूरदर्शन संच वगळता आणखी इतर एकूण उपरोक्तप्रमाणे १७ दूरदर्शन संच खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये २,१०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख दहा हजार) मात्रचे खर्चास, सर्व टी.व्ही. कार्यान्वित होणेकामी आवश्यक त्या केबल्स व इतर आवश्यक ते मटेरियल खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास मान्यता असावी.तसेच दूरदर्शन केंद्रामार्फत प्रक्षेपित होणारे कार्यक्रम उपरोक्त दूरदर्शन संचावर दिसणेकामी साईच्छा केबल, शिर्डी, किंवा इतर योग्य त्या केबल धारकाकडून केबल कनेक्शन जोडून घेणेबाबतची पूर्तता करणेस,तथा सदरकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चासही मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, १७ नग टी.व्ही खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/विद्युत विभागप्रमुख/खरेदी अधिकारी/ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**विषय नं. ३८ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील पत्रकार परिषदेनिमित्त इंप्रिमिज लाईफ पी आर प्रा.लि.,नवी दिल्ली यांचे खर्चाचे प्रतिपूर्तीचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.९११.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील पत्रकार परिषदेनिमित्त इनव्हाईसने इम्प्रीमीज लाईफ क्रिएटीव्ह कम्युनिकेशन्स थेरपी, दिल्ली, यांनी दि. ०७/०५/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी येथे सुरू करण्यात आलेल्या पहिल्या बायपास सर्जरी निमीत्ताने आयोजीत केलेल्या पत्रकार परिषदेस त्यांचे प्रतिनिधींनी केलेल्या वेगवेगळया खर्चाचे बील रु.३०,४४७.०० मात्र चेक/ डी. डी. ने संस्थानकडून मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३९ मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेशानुसार रुग्णांना बिलात सवलत देणे बाबत.**

**निर्णय क्र.९१२.** मा.उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन ( पी.आय.एल. ) नं. ३१३२/२००४ मधील दि. १७/०८/२००६ रोजी आदेश झालेला आहे, या आदेशात मा. उच्च न्यायालयाने " स्किम " केलेली आहे, दि. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५०, (बी.पी.टी. ॲक्ट १९५०) कलम ४१ एए, अंतर्गत नोंदणीकृत पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांचेमार्फत चालविणेत येणारे धर्मादाय हॉस्पिटल व त्या अंतर्गत नर्सिंग होम किंवा प्रसुतीगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय मदत देणारी इतर केंद्रे की, ज्यांचा वार्षिक खर्च रु.५ लाख पेक्षा जास्त आहे त्यास कलम ४ मधील पोटकलम ४१ एए नुसार " शासकीय अनुदानीत पब्लिक ट्रस्ट " समजण्यात येईल, त्याप्रमाणे तात्काळ अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर, यांचे कार्यालयास पाठविण्यात यावा, असा निर्देश केलेला आहे.

उपरोक्त कायद्याच्या कलम ४४ एए (४)(बी) नूसार गरीब व गरजू (इंडिजन्ट) व्यक्ती म्हणजे ज्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रू.३६००/- पेक्षा जास्त नाही ( किंवा राज्य शासनाने राजपत्रात वेळोवेळी जाहीर केलेल्या उत्पन्नाच्या मर्यादेइतके वार्षिक उत्पन्न आहे).

कलम ४४ एए (४)(सी) नूसार आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील व्यक्ती म्हणजे जी व्यक्ती गरीब व गरजू (इंडिजन्ट) व्यक्ती नाही, व ज्याचे वार्षिक उत्पन्न रू ३,६००/- पेक्षा जास्त रु.१५०००/- पेक्षा कमी

उत्पन्न आहे, (किंवा राज्य शासनाने राजपत्रात वेळोवेळी जाहीर केलेल्या उत्पन्नाच्या मर्यादेइतके वार्षिक उत्पन्न आहे).

सदर योजनेतील खालील महत्वाच्या बाबींची प्राधान्याने पूर्तता करुन अंमलबजावणी करणे बी.पी.टी. ॲक्ट १९५०, कलम ४४ एए नुसार बंधनकारक आहे.

१) अ) पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने हॉस्पिटलच्या वापरण्यात येणा-या एकूण खाटांच्या १०% खाटा गरीब व गरजू रुग्णांसाठी राखीव ठेऊन बिल आकारणी करु नये.

ब) पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने हॉस्पिटलच्या वापरण्यात येणा-या एकूण खाटांच्या १०% खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखीव ठेऊन त्यांनी सवलतीच्या दरामध्ये बिल आकारणी करण्यात यावी

सवलतीचे दर :- बी. पी. टी. ॲक्ट, १९५०, कलम ४४एए (१) (सी) नुसार सवलतीचे दर म्हणजे, दुर्बल घटकातील रुग्ण हॉस्पिटलमध्ये दाखल होऊन तपासण्या व वैद्यकीय उपचार घेऊ इच्छित असल्यास, त्यांची बील आकारणी राज्य शासनाने वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार निर्धारीत केलेल्या तत्सम शासन संचलीत वैद्यकीय केंद्रांच्या दरानुसार करण्यात यावी).

२) गरीब, गरजू रुग्णांवर वैद्यकीय उपचार करणेसाठी " श्री साईनाथ हॉस्पिटल व श्री साईबाबा हॉस्पिटल गरीब , गरजू रुग्णांचा निधी " या नावाने स्वतंत्र निधी उभारुन तसे बँक खाते चालू करुन त्यामध्ये हॉस्पिटलच्या एकूण बिल रक्कमेच्या ( गरीब व गरजू रुग्णांचे बिल रक्कम वजाकरुन ) २% रक्कम जमा करण्यात यावी व सदर रक्कमेचा विनीयोग कटाक्षाने फक्त गरीब व गरजू रुग्णांवर वैद्यकीय उपचार करणेसाठीच करण्यात यावा, असा आदेश आहे.वरील योजनेचा तपशिल खालीलप्रमाणे

१) दि. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५०. (बी.पी.टी. ॲक्ट १९५०) कलम ४१ एए, अंतर्गत नोंदणीकृत पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांचेमार्फत चालविणेत येणारे धर्मादाय हॉस्पिटल व त्या अंतर्गत नर्सिंग होम किंवा प्रसुतीगृह, दवाखाने किंवा वैदयकीय मदत देणारे इतर केंद्रे की, ज्यांचा वार्षिक खर्च रु.५ लाख पेक्षा जास्त आहे. त्यास कलम ४ मधील पोटकलम ४१ एए नुसार "शासकीय अनुदानीत पब्लिक ट्रस्ट" समजण्यात येईल.

२) उपरोक्त पब्लिक चॅरिटेबल टेस्टने वापरण्यात येणा-या एकूण खाटांच्या १०% खाटा आर्थिकदृष्टया अतिदुर्बल रुग्णांसाठी राखीव ठेऊन त्यांची बील आकारणी करु नये, आणि वापरण्यात येणा-या एकण खाटयांच्या १०% खाटा सवलतीच्या दरामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बी.पी.टी.ॲक्ट १९५०, कलम ४४ एए नुसार बंधनकारक राहील.

३) आणिबाणीच्या प्रसंगी चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये रुग्णांना तातडीने दाखल करुन घेऊन योग्य वैदयकीय सेवांसह जीवरक्षक उपाययोजना, रुग्ण स्थिर होईपर्यंत पुरविण्यात याव्यात व पुढील उपचारांसाठी वरिष्ठ चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये रुग्ण पाठविणे झाल्यास व रुग्ण गंभीर व अत्यवस्थ असल्यास चॅरिटेबल पैशाचा आग्रह न करता रुग्णांचे स्थलांतर मोफत करण्यात यावे.

४) प्रत्येक चॅरिटेबल हॉस्पिटलने स्वतंत्र अतिदुर्बल रुग्णांना निधी (इंडीजन्ट पेशंटस् फंड उभारुन एकूण सर्व रुग्णांच्या अतिदुर्बल व दुर्बल घटक सोडून) एकूण बील रक्कमेच्या कोणतेही कपात न करता २% रक्कम जमा करावी.

५) चॅरिटेबल हॉस्पिटल, वैयक्तिक देणगीदार, इतर चॅरिटेबल ट्रस्ट किंवा इतर कोणत्याही प्रकारे अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांवर वैदयकीय उपचार करणेकामी आलेला मदतनिधी आय.पी.एफ खात्यामध्ये जमा करण्यात यावा.

६) आय.पी.एफ. खाते आय.पी.एफ. नावाने संबोधिण्यात येऊन, वार्षिक ताळेबंधामध्ये (बॅलन्सशीट) आय.पी.एफ राखीव निधी म्हणून दर्शविण्यात यावा. (शेडयुल ८, नियम ७ (१) बी.पी.टी. नियम).

७) आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा झालेली रक्कम त्या त्या चॅरिटेबल हॉस्पिटलने खाली निर्देशीत केल्याप्रमाणे अतिदुर्बल व दुर्बल घटकातील रुग्णांवर वैदयकीय उपचार करण्यासाठीच वापरण्यात यावी.

८) चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये अतिदुर्बल तसेच दुर्बल घटकांतील रुग्णांस बील आकारणी न करता खालील, सेवा पुरविण्यात याव्यात.

१. बेड
२. निवासी वैदयकीय अधिकारी यांची सेवा (आर.एम.ओ.सर्व्हिस)
३. नर्सींग सेवा
४. भोजन (हॉस्पिटलमध्ये भोजन पुरविण्याची व्यवस्था असेल तर)
५. लिनन
६. पाणी.
७. विदयुत पुरवठा
८. वैदयकीय उपचारांसाठी करण्यात येणा-या नियमित तपासण्या करण्याची सुविधा.
९. साफसफाई

९) चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये अतिदुर्बल रुग्णांवर प्रत्येक विभागामध्ये वैदयकीय तपासण्या व उपचार पुर्णतः मोफत करण्यात यावेत, ज्या सेवा बिल आकारणी करुन करण्यात येतात त्या सेवांचे अतिदुर्बल

रुग्णांचे बिल हे हॉस्पिटलच्या कमीत कमी दर श्रेणी प्रमाणे आकारण्यात यावे, डॉक्टर्स त्यांची फी आकारणार नसतील तर अतिदुर्बल रुग्णांच्या अंतिम बीलामध्ये ती दर्शविण्यात येऊ नये, अशाप्रकारे बील तयार करुन ते आय.पी.एफ खात्याच्या खर्चामध्ये दर्शविण्यात यावे, अतिदुर्बल रुग्णांकडून हॉस्पिटलमध्ये दाखल होताना अनामत रक्कम भरण्याचा (डिपॉझिट) आग्रह करु नये.

१०) दुर्बल घटकांतील रुग्णांच्या वैदयकीय तपासण्या व उपचार चॅरिटेबल हॉस्पिटलच्या प्रत्येक विभागात सवलतीच्या दरात करण्यात यावे, ज्या सेवा बील आकारणी करुन करण्यात येतात, त्या सेवांचे अतिदुर्बल रुग्णांचे बील हे हॉस्पिटलच्या कमीतकमी दरश्रेणी प्रमाणे आकारण्यात यावे, औषधे व इतर साधनांचे बील हॉस्पिटलच्या खरेदीच्या दराइतकेच आकारण्यात यावे, तरीही दुर्बल घटकांतील रुग्णांनी औषधे व इतर साधनांचे ५०% बील अदा करावे. जर डॉक्टर्स त्यांची फी आकारणार नसतील तर अतिदुर्बल रुग्णांच्या अंतिम बीलामध्ये दर्शविण्यात येऊ नये, अशा प्रकारे बील तयार करुन ते आय.पी.एफ. खात्याच्या खर्चामध्ये दर्शविण्यात यावे.

११) चॅरिटेबल हॉस्पिटलने दर महिन्याला सर्व रुग्णांच्या (अतिदुर्बल व दुर्बल घटक सोडून) एकूण बील रक्कमेच्या २% रक्कम आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा करावेत, आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा असलेली जास्तीत जास्त रक्कम अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांच्या वैदयकीय उपचारावर खर्च करण्यात यावी, जर सतत सहा महिने आय.पी.एफ. खात्यामध्ये रक्कम कमी किंवा जास्त असल्यास ती पुढील महिन्यात संतुलित करण्यात यावी, जर आय.पी.एफ. खात्याची शिल्लक रक्कम कमी असेल व अतिदुर्बल, दुर्बल घटकांतील रुग्णांच्या उपचाराचा खर्च जास्त असेल तर, चॅरिटेबल हॉस्पिटलने सदर बाब नियंत्रण कमिटी (मॉनिटरींग कमिटी) यांचे निर्दशनास आणून दयावे. की जे सदर हॉस्पिटलला योग्य ते निर्देश करतील.

१२) चॅरिटेबल हॉस्पिटलने आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा झालेल्या रक्कमेची माहिती मा.धर्मादाय आयुक्त यांना सादर करावी. आर्थिकदृष्टया अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांवर केलेले उपचार व त्यांच्या संबंधी वैदयकीय समाज सेवकांनी संकलित केलेली माहिती, प्रत्येक रुग्णांवर झालेला खर्च यासह बॉम्बे पब्लिक ट्रस्ट नियम १९५१, नियम २५ ए, नुसार माहिती सादर करण्यात यावी.

१३) चॅरिटेबल हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी त्यांचे नातेवाईक, ट्रस्टचे कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेले कुटुंबीय यांना अतिदुर्बल व दुर्बल घटकांच्या रुग्ण श्रेणीमध्ये चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वैदयकीय उपचार करुन घेऊ नयेत.

१४) चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये कोणत्याही ठिकाणाहून किंवा शासकीय रुग्णालय किंवा नगरपालिका रुग्णांलय इत्यादी मार्फत आलेल्या आर्थिकदृष्टया अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांना खाली दर्शविलेल्या नियमानुसार दाखल करुन घेण्यात यावे.

**१५)** उपरोक्त कलम १४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वापरण्यात येणाऱ्या सरासरी खाटांच्या १०% पर्यंत खाटा अतिदुर्बल रुग्ण वैद्यकीय तपासण्या व उपचारांसाठी दाखल करुन घेण्यात यावेत, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांना चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वापरण्यात येणाऱ्या सरासरी खाटांच्या १०% खाटा पर्यंत रुग्ण वैद्यकीय तपासण्या व उपचारांसाठी दाखल करुन घेण्यात यावे, चॅरिटेबल हॉस्पिटलने रुग्णांची आर्थिक परिस्थिती वैद्यकीय समाजसेवकांमार्फत खालीलपैकी कोणत्याही एका दाखल्यानुसार तपासून घ्यावी :-

१. तहसीलदारांचा दाखला २. रेशन कार्ड/दारिद्रय रेषेखालील कार्ड.

**१६) नियंत्रण कमिटीचे बृहन्मुंबई क्षेत्रीय सभासद खालील प्रमाणे :-**

१. अध्यक्ष, संयुक्त धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई
२. सदस्य - सचिव, संयुक्त संचालक आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई
३. सदस्य - सचिव/नामनियुक्त, हॉस्पिटल असोसिएशन, मुंबई
४. सदस्य - आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

**नियत्रण कमिटीचे जिल्हास्तरीय सभासद खालीलप्रमणे :-**

१. अध्यक्ष, संयुक्त धर्मदाय आयुक्त (प्रादेशिक स्तर) व त्यांनी नियुक्त केलेली व्यक्ती.
२. सदस्य, सचिव सव्हिल सर्जन.
३. सदस्य, आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद
४. सदस्य, जिल्हयातील चॅरिटेबल हॉस्पिटलस्चा प्रतिनिधी.

**१७)** नियंत्रण कमिटीने महिन्यातून एक बैठक घेऊन प्रत्येक चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये योजनेच्या अंमलबजावणी बाबत नियंत्रण करावे. नियंत्रण कमिटीकडे दाखल झाले ल्या रुग्णांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचा अहवाल धर्मदाय आयुक्तांना पाठविण्यात यावा.

**१८)** चॅरिटेबल हॉस्पिटलने कलम ४१ एए च्या नियम व अटींचे उल्लंघन केल्यास बी. पी. टी. ॲटच्या कलम ६६ नुसार पुढील वर्षी दंडात्मक कारवाई करण्याची धर्मदाय आयुक्त राज्यशासनास शिफारस करुन चॅरिटेबल हॉस्पिटलला पी. टी. ए. निधीचा भरणा करण्याची दिलेली सवलत काढून घेण्याची शिफारस करुन सदर निधीच्या चॅरिटेबल हॉस्पिटलकडून भरणा करुन घेऊ शकतात. धर्मदाय आयुक्त सदर हॉस्पिटलला दिलेल्या इतर सवलती व फायदे काढून घेण्याची सुध्दा शासनास विनंती करु शकतात.

**१९)** चॅरिटेबल हॉस्पिटलला योजनेची उध्दिष्टे व जबाबदाऱ्या पार पाडण्यामध्ये काही वैयक्तिक अडचणी येत असल्यास त्यांना योग्य त्या कागदपत्रांच्या आधारे धर्मदाय आयुक्तांकडे दाद मागण्याचे स्वातंत्र्य असून धर्मदाय आयुक्त मदतीबाबत योग्य ते निर्देश/सुधारणा करु शकतात.

**२०)** धर्मदाय आयुक्तांनी बृहन्मुंबई क्षेत्रातील चॅरिटेबल हॉस्पिटलची यादी या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रदर्शित करुन, बृहन्मुंबई क्षेत्रातील सर्वाधिक खपाच्या एका मराठी व एका इंग्रजी वर्तमानपत्रात चॅरिटेबल हॉस्पिटलची यादी प्रसिध्द करावी आणि प्रत्येक जिल्हयातील चॅरीटेबल हॉस्पिटलची यादी संयुक्त धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रदर्शित करुन जिल्हयातील दोन सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्यात यावी.

**२१)** उपरोक्त योजने अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक चॅरिटेबल हॉस्पिटलने ही योजना हॉस्पिटलच्या प्रर्दशनी भागातील नोटीस बोर्डवर प्रदर्शित करावी.

तरी उपरोक्त महत्वाच्या बाबींची पूर्तता करणेकामी अ.नं.२ मधील "श्री साईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटल गरीब व गरजू रुग्णांचा निधी" या नावाचा स्वतंत्र निधी व खाते लेखाशाखेमार्फत उघडून उपरोक्त योजनेची लवकरात लवकर अंमलबजावणी करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे कार्यालयास पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका/मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं. ४०. श्रीसाईनाथ रुग्णालयातील जुने इ.सी.जी. मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१३.** श्रीसाईनाथ रूग्णालयात मे.बी.पी.एल.ली,मुंबई या कंपनीचे एकुण ०९ ई.सी.जी. मशीन आहेत. त्यापैकी एक मशीन ऑटोमॅटीक ६१०८ या प्रकारचे व ०८ मशीन्स मॅन्युअल १०८ प्रकारचे आहेत. ही सर्व मशीन्स सन १९९१ व ९७ साली खरेदी करण्यात आली असून सध्या त्यापैकी ०१ ऑटोमॅटीक ६१०८ मशीन व मॅन्युअल १०८- ०६ नग मशीन्स वापरून वापरून खराब झालेली आहेत सध्या सदरच्या मशीन्सचे बरेचशे स्पेअर पार्ट हे जुने झाल्यामुळे वारंवार बदलावे लागतात.त्यासाठी ०१ ऑटोमॅटीक मशीन ६१०८ व मॅन्युअल १०८-०६ नग मशीन्स कंपनीकडे बायबॅक करून तेवढेच नग नविन मशीन्स खरेदी करण्यात यावे असे मत आहे.

श्रीसाईबाबा रूग्णालयात खरेदी करण्यात आलेल्या नविन ऑटोमॅटीक ८१०८-१ नग मशीनची अंदाजे किंमत रू.८१,७००/-आणि मॅन्युअल डिजी १०८ मशीनची अंदाजे किंमत रू.२२,५००/-इतकी आहे.तसेच श्री साईनाथ रूग्णालयाच्या जुन्या मशीन्सला प्रत्येकी अंदाजे रू.४०००/-इतकी किंमत कंपनीकडुन मिळू शकते.

| अ.क्र. | मशिनचा प्रकार | नग | दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१. | ऑटोमॅटीक ८१०८ | ०१ | ८१,७००/- | ८१,७००/- |
| ०२. | मॅन्युअल डिजी १०८ मशीन | ०६ | २२,०००/- | १,३२,०००/- |
| | | | एकुण किंमत | २,१३,७००/- |
| ०३. | वजा जुने मशिनची अंदाजे किंमत | ०७ | ४००० | -२८,०००/- |
| | | | एकुण किंमत | १,८५,७००/- |

यावरून एकूण ०७ नग मशीन्स बायबॅक करण्याकरीता अंदाजे रू.१,८५,७००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.सदरचे बायबॅक हे मे.बी.पी.एल.लिमीटेड मुंबई व त्यांचे विविध डिलर यांचेकडून कोटेशन मागवून करता येईल.

तरी श्री साईनाथ रूग्णालयातील एकुण ०७ नग इ.सी. जी. मशिन बायबॅक करण्यास व त्यासाठी येणा-या एकुण रू.१,८५,७००/-च्या खर्चास आणि सदरच्या बायबॅकसाठी विविध कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४१ कर्करोग निदान व उपचार शिबीराबाबत.**

**निर्णय क्र.९१४.** श्री साईबाबा हॉस्पिटलचे दिनांक १५ मे २००६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य,मुंबई, यांचे शुभहस्ते उद्घाटन झाल्यानंतर सदर हॉस्पिटलमधील बहुतेक विभाग आता जवळ-जवळ सुरळीत सुरु झाले आहेत. व अजूनही काही नवीन विभाग सुरू करणेचे प्रस्तावित आहे. यातीलच एक Oncology म्हणजेच कर्करोगावरील उपचारांचा विभाग अदयाप सुरू झालेला नाही.

मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी, यांनी दिलेल्या तोंडी आदेशानुसार सदर विभाग मा. डॉ.संजय शर्मा, सुप्रसिध्द कर्करोगतज्ञ, मुंबई, यांचे शुभहस्ते दि.२ डिसेंबर-२००६ रोजी सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे.

सदर उद्घाटनानिमित्त कर्करोगाचे निदान व उपचार याबद्दल दि. २ व ३ डिसेंबर-२००६ रोजी शिबीराचे आयोजन करावयाचे प्रस्तावित केले आहे. पुर्वीच्या अनुभवानुसार सदर कार्यक्रमासाठी सुयोग्य व्यवस्था करण्यात यावी. असे तोंडी आदेशही त्यांनी यावेळी दिलेले आहेत. त्यानुसार काही महत्वाचे बाबी व त्यावर होणारा सर्वसाधारण अंदाजे पुढीलप्रमाणे एकूण रुपये ५,००,०००/-(अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) खर्चअपेक्षित आहे.

०१. निमंत्रण पत्रिका, हँडविल्स्, माहितीपत्रिका,बॅनर्स, इत्यादी छपाई व वितरण जनसंपर्क मॅनेजर व मार्केटिंग मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत करावी लागणार असून त्याकरिता अंदाजे रुपये ४०,०००/-

०२. बाहेरून येणाऱ्या रूग्ण व त्यांचेसोबत आलेल्या नातेवाईकांच्या चहापाणी, भोजनाची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कँटीन विभाग व प्रसादालय विभागामार्फत होणेकामी रुपये १५,०००/-

०३. रूग्ण व नातेवाईक यांचेसाठी शामियाना अथवा मंडप बांधकाम विभागामार्फत तयार करणेकामी रुपये २०,०००/-

०४. ध्वनिक्षेपण व दृक्-श्रवण यंत्र योजनेबाबत व्यवस्था ध्वनीक्षेपण विभाग व ई.डी.पी. मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत करणेकामी रुपये ५५,०००/-

०५. बाहेरून येणाऱ्या तज्ञ डॉक्टर्स व इतर महत्वाच्या व्यक्तींसाठी निवास व खानपाण व्यवस्थेकामी चौकशी कार्यालय तथा जनसंपर्क मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचे मार्फत होणेकामी अंदाजे रुपये ४०,०००/-

०६. पूजा व आदर सत्कार, इतर सजावट, मंदीर विभाग व मार्केटिंग मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल,यांनी करणेकामी अंदाजे रुपये ५,०००/-

०७. इतर महत्वाची औषधे, तपासणीकामी लागणारे साहित्य तथा शस्त्रक्रियेकरिता लागणारी उपकरणे व इतर प्रासंगिक खर्चाकरिता स्टोअर मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल,यांनी करणेकामी, अंदाजे रुपये ३,२५,०००/-

०८. उपरोक्तकामी विविध विभागांना दिनांक ०१.१२.२००६ ते दिनांक ०४.१२.२००६ या काळात आवश्यकतेनुसार ज्यादा कंत्राटी कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणेची जबाबदारी मा.कामगार अधिकारी व एच्.आर. मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचे कडे सोपविणेस व सदरकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास, मान्यता असावी.

०९. उपरोक्तशिवाय इतर महत्वाची कामे संस्थानचे इतर संबंधित विभागांकडून करुन घेणेस तथा याकामी सदर विभागास येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता असावी. सदरची बीले मुदतीत संबंधितांना अदा करणेची जबाबदारी फायनान्स मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत होणे.

तरी उपरोक्तप्रमाणे मोफत कर्करोग शिबीराचे आयोजन करणेस तसेच उपरोक्त दोन दिवसात भरती होणाऱ्या रुग्णांची योग्य ते निदान, औषधोपचार तथा शस्त्रक्रिया टप्प्या-टप्प्याने करणेस (सर्वांना एकाच वेळी सर्व उपरोक्तप्रमाणे सोई पुरविणे अशक्य असल्याने) मान्यता मिळणेस,तथा उपरोक्तप्रमाणे अंदाजे रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष मात्रचे) खर्चास मान्यता मिळणेस्तव, तसेच सस्थानचे इतर संबंधित विभागामार्फत उपरोक्तपैकी आवश्यक ती कामे करुन घेणेस व सदरचा खर्च श्री साईबाबा हॉस्पिटलचे शिबीराचे अंदाजपत्रकीय तरतूदीतून वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं. ४२ स्टेशनरी खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१५.** श्रीसाईबाबा हॉस्पिटल आता जवळ-जवळ सुरळीतपणे सुरू झाले आहे. हॉस्पिटलचे कार्यालयीन कामकाज व्यवस्थित सुरू झाले असून दररोजच्या कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक असलेली स्टेशनरी दि. १९/०८/२००६ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये रू. १,५०,०००/- चे खर्चास मान्यता घेउन खरेदी केली आहे.

उर्वरित खालीलप्रमाणे स्टेशनरी कार्यालयीन कामकाजाकरिता अत्यावश्यक आहे.

| अ.नं. | तपशील | संख्या | अ.नं. | तपशील | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | साधा प्लेन पेपर (टाईपिंग पेपर) | १०० रिम | १३ | स्टॅपलर पिन (५५५) | २० बॉक्स |
| २ | प्लेन पेपर (दस्ता) | ५० रिम | १४ | टाचणी (शार्प पिन) | ५० बॉक्स |
| ३ | झेरॉक्स पेपर (१३x८ १/२) | १०० रिम | १५ | स्टॅपलर पिन रिमुव्हर | १२ नग |
| ४ | झेरॉक्स पेपर (A-४) | ५० रिम | १६ | प्लॅस्टिक ट्रे (जाळीचे) | ५० नग |
| ५ | २ स्कॉयर रजिष्टर | १०० नग. | १७ | गुडनाईट लिक्विडेटर रिफिल (90Nights) | १०० नग |
| ६ | २०० पेजेस वही | १०० नग. | १८ | डिंक बाटली (३०० ml) | ५० नग |
| ७ | पिन कुशन (चुंबकीय) | ५० नग. | १९ | डिंक बाटली (७०० ml) | १० नग |
| ८ | पंचिंग मशिन (सरपंच) | १ नग. | २० | कातर | २० नग |
| ९ | स्टॅपलर (सरपंच) | १ नग. | २१ | व्हाईटनर (पेन) | २० नग |
| १० | स्टॅपलर पिन (सरपंच) | ५ बॉक्स | २२ | हॅन्ड बेल | १० नग |
| ११ | स्टॅपलर पिन (नं.१०) | २० बॉक्स | २३ | स्टील पट्टी | ५० नग |
| १२ | फोल्डर फाईल (प्लॅस्टिक) | १०० नग | २४ | इतर किरकोळ (Misc) (पेन्सिल, पेन, टिस्को टेप, खोडरबर व इतर आवश्यकतेनुसार अंदाजे रु.१५,०००/- खर्च | |

उपरोक्त प्रमाणे स्टेशनरी विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७५,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ४३ तातडीचे स्टेन्ट, बलून व पी.टी.सी.ए.वायर खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९१६.** दि.१५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा रुग्णालय कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदरचे ॲन्जीओप्लास्टी साठी लागणारे स्टेन्ट,बलून व पी.टी.सी.ए.वायर साठी सन २००६-२००७ चे वार्षीक औषधे खरेदी मध्ये मागणी करण्यात आलेली होती. सदर स्टेन्ट,बलून व पी.टी.सी.ए.वायर साठी एकूण १६ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्यामध्ये कुमार ब्रदर्स फार्मा प्रा.लि.,मुंबई यांची देखील निविदा प्राप्त झाली होती. सदर निविदाधारकाचे दरांचे तुलनात्मक दरांचे काम चालू असतांना मे.कुमार ब्रदर्स, मुंबई हे मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांचेशी समक्ष भेटून त्यांना दि.११/०८/२००६ चे पत्रान्वये त्यांच्याकडे असलेल्या कंपनीच्या स्टेन्ट,बलून व पी.टी.सी.ए.वायर बाबत कळविले होते. सदर पत्रावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी सदरचे स्टेन्ट,बलून व पी.टी.सी.ए.वायर ठेवून घेण्यास सांगितले होते. त्यानुसार मे.कुमार ब्रदर्स,मुंबई यांचे काही वरील साहित्य आपणाकडे Consignment Basis वर ठेवून घेण्यात आले होते त्यातील जितके वापरण्यात आले त्याचे बील त्यांनी सादर केले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Kumar Brothers,Mumbai | 24873 | 26/09/2006 | 3744.00 |
| 2 | Kumar Brothers,Mumbai | 24874 | 26/09/2006 | 3744.00 |
| 3 | Kumar Brothers,Mumbai | 24863 | 26/09/2006 | 3744.00 |
| 4 | Kumar Brothers,Mumbai | 24864 | 26/09/2006 | 3744.00 |
| 5 | Kumar Brothers,Mumbai | 24866 | 26/09/2006 | 3744.00 |
| 6 | Kumar Brothers,Mumbai | 24868 | 26/09/2006 | 3744.00 |
| 7 | Kumar Brothers,Mumbai | 24869 | 26/09/2006 | 3744.00 |
| 8 | Kumar Brothers,Mumbai | 24875 | 26/09/2006 | 3744.00 |
| 9 | Kumar Brothers,Mumbai | 24880 | 26/09/2006 | 27000.00 |
| 10 | Kumar Brothers,Mumbai | 24881 | 26/09/2006 | 27000.00 |
| 11 | Kumar Brothers,Mumbai | 24879 | 26/09/2006 | 27000.00 |
| 12 | Kumar Brothers,Mumbai | 24878 | 26/09/2006 | 13312.00 |
| **Total Amt.Rs.** | | | | **1,24,264.00** |

मे.कुमार ब्रदर्स,मुंबई यांना वार्षीक औषधे खरेदी मध्ये Consignment Basis वर स्टेन्ट, बलून पुरवणे बाबत इकडील पत्र क्र.१४११४ दि.१२/१०/२००६ अन्वये देखील कळवण्यात आलेले आहे. त्यांनी पुरवठा केलेले स्टेन्ट, बलूनचे दर हे वार्षीक निविदामधील दराप्रमाणे आहे. तथापी तातडीचे गरज असल्याने उपरोक्त स्टेन्ट,बलून व पी.टी.सी.ए.वायर हे पुरवठा आदेश देण्यापूर्वीचे खरेदी केलेले असल्यामुळे उपरोक्त खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४४ सेन्टीनिल सुचर्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१७.** श्री.साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता सन २००६-०७ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे खरेदी कामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांच्याकडून निविदा मागवण्यात आल्या होत्या. सदरच्या खरेदीमध्ये सुचर्स मटेरीयलचे बाबत मे.बी.ब्रॉन लि.,मुंबई , मे.जॉन्सन ॲन्ड जॉन्सन,मुंबई, सेन्टीनील,मुंबई व हिंदुस्थान लॅटेक्स,मुंबई यांचे दर प्राप्त झालेले आहेत.

दि.२३/०९/२००६ च्या मा.उपसमितीच्या सभेत ठरले प्रमाणे सुचर्स मटेरिअल बाबत मे.हिंदुस्थान लॅटेक्स,मुंबई कंपनीचे सुचर्स प्रायोगिक तत्वावर मागविण्यात येऊन उर्वरीत सुचर्स हे मे.बी.ब्रॉन कंपनीचे घेण्यात यावीत अशी शिफारस करण्यात आली होती. तसेच मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी केंद्रशासनाच्या नवीन धोरणानुसार पुढील महिन्यात औषधांच्या किंमती कमी होणार असल्याने तूर्तास तीन महिने पुरु शकतील इतके औषधांच्या साठ्याची मागणी करावी अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मे.बी ब्रॉन लि.,मुबई यांना मुळ मागणीच्या ९५% व मे.हिंदुस्थान लॅटेक्स,मुंबई यांना ५% सुचर्सची ३ महिन्यासाठी पुरतील इतका पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

परंतु कार्डीयाक सर्जरीसाठी सी.व्ही.टी.एस. विभागाने सेन्टीनील कंपनीच्या सुचर्सची मागणी केली आहे. व त्यास मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सुध्दा त्यावर शिफारस केलेली आहे. त्यामुळे सेन्टीनील कंपनीचे सुचर्स खरेदी करावे लागेल.

कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रियेसाठी सेन्टीनील कंपनीचे २६ प्रकारच्या सुचर्स खरेदी कामी वार्षीक खरेदीमध्ये प्राप्त झालेले कोटेशनच्या तुलनात्मक तक्त्यातील निन्मतम दराप्रमाणे अ.न. ६ व १५

साठी मे.माऊली फार्मा,कोपरगाव यांचे दर निन्मतम असून उर्वरीत सुचर्स साठी मे.सेन्टीनील,मुंबई यांचे दर निन्मतम आहे.

तरी खालीलप्रमाणे सेन्टीनील कंपनीचे सुचर्स निन्मतम दराने खरेदीस व रु.३,४७,६७८,.०५ च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**01.Centenial Surgical Suture Ltd.,Thane**

| S.No. | CODE NO | DESCRIPTION | Dem. Qty. | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | OTM/124 | Vicryl Undyed USP Size 3-0, 26mm, 3/8 Circle Reverse Cutting (CNW2407) | 4 | 1161.0995 | 4644.3980 |
| 2 | CDL/118 | Centicryl, USP Size 2.-0, 30mm, 1/2 Circle Round Bodied, 90cm (CNW-2317) | 5 | 1579.2230 | 7896.1150 |
| 3 | CDL/193 | Centicryl, USP Size 4.-0, 17.5mm, 1/2 Circle Cut Taper Double Armed (CNW-2346) | 5 | 1426.6720 | 7133.3600 |
| 4 | CDL/120 | Centicryl, USP Size 1.-0, 40mm, 1/2 Circle Round Bodied, 90cm (CNW-2347) | 5 | 1579.2230 | 7896.1150 |
| 5 | CDL/121 | Centicryl, USP Size 1, 40mm, 1/2 Circle Round Bodied Heavy, 90cm (CNW 2363) | 5 | 1579.2230 | 7896.1150 |
| 6 | CDL/123 | Centilene, USP Size 7-0, 7.6mm, 3/8 Circle Taper Point Double armed, 60cm (P-8735 H) | 6 | 3031.9725 | 18191.8350 |
| 7 | CDL/125 | Centilene, USP Size 6-0, 13mm, 3/8 Circle Taper Point Double armed, 60cm( P-8726 T) | 8 | 2060.5690 | 16484.5520 |
| 8 | CDL/126 | Centilene, USP Size 5-0, 16mm, 1/2 Circle Taper Point Double armed, 90cm ( P-8556) | 8 | 2107.9930 | 16863.9440 |
| 9 | CDL/128 | Centilene, USP Size 3-0, 26mm, 1/2 Circle Taper Point Double armed, 90cm (P-8522) | 9 | 1621.8970 | 14597.0730 |
| 10 | CDL/128 | Centilene, USP Size 3-0, 26mm, 1/2 Circle Taper Point 75cm (P-8832) | 6 | 917.6525 | 5505.9150 |
| 11 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 17.5mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 90cm (LC - 6977) | 6 | 1648.7725 | 9892.6350 |
| 12 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 17.5mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 90cm (LC - 6987) | 6 | 1648.7725 | 9892.6350 |
| 13 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 26mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 90cm ( LC - 6917) | 6 | 1963.3555 | 11780.1330 |
| 14 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 17.5mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 75cm ( LC 10 B 55) | 3 | 13615.4285 | 40846.2855 |
| 15 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 26mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 75cm ( LC 10 B 77) | 3 | 13615.4285 | 40846.2855 |
| 16 | CDL/135 | Centlon, USP Size 3-0, 26mm, 3/8 Circle Reverse Cutting , 70cm (CNW-3328) | 6 | 470.2880 | 2821.7280 |
| 17 | CLD/136 | Centlon , USP Size 2-0, 45mm, 3/8 Circle Reverse Cutting , 70cm ( CNW-3336) | 6 | 481.3555 | 2888.1330 |
| 18 | CDL/137 | Centisilk , USP Size 3-0, 25mm, 1/2 Circle Round Bodied , 76cm (CNW-5334) | 3 | 345.4010 | 1036.2030 |
| 19 | CDL/118 | Centicryl, USP Size 2-0,40mm, 1/2 Circle Reverse Cutting ( CNW-2364) | 4 | 1704.8890 | 6819.5560 |
| 20 | CDL/212 | 6 Steel Wire Cutting (CM - 654 G) | 3 | 7327.0080 | 21981.0240 |
| 21 | CDL/212 | 6 Steel Wire Blunt 44mm 45cm (CM - 649 G) | 3 | 7327.0080 | 21981.0240 |
| 22 | CDL/213 | 2 Steel Wire Cutting ( CM - 650 G) | 2 | 7327.0080 | 14654.0160 |
| 23 | CDL/207 | 5 Steel Wire Blunt ( CM - 651 G) | 2 | 7327.0080 | 14654.0160 |
| 24 | CDL/208 | 4 Steel Wire ( M6549) (CM - 644 G) | 2 | 4080.8295 | 8161.6590 |

**02.Mauli Pharma, Kopargaon**

| S.No. | CODE NO | DESCRIPTION | Dem. Qty. | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | CDL/123 | Centilene, USP Size 7-0, 8mm, 3/8 Circle Taper Point Double armed, 60cm( M-2078) | 9 | 2253.4000 | 20280.6000 |
| 2 | CDL/129 | Centibond, USP Size 2-0, 26mm, 1/2 Circle Cutting end Taper Double armed, 90cm (LC - 6937) | 6 | 2005.4500 | 12032.7000 |
| | | | | **Total Amount in Rs.-** | 347678.0550 |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४५ इलेक्ट्रीक पॉवर ड्रील मशिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१८.** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागामध्ये ऑर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी १ नग पॉवर ड्रिल मशिनची आवश्यकता आहे. यापुवी सन २००४ मध्ये मे. श्री ऑर्थो टुल्स मार्केटींग, पुणे यांचेकडून रु. ६५,०००/- इतक्या किंमतीत ०१ नग इलेक्ट्रीक पॉवर डिल मशिन खरेदी करण्यात आले होते. सध्या

असलेले मशिन हे व्यवस्थित काम देत नसल्यामुळे ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे दि. २८/१०/२००६ चे डि.पी. अन्वये सदर ०१ नग मशिनची मागणी केलेली आहे. सदर मशिनसाठी अंदाजे रु. १,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी इलेक्ट्रीक पॉवर ड्रिल मशिन कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४६ श्रीसाईबाबा हॉस्पिटल करिता १० ड्रॉवरचे मॉरच्यूरी कॅबिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१९.** श्री साईबाबा हॉस्पिटल आता सुरळीतपणे सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग जवळ - जवळ पूर्णपणे सुरू झालेले आहेत.

सदर हॉस्पिटलमध्ये दाखल होणारे रूग्ण हे बहुदा हृदय, किडणी किंवा इतर अशाच महत्वाचे आजाराने ग्रस्त किंवा पिडीत असतात. अशा रूग्णांना ट्रीटमेंट चालू असताना मेडीकल सायन्सच्या उपचार पध्दतीस काही अत्यवस्थ रूग्ण दाद देत नाहीत. अशा रूग्णांचे निधन झाल्यास नियमानुसार मृतदेह संबधितांचे नातेवाईकांस अर्ध्या तासाचे आत देणे आवश्यक असते. किंवा सदरचा मृतदेह शवागारात तरी ठेवावा लागतो.

तथापि, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अजून शवागाराची सुविधा उपलब्ध नसल्याने असे मृतदेह सध्या श्री साईनाथ रूग्णालयामधील मॉरच्युरी (शवागारात) ठेवावे लागतात. याकामी साईनाथ रूग्णालयामध्ये असे मृतदेह ठेवणेकामी परवानगी घेणे, मृतदेह तेथे नेणे, ठेवणे यामध्ये बराच वेळ जातो. त्यामुळे काही अडचणींमुळे प्रेत त्वरीत नेता न येणाऱ्या नातेवाईक आधीच दुःखी असूनही उपरोक्तकामी बराच वेळ जातो, प्रसंगी अशा दिरंगाईचे नाराजीने सदर रूग्णासोबत असलेल्या नातेवाईकांचे स्टाफशी वादविवादही होतात. तसेच यात अधिक कालावधी लोटल्यास प्रसंगी मृतदेह फुगण्याच्या धोक्याची शक्यताही नाकारता येत नाही.

उपरोक्त गैरसोय दूर होणेचे दृष्टीने श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये श्रीसाईनाथ रूग्णालयाप्रमाणेच मात्र दहा ड्रॉवरचे मॉरच्युरी कॅबिन (रूग्णालयाचा भविष्यकालीन विस्तार पाहता आवश्यकता असल्याने) खरेदी करणेस व सदर खरेदीकामी अंदाजे रू. १५,००,००० पर्यंत (अक्षरी रू. पंधरा लाख मात्र) खर्चास व बांधकाम तथा विद्युत विभागांमार्फत जागेची समक्ष पाहणी होऊन श्री साईनाथ रूग्णालयाप्रमाणेच सदर कॅबिनची उभारणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभागप्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

**विषय न. ४७ वैद्यकीय बीलात सवलत मिळणेबाबत. श्री.आंबादास दगडूजी अमृतवाड,संगमनेर, श्री.सुर्यभान बाबुराव कहांडळ, सहजानंदनगर, श्री.निसार इस्माईल कत्तार,कोपरगाव यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.९२०.** वैद्यकीय बीलात सवलत मिळणेबाबत खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

**अ)** श्री. अंबादास दगडूजी अमृतवाड, रा. संगमनेर, जि. अहमदनगर, यांनी त्यांचे अर्जान्व्ये ते किडनीच्या विकाराने पिडीत असून त्यांना डायलेसीस उपचार करावे लागते, त्यासाठी प्रत्येक वेळेस अंदाजे रु.१२००/- इतका खर्च येतो.

मा.श्री. बाळासाहेब थोरात सो. यांनी दि. १०/०९/२००६ रोजीचे शिफारस पत्रान्वये श्री. अमृतवाड यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने, श्री. अमृतवाड यांना दवाखाना खर्चासाठी योग्य ते सहकार्य करावे अशी शिफारस केली आहे.

किडणीचे आजारावरील रुग्णाला आठ दिवसातून २/३ वेळेस रुग्ण हयात असे पर्यंत डायलेसीस करावे लागते त्यासाठी प्रत्येक वेळेस अंदाजे रु.१२००/- इतका खर्च येतो, परंतू डायलेसीससाठी लागणारे साहित्य उदा. डायलाझर, टयुब हे नविन डायलेसीस मशीनसोबत मोफत मिळाल्याने रुग्णांना बिल आकारण्यात येत नाही, तरी सुदधा एक वेळ डायलेसीस करण्याचा खर्च अंदाजे रु. ६००/- खर्च अपेक्षित आहे.

श्री.अमृतवाड यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने त्यांच्यावर घरातील सगळी जबाबदारी एकटयावर असून शिवाय त्यांना तीन विवाहयोग्य मुलींची जबाबदारी त्यांच्यावर असल्याने त्यांनी डायलेसीस खर्चासाठी काही सवलत मिळणेची विनंती केली आहे, तसेच त्यांच्या विनंती अर्जावर दि. ३/१०/२००६ रोजी मा. विश्वस्त श्री. खांबेकर यांनी रुग्णाला नाममात्र दराने मदत करावी अशी शिफारस केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला त्यांचे वार्षिक उत्पन्न १९,०००/- आहे असा तहसिलदार संगमनेर यांनी दाखला दिला आहे, रहिवाशी दाखला (तलाठी कार्यालय संगमनेर) व रेशन कार्ड झेरॉक्स सोबत जोडली आहे, रुग्ण बी.पी.एल. (दारिद्रय रेषेचे) रेशनकार्ड धारक नाही.

ब) श्री. सुर्यभान बाबुराव कहांडळ रा. गोदावरी दुध संघ कॉलनी, सहजानंदनगर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, यांनी त्यांचे अर्जान्वये ते हृदय विकाराने पिडीत असून त्यांची हृदय शस्त्रक्रिया (C.A.D) करणेकामी हॉस्पिटलचे डॉ. विजय नरोडे यांनी रु. ५१,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याचा दाखला दिलेला आहे.

श्री.कहांडळ यांनी रु.१०,०००/- भरण्यास तयार असून याची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामुळे त्यांनी त्यांच्या उर्वरीत होणा-या वैद्यकीय बिलात सवलत मिळावी अशी विंनती केली आहे.

मा.श्री.अशोक काळे यांचे शिफारस पत्रान्वये श्री. कहांडळ यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्यामुळे त्यांच्या होणा-या वैद्यकीय बिलात जास्तीत जास्त सवलत दयावी अशी शिफारस केली आहे.

मा.विश्वस्त श्री सुरेश वाबळे यांचे शिफारस पत्रान्वये श्री. कहांडळ हे हृदय विकाराने आजारी असून त्यांची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे तसेच ते अल्प उत्पन्न गटातील असून त्यांची हृदयशस्त्रक्रिया व पुढील उपचार मोफत करणेस शिफारस केली आहे.

श्री.कहांडळ यांनी अर्जासोबत २००५-२००६ चा तहसिलदार सिन्नर, यांचा वार्षिक उत्पन्न रु.१८०००/- असल्याचा उत्पन्नाचा दाखला, तलाठी कहांडवाडी, ता. सिन्नर, यांचा रहिवाशी दाखला, प्रतिज्ञा पत्र, रेशन कार्ड झेरॉक्स जोडलेले आहेत.

श्री.कहांडळ हे रु. १०,०००/- भरण्यास तयार असून उर्वरित बील रु. ४१,०००/- माफ करणेबाबत योग्य तो मर्जीनुरुप आदेश होणेस विनंती.

क) श्री. निसार ईस्माइल अत्तार, यांनी त्यांचे अर्जान्वये ते किडनीच्या विकाराने पिडीत असून त्यांना डायलेसीस उपचार करावे लागते, त्यासाठी प्रत्येक वेळेस अंदाजे रु.१२००/- इतका खर्च येतो, श्री. आत्तार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने त्यांची खर्च करण्याची परिस्थिती नाही अशी विनंती केली आहे.

मा.विश्वस्त अशोक खांबेकर यांनी दि. २१/०९/२०६ व ५/१०/२००६ श्री. अत्तार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने, व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गरीब रुग्णांना उपचार पूर्णतः मोफत देण्याच्या योजने अंतर्गत श्री. आत्तार यांचे वरील उपचार मोफत करण्याची शिफारस केली आहे.

मा. श्री. उपाध्यक्ष कोल्हे सो. यांनी श्री. अत्तार यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने मोफत औषध उपचार करावा अशी शिफारस केलेली आहे.

किडणीचे आजारावरील रुग्णाला आठ दिवसातून २/३ वेळेस रुग्ण हयात असे पर्यंत डायलेसीस करावे लागते त्यासाठी प्रत्येक वेळेस अंदाजे रु.१२००/- इतका खर्च येतो, परंतू डायलेसीससाठी लागणारे साहित्य उदा. डायलाझर, टयुब हे नविन डायलेसीस मशीनसोबत मोफत मिळाल्याने रुग्णांना बिल आकारण्यात येत नाही तरी सुदधा एक वेळ डायलेसीस करण्याचा खर्च अंदाजे रु. ६००/- खर्च अपेक्षित आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला त्यांचे वार्षिक उत्पन्न २४,०००/- आहे असा तहसिलदार कोपरगांव यांनी दाखला दिला आहे, व रेशन कार्ड झेरॉक्स सोबत जोडली आहे, रुग्ण बी.पी.एल. (दारीद्रय रेषेचे) रेशनकार्ड धारक आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त "अ" व "क" याचे एक डायलेसिस मोफत करुन द्यावे तसेच "ब" यांचे नियमानुसार कागदपत्रे तपासून बिलात सवलत देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४८ फोर सिटर बेंच खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.९२१.** श्रीसाईबाबा हॉस्पिटल कार्यान्वीत होऊन कार्डीयाक, प्लास्टीक सर्जरी, आर्थोपेडीक, ऑपथाल्मिक, डेन्टल, इत्यादी ओ.पी.डी. विभाग कार्यान्वीत करण्यात आले आहे. सदर ओ.पी.डी. विभागामध्ये पेशन्टची संख्या दिवसेंदिवस वाढत असून पेशन्टला तसेच पेशन्टच्या बरोबर येणाऱ्या नातेवाईकांना डॉक्टर केबीन बाहेर बसण्यासाठी लागणारे बाकडे उपलब्ध नाही. ३० नग फोर सिटर बेंच मे.खिरा स्टिल वर्क्स प्रा.लि.,अहमदाबाद यांचेकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस याकामी अंदाजे रु.२,४३,०००/- चा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,चांगल्या प्रतिच्या लोखंडी जाळीचे फोर सिटर बेंचेस खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं. ४९ श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता तीन ऑपरेशन थिएटरचे कामाबाबत.**

**निर्णय क्र.९२२.** श्रीसाईबाबा रुग्णालयात खालील प्रमाणे तीन नवीन ऑपरेशन थिएटर तयार करावयाचे आहे.

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| ०१ | न्यूरो सर्जरी ऑपरेशन थिएटर |
| ०२ | प्लास्टिक सर्जरीचे ऑपरेशन थिएटर |
| ०३ | इ.एन.टी.सर्जरी ऑपरेशन थिएटर |

उपरोक्त पैकी दोन ऑपरेशन थिएटर हे सेमी प्रायव्हेट वॉर्डच्या पूर्वेकडील भागात व एक ऑपरेशन थिएटर हे आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर समोर तयार करावयाचे आहे. या ऑपरेशन थिएटरसाठी करावयाचे काम संस्थानचे बांधकाम विभागाकडून चालू आहे. सदर ऑपरेशन थिएटरमध्ये सध्याचे ऑपरेशन थिएटर प्रमाणे सुविधा कराव्या लागणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सेंट्रल एअर कंडीशनींग, फॉल सिलींग, थर्मल एन्सुलेशन, इलेक्ट्रीकल केबलींग, वॉल पेंटींग इत्यादी कामे करावी

लागणार आहे. यापुर्वी सध्याच्या ऑपरेशन थिएटरमध्ये वरील कामे मे.एअर बॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांनी केलेली आहे.

त्यानुसार मे.एअर बॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांनी त्यांचे दि.१०.११.२००६ चे पत्रान्वये सविस्तर प्रस्ताव पाठविला आहे. त्यामध्ये वरील कामासाठी त्यांनी एकुण रु.२८,३७,७६७/- इतका खर्च सर्व करासह कळविला आहे. परंतू त्याचे परिशिष्ट २ व ३ ची बेरीज करता सदरची रक्कम ही रु.२५,४४,४६२/- इतकीच होते व त्याबाबत त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केलेली आहे व ती त्यांनी मान्य केलेली आहे. त्यांनी सदरचे रकमेपैकी ४०% रक्कम मटेरियल प्राप्त झालेनंतर, १०% रक्कम सिस्टीम उभी राहील्यानंतर १०% रक्कम सिस्टीम व्यवस्थीत चालू झालेवर मागणी केली आहे. तसेच उपरोक्त नियोजीत ऑपरेशन थिएटर्ससाठी सध्याचे बांधकामात काही फेरबदल करावे लागतील. त्यासाठीचे सिव्हील वर्ककरीता अंदाजे रु. ९३,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. असा दोन्ही मिळून अंदाजे रु.२६,३७,४६२/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या प्लॅस्टिक सर्जरी व न्यूरो सर्जरी हे दोन ऑपरेशन थिएटर्स सुरु करण्यात यावेत व मे.एअर बॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांचेकडून दोन ऑपरेशन थिएटर्स मध्ये करावयाचे कामासाठी लागणारे फेर दर मागविण्यात येऊन, त्यानुसार कार्यादेश देण्यात यावा, असें, ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ५० इंजेक्शन Boxter खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.९२३.** श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपास शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना इंजेक्शन Boxter ची आवश्यकता असते. सदरचे इंजेक्शन हे Antibiotic असुन त्याचा वापर बऱ्याच रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर आवश्यक असते. सदरचे इंजेक्शन हे डॉ.अभय वालीया हे वापरत असुन त्याची मागणी रुग्णालयातील इन्टेसेव्हिस्ट डॉ.विजय एस.नरोडे यांनी केली आहे. सदरची इंजेक्शन हे एक महिन्यासाठी साधारणतः ५० व्हायल लागतील. एका इंजेक्शनची अंदाजे किंमत रु.४१५/- प्रती व्हायल इतकी असुन ५०० व्हायल खरेदीकामी अंदाजे रु.२०७५००/- इतका खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये बायपास शस्त्रक्रिया झालेनंतर रुग्णांना देण्यात येणारे ५०० व्हायल Boxter इंजेक्शन कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणार अंदाजे रक्कम रुपये रु.२०७५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ५१ सन २००७ करिता लागणारे छपाईकामी तत्वतः मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र.९२४.** सन २००७ मध्ये संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक छापील स्टेशनरीकामी विभागांकडून माहिती मागविणेत आलेली होती. त्यानुसार विभागवार छपाई करावयाचे जनरल व प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | जनरल स्टेशनरी छपाई खर्च रुपये | प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरी छपाई खर्च रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासन शाखा | १५०००० | १७५००० | ३२५००० |
| २ | जनसंपर्क कार्यालय | १००००० | --- | १००००० |
| ३ | लेखाशाखा | १०७००० | ५०५००० | ६१२००० |
| ४ | चौकशी विभाग | ५७००० | ६०००० | ११७००० |
| ५ | भक्तनिवासस्थान विभाग | ११७००० | १५००० | १३२००० |
| ६ | धर्मशाळा विभाग | ३७२०० | --- | ३७२०० |
| ७ | आय.टी. विभाग | १६००० | --- | १६००० |
| ८ | पाणीपुरवठा विभाग | ५९०० | --- | ५९०० |
| ९ | ध्वनीक्षेपण विभाग | ४८०० | --- | ४८०० |
| १० | प्रकाशने विभाग | ३५०० | --- | ३५०० |
| ११ | खरेदी विभाग | ८००० | --- | ८००० |
| १२ | प्रसादालय विभाग | ६०००० | १५०००० | २१०००० |
| १३ | कॅन्टीन विभाग | ५५८३०० | --- | ५५८३०० |
| १४ | कामगार विभाग | ५००० | --- | ५००० |
| १५ | कन्या विद्या मंदिर | १५७५०० | --- | १५७५०० |
| १६ | इंग्लिश मिडीयम स्कुल | ८५१०० | --- | ८५१०० |
| १७ | आयटीआय | १७२००० | --- | १७२००० |
| १८ | वाहन विभाग | १५००० | --- | १५००० |
| १९ | स्वच्छता विभाग | ३००० | --- | ३००० |
| २० | बगीचा विभाग | ३७०० | --- | ३७०० |
| २१ | रुग्णालय विभाग | ४४५००० | --- | ४४५००० |
| २२ | जनरल छपाई | १५०००० | --- | १५०००० |

| | | २२६१००० | ९०५००० | ३१६६००० |
|---|---|---|---|---|

उपरोक्त खर्च हा अदांजे नमूद केला असून त्यात कागदाचे वाढलेले दर व व्हॅट टॅक्सचा विचार करणेत आलेला आहे. वरीलप्रमाणे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

**विषय नं. ५२ पुस्तके/फोटो छपाई व ऑडिओ कॅसेट सी.डी /व्ही.सी.डी निर्मिती करणे बाबत.**

**निर्णय क्र.९२५.** खाली दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो छपाई व ऑडिओ कॅसेट/सी.डी/व्हीसीडी यांचा साठा भांडार विभागात सध्या स्थितीत अल्प प्रमाणात साधारणत: २ ते ६ महिने पुरेल एवढाच शिल्लक असल्याने सदरचे पुस्तके/ फोटो छपाई करून घेणेस व ऑडिओ कॅसेट/सी.डी. तसेच व्हीसीडी निर्मिती करणे आवश्यक असल्याने तत्संबंधीत तपशिल खाली "अ", "ब" व "क" प्रमाणे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई सच्चरित्र | हिंदी | ०६.०२.२००२ | १७.६० | १,००,००० | २१.०० | २१,००,०००/- |
| ०२ | साईसत्चरित्र | कन्नड | ३०.१२.२००५ | १८.०० | २५,००० | २१.०० | ५,२५,०००/- |
| ०३ | साईसत्चरित्र | तेलगू | ३०.१२.२००५ | २१.०० | १,५०,००० | २३.०० | ३४,५०,०००/- |
| ०४ | साईसत्चरित्र | तामिळ | ३०.१२.२००५ | ३२.०० | २०,००० | ३५.०० | ७,००,०००/- |
| ०५ | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | ०९.०१.२००६ | १.७० | १,२५,००० | ०२.०० | २,५०,०००/- |
| ०६ | श्री साई स्तवन मंजरी व श्री साई सुमनांजली | मराठी | ३०.०३.२००६ | १.५५ | २०,००० | ०१.७५ | ३५,०००/- |
| ०७ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | ०९.०६.२००४ | १.८० | ५,००० | ०१.९० | ९,५००/- |
| ०८ | श्री साई रुद्राध्याय (सच्चरित ११ अध्याय) | मराठी | ०९.०१.२००६ | १.८५ | १०,००० | ०१.९० | १९,०००/- |
| ०९ | श्री सतचरित्र (ओवी टु ओवी) | तेलगू | १६.११.२००५ | ५९.८२ | ५,००० | ६५.०० | ३,२५,०००/- |
| १० | चिल्ड्रेन्स श्री साईबाबा (मेहता) | इंग्रजी | ३१.०५.२००६ | ६४.०० | ५,००० | ७०.०० | ३,५०,०००/- |
| ११ | श्री मातृसाई | तेलगू | ३१.०८.२००६ | १९.८० | २०,००० | २१.०० | ४,२०,०००/- |
| १२ | श्री साईंचे सत्य चरित्र | तेलगू | प्रथम आवृत्ती | -- | ५,००० | ६०.०० | ३,००,०००/- |
| १३ | एक फकिर की पाठशाला (विकास मेहता) | हिंदी | प्रथम आवृत्ती | -- | ५,००० | ७०.०० | ३,५०,०००/- |
| | | | | | | **एकूण रु.** | **८८,३३,५००/-** |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात | १४"x २०" | ०९.०१.२००६ | ०१.९९ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०२ | दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात | ४" x ६" | ०६.०२.२००२ | ००.२९ | १,००,००० | ०.५० | ५०,०००/- |
| ०३ | द्वारकामाईत कानाला हात लावून बसलेले बाबा फोटो ४ रंगात | १०" x १४" | ०८.०६.२००४ | ०१.२३ | १,००,००० | ०१.४० | १,४०,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | १०" x १४" | २९.०४.२००६ | ०१.२० | १,००,००० | ०१.४० | १,४०,०००/- |
| | | | | | | **एकूण रूपये** | **५,३०,०००/-** |

**क) ऑडिओ कॅसेट/सी.डी. व व्हीडीओ निर्मिती तपशिल.**

| अ.नं | निर्मिती तपशिल | मागिल निर्मिती केल्याची तारीख | मागिल निर्मिती दर | निर्मिती संख्या | निर्मिती दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा आरती ऑडिओ कॅसेट (४ कॅसेट संच) | १३.०५.२००५ | ३९.७६ | ५,००० संच | ४४.०० | २,२०,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सी.डी. | १३.०५.२००५ | २२.७२ | ५,००० संच | २५.०० | १,२५,०००/- |
| ०३ | शिर्डी दर्शन व्हीसीडी | ०१.०५.२००६ | १७.०० | २५,००० नग | २०.०० | ५,००,०००/- |
| | | | | | **एकूण रु.** | **८,४५,०००/-** |

उपरोक्त "अ ", "ब" व "क" नुसार

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | "अ " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण १२ पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च | ८८,३३,५००/- |
| ०२ | "ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ४ प्रकारचे फोटो छपाई कामी अपेक्षित खर्च | ५,३०,०००/- |
| ०३ | "क " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ३ ऑडिओ कॅसेट/सी.डी. निर्मितीकामी अपेक्षित खर्च | ८,४५,०००/- |
| | एकूण रूपये - | १०२,०८,५००/- |

वरील तपशिलाप्रमाणे "अ ", "ब" व "क" मिळूण अंदाजे रूपये - १०२,०८,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी, दोन लाख, आठ हजार, पाचशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २००६-२००७ मंजूर बजेट तरतूद रूपये-१५०,००,०००/- मधून व ऑडिओ कॅसेट/सी.डी. निर्मितीकामी मंजूर बजेट तरतूद रूपये-३०,००,०००/- मधून करता येईल.

तरी वरील "अ ", "ब" यात दर्शविलेप्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई ही मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार १८ प्रेसधारक व मा.व्यवस्थापन समितीचे

दि.०५.११.२००५चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.६७८ नुसार ११ प्रेसधारक असे एकूण २९ निवडक प्रेसधारकांकडून पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस व ऑडिओ कॅसेट/ सी.डी. निर्मितीसाठी मुंबई येथील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून कोटेशन्स मागविणेस तसेच याकामी अंदाजे एकूण रूपये १०२,०८,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी, दोन लाख, आठ हजार, पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं. ५३ लाडू पॅकिंग पिशवीवरील श्रीसाईबाबांचे नाव, मंदीर कळसाचे छायाचित्र न छापणेबाबत आलेल्या तक्रारीवर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.९२६.** श्रीसाईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या साईभक्तांना संस्थानमध्ये तयार केलेला प्रसाद घरी घेउन जाता यावा अथवा जागेवरच खाणेसाठी सुमारे १५-१६ वर्षापासून मोतीचूर लाडू तयार करुन विक्री करण्यात येत आहे. सदर लाडूची पॅकींग सुरवातीपासून प्लेन प्लास्टीक पिशवीमध्ये करण्यात येत होती.

माहे डिसेंबर २००४ मध्ये झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१७६ नुसार, श्री सिध्दीविनायक गणपती न्यास, प्रभादेवी., मुंबई यांचे प्रमाणेच आकर्षक रंगीत, हवाबंद पिशवीमध्येलाडूचे पॅकींग करुन विक्री करण्यास सुरुवात केलेली आहे. लाडूचे पॅकेट आकर्षक दिसण्यासाठी प्लास्टीक पिशवीवर श्री साईंचे मंदीर कळसाचे छायाचित्र, श्रध्दा, सबुरी, श्री साईबाबा संस्थान, सबका मालिक एक असा मजकूर छापण्यात आलेला आहे. असे पॅकेटस् तयार करुन मोतीचूर लाडूची विक्री करण्यात येत आहे.

नविन प्रिंटेड पिशवी पॅकींगबाबत खालीलप्रमाणे साईभक्तांच्या प्रतिक्रीया आलेल्या आहेत.

| अ.नं. | साईभक्ताचे नाव | गांव | पत्राची तारीख | पत्राचा आशय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री राघवेंद्र दास | अयोध्या | ०९/५/०५ | मंदीर कळसाचे छायाचित्र व श्री साईबाबा संस्थान हे नाव असू नये |
| २. | श्री मज्जीदखान पिरखा पठाण | शिर्डी | १६/५/०५ | -----------------"--------------- |
| ३. | श्री सुरेश राजाराम आंजर्लेकर | मुंबई | ०५/६/०५ | -----------------"--------------- |
| ४. | श्री विक्रांत शिंदे | मुंबई | ३०/०६/०५ | -----------------"--------------- (दि.३०/६/०५ चे दैनिक लोकमत मधील वृत्त) |
| ५. | श्री रमेश भाउसाो. गोंदकर | शिर्डी | २६/७/०५ | मंदीर कळसाचे छायाचित्र न छापणेबाबत. |
| ६. | श्री ज्ञानेश्वर विठ्ठल बोराडे | पुणे | २७/८/०६ | -----------------"--------------- |
| ७. | श्री मनोज चव्हाण | अ.नगर | १२/२/०६ | -----------------"--------------- (दि.१०/२/०६ चे दैनिक गांवकरी मधील वृत्त) |
| ८. | श्री ऋषीकेश अनंत परब दि.२९/४/०६ चे इ.मेल द्वारे | मुंबई | २९/४/०६ | कळसाचे छायाचित्र काढून टाकणेबाबत. |
| ९. | श्री ऋषीकेश अनंत परब दि.१७/१०/०६रोजी मिळालेले पत्र | मुंबई | १७/६/०६ | -----------------"--------------- |

उपरोक्तप्रमाणे साईभक्तांच्या लेखी तक्रारी आलेल्या आहेत. यापुढेही आणखी तक्रारी येत राहतील. वरीलप्रमाणे तक्रारीनुसार असे दिसून येते की, लाडू पॅकेटवर श्रीं चे कळसाचे छायाचित्र असल्याने लाडू प्रसाद खाउन झाल्यानंतर सदर पॅकेट पायंदळी येते, कचऱ्याचे डब्यात पडते. त्यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जातात.

श्रीसाईबाबांवर साईभक्तांची अतिशय श्रध्दा आहे. त्यामुळे साईभक्तांनी व्यक्त केलेल्या भावनांचा आदर करणे संस्थानचे कर्तव्य आहे. तथापि या संदर्भात दुसरी बाजूही विचारात घेणे आवश्यक वाटते ती अशी की, लग्नयपत्रिका, अगरबत्ती पॅकेट, उदघाटन, भुमिपूजन वगैरे कार्यक्रम पत्रिका इत्यादिवर तसेच वृत्तपत्रामध्ये देवस्थानच्या कार्यक्रमाचे वेळी, माहीती, जाहिराती, जाहिर निवीदा, वाढदिवसाच्या जाहिराती देताना विविध देवा-देवतांची छायाचित्रे छापलेली असतात. अशाप्रकारे देवा-देवतांचे (श्री साईबाबांचे सुध्दा) छायाचित्र असलेले पेपर्स रस्त्यावर, इतरत्र पडलेले आढळतात.

याशिवाय श्रीसिध्दीविनायक गणपती न्यास मुंबई, तिरुपती तिरुमला देवस्थान तिरुपती तसेच इतर देवस्थानचे प्रसाद पाकीटांवर, प्लास्टीक पिशवीवर त्या-त्या देवतांची छायाचित्रे छापलेली असतात. ही वस्तुस्थिती आहे. तथापि त्याबात भक्तांनी योग्य अयोग्य ते बाबत काही प्रतिक्रीया केल्याचे आढळत नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मोतीचूर लाडू प्रसाद पाकीटावरील मंदीर कळसाचे छायाचित्र वगळण्यात यावे व उर्वरित मजकूर कायम ठेवून छपाई करणेत यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी/कॅन्टीन विभाग प्रमुख/अधिक्षक,प्रसादालय)

**विषयनं. ५४ नाताळचे सुटीचे कालावधीत साईभक्तांच्या अतिरिक्त गर्दीचे निवास व्यवस्था करणेसाठी कापडी मंडप टाकणेबाबत.**

**निर्णय क्र.९२७.** सध्या सुमारे १०,००० साईभक्तांची निवासव्यवस्था होईल एवढीच व्यवस्था संस्थानकडे आहे. नाताळ सुट्टयांचे कालावधीत शिर्डी येथे साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी संस्थानकडे असलेली निवासव्यवस्था अपुरी आहे. वाढीव सुविधा म्हणून श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिर्डी संस्थानचे शैक्षणिक संकुल व कर्मचाऱ्यांचे रिक्त असलेली निवासस्थाने या ठिकाणी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येईल. हि व्यवस्था करुनही ती अपुरीच पडण्याची शक्यता असल्याने दि.२४.१२.२००६ ते दि.०२.०१.२००७ या कालावधीत भाडोत्री शामीयाना कापडी मंडप जमिनीवरील बिछायती व पार्टीशियन (कनाती) सह जेथे गाद्या उपलब्ध नाही तेथे गाद्यांसह मंडप उभारणी करुन अतिरिक्त गर्दीची निवासव्यवस्था खालील ठिकाणी दर्शविलेले मोजमापाचे मंडपात करण्यात येऊ शकते.

| **ठिकाण व तपशिल** | | **अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रुपये** |
|---|---|---|
| साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | | |
| १. साईबाबा भक्तनिवासस्थान परीसर | ४५' x ३००' - ५०० गाद्यांसह | १,५०,०००/- |
| २. शैक्षणिक संकुल क्रिडांगण | ६०' x ९०' - २०० गाद्यांसह | ५०,०००/- |
| धर्मशाळा विभाग | | |
| ०१. धर्मशाळा इमारत परिसर | १००' x १००' | ९०,०००/- |
| **चौकशी व निवासस्थान विभाग** | | |
| १. श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय | १००' x ६०' | ५४,०००/- |
| २. कार्यालय परीसर | ५०' x २०' | ९,०००/- |
| ३. कार पार्किंग | १००' x ६०' | ५४,०००/- |
| ४. कार पार्किंग | १००' x ४०' | ३६,०००/- |
| प्रसादालय विभाग | | |
| प्रसादालय परीसर | ४०' x ३०', ४०' x ३०' | २२,०००/- |
| | १२५' x ३०' | ३५,०००/- |
| | ५०' x ५०' | २५,०००/- |
| | ६०' x ८०' | ४५,०००/- |
| | एकूण- | ५,७०,०००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे नाताळ गर्दीचे कालावधीत व नवीन वर्षारंभी दि.२४.१२.२००६ ते दि.०२.०१.२००७ या कालावधीत शामियाना कापडी मंडप उभारणी करणेस व त्याकामी येणारे रु. ५,७०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता .

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तप्रमाणे तसेच शैक्षणिक संकुल ग्राऊंड भक्तनिवासस्थान पार्किग,इंग्लीश मिडीयम स्कूल व कन्या विद्यामंदिर समोरील लॉन, साईनगर समोरील पटांगण साईनाथ हायस्कूल, धर्मशाळा समोरील लॉन,साईउद्यान इमारत, श्री.लोढा यांचेकडून खरेदी केलेली जागा, इत्यादी ठिकाणी उपलब्ध जागेवर मान्य दराने आवश्यकतेनुसार जादा मंडप व्यवस्था करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी निवासस्थान/अधिक्षक,भक्तनिवासस्थान/अधिक्षक,प्रसादालय/धर्मशाळा प्रमुख)

**विषय नं. ५५ श्रीसाई भक्तांना मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हेल्पलाईन सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.९२८.** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, Siemens Hipath ४३००IP ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा माहे ऑगस्ट, २००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अंतर्गत दूरध्वनीचे वापरासाठी बीएसएनएल यांचेकडून PRI Line घेण्यात आलेली असून या PRI Line मधून एकाच वेळी ३० कॉल्स देवाण-घेवाण होऊ शकते. तसेच संस्थानला बाहेरुन येणारे कॉल्सही त्वरीत मिळतात.

श्री साईभक्तांना श्रीबाबांविषयी, मंदिरातील कार्यक्रमांविषयी तसेच भक्तांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांविषयी माहिती हवी असते. अशी माहिती त्यांना त्वरीत प्राप्त होण्यासाठी स्वतंत्र नंबरव्दारे (०२४२३) २५८९९९ हेल्पलाईन सुविधा उपलब्ध व्हावी, असे मत आहे. या सुविधेमध्ये IVRS चा वापर

करुन विविध सुविधा इंग्रजी, हिंदी, मराठी व तेलगु अशा चार भाषांमध्ये रेकॉर्ड करुन या नंबरवर त्या उपलब्ध करुन देता येतील. याचे थोडक्यात वर्णन पुढीलप्रमाणे-

**अ) IVRS व्दारे भक्तांना हेल्पलाईन सुरु करणे-** श्री साईभक्तांना हवी असणारी विविध माहिती संस्थानच्या हेल्पलाईन नंबरवर (०२४२३) २५८९९९ चार भाषांमध्ये (इंग्रजी, हिंदी, मराठी व तेलगु) नऊ विभागात रेकॉर्ड करुन, ती भक्तांना उपलब्ध करुन देता येईल. उदा. भक्तांनी कोठूनही वरील हेल्पलाईन नंबरवर कॉल केल्यास (या नंबरवर एकाच वेळी आठ भक्त कॉल करु शकतात.) सर्व प्रथम "Wel Come To Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi, Please Press १ For English, २ For Hindi, ३ For Marathi, ४ For Telgu". श्री साइभक्तांनी या प्रमाणे नंबर दाबून भाषा निवडल्यानंतर प्रत्येक भाषेमध्ये माहितीसाठी नऊ टप्पे देण्यात येतील. ते असे- ०१) मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम ०२) विविध पुजांविषयी माहिती ०३) देणगीबद्दल माहिती ०४) संस्थानचे निवासस्थाने व सोयी ०५) प्रसादालय व कॅन्टीन विषयी माहिती ०६) संस्थानच्या रुग्णालयांविषयी माहिती ०७) शिर्डी परिसरातील धार्मिक स्थळे ०८) शिर्डीस येण्याचे मार्ग ०९) हेल्पलाईन वरील ऑपरेटर (या व्यतिरिक्त जादा माहिती हवी असल्यास) याप्रमाणे संस्थानच्या हेल्पलाईनवर IVRS व्दारे भक्तांना रेकॉर्डींग व विविध भाषांतील माहिती सहजतेने मिळू शकेल. शिवाय याव्यतिरिक्त भक्तांस माहिती हवी असल्यास हेल्पलाईनवरील स्वतंत्र ऑपरेटर त्वरीत त्या कॉलवर भक्तांना मार्गदर्शन करु शकेल. अशाप्रकारे सर्व साधारणपणे हेल्पलाईनची संकल्पना राबविण्यात येईल.

**(ब) IVRS व्दारे हेल्पलाईन सुरु करण्यास येणारा अंदाजीत खर्च-** IVRS आपल्या अंतर्गत दूरध्वनीवर सुरु करण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली विकत घ्यावी लागणार आहे. यासाठी साधारण १,२०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. आठ चॅनेलकरिता लागणारे कार्ड रुपये ५०,०००/-, संदेश चार भाषेत नऊ लेव्हलमध्ये रेकॉर्ड करणेसाठी रुपये ३०,०००/- अशा प्रकारे एकूण अंदाजे खर्च रुपये २,००,०००/- पर्यंत अपेक्षीत आहे. ही सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या विविध सेवेदारांकडून विहित पध्दतीने सिलबंद निविदा मागवून मा. कार्यकारी अधिकारी यांच्या समोर त्या उघडून न्यूनतम निविदाधारकांना कार्यादेश देता येईल.

उपरोक्त **अ** आणि **ब** मध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री साईभक्तांना IVRS हेल्पलाईन सुरु करण्यासाठी व त्यावर येणाऱ्या अंदाजे खर्च रुपये २,००,०००/- यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नामांकित कंपन्याकडून निविदा मागवून त्या मा.विश्वस्तांचे समक्ष उघडून निम्नतम दराचे निविदाधारकाकडून काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये २ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ५६ श्रीसाई भक्तांना संस्थानच्या वेबसाईटवर विविध सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.९२९.** संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे १९९९ पासून सुरु करण्यात आली आहे. वेबसाईटचे नुतनिकरण करुन तिचे दिनांक ०४ ऑक्टोबर, २००३ रोजी Broad Band मध्ये रुपांतर करण्यात आले आहे. वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात आली आहे. संस्थान प्रकाशीत सर्व भाषेतील पुस्तकांचे डिजीटलायझेशन करुन ते वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात आले आहेत. संस्थानचे प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत केले जातात. त्याचप्रमाणे संस्थानचे जूने सन १९२३ पासूनचे साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत करण्यास सुरुवात केली आहे. संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्ययावत माहिती वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक छायाचित्रे प्रसारित करण्यात येत आहेत. आतापर्यंत वेबसाईटवर ११०० एमबी एवढा डाटा संकलीत करण्यात आला आहे. श्रीबाबांच्या जीवनावरील संस्थानची अधिकृत वेबसाईट असल्याने, सध्या प्रतिदिनी सरासरी २००० श्रीसाईभक्त संस्थानच्या वेबसाईटला भेट देत आहेत. लवकरच वेबसाईटवर श्री बाबांचे ऑनलाईन दर्शन सुविधा श्रीसाईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या सर्वांमुळे संस्थानच्या वेबसाईटला नियमीत भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

श्रीसाईबाबांच्या जीवनावरील विविध मंदिरांच्या तसेच खाजगी ८०० ते ९०० वेबसाईट सध्या नेटवर चालू आहेत. संस्थानची अधिकृत वेबसाईट अधिकाधिक आकर्षित व परिपूर्ण करुन श्रीसाईभक्तांना विविध सेवा व सुविधांचा लाभ वेबसाईटवर घेता यावा, यासाठी आपल्या वेबसाईटचे त्याप्रमाणे अधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. ज्यामुळे बाबांच्या जीवनावरील संस्थानची वेबसाईट अधिकाधिक भक्तांमध्ये लोकप्रिय होईल. श्रीसाईभक्तांना वेबसाईटवर विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संकल्पना तयार करण्यात आल्या आहेत. यामुळे श्रीसाईभक्तांना विविध सुविधा मिळून संस्थानलाही हे एक हक्काचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न देणारे साधन ठरेल.

**(अ) श्री साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सेवा व सुविधांची संकल्पना-**

**०१. आशिर्वाद-**

श्रीसाईभक्तांना त्यांच्या व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या वाढदिवसासाठी एक आकर्षक योजना वेबसाईटवर राबविण्यात येईल. यामध्ये श्रीसाईभक्तांकडून क्रेडीट / डेबीट कार्डवर काही रक्कम घेऊन वाढदिवसाच्या व्यक्तीचा फोटो ऑनलाईन या सदरामध्ये आकर्षकरित्या वेबसाईटवर काही ठराविक दिवस प्रसारित केला जाईल. त्याचप्रमाणे त्यांना या दिवसामध्ये वेबसाईटवर श्रीबाबांच्या सोबत वाढदिवस साजरा करण्यासाठी आकर्षक अशा संगणक प्रणालीमध्ये संधी दिली जाईल. वाढदिवसाच्या दरम्यान त्यांना त्यांच्या पत्त्यावर श्रीबाबांच्या फोटोसहित उदी प्रसाद पाठविता येईल.

श्रीसाईभक्तांना त्यांच्या विवाहाच्या वाढदिवसानिमित्त काही ठराविक रक्कम आकारुन त्यांचे फोटो वेबसाईटवर विशिष्ट सदरात प्रकाशीत करता येतील. तसेच आशिर्वादपर त्यांना त्यांच्या पत्त्यावर श्री बाबांचा उदी प्रसाद पाठविण्यात येईल.

व्यवसायाच्या वर्धापनदिनी त्यांना त्यांच्या व्यवसायाविषयी ठळक वैशिष्ट्यांसह फोटो वेबसाईटवर ठराविक रक्कम आकारुन प्रकाशीत करता येईल.

यशस्वी झाल्याबद्दल आशिर्वादपर त्या व्यक्तीच्या फोटोसहित त्यांचे प्रकाशन करता येईल.

**०२. वेबमेंबर्स-** श्रीसाईभक्तांकडून ठराविक वार्षिक वर्गणी वेबसाईटवर आकारुन त्यांना एक आयडी नंबर व पासवर्ड दिला जाईल. अशा प्रकारे वेबमेंबर होणाऱ्या साईभक्तांना खास विविध सुविधा पुरविण्यात येतील. उदा. मेंबर ते मेंबर चाटरुम (स्वतःचे आलेले अनुभव इतरांमध्ये चर्चा करणेसाठी ), ई-ग्रिटींग पाठविण्याच्या सुविधा, संगणकावर आकर्षक वॉलपेपर व स्क्रिन सेव्हर डाऊनलोड करण्याची सुविधा, भक्तीमार्गपर आधारित विविध खेळ, स्वतंत्र व्हिडीओ क्लिप्स, बाबांच्या जीवनावर आधारित विविध गोष्टीरुप चित्रफिती इ.

**०३. कौल लावणे-** बरेच श्रीसाईभक्त कोणतेही काम करण्याअगोदर श्रीबाबांची आज्ञा घेतात. श्रीबाबांची आज्ञा घेण्यासाठी त्यांना शिर्डीला प्रत्येक वेळेस येणे शक्य होईलच असे नाही. यासाठी श्रीसाईभक्तांना वेबसाईटवर श्रीबाबांना कौल लावण्याची संकल्पना सादर करता येईल. यासाठी अगदी थोडी रक्कम आकारुन भक्तांच्या इच्छा पूर्ण करता येतील.

**०४. ऑनलाईन पुजा-** श्रीसाईभक्तांना जगातील कोठूनही श्रींची अभिषेक / श्रीसाईसत्यव्रत पुजा ठराविक रक्कम आकारुन ठराविक वेळी ऑनलाईन करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य आहे.

**०५. ई-शॉपी-** संस्थान प्रकाशीत पुस्तके, फोटो, सीडी, दैनंदिनी, दिनदर्शिका इ. श्रीसाईभक्तांना ऑनलाईन बुकींग करता येईल.

**०६. ई-रुम बुकींग-** भविष्यात श्रीसाईभक्तांना त्यांच्या निवासस्थानातून हवे त्या दिवसाची ऑनलाईन रुमबुकींग सुविधा उपलब्ध करुन देता येईल. ज्यामुळे श्रीसाईभक्त शिर्डीत येतांना निवासस्थानाची सोय झाल्याबाबत निश्चिंत राहिल.

उपरोक्त नमुद केलेल्या संकल्पनांमधून श्रीसाईभक्तांना वेबसाईटच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करुन देता येतील. शिवाय अशा प्रकारच्या सुविधांमधून संस्थानला प्रतिवर्षी करोडो रुपयांचे हक्काच्या उत्पन्नाचे नविन साधन निर्माण होईल व संस्थानची अधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेली वेबसाईट श्रीसाईभक्तांना भक्तीभावाचे समाधान प्राप्त करुन देणारी ठरेल व यामुळे प्रतिदिनी कमीत कमी वेबसाईटला भेट देणाऱ्या श्रीसाईभक्तांची संख्या वाढून ती पन्नास हजारापेक्षाही अधिक होईल.

**(ब) वेबसाईटवर सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी करावे लागणारे अत्याधुनिकीकरण-**

श्री साईभक्तांना **परिशिष्ट अ** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वेबसाईटचे अत्याधुनिकीकरण करणे, सेवा व सुविधा प्राप्त होण्यासाठी विविध संगणक प्रणाली तयार करुन घेणे, मुखपृष्ठ आकर्षित करणे, अद्ययावत सर्च इंजिन बनविणे, पेमेंट गेटवे कनेक्टीव्हीटी तयार करणे, ऑनलाईन गेम्स, वॉलपेपर्स, स्क्रिन सेव्हर्स व ई-ग्रिटींगस् तयार करणे इ. साठी अंदाजे रुपये २२,००,०००/- व हार्डवेअर घेणे, निविदांसाठी जाहिरात देणे इ. साठी अंदाजे रुपये ३,००,०००/- असे एकूण अंदाजे रुपये २५,००,०००/- पर्यंतचा भांडवली खर्च अपेक्षीत आहे. संस्थानला वेबसाईटपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या मानाने हा खर्च वाजवी प्रमाणात व एकदाच होणारा आहे.

उपरोक्त **परिशिष्ट "अ" आणि "ब"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे संस्थानच्या वेबसाईटवर श्रीसाईभक्तांना विविध सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यावर होणारा भांडवली अंदाजे रुपये २५,००,०००/- पर्यतच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने नामांकित कंपन्यांकडून सिलबंद निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ५७** **आय.टी. विभागासाठी दोन लॅपटॉप खरेदी करणेस मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.९३०.** श्रीसाईबाबा संस्थानचे कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थान परिसरातील विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप काऊंटर्स, प्रसादालय व कॅन्टीन काऊंटर्स, लेखाशाखेतील

मनिऑर्डर्स/चेक आदि. ठिकाणची साधारणत: १४०/१५० संगणके माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरशी नेटवर्कींगव्दारे जोडण्यात आलेली आहेत. या नेटवर्कींगसाठी फायबर ऑप्टीक केबलचा वापर करण्यात आला असून, या फायबर ऑप्टीक केबलवर संस्थानची Siemens Hipath 4300IP ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा माहे ऑगस्ट, २००४ पासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकिय सेवा व सुविधा उपलब्ध होण्याच्या हेतूने श्रीसाईनाथ रुग्णालय व श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांच्यासाठी सर्वंकष संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी अत्याधुनिक संगणकीय जाळ्याची उभारणी नुकतीच करण्यात आलेली आहे.

संस्थानमधील संपूर्ण संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकाची संख्या वाढलेली आहे. संस्थानचे नेटवर्कींगचे कार्यक्षेत्र यामुळे वाढलेले आहे. नेटवर्कमध्ये चार सर्व्हर बसविण्यात आले आहेत. काही वेळेस नेटवर्कमध्ये अडथळे निर्माण होऊन संगणके बंद पडतात. नेटवर्क बंद पडल्यास, नेटवर्कचे प्रत्येक ठिकाणचे नोड तपासावे लागते. अशी तपासणी करण्यात बराच वेळ जात असल्याने, नेटवर्कमधील सर्व संगणके व दूरध्वनी यंत्रणा तोपर्यंत बंद रहाते. नेटवर्क बंद पडण्याची कारणे लॅपटॉप असल्यास, तात्काळ शोधता येणे शक्य होते. अशाप्रकारचा लॅपटॉप माहिती तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध नसल्याने, तो खरेदी करणे गरजेचे आहे. लॅपटॉप खरेदी केल्यास खालीलप्रमाणे कामे तातडीने होणे सहज शक्य होईल.

०१. संस्थानचे नेटवर्क व्यवस्थीत चालू आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी या लॅपटॉपमध्ये आवश्यक सॉफ्टवेअर बसवून नेटवर्कवर सतत नियंत्रण ठेवता येईल. नेटवर्कमध्ये अडथळा निर्माण झाल्यास तो तात्काळ शोधून कार्यपध्दती जलदगतीने पूर्ववत सुरु करता येईल.

०२. श्रीसाईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सर्वंकश संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी अत्याधुनिक संगणकीय जाळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर नेटवर्कमध्ये १५ स्विचेस असून, ३०० नोड जोडण्यात आले आहेत. रुग्णालयामध्ये तांत्रिक ज्ञान असलेले कर्मचारी सध्या उपलब्ध नसल्याने, या नेटवर्कमध्ये काही अडथळा आल्यास माहिती तंत्रज्ञान विभागातील तंत्रज्ञ पाठवून तेथील प्रत्येक स्विचेस व नोड तपासावे लागतात. यामध्ये बराच वेळ खर्च होतो. नेटवर्क पूर्ण चालू होईपर्यंत रुग्णालये, खोली वाटप कक्ष, तिकीट विक्री कक्ष, देणगी काऊंटर्स, विविध कार्यालये येथील संगणके व दूरध्वनी यंत्रणा बंद रहाण्याचा धोका संभवतो. अशावेळी लॅपटॉपमध्ये लोड केलेल्या सॉफ्टवेअरव्दारे नेटवर्कमध्ये ज्या ठिकाणी अडथळा असेल ते ठिकाण अचूक शोधून नेटवर्क पुन्हा तातडीने कार्यान्वीत करता येणे शक्य होईल.

०३. मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये बोलविण्यात आलेल्या विविध संस्थेच्या प्रतिनिधींना प्रेझेंटेशन(डेमो) द्यावे लागतात. यासाठी लॅपटॉपची आवश्यकता भासते. त्याचप्रमाणे संस्थानच्या होणाऱ्या विविध मिटींग व तेथे सादर करावी लागणारी माहिती यासाठी लॅपटॉपची आवश्यकता आहे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या विवेचनानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागास दोन लॅपटॉपची आवश्यकता आहे. अशा प्रकारे नामांकित कंपनीच्या एका लॅपटॉपसाठी अंदाजे रुपये ६०,०००/- प्रमाणे दोन लॅपटॉप खरेदीसाठी रुपये १,२०,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षीत असून, सदर खरेदी विहित पध्दतीने करता येईल.

वर नमुद केल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागासाठी दोन लॅपटॉप खरेदी करणेस, त्यासाठी येणारे एकत्रीत अंदाजे रुपये १,२०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिकृत विक्रत्यांकडून निविदा मागवून त्या विश्वस्तांचे समक्ष उघडून निम्नतम दराच्या निविदाधारकास कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या रुपये १,२०,०००/- पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ५८** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नविन अभ्यासक्रम सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.९३१.** श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या वेगवेगळया दहा व्यवसांमधुन विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते, या दहा व्यवसायांच्या वीस तुकडया सध्या कार्यरत आहेत. प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर बहुतांशी विद्यार्थ्यांना कंपन्यांमध्ये शिकाऊ उमेदवारी/नोकरी व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होतात. संस्थेमध्ये कंपन्यांचे कॅम्पस इन्टरव्हयु आयोजित करुन तसेच कंपन्यांशी थेट संपर्क करुन शिकाऊ उमेदवारी/ नोकरीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात.

ऑगष्ट- २००७ मध्ये सुरु होणाऱ्या प्रशैक्षणिक सत्रापासून श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नविन व्यवसाय सुरु करावयाचे झाल्यास विहीत नमुन्यात शासनाकडे अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.१५.११.२००६ अशी आहे. प्रत्येक व्यवसाय तुकडीसाठी रु.६०००/- शुल्क भरावे लागते. केंद्र शासनाच्या शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत (CTS) उपलब्ध असलेंल्या व्यवसायाची यादी सोबत जोडली आहे.

त्यापैकी ऑगष्ट- २००७ चे नविन सत्रापासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये १) क्राप्टसमन फ्रुड प्रॉडक्शन व २) कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमींग असिस्टंट हे दोन नविन व्यवसाय सुरु करता येईल.

अ) सद्यस्थितीत सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याच अनुषंघाने शिर्डी/ औरंगाबाद/ नाशिक/ पुणे/ मुंबई इ. शहरात असलेलया तारांकित हॉटेलची संख्याही मोठया प्रमाणात असुन या सर्व ठिकाणी प्रशिक्षीत मनुष्यबळाची मोठया प्रमाणात मागणी असते. तथापी सदरच्या हॉटेलसाठी लागणाऱ्या प्रशिक्षीत हॉटेल ॲण्ड कॅटरींग या गटातील अभ्यासक्रम आपल्या संस्थेत सुरु करण्याची सूचना मा.उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी केली आहे. हॉटेल ॲण्ड कॅटरींग व्यवसायातील क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन हा अभ्यासक्रम आपले संस्थेत सुरु करता येईल.

ब) सध्या बहुतांश आस्थापनांमध्ये सर्व कामकाज हे संगणकावर चालते. Qualified Computer Operator करीता चांगल्या संधी आहेत. आपले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रमींग असिस्टंट (COPA) हा एक वर्ष मुदतीचा अभ्यासक्रम सुरु करता येईल. संस्थेत विकसित होत असलेल्या मध्यवर्ती संगणक लॅबमध्ये अभ्यासक्रम सुरु केल्यास यासाठी लागणारे भांडवल खर्चही कमी लागेल.

वरील अ व ब मध्ये दर्शविलेल्या व्यवसायांबाबतचा काही तपशील खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता- अ-** व्यवसाय कालावधी शैक्षणिक पात्रता इत्यादी माहिती.

| अ.नं. | सुरु करावयाचे व्यवसायाचे नाव | कालावधी | शैक्षणिक पात्रता | लागणारी जागा (चौ.मी.) (अंदाजे) |
|---|---|---|---|---|
| ०१ | क्राप्टसमन फ्रुड प्रॉडक्शन CFP (VEG) | ०१ वर्ष | १० वी उत्तीर्ण | ६४ |
| ०२ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमींग असिस्टंट (COPA) | ०१ वर्ष | १२ वी उतीर्ण | ५६ |

**तक्ता- ब-** वरील दोनही व्यवसायांसाठी लागणारा आवर्ती खर्च व भांडवली खर्च खालीलप्रमाणे-

| व्यवसाय क्रमांग | अंदाजे आवर्ती खर्च (वार्षिक) | | आवर्ती जमा (वार्षिक) | निव्वळ वाढीव आवर्ती खर्च (अंदाजे) | भांडवली खर्च एकाच वेळी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ CFP (VEG) | १,४३,०००/- | १९,२००/- | २४,०००/- | १,३८,२००/- | २,२५,०००/- | मुख्य इमारतीमध्ये चालू करता येईल. |
| ०२ COPA | १,४३,०००/- | १९,२००/- | २४,०००/- | १,३८,२००/- | ५,२०,०००/- | प्रत्यक्ष भांडवली खर्च अंदाजे रु. १२.२० लाख आहे. तथापी मध्यवर्ती संगणक लॅबचा वापर करुन हा व्यवसाय सुरु केल्यास भांडवली खर्च रु.७ लाख कमी लागेल. वेगळी जागा लागणार नाही. |

वरील दोन व्यवसायांसाठी अर्हताप्राप्त निर्देशकांची नेमणूक करावी लागेल.

दोन व्यवसाय तुकडया सुरु करावयाच्या झाल्यास त्यांचेसाठी येणारा खर्च हा अंदाजे खर्चाचे कमी किंवा जास्त होऊ शकतो. नविन व्यवसाय तुकडया सुरु करण्यास मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रस्ताव व्यवसाय शिक्षण संचालनालयाकडे सादर केल्यानंतर संचालनामार्फत प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला जातो. राज्य शासनाची मंजूरी मिळालेनंतर प्रत्येक व्यवसाय तुकडीसाठी रु.१०,०००/- प्रमाणे अनामत रक्कम राज्य शासनाकडे भरावी लागेल. तशी परवानगी दि.३१.०१.२००७ पर्यंत मिळणे अपेक्षित आहे.

त्यानंतर मार्च- २००७ अखेर पर्यंत नविन व्यवसाय तुकडयांसाठी मानकानुसार आवश्यक साहित्य, निदेशक, जागा इ. सर्व बाबींच्या पुर्ततेची राज्य व केंद्र शासनाच्या संयुक्त स्थायी समितीमार्फत निरीक्षण करुन पहाणी केली जाते. त्या आधारे दि.१५.०७.२००७ पर्यंत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त होणे अपेक्षित असते. त्या मान्यते आधारे विद्यार्थ्यांना प्रवेश देता येतात.

शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दि.१५.११.२००६ अशी असलेने विहित शुल्कासह मुदतीत शासनाकडे अर्ज सादर केला आहे.

वरीलप्रमाणे दोन नविन व्यवसाय तुकडया श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दि.०१.०८.२००७ पासून सुरु करण्यास, त्यासाठी येणाऱ्या खर्चास व आवश्यक निदेशक भरतीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं. ५९ जे.सी.बी.मशिन बिलाबाबत.**

**निर्णय क्र.९३२.** यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू विषयाबाबत सविस्तर तपशिलासह सर्व माहिती व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावी असे ठरले.

**विषय नं. ६०	संस्थान वाहन क्र.एमएच-१७/टी-६०१ ॲम्बॅसॅडर कार दुरुस्तीबाबत.**

**निर्णय क्र.९३३.** दि.०२/११/२००६ रोजी मा. उपसमितीची मिटींग संपले नंतर मा.वि.श्री वाबळे साो. यांना त्यांचे घरी गुहा येथे सोडविणे कामी वाहन क्रं. एमएच-१७/टी-६०१ (ॲम्बेसॅडोर कार) जनरल डयुटी वरील कंत्राटी वाहन चालक, श्री रमेश डांगे यांना पाठविले होते.

मा.विश्वस्त श्री वाबळे यांना साधारंता १७.०० वाजता गुहा येथे सोडुन परत येत असतांना बाभळेश्वर जवळ कार अचानक बंद पडल्याने वाहन चालक यांनी गाडीचे बोनट उघडून पाहीले असता गाडीतील इंजिन ऑईल संपल्याचे वाहन चालक यांनी वाहन विभागात दुरध्वनी वरून सांगितले.

दुरध्वनी आले नंतर वाहन विभागातील मॅकेनिक यांना घटनास्थळी पाठविले असता कारचा अल्टरनेटर ऑईल प्रेशर पाईप फुटल्याने इंजिनमधील सर्व ऑईल निघुन गेल्याचे लक्षात आले. तदनंतर वाहन विभागातील दुसऱ्या वाहनाने टोचन करून कार १९.०० वाजता वाहन विभागात आणली.

कारचे ऑईल चेंबर खोलून बघीतले असता इंजिन क्रॅंक, कनेक्टींग, कनेक्टींग बेअरींग यांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कारचे इंजिन ओव्हर ऑल करावे लागेल. सदर ॲम्बेसॅडोर कार दुरूस्तीचे (इंजिन ओव्हर ऑल) कामाकरीता हिंदुस्तान मोटर्सचे अधिकृत डिलर कैलास एजन्सी प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे. या कामी अंदाजे रू.४० ते ५० हजार खर्च अपेक्षीत आहे.

तरी ॲम्बेसॅडोर कार इंजिन ओव्हर ऑलचे काम कैलास एजन्सी, प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून करून घेणेस व अंदाजे रू.४० ते ५० हजार मात्र खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदर ॲम्बेसॅडोर कार इंजिन ओव्हर ऑलचे काम मे.कैलास एजन्सी,औरंगाबाद यांचेकडून करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५० हजार पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर कारचे झालेले नुकसानीबाबत चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ६१	श्रीरामपूर दूध जिल्हा मध्य.सहकारी दूध व्याव.संघ लि.,बाभळेश्वर यांचे श्रीराम आईस्क्रिम व दूग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी दिलेल्या स्टॉलला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.९३४.** संस्थानने श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता.राहाता यांना श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थाचे विक्री साठी प्रसादालय परिसरात बुथ स्टॉलसाठी जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने बारा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | जागा /गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर - चहा कॅन्टीन कार्यालय जवळ | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ, लिमि. बाभळेश्वर, ता- राहाता , अहमदनगर | दरमहा रुपये ८००/- (डिपॉझीट रु. १०,०००/-) मात्र | श्रीरामपूर संघाचे उत्पादीत आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीकामी | ३०-११-२००५ ते २९-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर, ता-राहाता, जिल्हा - अहमदनगर यांची दिनांक २९-११-२००६ रोजी मुदत संपत असल्याने पुढील १२ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास १८/१०/२००६ रोजी प्राप्त झ ाालेला आहे. त्यात त्यांनी " आमचे दूध संघासाठी संस्थानने प्रसादालय परिसरात श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्री साठी १० बाय १० ची जागा बुथ स्टॉलसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर रु. १०,०००/- डिपॉझीट भरून दरमहा मासिक परवाना लायसेन्स फी रुपये ८००/- तसेच मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बिल वेगळे याप्रमाणे एका स्टॉलसाठी जागा दिलेली आहे. सदर बुथ स्टॉल जागेचा दिनांक २९/११/२००६ रोजी १२ (बारा) महिन्याचा कालावधी पूर्ण होत आहे. तरी दि २९/११/२००६ पासून पुढे बारा महिन्याच्या कालावधीसाठी आईस्क्रिम बुथ स्टॉलसाठी मुदतवाढ मिळावी. अशी विनंती केलेली आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता , जिल्हा - अहमदनगर यांना लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दिनांक ३०/११/२००६ पासून दि २९/११/२००७ अखेर १२ महिने करिता एका स्टॉलसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये १०००/-(अक्षरी रुपये एकहजार) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्ती अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास १२ महिने करिता मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं. ६२ संदीप अशोक जगधनी,श्रीरामपूर यांना भक्तनिवासस्थान येथे टेलिफोन सुविधाकामी गाळा क्र. ०३ यास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.९३५.** १) संस्थानने नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील १ गाळा साईभक्तांचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर श्री. जगधनी यांना वापरांसाठी दिलेले आहेत.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त - निवासस्थान गाळा क्रमांक ०३ | श्री.संदीप अशोक जगधनी श्रीरामपूर कॅम्प - शिरडी | दरमहा रुपये १,४३०/- **( डिपॉझीट रक्कम रुपये ३,१८,०००/- )** | साईभक्तांना टेलिफोन सुविधा पुरविणेबाबत | ०१-०१-२००६ ते ३०-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे श्री संदीप अशोक जगधनी यांची दिनांक ३०-११-२००६ रोजी मुदत संपत असल्याने पुढील ३६ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव दिनांक ०१/११/२००६ रोजीचा अर्ज (दि.१/११/२००६ रोजी प्राप्त) पाठवला आहे त्यात त्यांनी "माझे टेलिफोन सुविधा गाळा क्रमांक ३ नविन भक्तनिवासचे लिव्ह ॲन्ड लायसन्सचे नुतनीकरण माहे नोव्हेंबर २००६ मध्ये संपत आहे. तरी विनंती की सदरचे नुतनीकरण ३६ महिन्याचे होणेस नम्र विनंती आहे. " अशी विनंती केलेली आहे.

यापूर्वी श्री. संदीप अशोक जगधनी यांना पुढीलप्रमाणे गाळयास मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत.

१) दिनांक ०१/०८/१९९९ ते दिनांक ३०/०६/२००० अखेर
२) दिनांक ०१/०७/२००० ते दिनांक ३१/०५/२००१ अखेर
३) दिनांक ०१/०६/२००१ ते दिनांक ३१/०४/२००२ अखेर
४) दिनांक ०१/०५/२००२ ते दिनांक ३१/०३/२००३ अखेर
५) दिनांक ०१/०४/२००३ ते दिनांक २९/०२/२००४ अखेर
६) दिनांक ०१/०३/२००४ ते दिनांक ३१/०१/२००५ अखेर
७) दिनांक ०१/०२/२००५ ते दिनांक ३१/१२/२००५ अखेर
८) दिनांक ०१/०१/२००६ ते दिनांक ३०/११/२००६ अखेर

उपरोक्त कालावधी प्रमाणे प्रस्तुतचा गाळा चालविणेस देण्यात आला आहे. सध्याचा लिव्ह ॲन्ड लायसेन्स कालावधी दि ०१/०१/२००६ ते ३०/११/२००६ पावेतो असून या कालावधीसाठी गाळा चालविणेस दिलेला आहे. सदर कालावधी संपत असल्याने याबाबतचा विचार करता " लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर गाळयास दिनांक १/१२/२००६ ते दिनांक ३१/१०/२००७ अखेर ११ महिने कालावधीकरिता मुदतवाढ पूर्वीचे लायसन्स फी रुपये १४३०/- मध्ये १० % वाढ करून रुपये १,५७३/- मात्र आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास ११ महिन्यासाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं. ६३ प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी संस्था मर्यादित लोणी यांना देण्यात आलेल्या जागेस व गाळयास मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.९३६.** संस्थानने प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द, मु पो लोणी खुर्द, ता राहाता, जिल्हा अहमदनगर यांना फक्त बेदाणा विक्री साठी श्री साईबाबा भक्तनिवास इमारत येथे गाळा नं ०७ व तसेच प्रसादालय परिसरात चहा कॅन्टीन शेजारी बुथ स्टॉलसाठी जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने बारा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेली आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा / जागा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा भक्तनिवास इमारत, श्री साईबाबा संस्थान शिरडी ,साभनि इमारत मधील गाळा नं ०७ | प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित , लोणी खुर्द, मु. पो - लोणी खुर्द, ता- राहाता, जि-अ नगर | एका गाळयासाठी दरमहा रुपये ८००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | बेदाणा विक्रीकामी | ३०-११-२००५ ते २९-११-२००६ |
| ०२ | साईप्रसाद परिसर -चहा कॅन्टीन / कार्यालय जवळ स्टॉलकामी जागा | प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित , लोणी खुर्द, मु. पो - लोणी खुर्द, ता- राहाता, जि-अ नगर | एका स्टॉलसाठी दरमहा रुपये ८००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | बेदाणा विक्रीकामी | ३०-११-२००५ ते २९-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द, मु पो - लोणी खुर्द, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर यांना देण्यात आलेला गाळा व बुथ स्टॉलसाठी जागा याची मुदत दि. २९/११/२००६ रोजी मुदत संपत असल्याने पुढील १२ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास २/११/२००६ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात त्यांनी" आमचे संस्थेस आपले संस्थानचे भक्तनिवास-५०० रुम गाळा बेदाणे व ड्रायफुट विक्री करणेसाठी " स्टॉलकरिता गाळा मंजूर केलेला आहे व संस्थेच्या ताब्यात मिळालेला आहे. सदर गाळा करार मुदत दि.२९/११/२००६ पर्यंत असून पुढील नविन करार दि ३०/११/२००६ ते दि ३०/११/२००६ पर्यत मुदतवाढ मिळावी " व तसेच "आमचे संस्थेस आपले संस्थानचे प्रसादालय परिसरामध्ये प्रवेशव्दाराजवळ मोकळया जागेत बेदाणे व ड्रायफुट विक्री करणेसाठी स्टॉलकरिता जागा मंजूर केलेली आहे व ती संसेच्या ताब्यात देण्यात आलेली आहे. सदरचे स्टॉलची करार मुदत दि २९/११/२००६ अखेर पर्यंत असून पुढील नविन करार दि ३०/११/२००६ ते ३०/११/२००७ अखेर पर्यंत प्रसादालय जागा संदर्भात मुदतवाढ मिळावी." अशी विनंती केलेली आहे. असे दोन प्रस्ताव अर्ज गाळा / जागेबाबत त्यांनी सादर केलेले आहे.

साईभक्त व संस्थानला सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द, मु पो. लोणी खुर्द, ता. राहाता, जिल्हा अहमदनगर यांचे मुदत गाळयाची व स्टॉलसाठी जागेची मुदत दि २९/११/२००६ रोजी संपत असल्याने प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक संस्था, लोणी खुर्द यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर गाळा व जागा दिनांक ३०/११/२००६ पासून दि.२९/११/२००७ अखेर १२ महिने करिता एका गाळयासाठी त्यांचेकडून डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून व तसेच त्यांचेकडून एका स्टॉलसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीसअनुसरून लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास १२ महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं. ६४ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थान परिसरात साईछाया इमारतीत लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर दिलेल्या हॉल यास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.९३७.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी येथे सिटी सर्व्हे नंबर ३२ व ग्रामपंचायत मिळकत न ८०२ मध्ये जुनी साईनाथ छाया इमारतीचे जागेवर संस्थाने नव्या इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

उपरोक्त इमारतीमध्ये शिर्डी येथे येणा-या देशी , विदेशी साईभक्तांच्या सोईसाठी व जनतेच्या सोईसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कोपरगांव यांना या ठिकाणी सदर इमारतीमधील पहिला मजला लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर १२ महिने कालावधीसाठी देण्यात आलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | जागा /गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनाथ छाया इमारत-मधील - पहिला माळा | स्टेट बँक ऑफ इडिया | दरमहा रुपये २५०००/- | साईभक्त व संस्थानला सेवा व सुविधेसाठी | ११-११-२००५ ते १०-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया यांना दिलेल्या हॉलची मुदत १०-११-२००६ रोजी मुदत संपत असल्याने पुढील १२ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास १७/१०/२००६ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी " सदरचे हॉलची मुदत १२ महिने ची असून त्याची मुदत दिनांक १०/११/२००६ रोजी संपत असलेने पुढील मुदतवाढ १२ महिने कालावधीसाठी मिळावी अशी विनंती केलेली आहे. "

साईभक्तांना व संस्थानला सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा कोपरगांव यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर पुढील मुदतीसाठी म्हणजेच दिनांक ११/११/२००६ पासून दि १०/११/२००७ अखेर १२ महिने करिता मासिक परवाना भाडे रुपये २५,०००/- (मासिक भाडे - अक्षरी रुपये पंचवीस हजार ) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास १२ मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं. ६५ लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर नेमणुकीसाठी जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**निर्णय क्र.९३८.** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेसाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे व मे.क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि., मुंबई यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी

मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि., मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-०३-२००६ पासून ते दि.२८-०२-२००७ अखेर या कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला सद्या पुरविणेत येणा-या अकुशल, कुशल कंत्राटी कामगार व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांची संख्या खालीलप्रमाणे आहे-

**अ) अकुशल कामगार- ९२३**

**ब) कुशल कामगार- १९१**

**वर्गवारी-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इलेक्ट्रीशियन- ५२ | २. | वेल्डर- १० |
| ३. | फिटर( प्रसादालय)-०२ | ४. | बॉयलर सुपरवायझर- ०१ |
| ५. | आचारी- ०२ | ६. | लिपीक- ४१ |
| ७. | कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर- ०१ | ८. | बगीचा माळी- ०५ |
| ९. | ज्यूनियर सिव्हील इंजिनीअर-०५ | १० | सुतार- ०३ |
| ११. | गवंडी-०२ | १२. | लॅब टॅक्नीशियन- ०७ |
| १३. | फार्मासिस्ट-०४ | १४. | एक्स रे टेक्नीशियन- ०१ |
| १५. | बायोमेडीकल इंजिनीयर- ०२ | १६. | डेन्टल सहाय्यक- ०१ |
| १७. | संगीत शिक्षक (कन्या)- ०२ | १८. | कॉम्प्युटर शिक्षक- ०३ |
| १९. | क्रिडा शिक्षक- ०२ | २०. | बालवाडी शिक्षीका (इंग्लीश )-०१ |
| २१. | शिक्षीका (इंग्लीश )-०१ | २२ | लॅब सहाय्यक(कन्या)-०१ |
| २३. | टेलिफोन ऑपरेटर-०३ | २४. | ग्रंथालय सहाय्यक- ०३ |
| २५. | लॉन्ड्री ऑपरेटर-०१ | २६. | वाहन चालक- २९ |
| २७ . | वाहन चालक (जेसीबी )-०१ | २८. | फिटर/मॅकेनिक(वाहन )-०५ |

**क) सुरक्षा कर्मचारी (एकूण )- २८६**

**वर्गवारी-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुरक्षा अधिकारी-०२ | २. | सुरक्षा सुपरवायझर- ०६ |
| ३. | सशस्त्र सुरक्षारक्षक- २४ | ४. | सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री )-२५४ |

**ड) एकूण ( अ+ब+क)= १४००**

उपरोक्तप्रमाणे सद्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत दि.२८-०२-२००७ अखेर संपत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी अशाचप्रकारे नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करता येईल. त्याकरीता लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा" मागविणेकामी दैनिक महाराष्ट्र टाईम्स (मुंबई आवृत्ती ), दैनिक सकाळ (सर्व आवृत्या ), दैनिक लोकसत्ता (सर्व आवृत्या ), दैनिक सामना (मुंबई व औरंगाबाद आवृत्ती ) व दैनिक लोकमत (सर्व आवृत्या) या वर्तमान पत्रांतून जाहीरात प्रसिध्दीस देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.९.२००६ चे सभेत सन २००० पूर्वीचे कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थानचे नियमित सेवेत घेणेचा प्रस्ताव मान्य झालेला असून त्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तरी वरील जाहिरात/निविदा मागणी करतांना त्याबाबतची योग्य खातरजमा करुन घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-कामगार अधिकारी )

**विषय न. ६६ नाशिक येथे आयोजित करण्यात यावयाच्या श्रीसाई महोत्सव-२००७ बाबत.**

**निर्णय क्र.९३९.** शनिवार, दिनांक १६/०९/२००६ रोजी शिरडी येथे पार पडलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत जानेवारी २००७ मध्ये नाशिक येथे शनिवार, दिनांक १३/०१/२००७ ते सोमवार, दिनांक १५/०१/२००७ अखेर तीन दिवस श्री साई महोत्सव आयोजित करावा असा ठराव सम्मत करण्यात आलेला आहे. सदरचा महोत्सव कार्यक्रम हा अधिनियम २००४, १७(ड) मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार मध्ये नमुद केलेप्रमाणे - श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल. या नुसार घेता येईल. त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

साधारणपणे सदरच्या महोत्सवाचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल. श्री साई महोत्सव हा नासिक जिल्ह्यातील साईभक्तांपुरता मर्यादित असेल. कार्यक्रम हा शिवाजी स्टेडीयम येथील मैदानावर आयोजित करण्यात येईल. मैदानावर दोन मोठे पेंडाल असतील पैकी एका पेंडालमध्ये श्री साईबाबांची

मुर्ती व पादुका दर्शनासाठी ठेवण्यात येतील या पेंडालला मोठ्याप्रमाणात फुलांचे तसेच लाईटचे डेकोरेशन करण्यात येईल. व दुस-या पेंडालमध्ये मान्यवर राजकीय व्यक्तींची भाषणे, किर्तने, प्रवचन त्याचप्रमाणे रात्रीचेवेळी प्रसिध्द कलावंताचे कार्यक्रम असतील. ज्या गरीब साईभक्तांना शिर्डी येथे दर्शनासाठी येणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही त्यांच्याकरीता बाबांच्या पादुका ३ दिवस दर्शनासाठी उपलब्ध राहतील. सदर महोत्सवाचे खर्चाचे अंदाजपत्रक साधारणपणे खालीलप्रमाणे असेल.

| अ.नं. | तपशील | अंदाजित लागणारा खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१. | स्टेज, मंडप, फुलांचे डेकोरेशन, विद्युत रोषणाई, प्रसाद वाटप इ. | १५,००,०००.०० |
| ०२. | प्रचार, प्रसार, होर्डीग्ज, पत्रके, हँडबील्स, पेपर जाहिरात, केबल जाहिरात, थेट प्रक्षेपण इ. | ५,००,०००.०० |
| ०३. | सन्माननीय व्यक्ती सत्कार, कलाकार किर्तनकार, प्रवचनकार मानधन इ. | ७,००,०००.०० |
| ०४. | वहातुक, कर्मचारी मुक्काम, नाष्टा, जेवण इ. | ३,००,०००.०० |
| | एकूण अपेक्षीत अंदाजित खर्च | ३०,००,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साई महोत्सवाचे स्वरुप असून त्यासाठी एकूण अंदाजीत खर्च रु. ३०,००,०००.०० (अक्षरी रु. तीस लाख मात्र) अपेक्षीत असून , त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. याकामी मा.विश्वस्तांची समिती नेमण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५ )

**विषय नं. ६७ धामणी टेली मिडिया बेंगलोर यांना "श्रीसाई चरित्रे" ही कन्नड भाषेतील मालिका तयार करणेस परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.९४०.** चंद्रमती एन.,निर्माती,धारुणी टेली मिडीया,बेंगलोर यांनी त्यांचे दिनांक २२.१०.२००६ रोजीचे पत्राने, आम्ही सर्व जण साईबाबांचे भक्त आहोत.साईबाबांच्या महीमांनी प्रेरित होवून साई सच्चरित पुस्तकावर आधारीत "साई सच्चरित्रे" नावाची कन्नड भाषेतील दुरदर्शन मालीका तयार करण्याची इच्छा आहे.सदरची मालीका ही सन नेटवर्क कन्नड उदय दुरचित्रवाहीनीवरुन आठवडयातून एकदा प्रसारीत करण्याचे नियोजन आहे.यासाठी आपणास विनंती आहे की,आपण कृपया सदरची मालीका तयार करणेसाठी आणि मालीकेच्या प्रथम दृश्यासाठी मंदिराचे आतील बाजूस पुजाविधी करतानाचे चित्रीकरणास परवानगी द्यावी," असे कळविलेले आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०३.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२६ नूसार सुप्रसिध्द दिग्दर्शक श्री रामानंद सागर,मुंबई यांना "श्री साईबाबा "ही बाबांच्या जीवनावर आधारीत मालीका तयार करण्यास बाबांच्या कार्याचा प्रसार व प्रचार होणेस मदत होणार या उददेशाने परवानगी देण्यात आलेली आहे.तथापि श्री सागर यांनी मालीकेत चित्रीकरणाचे अनुषंगाने व मालीकेचे स्वरुप यावे या उददेशाने काही काल्पनीक पात्रांचा व कथानकाचा समावेश केलेला होता.याबाबत ब-याच साईभक्तांनी त्यावर आक्षेप घेवून संस्थानकडे दुरध्वनीद्वारे व पत्रांद्वारे आक्षेप घेतला होता.तद्नंतर श्री सागर यांचेशी यासंदर्भात पत्रव्यवहार करुन काल्पनीक पात्रांबाबत व कथानकाबाबत दुरुस्ती करणे बाबत कळविलेले होते.

आता चंद्रमती एन.,निर्माती,धारुणी टेली मिडीया,बेंगलोर यांनी कन्नड भाषेतील "श्री साई सच्चरित्रे" ही कन्नड भाषेतील मालीका तयार करण्यास व मंदिराचे आतील बाजूचे चित्रीकरण करण्यास परवानगी मागितलेली आहे.श्री रामानंद सागर यांना मालीका तयार करणेसाठी ज्या धर्तीवर व उद्देशाने परवानगी देण्यात आली होती त्याच धर्तीवर व उद्देशाने परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, चंद्रमती एन.,निर्माती,धारुणी टेली मिडीया,बेंगलोर यांनी कन्नड भाषेतील "श्री साई सच्चरित्रे" ही कन्नड भाषेतील मालीका तयार करण्यास व मंदिराचे आतील बाजूचे चित्रीकरण करण्यास श्री रामानंद सागर यांना मालीका तयार करणेसाठी ज्या धर्तीवर व उद्देशाने परवानगी देण्यात आली होती त्याच धर्तीवर व उद्देशाने परवानगी देणेत यावी. मात्र चित्रीकरणाचे अगोदर त्यांनी मालीकेसाठी तयार केलेले कथानक प्रथम श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) कडून तपासून घेणे त्यांना बंधनकारक राहील असे त्यांना कळविण्यात यावे, असें ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/अधिक्षक,मंदीर)

**विषय नं. ६८ नागरिकांची सनद शासनास सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.९४१.** अवर सचिव, (प्रशासन) विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, यांनी अ.शा.प.क्र.इएसटी १७०६/(१३१) दोन अन्वये नागरीकांची सनद ( Citizen Charter ) तयार करणेकामी विभागांची / कार्यालयांची माहिती, दिलेल्या प्रपत्रामध्ये तयार करावी व त्याची प्रत मान्यतेसाठी पाठवावी, व विभागाने मान्यता दिल्यावर ती प्रसिध्द करावी, असे कळविले आहे.

यांस अनुसरुन इकडील जा. नं.एसएसएस/वशी-०१/१५७३९/२००६ दिनांक ०९/११/२००६ अन्वये, श्री ए.पी.भंगाळे, प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.यांना "" सदरची माहिती तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे आगामी सभेपुढे सादर करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आपणांस लवकर पाठवित आहोत ", असे कळविलेले आहे.

संदर्भिय पत्रास अनुसरुन नागरीकांची सनद (Citizen Charter) तयार करणेकामी द्यावयाची विभागीय/कार्यालयांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिरडी येथे येणाऱ्या भक्तांना विविध सोई उपलब्ध करुन देणेकामी , मा.सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांचेकडे सदर न्यासाची, श्री साईबाबा संस्थान , शिरडी , पब्लीक ट्रस्ट -रजि.नं.ई-६९, अहमदनगर,या नांवे नोंदणी करण्यात आलेली आहे.

ब ) "" महाराष्ट्र शासन राजपत्र ", विधी व न्याय विभाग ,मंत्रालय,मुंबई -३२,दि.२३ ऑगष्ट २००४ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी ) अधिनियम २००४, अंमलांत आलेला आहे. त्यानूसार एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व इतर १५ सदस्य अशा १७ मान्यवरांची सदर समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली असून. या अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन कारभार केला जातो. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिरडी ) दूरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, फॅक्स नं.(०२४२३) २५८७७०.Website :http://www.shrisaibabasansthan.org * E_mail : saibaba_anr@sancharnet.in/ saisandesh_anr@sancharnet.inविभागाचे काम / विभागाच्या अखत्यारीखाली असलेल्या कार्यालयाचे काम :-भक्तांना सेवा देण्यासाठी स्वतंत्र विभागकार्यरत असून त्यांचे नांवापुढे कामे नमूद केली आहेत.

| अ.नं. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा (स्तर नमुद करावा ) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे. | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाऱ्याचे नांव नमूद करावे.) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारीत असल्यास विहित / सर्वसाधारण ) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची ( पदनाम व पत्ता ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **मंदीर विभाग** | श्री साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी देशाच्या व जगाच्या कानाकोपऱ्यातून भक्त येतात. या भक्तांची श्रींचे दर्शन व आरतीची सोय करणे. | दर्शनासाठी दर्शन रांगेची व्यवस्था केलेली आहे. दर्शन रांगेतून दर्शन दिले जाते. खास व अतिमहत्वाच्या व्यक्तीं, वृध्द इ.ना दर्शन, आरती करीता पास दिले जातात. | **श्री सुभाष कि.जगताप प्रशासकीय अधिकारी,** ०१) श्री प्रकाश खोत, अधिक्षक,मंदीर विभाग ०२) श्री दिलीप बकरे, पर्यवेक्षक,मंदीर विभाग | पहाटे ०५.०० मंदीर उघडते, पहाटे ५.१५ काकड आरती सकाळी ५.४५ते ६.००चे दरम्यान मंगल स्नान, स. ६.३० नंतर दर्शन सुरु. दु..१२.०० माध्यान्ह आरती, सुर्यास्त -सायं.धूपारती, रात्री १०.०० शेजारती, | मा. कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी प्रत्यक्ष अथवा टपालाने ७ दिवस. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, ता.राहाता., जिल्हा -अहमदनगर |
| | | अभिषेक पूजा (रविवार, गुरुवार, गर्दीचे दिवशी व उत्सवात अभिषेक पुजा बंद ठेवणेत येतात.) | एक व्यक्ती/पति-पत्निसाठी, पूजेची तिकीटे दररोज सकाळी ८ ते ९ या वेळेत अभिषेक हॉलमध्ये दिली जातात. **शुल्क रुपये- २५/-** | | अभिषेक पूजेची वेळ सकाळी ९.०० ते १०.०० | | |
| | | **सत्यनारायण पूजा** | एक व्यक्ती/ पति-पत्निसाठी संगणकाद्वारे पावती आदले दिवशी दुपारी ०३.०० वाजेपासुन पुजेचे वेळेपुर्वी पर्यंत . **शुल्क रुपये- ५०/-.** | | पहिली बॅच स. ८ ते ९ दुसरी बॅच स १०.३० ते ११.३० तिसरी बॅच दु. १ ते २ ( गर्दीनुसार) प्रत्येक बॅचला फक्त १०० तिकीटे देणेत येतात. | | |
| ०२ | **प्रकाशने विभाग** | श्री साईबाबा विषयी विविध भाषेतील पुस्तके, फोटो,कॅसेट, सी.डी, कॅलेंडर्स व डायरी इ.संस्थान प्रकाशने भक्तांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. | प्रकाशने विभागातील विक्री कांऊटरवर भक्तांनी समक्ष मागणी केल्यास उपलब्धेनुसार त्वरीत दिले जातात.तसेच आवश्यक रक्कम आगाऊ पाठविल्यास टपालाव्दारे पाठविणेत येतात. | **श्री सुभाष कि.जगताप प्रशासकीय अधिकारी,** श्री पी.व्ही.कुलकर्णी, प्रकाशने विभाग ,प्रमुख. | उपलब्ध असलेले संस्थान प्रकाशित पुस्तके,फोटो , कॅसेट, सी.डी.,दैनंदिनी,दिनदर्शिका इत्यादी मागणीनुसार कार्यालयीन वेळेत समक्ष दिले जातात. तसेच मागणी केल्यास पोष्टाव्दारे पाठविली जातात. व्ही.पी.पी. ने पाठविली जात नाही. | ------"-------- | ------"-------- |
| ०३ | **बांधकाम विभाग** | श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणाऱ्या भक्तांचे निवासासाठी निवासस्थाने, इमारती, तसेच रस्ते, ड्रेनेज , मंदीर परिसरातील विविध बांधकाम विषयक कामे करणे. | मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व का.अधिकारी यांचे आदेशानुसार नवीन बांधकामे तसेच इतर आवश्यक सुविधा करण्यात येतात. | **श्री सुभाष कि.जगताप प्रशासकीय अधिकारी,** ०१)श्री आर.बी.आहेर, उपमुख्य,अभियंता,बांधकाम ०२) श्री जोरी एस.एस. ज्यु.इंजिनिअर, ०३) श्री देसाई डी.एस. ज्यु.इंजिनिअर, | मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व मा.का.अ. यांचे आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते. | ------"-------- | ------"-------- |
| ०४ | **पाणी पुरवठा** | श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणाऱ्या | पाणी पुरवठा होईल ,अशी व्यवस्था केलेली | **श्री सुभाष कि.जगताप** | २४ तास पाणी पुरवठा होणेसाठी ३ शिफ्टमध्ये | ------"-------- | ------"-------- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भक्तांना पिण्यास स्वच्छ पाणी उपलब्ध करुन देणे, तसेच प्रसादालय विभाग,चौकशी निवासस्थान , रुग्णालय इ. ठिकाणी वेळेवर व पुरेसा पाणी पुरवठा करणे | आहे. | **प्रशासकीय अधिकारी,** श्री प्रल्हाद गं.शेळके पाणी पुरवठा, विभाग प्रमुख. | कर्मचाऱ्यांचे नियोजन केलेले आहे. | | |
| **०५** | **संरक्षण विभाग** | साईभक्तांना श्रींचे दर्शनाकरीता योग्य मार्गदर्शन करणे, भक्तांना श्रीचे दर्शन, आरती शांततेने मिळेल याची दक्षता, तसेच भक्तांच्या व संस्थानच्या मालमत्तेचे संरक्षण करणे. | संस्थानचे प्रचलित व रुढ पध्दतीनुसार दर्शन व आरती तसेच संरक्षण व मार्गदर्शन करणेत येते. | **श्री सुभाष कि.जगताप प्रशासकीय अधिकारी,** श्री ढिकले, आर. टी. संरक्षण विभाग प्रमुख. | २४ तास संरक्षण व्यवस्था व स.५ ते रात्री १०.३० पर्यत दर्शन व आरतीबाबत मार्गदर्शन करणेत येते. त्याबाबत संरक्षण कर्मचारी व सुपरवायझर इ.चे डयुटया लावलेल्या आहेत. | -----"---- | -----"--------- |
| **०६** | **बगीचा विभाग** | मंदिर परिसर व इतरत्र बगीचा ,तयार करणे, शोभेची झाडे लावणे, श्रींची पुजा,आरतीसाठी फुले,हार पुरविणे. | वेळचे वेळी कामे केली जातात. | **श्री सुभाष कि.जगताप प्रशासकीय अधिकारी,** श्री भणगे, बगीचा, पर्यवेक्षक | संबंधीत विभागास आवश्यक असेल,त्यावेळी सेवा दिली जाते. | -----"----- | -----"--------- |
| **०७** | **शै.संकुल** | शिरडी व परिसरातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना इग्लिश मेडिअम स्कुलमध्ये अल्पदरात शिक्षण. तसेच मुलींकरीता कन्या विद्यामंदीर मध्ये शासनाचे निर्णयानुसार मोफत शिक्षण दिले जाते. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना आय. टी.आय.मार्फत प्रशिक्षण दिले जाते. | स्कुल कोड प्रमाणे कार्यवाही. | **श्री प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी,** सौ.झेड. व्ही. इनामदार, मुख्याध्यापिका, श्रीमती चव्हाणके,एन.बी मुख्याध्यापिका, श्री पटणे,एस.बी. प्राचार्य. | कार्यालयीन ठरलेल्या वेळेनुसार कामकाज चालते. इंग्लिश मेडिअम स्कुल, कन्या विद्यामंदीर --"--- आय.टी.आय. --"----- | -----"----- | -----"--------- |
| **०८** | **वाहन विभाग** | साईभक्तांना श्रींचे दर्शन, आरतीसाठी नविन भक्त निवास स्थान ते मंदीर परिसर, प्रसादालय इ.ठिकाणी ने आण करणेकरीता मोफत बस सेवा. तसेच नगरसुल रेल्वे स्टेशन ते शिरडी व परत शिरडी ते नगरसुल रेल्वे स्टेशन येथून भक्तांना शिरडी येथे ने आणणे कामी अल्पदरात बस सेवा. | मंदीर परिसरात ने आण विनामुल्य असल्याने कागदपत्र नाही. | **श्री प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी,** श्री बा.भा.शिंदे, प्र.वाहन विभाग प्रमुख. | १)कार्यालयीन वेळैत २)नगरसुल रेल्वे स्टेशनसाठी दुपारी ०३.३० व नगरसुल ते शिरडी येथे रेल्वे नगरसुल स्टेशनवर येण्याच्या वेळेनुसार बसेस सुटतात .सदर व्यवस्था रेल्वेचे वेळापत्रकानुसार करणेत आलेली आहे. | -----"------ | -----"--------- |
| ०९ | जनसपर्क कार्यालय | संस्थानचे देणगीदार,अपंग,दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती, तसेच मुख्य अतिथी आदींची दर्शन व आरतीची व्यवस्था पास देऊन करण्यात येते.तसेच श्री साईबाबांच्या कार्याची व संस्थान साईभक्तांना देत असलेल्या सोयी सुविधांची माहिती वृत्तपत्र, मासिक ( प्रिंट मिडीया ) व दूरचित्रवाणीला (इलेक्ट्रॉनिक्स मिडीया) देणे, संस्थान उपक्रम , उत्सव आदिंची माहिती साईलिला या व्दैमासिकात प्रसिध्द करणे. | दर्शन व्यवस्था मंदीरातील दर्शन, आरती वेळेनुसार. | **श्री प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी,** श्री मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी, | कार्यालयीन वेळेत. | -----"--------- | -----"--------- |
| १० | विद्युत विभाग | मंदीर व परिसर, भक्तनिवास स्थान, प्रसादालय ,रुग्णालये, चहा कॅन्टीन, इ.ठिकाणी अखंड विद्युत पुरवठा करणे. | सतत विद्युत पुरवठा राहील,याची दक्षता घेणे. | श्री प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी, श्री वि.ग.रोहमारे, विद्युत विभाग प्रमुख, | २४ तास तिन्ही शिप्टमध्ये कर्मचारी नियोजन केलेले आहे. | -----"--------- | -----"--------- |
| ११ | माहिती | श्री साईबाबा विषयी | इंटरनेटवर सेवा | **श्री प्र.प्र.देशपांडे,** | कार्यालयीन वेळेत . | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तंत्रज्ञान | विविध भाषेतील पुस्तके /फोटो / आरती व कॅसेट इ. तसेच संस्थान भक्तांना देत असलेल्या सोयीबाबत वेबसाईट, ई-मेल वर भक्तांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. | उपलब्ध . | **प्रशासकीय अधिकारी,** ०१) श्री औटी,ए.आर. माहिती तंत्रज्ञान प्रमुख, ०२) श्री आर.व्ही.गंलाडे. | | **------''--------** | **------''--------** |
| १२ | लेखाशाखा | श्री साईभक्तांनी दिलेली विविध प्रकारची देणगी (रोख रक्कम,सोने,चांदी, वस्त्र ,वस्तु इ.) कार्यालयीन वेळेत स्विकारली जाते. मनिऑर्डर, चेक, डी.डी. पोष्टाव्दारे /समक्ष स्विकारले जातात. (तसेच आंध्र बँक,शाखा शिरडी मार्फत अन्नदान स्किम राबविली आहे.) | कार्यालयीन वेळेत. क्रेडिट व डेबीट कार्डद्वारे स्टेट बँक व आंध्र बँकेच्या सर्व ए.टी.एम वर संस्थान साठी देणगी रक्कम स्विकारली जाते. | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी,** ०१) श्री जाधवर,एच.एस. मुख्य लेखाधिकारी, ०२) श्री ए.एम.काळे, लेखाधिकारी. | सकाळी ०६ ते रात्री १० पर्यंत देणगी कांऊटरवर स्विकारणेत येते.तसेच इतर कामे कार्यालयीन वेळेत करणेत येतात. | **------''--------** | **------''--------** |
| १३ | श्री साईनाथ रुग्णालय | साईभक्त व परिसरातुन येणा-या रुग्णांना अल्पदरात वैद्यकीय सेवा दिली जाते.आवश्यकतेनूसार अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जातात. | कागदपत्रांची आवश्यकता नाही. | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी,** डॉ.सौ.पेंडसे,ए.एस. वैद्यकीय अधिक्षीका | दररोज ओ.पी.डी. सकाळी ८.३० ते १३.३० व दुपारी ०४.०० ते ०६ , तातडीच्या सेवा २४ तास. | **------''--------** | **------''--------** |
| १४ | श्री साईबाबा हॉस्पीटल | साईभक्त व परिसरातून येणा-या रुग्णांना अल्पदरात सेवा दिली जाते. आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया केल्या जातात. | कागदपत्रांची आवश्यकता नाही. | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी,** डॉ.टिंगरे, वैद्यकीय संचालक | ओ.पी.डी. सकाळी ९.३० ते १७.३० तातडीची सेवा २४ तास. | **------''--------** | **------''--------** |
| १५ | स्वच्छता विभाग | मंदिर व मंदिर परिसर, भक्तनिवासस्थाने, प्रसादालय, कँटीन, रुग्णालय, स्वच्छतागृहे इ.ठिकाणी स्वच्छता ठेवली जाते. | . | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी,** श्री.डी.के.झुरंगे, स्वच्छता विभाग प्रमुख | २४ तास सेवा. | **------''--------** | **------''--------** |
| १६ | मुंबई कार्यालय | भक्तांकडून येणा-या देणग्या स्विकारणे व त्यांना पावत्या देणे. श्रींच्या फोटो-पुस्तकांची विक्री करणे, श्री साईलिला मासिकांची वर्गणी घेऊन पावती दिली जाते व त्यांना पोष्टाने साईलिला अंक पाठविले जातात. | देणगी दिल्यानंतर पावती दिली जाते. श्रींचे फोटो-पुस्तके विक्रींची पावती दिली जाते. साईलिला द्वै-मासिकाच्या वर्गणीची पावती दिली जाते. | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी,** श्री.तु.गो.माणिक, अधिक्षक, मुंबई कार्यालय. | देणगी पावती त्वरीत दिली जाते. साईलिला व्दैमासिक अंकासाठी पावती केलेवर २ महिन्यानंतर टपालाव्दारे मासिक पाठविले जातात. साईलिला वार्षिक वर्गणी रु.५०/-, आजीवन सभासद भारतात रु.१,०००/- व भारताबाहेरील देशात एका वर्षासाठी रु.१,०००/- | **------''--------** | **------''---** |
| १७. | प्रशासन शाखा- विधी विभाग (कार्यासन - २) | संस्थान मार्फत तसेच विरोधात दाखल झालेल्या विविध न्यायालयीन दाव्यासाठी वकिलामार्फत न्यायालयास माहिती पुरविणे.तसेच संस्थान स्थावर मालमत्तेबाबत नोंदी ठेवणे . | आवश्यकतेनुसार. | **श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी, श्री.सु.ना.गर्कल, विधी अधिकारी, कार्यासन नं. २** | न्यायालयीन आदेशानुसार विहित मुदतीत. | **------''--------** | **------''--------** |
| १८ | प्रसादालय | अ) साईभक्तांकरीता अल्प दरात प्रसाद भोजन बनवून ते वितरीत करणे. १० वर्षा खालील मुलास रु.२/- व १० वर्षापुढील व प्रौढास रु. ५/-आकार. ब) प्रसाद लाडू तयार करुन भक्तांना वितरीत करणे. **प्रति पॅकेट रु. १०/- एका पाकीटात ३ लाडु** क) अन्नपाकीटे (पुरी-भाजी-बर्फी) **प्रति पाकीट रु. ३/-** | साईभक्तांस प्रसाद भोजनाची संगणक/छापील तिकीटे दिली जातात. प्रसाद लाडु व अन्नपाकिटे कांऊटर्सवर वितरीत करणेत येतात. | **श्री.ई.एन.वाघ प्रशासकीय अधिकारी, श्री.सु.भ.पाटील, प्रसादालय अधिक्षक** | अ) प्रसाद भोजन सकाळी १०.०० ते रात्रौ १०.०० ब) लाडु प्रसाद वेळ स.६ ते रात्री १० पर्यंत. क) अन्नपाकीटे सकाळी ७ ते १०.०० | **------''--------** | **------''--------** |
| **१९** | **चहा कॅन्टीन** | भक्तांना खालील सेवा अल्पदरात उपलब्ध. चहा-रु.१/-,/कॉफी रु.१.५०,/ दुध - रु.१.५० .बिस्कीटे | छापील /संगणक प्रिंटेड कुपन | **श्री.ई.एन.वाघ प्रशासकीय अधिकारी,** श्री.रा.रं.शेळके, कँटीन विभाग प्रमुख | २४ तास सेवा. | **------''--------** | **------''--------** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कंपनी दराने. | | | | | |
| २० | **निवास स्थान** | शिर्डीस येणा-या भक्तांची अल्पदरात निवासव्यवस्था/लॉकरची सुविधा ,तसेच समुदायाने आलेल्या भक्तांची हॉलमध्ये निवासव्यवस्था केली जाते. | कार्यालयात आलेवर भक्तांनी नांवनोंदणी फॉर्मवर शिर्डी येथे आलेल्या कुटुंबियांची माहिती भरुन द्यावी लागते. | **श्री.ई.एन.वाघ प्रशासकीय अधिकारी, श्री.सी.बी.मुळे, अधिक्षक, चौकशी व निवासस्थान ,** | उपलब्ध असल्यास त्वरीत व रिक्त नसल्यास प्रतिक्षा यादीनुसार क्रमाने निवासाची व्यवस्था केली जाते. याकामी खोलीच्या ठरलेल्या आकारानुसार रक्कम घेऊन संगणक पावती दिली जाते. २४ तास सेवा. | ------"-------- | ------"-------- |
| २१ | **सा.भ.निवारा (५०० रुम)** | शिर्डीस येणा-या भक्तांची अल्पदरात निवासव्यवस्था/लॉकरची सुविधा ,तसेच समुदायाने आलेल्या भक्तांची हॉलमध्ये निवासव्यवस्था केली जाते. | कार्यालयात आलेवर भक्तांनी नांव नोंदणी फॉर्मवर शिर्डी येथे आलेल्या कुटुंबियांची माहिती भरुन द्यावी लागते. | **श्री.ई.एन.वाघ प्रशासकीय अधिकारी, श्री पी.बी.बोरावके, अधिक्षक, सा.भ.निवासस्थान** | उपलब्ध असल्यास त्वरीत व रिक्त नसल्यास प्रतिक्षा यादीनुसार क्रमाने निवासाची व्यवस्था केली जाते. याकामी खोलीच्या ठरलेल्या आकारानुसार रक्कम घेऊन संगणक पावती दिली जाते. २४ तास सेवा. | ------"-------- | ------"-------- |
| २२ | **साईबाबा धर्मशाळा (२०० रुम)** | शिर्डीस येणा-या भक्तांची अल्पदरात निवासव्यवस्था/ लॉकरची सुविधा ,तसेच समुदायाने आलेल्या भक्तांची हॉलमध्ये निवासव्यवस्था केली जाते. | कार्यालयात आलेवर भक्तांनी नांव नोंदणी फॉर्मवर शिर्डी आलेल्या कुटुंबियांची माहिती भरुन द्यावी लागते. | **श्री.ई.एन.वाघ प्रशासकीय अधिकारी, श्री.एम.एस.टाक, विभाग प्रमुख, श्री साईबाबा धर्मशाळा,** | उपलब्ध असल्यास त्वरीत व रिक्त नसल्यास प्रतिक्षा यादीनुसार क्रमाने निवासाची व्यवस्था केली जाते. याकामी खोलीच्या ठरलेल्या आकारानुसार रक्कम घेऊन संगणक पावती दिली जाते. २४ तास सेवा. | ------"-------- | ------"-------- |
| २३ | **सामान्य प्रशासन - कार्यासन - ५** | विविध राज्यातून उत्सवात व इतर कालावधीत येणा-या पालखीतील पदयात्रींची संस्थान नियमानुसार व उपलब्धतेनुसार निवास,भोजन व दर्शनव्यवस्था केली जाते. | पालखी संयोजकाने शिर्डीस येणेपुर्वी १५ दिवस अगोदर त्यांचे लेटरपॅडवर येणेबाबत व लागणा-या सुविधाबाबत लेखी कळविणे आवश्यक. | **श्री.सु.की.जगताप प्रशासकीय अधिकारी, ०१) श्री बी.डी.साबळे, आस्थापना अधिक्षक, ०२)** श्री बी.व्ही.जोशी, वरिष्ठ लिपीक, कार्यासन नं.०५. | शिर्डीत आलेनंतर व त्यांचे मागणी व उपलब्धतेनुसार निवास /प्रसाद / दर्शनव्यवस्था संस्थान नियमानुसार करण्यात येते. | ------"-------- | ------"-------- |
| २४ | **प्रशासन शाखा कार्यासन नं. ८ (सभासद व साईलिला)** | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे आजीव सभासद/आश्रय दाता झालेनंतर प्रत्येकवर्षी होणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी(दसरा) या उत्सवाचे अगोदर उत्सव नि.पत्रिका पाठविल्या जातात व उत्सवानंतर पोष्टाने उदिप्रसाद पाठविला जातो. | सभासद होणेकामी देणगी कार्यालयात छापील फॉर्म भरुन दिलेनंतर भरलेल्या रकमेची संगणकीय पावती दिली जाते. आजीव सभासद शुल्क रक्कम रु.२५१/- .आश्रयदाता रक्कम रु. १५००/- यासाठीच्या रक्कमा रोख पोष्टाद्वारे मनिऑर्डर, चेक, डि.डी व परकीय चलन याद्वारे तसेच क्रेडिट व डेबीट कार्डद्वारे स्टेट बँक व आंध्र बँकेच्या सर्व ए.टी.एम वर स्वीकारणेत येतात. | **श्री.आर.एस.साबळे, प्रशासकीय अधिकारी, ०१) श्री बी.डी.साबळे, आस्थापना अधिक्षक, ०२) श्री एस.आर.गोरक्ष, कार्यासन नं.८.** | कार्यालयीन वेळेत. | ------"-------- | ------"-------- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरची माहिती मा.प्रधान सचिव, विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुं.-३२, यांना पाठविणेस मान्यता देण्यात आली.

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१ गुंतवणूकी बाबत.**

**निर्णय क्र.९४२.** माहे डिसेंबर,२००६ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | आंध्र बँक ,शिर्डी (NPAY) | १.१२.२००६ | १७,१४,८७२.०० |
| ०२. | सिंडीकेट बँक,शिर्डी | ५.१२.२००६ | ६०,६७,७६२.०० |
| ०३ | युनियन बँक ऑफ इंडिया,शिर्डी | १९.१२.२००६ | १,५१,१३,४२५.०० |
| ०४ | आंध्र बँक ,शिर्डी | १९.१२.२००६ | १,५१,१३,४२५.०० |
| | | **एकूण :-** | **३,८०,०९,४८४.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ३.८०** कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

**(अ)** वरील अ.नं. १ अन्वये आंध्र बँक, शिर्डी ( नित्य प्रसादालय योजना ) यांचेकडील गुंतवणूकीची मुदत दि.०१.१२.२००६ रोजी संपत असुन मिळणारी रक्कम रु.१७,१४,८७२/- एवढी आहे. नित्य प्रसादालय या योजनेअंतर्गत सदरची रक्कम ही आंध्र बँकेकडेच पूनर्गुंतवणूक करावी लागणार आहे.

सदर गुंतवणूक करतांना त्यांचेकडील नित्य प्रसादालय अन्नदान योजनेच्या बचत खाती शिल्लक असलेली रक्कम साधारणतः रु.१२ लाख एवढी एकत्रीत करुन पुर्णांकीत रक्कम रु.३० लाख त्यांचेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतवणूक करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**(ब)** अ.नं. २ ते ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु. ३,६२,९४,६१२/- मात्र गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. संस्थानला स्थानिक ( शिर्डी, राहाता, कोपरगांव, श्रीरामपूर ) व नासिक येथील राष्ट्रीयीकृत बँकेकडून मोठया प्रमाणावरील आवश्यकतेनुसार सेवा मिळत आहे. गुंतवणूकीसाठी उपलब्ध असलेल्या रकमेची गुंतवणूक ही अशा सेवा देणा-या बँकांकडे झाल्यास संस्थानला पुढील कालावधीत चांगल्या प्रकारच्या सेवा त्यांचेकडून मिळत राहतील.

**(क)** संस्थानने यपूर्वी युटीआय म्युच्युअल फंडाच्या मास्टर व्हॅल्यु फंड-९८ मध्ये रक्कम रु.६६,११,३१८.२० एवढी गुंतवणूक केलेली आहे. सदरचा फंड हा पूर्णतः इक्विटी ( शेअर्सवर ) आधारीत असुन, गुंतवणूकीवर मिळणारे उत्पन्न हे शेअर बाजारातील चढ-उतारावर पूर्णतः अवलंबून असल्याने सदरची गुंतवणूक त्यांचेकडेचे ठेवावी किंवा काढुन घ्यावी याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मिळणेबाबत जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/३३००/२००६ दि.७ मार्च,२००६ अन्वये मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पस्तावित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२००६/२४३/(४३) का.सोळा, दि.२१ नोव्हेंबर,२००६ अन्वये त्यांनी संस्थानच्या विश्वस्त निधीची सुरक्षितता लक्षात घेऊन व अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन म्युच्युअल फंडातील शिल्लक गुंतवणूक तात्काळ काढूण घेण्यात येऊन राष्ट्रीयीकृत बँकेत अथवा सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात यावी असे निर्देशीत करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन युटीआय मास्टर व्हॅल्यु फंड-९८ या योजनेचे बाजारातील निव्वळ मालमत्ता मुल्य ( NAV ) विचारात घेऊन शिल्लक असलेल्या गुंतवणूकीची रक्कम काढुन घेऊन ती उच्चतम व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविता येईल.

**(ड)** माहे डिसेंबर मध्ये भक्तांची दरवर्षीच मोठयाप्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे देणगी रुपाने जमा होणारी रक्कमही मोठी असते. सध्या रुग्णालय व बांधकामाची बीले मोठया प्रमाणावर आदायगीसाठी येत आहेत. त्यासाठी व दैनंदिन खर्चासाठी आवश्यक असणारी रक्कम राखुन ठेवून गुंतवणूकीसाठी काही रक्कम उपलब्ध झाल्यास सदरची रक्कम ही उच्चतम व्याजदर देणा-या बँकेकडे गुंतवणूक करावी असे वाटते. अशाप्रकारे किती रक्कम उपलब्ध होऊ शकेल याबाबतचा अहवाल अलहिदा ठेवण्यात येईल.

तरी उपरोक्त **'अ' 'ब' 'क'** व **'ड'** मध्ये नमूद केल्याप्रमाणे गुंतवणूक करणेस व त्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकेचे व्याजदर मागवुन उच्चतम व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील तपशीलानुसार प्राप्त होणारी रक्कम गुंतवणूक करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांना अधिकार देण्यात आले. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ औषधे खरेदी बाबत.**
**निर्णय क्र.९४३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३. तातडीचे औषधे खरेदी बाबत**
**निर्णय क्र. ९४४.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ फूड सर्व्हिस ट्रॉली खरेदी बाबत**
**निर्णय क्र. ९४५.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५ संस्थान कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय बीलाची परतफेडीची (Reimbursment) रक्कम वाढविणे बाबत**
**निर्णय क्र. ९४६.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६ हॉस्पिटलमधील विविध कामांबाबत**
**निर्णय क्र. ९४७.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७ ऑनकोलॉजी कॅम्पच्या डायग्नोस्टीक टेस्टसाठी लागणारे केमिकल व किटस खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ९४८.**श्री साईबाबा रुग्णालयात मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे सूचनेवरुन दि.२ व ३ डिसेंबर २००६ रोजी Oncology Camp आयोजित करण्यात आलेला आहे. सदरच्या Oncology Camp मध्ये डायग्नोस्टिक टेस्ट करणेकामी प्रयोगशाळा विभागाने दि.१०/११/२००६ च्या डि.पी. अन्वये खालीलप्रमाणे किट्स व केमिकल्सची मागणी केलेली आहे.

## (अ)यापूर्वी खरेदी केलेली केमिकल्स व किट्सचे मंजूर दर

| अ.नं. | केमिकल्सचे नाव | मागणी | मंजुर दर | एकुण किंमत | पुरवठा धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | Syringe (१०ml) | १००० | ३.८० | ३७९६.०० | कांचन ड्रग्ज, पुणे |
| २ | Auto Clean २ Lit. | १० Drum | ५९८.४० | ५९८४.०० | यूनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक |
| ३ | Auto Lyser ५००ml | १० Drum | २६१६.३८ | २६१६३.८० | यूनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक |
| ४ | Slides (Regular) १ x ५० slides | १०००० | ०.६१ | ६०८०.०० | जे.एस.पी.,नाशिक |
| ५ | Cover Slips (Big) Large २२ x २२ m | १०००० | १.५९ | १५९१९.९२ | विजय ट्रेडींग कंपनीए श्रीरामपूर |
| ६ | Auto dil २० Lit. | ५ Drum | १७३६.२६ | ८६८१.३० | यूनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक |
| ७ | Urea Med - ५००ml | ५ Kit. | १२१०.०० | ६०५०.०० | एस.एस. मार्केटींग, औरंगाबाद |
| ८ | Glucose GOD POD ५ x ५००ml | २ | २१२७.०० | ४२५४.०० | एस.एस. मार्केटींग, औरंगाबाद |
| ९ | Total Bilurubin (२x१२५ml) | २ | १६०८.०० | ३२१६.०० | सिध्दी ,औरंगाबाद |
| १० | SGOT ५x२०ml | २ | १०१३.७६ | २०२७.५२ | कांचन ड्रग्ज, पुणे |
| ११ | SGPT ५x२०ml | २ | १०१३.७६ | २०२७.५२ | कांचन ड्रग्ज, पुणे |
| १२ | Alk. Phosphate २५x२ml | ८ | ६६०.०० | ५२८०.०० | एस.एस. मार्केटींग, औरंगाबाद |
| १३ | Uri - Sticks | १० boxes | ३३०.०० | ३३००.०० | जे.एस.पी.,नाशिक |
| १४ | Multi Sticks | १० boxes | ९८०.०० | ९८००.०० | कपिल मेडीकल, जळगाव |
| १५ | T. Protein २x२५०ml | २ | १०७७.०० | २१५४.०० | सिध्दी ,औरंगाबाद |
| १६ | T. Albumin (BCG) २x२५०ml | २ | १०७७.०० | २१५४.०० | सिध्दी, औरंगाबाद |
| १७ | Field (A) Stain ५०० ml | १ | १२५.६९ | १२५.६९ | जे.एस.पी.,नाशिक |
| १८ | Field (B) Stain ५००ml | १ | १२५.६९ | १२५.६९ | जे.एस.पी.,नाशिक |
| १९ | Leishmans Stain ५००ml | २ | १३९.६५ | २७९.३० | जे.एस.पी.,नाशिक |
| २० | Direct Bilurubin २ x २५०ml | २ | २३३३.०० | ४६६६.०० | सिध्दी ,औरंगाबाद |
| | | | **Total in Rs.** | **११२०८४.७४** | |

## (ब)कोटेशन मागवून तातडीने खरेदी करावयाचे केमिकल्स व किट्स

| अ.नं. | केमिकल्सचे नाव | मागणी | मंजुर दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Bone Marrow Aspiration Needles | २५ | १४५०.०० | ३६२५०.०० |
| २ | Bone Marrow Biopsy Needles (J Needle) | २५ | ७३०.०० | १८२५०.०० |
| ३ | Liver Biopsy Needles | २५ | १६८०.०० | ४२०००.०० |
| ४ | Rapid Papstain Kit | ४ | ८००.०० | ३२००.०० |
| ५ | Spatulla (For Pap Smear) | २०० | १५.०० | ३०००.०० |
| ६ | Fixative (For Pap Smear) | २०० | १७५.०० | ३५०००.०० |
| ७ | Biopsy Bottles (Plain Bulbs) | ५०० | ४.०० | २०००.०० |
| ८ | Bouins Fluid | १.५ Lit. | १०००.०० | १५००.०० |
| ९ | Couplin Jar | ५०० | ४०.०० | २००००.०० |
| १० | Methanol | ५Lit. | ४८०.०० | २४००.०० |
| ११ | LP Needle | ५ | १२.७५ | ६३.७५ |
| १२ | Creat Fix Kinetic | ५ Kit. | २५२.०० | १२६०.०० |
| १३ | Bioclean १ Lit Jar. | १ | ३८०.०० | ३८०.०० |
| | | | **Total in Rs.** | **१६५३०३.७५** |
| | | | **Total of A + B =** | **२७७३८८.४९** |

वरील "अ" मध्ये नमूद केलेली केमिकल्स व किट्स हि सन २००६-०७ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करता येतील व त्यासाठी रु. १,१२,०८४.७४ इतका खर्च अपेक्षित आहे. तर "ब" मध्ये नमुद केलेली केमिकल्स व किट्स आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने कोटेशन ही फॅक्स/बंद पाकीटात मागवून खरेदी करावी लागतील त्यासाठी अंदाजे रु.१,६५,३०३.७५ इतका खर्च अपेक्षित

आहे. दोन्हीही मिळून सदरचे खरेदीकामी अंदाजे रु. २,७७,३८८.४९ इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ वैष्णोदेवी, कटरा (जम्मू कश्मिर) येथे जागा उपलब्ध करवून भविकांसाठी निवासस्थान उभारणे बाबत.**

**निर्णय क्र. ९४९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत शिर्डी शहरासाठी भूयारी गटर योजना राबविणेकामी १० टक्के लोकवर्गणीबाबत.**

**निर्णय क्र. ९५०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथे संस्थान मार्फत साईभक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र. ९५१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ शिर्डी स.न.१०७,१०८,१०९ मधील नियोजित साईआश्रम प्रकल्पाचे Project Management Consultancy (PMC) सेवेकरीता आलेल्या प्रस्तावांबाबत .**

**निर्णय क्र.९५२.** शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई (तामिळनाडू) यांचेमार्फत साईभक्तांचे निवासाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे शिर्डी येथील स.नं.१०७,१०८,१०९ मध्ये साईआश्रम प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प हा शिर्डी साईट्रस्ट यांचे देणगीतून उभारण्यात येणार आहे. याबाबत संस्थान व शिर्डी साईट्रस्ट यांचेमध्ये करार झालेला आहे. या प्रकल्पाकरीता Project management consultancy (PMC) चे सेवेबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/१०/२००६ रोजीचे सभेत निर्णय झालेला आहे. त्यानुसार PMC ची सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांबाबत मा.श्री.के.व्ही.रमणी यांना माहिती देणेत आली. मा.श्री.के.व्ही.रमणी यांनी खालील कंपन्यांकडून ऑफर्स मागविणेबाबत सहमती दर्शविली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | Archivista Engineering Projects Limited, Pune | 02. | Kirloskar Consultants, Pune |
| 03. | TCE Consulting Engineers Ltd., Pune | 04 | THDC Limited, Mumbai |

सदर प्रकल्पाची किंमत रुपये ५० ते ६० कोटी मात्र अंदाजे गृहित धरण्यात आलेली आहे. अशाप्रकारे PMC Consultant ची नेमणूक करणेबाबत अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीबाबत सर्वसाधारण स्वरुपाचे कामासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन विहित नमून्यात निविदा मागविणेत येतात.

वरील प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने त्याकरीता Project Management Constultant ची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेसाठी दि. ०१/११/२००६ चे टिपणीव्दारे मान्यता घेण्यात आली. त्यानुसार दि. ०६ नोव्हेंबर २००६ रोजी दै.इंडीयन एक्सप्रेस,पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार दि. १३ नोव्हेंबर २००६ रोजी प्रस्ताव सादर करणेची अंतीम मूदत ठेवण्यात आली होती. परंतू TCE Consulting Engineers Ltd., Pune यांनी त्यांचे दि. ०८ नोव्हेंबर २००६ रोजीचे ई- मेल पत्राव्दारे प्रस्ताव सादर करणेकामी ०७ दिवसांची मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली.

या संदर्भात शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे श्री.के.व्ही.रमणी यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी प्रस्ताव सादर करणेकामी वार सोमवार, दि. १३ नोव्हेंबर २००६ रोजी सांयकाळी ०५ वाजेपर्यंत असलेली मूदत, वार सोमवार दि. २० नोव्हेंबर २००६ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत वाढविणेस हरकत नाही असे कळविले.

त्यानुसार प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमणेकामी प्रस्ताव सादर करण्याची मूदत दि. २० नोव्हेंबर २००६ रोजी सांयकाळी ०५ वाजेपर्यंत वाढविणे बाबतचे शुध्दीपत्रक वर्तमानपत्रात (Indian Express) दि. १०.११.२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार विहित मूदतीत खालील कंपन्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Applicants Name | Inward No | Date | No.of Sealed Envelopes. |
|---|---|---|---|---|
| 01 | TCE Consulting Engineers Ltd., Pune | 34467 | 20/11/2006 | 01 |
| 02 | Kirloskar Consultants Ltd, Pune | 34469 | 20/11/2006 | 01 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03 | M/s. Tare & Associates, Nashik | 34468 | 20/11/2006 | 01 |
| 04 | Without Name & Address (Dorsch Consultants, India Pvt. Ltd. Mumbai) | 34470 | 20/11/2006 | 01 |

उपरोक्तप्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडणेत आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :

| Sr. No. | Name and Address of Tenderer | Details of Applications Security | Remark |
|---|---|---|---|
| 01 | TCE Consulting Engineers Ltd., Pune | State Bank of India DD No.242891/13.11.06 | Rs.41,00,000/- for Review Engineering. Rs.1,03,39,000/- for Project Management. Exclusive of all travel and incidental expenses. |
| 02 | Kirloskar Consultants Ltd, Pune | Bank of Maharashtra DD No.306146/18.11.06 | Fees – 1.53% of the total contract value. Service Tax Extra. |
| 03 | M/s. Tare & Associates, Nashik | Union Bank of India DD No.371656/18.11.06 | Fees – 1.25% Service Tax Extra. Offer Negotiable. |
| 04 | Dorsh Consultants India Pvt. Ltd., Mumbai | State Bank of India DD No. 534982/16.11.06 | Fees – 1.35 % Service Tax Extra. Plus Rs. 3,00,000/- for Review of design and Rs.3,00,000/- for finalisation and award of contract. Offer Negotiable. |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता व इतर अनुषंगिक माहिती शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (श्री.के.व्ही.रमणी ) यांचेकडेस अभिप्रायासाठी पाठवून, त्यांचेशी चर्चा-तथा-विचारविनिमय करुन, त्यांचे अभिप्राय-तथा-मार्गदर्शनानुसार नियोजित साईआश्रम प्रकल्पासाठी Project Management Consultancy सेवेकरीता नेमणूक करण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ कनकुरी येथील संस्थानचे पाणीपुरवठा योजनेच्या भिंतीलगत असलेल्या म्हसोबा मंदिराचे बांधकाम करणे बाबत.**

**निर्णय क्र. ९५३.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ नगर-मनमाड रोड डिव्हायडर सुशोभिकरण करणे बाबत.**

**निर्णय क्र.९५४.**दिनांक २१.१०.२००६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी नगर मनमाड रोड डिव्हाडर सुशोभिकरण करणेकामी सुचना दिलेल्या आहेत. साईप्रसाद बिल्डिंग ते भक्तनिवासस्थान पर्यंत रोड डिव्हायडर लांबी १४२५ मी. व रुंदी १.४० मी. आहे. नगर मनमाड रोड डिव्हाडरमध्ये लॉन लावून त्यामध्ये शोभेची रोपे लावावयाची आहेत. यासाठी पुणे येथील गिरमे फार्म यांच्याकडे तयार लॉन व शोभेची रोपे याबाबत चोकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कळविलेल आहेत.

| अ.नं. | तपशील | संख्या | दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | लॉन - (साईज २'x१') | १००० नग | २० प्रती नग | २,००,०००/- |
| ०२ | फायकस बेंनझेमींना - (साईज ७'x१०') | २४० रोपे | १५० प्रती नग | ३६,०००/- |
| ०३ | सनराईज डुंरटा (साईज १'x१.५') | १३०० रोपे | ८ प्रती नग | १०,४००/- |
| ०४ | पोयटा | ७५ ट्रीपा | ६५०/- | ४८,७५०/- |
| ०५ | शेणखत | १० ट्रीपा | १३००/- | १३,०००/- |
| | | | **एकूण रुपये** | **३,०८,१५०/-** |

उपरोक्तप्रमाणे नगर मनमाड रोड डिव्हाडर सुशोभिकरणाचे गिरमे फार्म,पुणे यांचेंकडून करुन घेण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये ३,०८,१५०/- चे मान्याता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.तसेच सदर डिव्हायडरला रहदारीचे नियमाप्रमाणे रंगकाम करुन देणेस व त्याकामी येणारे योग्य त्या खचार्स मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्री साईपदनंदा सत्संग बंगलोर व्दारा प्रकाशित श्री साईबाबांचे कन्नड भाषेतील पुस्तके संस्थानव्दारे प्रकाशित करणे बाबत**

**निर्णय क्र. ९५५.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ श्री साईबाबा दैनंदिनी /दिनदर्शिका २००७ भेट देणे बाबत**

**निर्णय क्र. ९५६.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी/ दिनदर्शिका २००६ हया मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१२.२००५ रोजीच्या सभेतील आयत्या वेळच्या विषय नं. १९ निर्णय क्र.७९४ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांना श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ चे सिक्स व शिंगल शिटर प्रत्येकी १०० नग भेट म्हणून देण्यात आल्या होत्या.

चालू वर्षीही सन- २००७ च्या श्री साईबाबा दैनंदिनी- १०० व दिनदर्शिका (सिक्स शिटर) १०० नग व दिनदर्शिका (सिंगल शिट) १०० नग याप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांना भेट म्हणून देण्यात याव्या असे वाटते याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.सदस्य असे १७ व मा. कार्यकारी अधिकारी याप्रमाणे एकूण १८ यांना दैनंदिनी प्रत्येकी १०० नग x १८ = १८०० नग, दिनदर्शिका (सिक्स शिटर) प्रत्येकी १०० नग x १८ = १८०० नग व दिनदर्शिका (सिंगल शिट) प्रत्येकी १०० नग x १८ = १८०० नग याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी/ दिनदर्शिका २००७ भेट म्हणून देणेस व भेट म्हणून देण्यात येणारे दैनंदिनी/ दिनदर्शिका सिक्स व सिंगल शिटर २००७ संभावना खाते खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ संस्थान प्रकाशित श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल सीट जादा छपाई बाबत**

**निर्णय क्र. ९५७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दिनदर्शिका -२००७ (सिंगल सिट) १,००,००० नग छपाई दर रुपये ४.८५ प्रमाणे जा.नं. एसएसएस-वशी-प्रकाशने-१३२३६-२००६ दिनांक २५.९.२००६ अन्वये मे.राधारमण प्रिंटींग प्रेस मुंबई यांना छपाई कामाचा आदेश देण्यात आलेला आहे.

मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई यांनी "श्री साईबाबा दिनदर्शिका-२००७ सिंगल सीट"१,००,००० नगाची छपाई करुन दिनदर्शिका संस्थानचे भांडार विभागत जमा केले आहे. त्यानुसार दिनांक २.१०.२००६ पासून श्री साईबाबा दिनदर्शिका विक्री करण्याचे काम चालू करण्यात आले आहे. दिनदर्शिकेची विक्रीस साईभक्तांचा उत्स्पूर्त प्रतीसाद मिळाल्याने सदर दिनदर्शिकेचा उपलब्ध साठा संपत आलेला आहे. तथापि श्री साईबाबा दिनदर्शिका - २००७ (सिंगल सिट)यास भक्तांची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच पूढील वर्षानिमित्त सदर दिनदर्शिकेस भक्ताची वाढती मागणी लक्षात घेता वरील संदर्भीय छपाई आदेशातील अट क्रमांक १३ नुसार संस्थानला जादा नगांची आवश्यकता भासल्याने त्याच अटी व शर्तीने १,००,००० नग श्री साईबाबा दिनदर्शिका-२००७ (सिंगल सिट) चे मागील छपाईप्रमाणे छपाईचे काम करुन घेणे गरजेचे आहे.

तरी न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई यांचेकडून श्री साईबाबा दिनदर्शिका-२००७ (सिंगल सिट) १,००,००० नग मंजूर दर रुपये ४.८५ प्रमाणे छपाईचे काम करुन घेणेस व त्याकामी येणारे एकूण रुपये ४,८५,०००.००चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही - प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७ पाणीपूरवठा विभागामार्फत शांतीनिवास इमारतीवर देणगी आलेला R.O. प्लॅन्ट बसविणे बाबत**

**निर्णय क्र. ९५८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८ न.पा.वाडी ता.राहता यांना पाण्याचे पाईपलाईनसाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र. ९५९.** मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांचे दि.२४/०४/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे की, "महाराष्ट्र जिवन प्रधिकरणामार्फत शिर्डी संस्थान करीता पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. शिर्डी जवळील पिंपळवाडी व न.पा.वाडी येथील पाण्यात फार मोठया प्रमाणात क्षार असून सदरचे पाणी पिण्यास योग्य नाही. मौजे पिंपळवाडी व न.वा.वाडी येथील ग्रामस्थांनी शिर्डी पाणिपुरवठा योजनेतुन त्यांच्या गावांना पिण्याचे पाणी देणेबाबत वेळोवेळी मागणी केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जिवनप्राधिकरणाने समक्ष पहाणी करुन अंदाजपत्रक तयार केलेले आहे. पिंपळवाडी गांव हे शिर्डी नजिक असुन शिर्डी येथे व्यवसाय व कामधंदा करणारे बहुसंख्य लोक हे पिंपळवाडी येथे राहात असुन पिंपळवाडी येथील पाणी क्षारयुक्त आहे.

शिर्डी येथुन सध्या पिंपळवाडीसाठी ३" व्यासाच्या पाईपद्वारे पाणी पुरविले जाते. ते पाईप बदलुन त्याठिकाणी ४" पी.व्ही.सी पाईप टाकुन पिंपळवाडी येथे संपवेल घेवून तेथुन ३" पी.व्ही.सी. पाईपने पाणी पुरविण्याचे अंदाजपत्रक रु.२१ लाखाचे तयार केलेले आहे. कृपया सदर कामाकरीता साई संस्थान मार्फत रु.२१ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, "अशी विनंती केलेली आहे.

तरी सध्या नगरपंचायत शिर्डी यांचे विस्तारीत पाणीपुरवठा योजनेचे काम चालु आहे. या नविन पाणीपुरवठा योजनेत वरील मागणीचा समावेश करुन निधी उपलब्ध करुन देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९ प्रसादालय परिसरात वारणा दूध संघास स्टॉलकामी जागा देणे बाबत.**

**निर्णय क्र. ९६०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२० मानधन व फिक्स वेतनावरील कर्मचाऱ्यांचे पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्याबाबत.**

**निर्णय क्र. ९६१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१ शिर्डी महोत्सव २००६ बाबत.**

**निर्णय क्र. ९६२.** सन २००५ सालात दि.१८/१२/२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ८०३ अन्वये " शिर्डी महोत्सव - २००५ हा दि.२९/१२/२००५ ते दि.३१/१२/२००५ अखेर तीन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. मागिल वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. ८०,५७०/- (अक्षरी रु. ऐंशी हजार पाचशे सत्तर मात्र) खर्च आलेला आहे. सन २००५ मध्ये सदरचा कार्यक्रम तीन दिवस साजरा करण्यात आला होता.

याहीवर्षी मागिल वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने १२ मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००६ ते दि.३१/१२/२००६ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून पत्रे आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | तपशील | दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | पुनम खन्ना, इ-३५१, ग्रेटर कैलाश-II, न्यु दिल्ली-११००४८, मो.नं. ०९८११०३४८७२ फोन नं. २९२१७८८१ / २९२२७७०८ | साई भजन कार्यक्रम.- सदरचा कार्यक्रम उत्सवात झालेला आहे. | ३१/१२/२००६ | रु. ३१,०००/- |
| ०२. | श्री विनय रट्टा, जी-१६, लजपत नगर-I, न्यु दिल्ली-११००२४ मो.नं. ०९८९११६६६४५ / ०९३५००७४४२४/ ०९३५०१४५९५३ | साई भजन कार्यक्रम.- सदरचा कार्यक्रम उत्सवात झालेला आहे. | ३१/१२/२००६ | रु. ४१,०००/- |
| ०३. | श्री कमलेश उपाध्याय हरिपूरी, डी-१४, पहली मंजिल, आचार्य निवास, नेवीनगर, कुलाबा, मुंबई - ४०० ००५, फोन नं. ०२२-२२१५४२६६ मो.नं. ०९३२४४९७६३४ | भक्ति संगीत कार्यक्रम | | रु. २१,०००/- |
| ०४. | साई द्वारकामाई, ए-२/५६, औदुंबर छाया को.ऑ.हौ.सो., आय.सी.कॉलनी रोड, बोरिवली(प), मुंबई-४०० १०३ मो.नं. ९८६९१३४४१७ | साई भजन कार्यक्रम | | रु. ६०,०००/- |
| ०५. | श्री अजित परब, २०५, आविष्कार एम्प्रेस, चितळे पथ, दादर,मुंबई-४०००२८ | मराठी भावगीत व भक्तिगीत | | रु. ४५,०००/- |
| ०६. | श्री देवेंद्र नेने, स्वरांकित, ४१४, ४ था मजला, शास्त्री हॉल, नाना चौक, जे.डी.मार्ग, ग्रँट रोड(प), मुंबई-४००००७ मो.नं.९८२११३८७७३/९८२१९३१७३१ | संगित संध्या | | रु. ३५,०००/- |
| ०७. | सुश्री सुमन वर्मा, सचिव, संगितका, सेक्टर-IV, २५१- आर.के.पुरम, न्यु दिल्ली - ११० ०२२, टेली.नं.२६१०२६६३/२६१९६९१५ मो.नं. ९८११३७९७०९ | हरि अनंत हरि कथा अनंत यावर नृत्य अविष्कार. | | रु. २५,०००/- |
| ०८. | श्री प्रभंजन मराठे, ए विंग, २०३, कनक कुटीर अपार्टमेंटस्, दुर्गा सोसायटीच्या बाजूला, पंचायत विहिरीजवळ, ठाकुर्ली डोंबीवली (पु), मुंबई -०१ दूरध्वनी - २५१-२४५१५७०/२४७०४२७ | अमृताची गोडी, मराठी कार्यक्रम | २९,३०,३१-१२-२००६ | रु. ३७,०००/- |
| ०९. | श्री प्रभंजन मराठे, मुंबई | भक्तीगीत गुंजन हिंदी कार्यक्रम | वरीलप्रमाणे | रु. ३५,०००/- |
| १०. | पार्वती खान, ए-१४, बंदस्टँड बिल्डींग, बांद्रा, मुंबई-४०० ०५० फोन नं.०२-२६४०८४८८, २६४५९८०९ फॅक्स नं. २६५५८५१५ | साई भजन | ३१/१२/२००६ | रु.६९,०००/- |
| ११. | सच्चिदानंद अप्पा, वेस्टर्न रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, मुंबई-४०० ०१९ फोन नं.२४३६२८७८,मो.नं.९८२०१४८६७८ | एक शाम साईके नाम | ३१/१२/२००६ | रु.१२,०००/-गाडी भाडे, रु.१/- व शॉल, श्रीफळ. |
| १२. | श्रावण बाळा, साईलिला मंडळ, १०/४०, तेजुकाया | झाले तुझे दर्शन साई | ३१/१२/२००६ | रु.११,०००/-गाडी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मेन्शन, लालबाग, मुंबई-४०००१२,<br>मो.नं.९३२३३८३९२९ | (२० कलाकार) | | भाडे, रु.१/- व शॉल, श्रीफळ. |

उपरोक्तप्रमाणे १२ कलाकारांनी दि.२९/१२/२००६ ते दि.३१/१२/२००६ रोजी भजन संध्या , नृत्य व गायन कार्यक्रम सादर करणेस परवानगी मागितलेली आहे.

अ.नं.१ यांना श्री पुण्यतिथी उत्सव २००५ व श्री गुरुपौर्णिमा २००६ मध्ये, अ.नं.२ यांना श्री पुण्यतिथी उत्सव २००६ मध्ये व अ.नं.११ यांना सन २००४,२००५ चे वर्षाअखेरचे ३१ डिसेंबरला कार्यक्रम दिलेले आहेत. अ.नं.४ - साईभजन व श्री साईबाबांचे जीवनावरील नाटीकेचा कार्यक्रम आहे, अ.नं.६,७-देवेंद्र नेने हा कार्यक्रम सरकारी ऑडीटरकडून प्रस्तावीत केलेला आहे. अ.नं.१० - पार्वती खान व अ.नं.१२ - श्रावण बाळा, यांची कार्यक्रमाची प्रथमच मागणी आहे. तसेच अ.नं.१० मधील श्रीमती पार्वती खान, मुंबई यांनी रु.६९,०००/-इतके मानधन मागितले असून पैकी निम्मी रक्कम ॲडव्हान्स मिळावा, अशी विनंती केली आहे.

०२) तीन दिवसांच्या या महोत्सवासाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील | तीन दिवस खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | रु. ००,२०,०००.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | रु. ००,१५,०००.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च (अंदाजे तीन दिवसाकरीता कलाकार ) | रु. ०१,५०,०००.०० |
| ०४. | कलाकार निवास व्यवस्था | रु. ००,४५,०००.०० |
| ०५. | व्हि.डी.ओ.शुटींग व फोटोग्राफी | रु. ००,२०,०००.०० |
| ०६. | इतर किरकोळ खर्च | रु. ००,२०,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **रु. ०२,७०,०००.००** |

सदरचा कार्यक्रम श्री पुण्यतिथी उत्सव २००६ चा कलाकार कार्यक्रम ज्याठिकाणी झाला त्याठिकाणी अथवा लेंडीबागेसमोरील सत्संगाचे कार्यक्रमाचे ठिकाणी केल्यास उत्तम प्रतिसाद मिळेल. मागिलवर्षाप्रमाणे याहिवर्षी तीन दिवस कार्यक्रम ठेवावा . दि. २९/१२ ते ३०/१२/२००६ - दोन दिवस वेळ सायं. ७.०० ते ९.३० पर्यंत एक कार्यक्रम ठेवावा व दि. ३१/१२/२००६ रोजीचा कार्यक्रम हा रात्रौ ०७.०० ते ९.३० व रात्रौ ११.०० ते पहाटे ४.३० पर्यंतच ठेवावा, म्हणजे एकूण ४ कार्यक्रम सादर करता येतील, असे नम्र मत आहे. याबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे. तीन दिवसाच्या या महोत्सवासाठी साधारणपणे अंदाजीत रु.२,७०,०००/-(अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार मात्र) खर्च येण्याची शक्यता आहे.

तथापि उपरोक्त दर्शविलेल्या १२ मान्यवर कलाकांराचे कार्यक्रम तारखा व वेळ निश्चिती मा. व्यवस्थापन समितीचे सभेत करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. २,७०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी श्री प्रभंजन मराठे, मुंबई श्री सच्चिदानंद आप्पा,मुंबई श्रीमती पुनम खन्ना,नवी दिल्ली, श्रीमती पार्वती खान, मुंबई यांचे कार्यक्रम ठरविण्यात यावे, तसेच श्री नितीन मुकेश, कु.वैशाली सामंत, मुंबई यांचेही कार्यक्रम ठेवण्यात यावे असे ठरले. या कार्यक्रमांचे मानधन ठरविण्याचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय यांना देण्यात आले.तसेच याकामी जाहिरात,बॅनर्स, निवासव्यवस्था व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२ स्नेहसंमेलनाचे निमित्ताने मोफत जेवण मिळणेबाबत श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.९६३.** मुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, जि.अहमदनगर यांनी दि.२१/११/२००६ रोजीचे पत्राने सदर विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मंगळवार, दि.२८/११/२००६ रोजी दुपारी ३.०० वा. होणार असून सदरच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे निमित्ताने संस्थानमार्फत साईबाबांचा प्रसाद म्हणून एक वेळचे भोजन बुधवार, दि.२९/११/२००६ रोजी २२६६ विद्यालय कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रसादालयात मिळावे अशी विनंती केलेली आहे. सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षी पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी मा.आ.श्री.जयंतरावजी ससाणेसाहेब यांनी अशा पध्दतीचे आश्वासन दिलेले आहे.

यापुर्वी दरवर्षी संस्थानमार्फत श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी म्हणून खाऊ वाटप करीत असतो. सन २००४-०५ व सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षी पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी सदरच्या शाळेस संस्थानमार्फत शालेय विद्यार्थी , अध्यापक, कर्मचारी व पाहुणे असे एकूण २,००० व २,१६८ जणांना मोफत भोजन देण्यात आले होते. यावर्षी सदरच्या शाळेने स्नेहसंमेलनानिमित्त मोफत भोजन

मिळणेबाबत मागणी केलेली आहे, परत ते वार्षिक पारितोषिक समारंभाचेवेळीही अशाप्रकारची मागणी करतील व त्यास आपणास नकार देता येणार नाही.

तथापि श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, जि.अहमदनगर या विद्यालयास वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त संस्थानमार्फत साईबाबांचा प्रसाद म्हणून एक वेळचे भोजन बुधवार, दि.२९/११/२००६ रोजी २२६६ विद्यालय कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रसादालयात देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३ नाताळ सुट्टी व गर्दीचे काळात साईभक्तांकरिता सतरंज्या खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ९६४.** माहे डिसेंबर २००६ मध्ये नाताळच्या सुट्टीत तसेच दत्तजयंती निमित्त होणाऱ्या श्री साईभक्तांच्या प्रचंड गर्दीमध्ये संस्थानकडील गादया/ सतरंज्या अपुऱ्या पडतात तसेच संस्थानचे नविन कार्यक्रमासाठी (शिबीर, सत्संग, सप्ताह) व इतर उत्सव काळात ही भक्तांची बऱ्याच प्रमाणात गर्दी होत असल्याने संस्थानकडील सतरंज्या कमी पडतात. तेव्हा उपरोक्त गर्दीत भक्तांचे तात्पुरते निवासासाठी मंडपात तसेच शिबीर सत्संगकाळी सतरंज्याची अत्यंत गरज भासते. त्याकरीता अंदाजे ५० नग सतरंज्या खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे.

सदरील १०' x २०' साईजच्या एक सतरंजीची किंमत अंदाजे रु.४,०००/- अशी आहे. त्यानुसार ५० नग सतरंज्या खरेदीस रु. २,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही तातडीची असल्याने पुरवठादारांशी थेट संपर्क साधून कोटेशन मागविता येईल. तरी ५० नग सतरंज्या खरेदीस व येणारे अंदाजे रक्कम रु.२ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-चौकशी व निवासस्थानप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४ संस्थान कर्मचाऱ्यांना आजारानुसार उपचारासाठी श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आवश्यक वार्डात दाखल करुन घेणे बाबत**

**निर्णय क्र. ९६५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५ श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे नेमणूक करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ९६६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६ अ)सर्वश्री विनोद शेज्वळ व सतिष थोरात, वर्ग-४ चे कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**ब) श्री विजय रमेश साळवे, मदतनीस संरक्षण विभाग यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**निर्णय क्र. ९६७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७ श्री लक्ष्मण सदाशिव चव्हाण,अधिक्षक, प्रत्यक्ष काम मुख्य रोखपाल यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**निर्णय क्र. ९६८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८ कनिष्ठ अभियंता,स्थापत्य या पदावर नेमणूक होणे बाबत श्री गणेश रत्नाकर कोराटे यांचे अर्जा बाबत**

**निर्णय क्र. ९६९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९ श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्ये आयुर्वेद विभागत पंचकर्म तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नव्याने दोन पदे भरणे बाबत.**

**निर्णय क्र. ९७०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३० अ)श्री वैभव पंडित,ज्यु.बायोमेडिकल इंजिनिअर,साईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढीबाबत**

**ब)श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील मेडिकल/पॅरॉमेडिकल अधिकारी/कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. ९७१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१ श्री.प्रशांत गजाबा पारखे वर्ग-४ कर्मचारी यांनी ४।। वर्ष शैक्षणिक कामासाठी मागणी केलेल्या विनावेतन दीर्घ रजेबाबत.**

**निर्णय क्र. ९७२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **श्री साईनाथ हॉस्पिटलकडील डॉक्टरांना श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉक्टरांप्रमाणे वेतन देणे बाबत.**

**निर्णय क्र. ९७३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **श्रीसाईबाबा हॉस्टिलमधील वैद्यकीय अधिकारी (RMO) यांना क्लिनीकल असिस्टंट पद देणेबाबत.**

**निर्णय क्र. ९७४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडे नेमणूका करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी/आर.एम.ओ नेमणूकीस मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र. ९७५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **व्यायामशाळा प्रशिक्षक भरती करणे बाबत.**

**निर्णय क्र. ९७६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी (स्टाफिंग पॅटर्न) सेवक आकृतीबंध -२००६ मान्यतेबाबत**

**निर्णय क्र. ९७७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी (स्टाफिंग पॅटर्न) सेवक आकृतीबंध -२००६ च्या प्रती सर्व विश्वस्तांना पाठविण्यात येऊन त्याबाबत विश्वस्तांचे अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **मे.ईगल आय एन्टरप्राईज, सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना कंत्राटी सुरक्षा अधिकारी ठेवणे व १.५० टक्के सर्व्हिस चार्जेस ऐवजी ११.५० टक्के सर्व्हिस चार्जेस देणेबाबत.**

**निर्णय क्र. ९७८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८.** **नविन प्रसादालयामध्ये भात,डाळ,भाजी शिजविणेकामी अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर करणेसाठी सौर उर्जा यंत्रणा खरेदी व उभारणी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ९७९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३९** **गुरुकृपा सेल्स भक्तनिवास (५०० रुम) इमारतीमधील साईगंगा मिनरल वॉटर गाळयाचे भाडेबाबत**

**निर्णय क्र.९८०.** साईबाबा भक्तनिवासस्थान डी विंगकडील आतील बाजूला गाळा क्रमांक ८ हा मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२/१०/२००५ रोजीचे मिटींगमधील निर्णय क्रमांक ५९६ अनुसार श्री अजय बोरावके, कोपरगांव यांना मिनरल वॉटर विक्रीसाठी जा.नं.एसएसएस/वशी०२/१३९६५/२००५ दिनांक २/१२/२००५ ने देण्यात आलेला आहे. त्यानुसार संबंधिताने सदरचा गाळा दिनांक १०/१२/२००५ रोजी ताब्यात घेतलेला संबंधितांना गाळा देताना पारीत झालेल्या आदेशात डिपॉझीट रुपये १०,०००/- व प्रति महिना रुपये ४,०००/- परवाना लायसेन्सी फी आदेशीत केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे श्री. अजय बोरावके यांना गाळयाचे परवाना लायसेन्सी फी पोटी दरमहा रुपये ४,०००/- लायसेन्सी फी निश्चित झालेली असतांना त्यांनी सदरची परवाना लायसेन्सी फी कमी करणेबाबत विनंती अर्ज केलेला होता त्यानुसार सदरहू गाळयाची दरमहा परवाना लायसेन्स फी कमी करणे संदर्भात विचार होणेबाबत इकडील कार्यासन कडून मा. व्य.समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी दि ०१/०४/२००६ चे व्यवस्थापन समितीचे बैठकीतील निर्णय क्रमांक २२० नुसार सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.

त्यांनी सदरचा गाळा ताब्यात घेतलेपासून आज अखेर दरमहा निश्चित केलेली परवाना फी भरलेली नाही सदरचे गाळयाची मुदत दिनांक ०९/११/२००६ रोजी संपुष्टात येत आहे अद्यापपर्यंत त्यांनी परवाना फी संस्थानकडे जमा केलेली नाही त्यांनी आता दि.०८/०९/२००६ रोजी पावती नं १५६४५ ने रुपये १०,०००/- डिपॉझीट फी लेखाशाखेकडे जमा केलेली असून त्याची झेरॉक्स प्रत इकडील कार्यालयाकडे सादर केलेली आहे. तसेच त्यांनी उपरोक्त कालावधीचा करारनामा अद्यापही करुन दिलेला नाही.

सदर भक्तनिवास ५०० रुम जवळील साईगंगा मिनरल वॉटर स्टॉलचे भाडेबाबत मा.श्री शंकरराव कोल्हे सो., उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी आपले संस्थानचे भक्तनिवास ५०० रुम जवळील स्टॉलमध्ये साईगंगा मिनरल वॉटर व ब्राम्हणगांव फळबाग सोसायटीचे सभासद शेतक-यांनी उत्पादीत केलेली ताजी फळाची (उदा. सिताफळ, चिक्कू, पेरु इं) विक्री साईभक्तांना रास्त दराने केली जात आहे सदर स्टॉलचे भाडे हे इतर स्टॉलचे भाडेप्रमाणे सवलतीच्या दराने आकारणेत यावे म्हणून श्री. अनिलराव बोरावके यांनी विंनती

केलेली आहे. तरी साईगंगा हे ब्राम्हणगांव फळबाग सोसायटीचे सभासद असल्याने सदर संस्था देखील शेतकरी सहकारी संस्था असल्याने त्यांचे साईगंगा मिनरल वॉटर स्टॉलचे भाडे देखील इतर सहकारी संस्थेप्रमाणे आकारावे व जेणेकरुन त्यांना स्टॉलचे भाडे भरणे शक्य होईल. तसेच ते स्टॉल चालू केलेपासूनचे व यापुढील दरमहा भाडे नियमित भरण्यास तयार आहे तरी त्यांचे स्टॉलचे भाडे इतर सहकारी संस्थेप्रमाणे आकारावे असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

दिनांक ०२/१०/२००५ चे आदेश क्रमांक १३९६५ ने श्री. अजय बोरावके यांना साईगंगाची विक्री करणेसाठी गाळा दिलेला आहे, परवानगी दिलेली आहे. फळाची विक्री करणेसाठी प्रस्तुत परवानगी मध्ये उल्लेख नाही. श्री. बोरावके यांनी लायसेन्स फी बाबत मी आकारणी व्हावी असे मा. उपाध्यक्ष यांची शिफारस आहे. साईगंगाची विक्रीसाठी दिलेले जागेचे क्षेत्र बांधकाम विभागाकडून इकडील कार्यालयाकडे आलेल्या पत्रानुसार ३०.८.४४ चौ फुट मोजमाज कळविले आहे गाळा आतील बाजूस आहे.

सहकारी संस्थेचे सभासद एखादी व्यक्ती असल्यास सदर व्यक्ती सहकारी संस्था ठरत नाही. मात्र भक्तांचे सोयीसाठी सोईसाठी साईगंगा सवलतीचे दराने मिनरल वॉटर विक्री करणेचे अर्जास अनुसरून प्रस्तुतचे गाळा त्यांना वापरास दिलेला आहे. ही बाब विचारात घेता येईल. व काही प्रमाणात त्यांची लायसस फी कमी करता येईल खाजगी गाळा धारकांचे धर्तीवर यापूर्वी त्यांची लायसन्स फी ठरवली होती.

श्रीसाईबाबा भक्तनिवास परिसरातील सहकारी संस्थाचे गाळे सध्या रुपये १,०००/- पावेतो संस्थानमध्ये भरतात त्याचा विचार करता साईगंगा मिनरल वॉटर श्री.अजय बोरावके यांना परवानगी देण्यात आलेले गाळयाबाबत रुपये १ ०००/- लायसेन्स फी निश्चित करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुकृपा सेल्स,कोपरगांव यांना " लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर लायसेन्स फी दरमहा रुपये २०००/- मात्र व विद्युत आकार वेगळा आकारून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळा ११ महिन्यासाठी देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही -विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४०. गोदावरी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर पुरवठ्याबाबत.**

**निर्णय क्र.९८१.** कार्यकारी संचालक, गोदावरी खोरे नामदेवराव परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या, कोपरगाव यांचे दिनांक २५.११.२००६ पत्रान्वये त्यांचे संघाने गोदावरी शुध्द पाणी सुरु करण्यात आले असून सदर शुध्द पाणी संस्थानने खरेदी करावे आपण इतर कंपन्यांचे पाणी ज्या दराने खरेदी करीत आहात त्याचप्रमाणे खरेदी करावे असे कळविले आहे.

आजचे सभेत गोदावरी खोरे नामदेवराव परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या, कोपरगाव यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी सविस्तर माहिती सभेस करुन दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेतील निर्णय क्र.५३३(०५) अन्वये संस्थानसाठी आवश्यक असणारे पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर पुरविणेकामी मे.नालकर, तिसगाव व मे.गुरुकृपा सेल्स,कोपरगाव यांचेकडून १ लिटरसाठी रु.५.४० व ५०० मि.लि.साठी रु.३.६५ या दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याच दराने गोदावरी खोरे नामदेवराव परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या, कोपरगाव यांना गोदावरी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर पुरविणेबाबत आदेश देण्यात येऊन, वरील तिनही पुरवठादारांकडून सम प्रमाणात पॅकज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदी करण्यात यावे. सदरचे पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर ०१ लिटर बाटलीची विक्री किंमत रुपये १०/- व ५०० मि.ल. बाटलीची विक्री किंमत रुपये ६/- प्रति नग पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात यावी, असें ठरलें

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१ राष्ट्रीय पेरुसंवाद व कृषीप्रदर्शनसाठी सभामंडप व कृषी प्रदर्शन मंडप वगैरे मिळणेबाबत...**

**निर्णय क्र.९८२** श्री विनायक दंडवते, संयोजक, नॅशनल सिम्पोसियम ऑन गावा, मु.पो.साकुरी, ता.राहाता, जि.अहमदनगर, यांचे दि.२०/११/२००६ रोजीचे पत्रान्वये गावा ग्रोवर्स असोसिएशनऑफ इंडिया व सेंट्रल इन्स्टीट्युटफॉर सबट्रॉपिकल हॉर्टीकल्चर, लखनौ यांचे संयुक्त विद्यमाने दि.०६/०१/२००७ ते दि.०८/०१/२००७ अखेर तीन दिवस राष्ट्रीय पेरु परिसंवाद व कृषी प्रदर्शन आयोजित करणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मा.ना.शरदचंद्रजी पवारसो. (कृषी मंत्री, भारत सरकार) उपस्थित राहणार आहेत.

उपरोक्त कार्यक्रम हा न.भ.निवासजवळील मैदानात होणार असून संस्थानकडून खालील गोष्टींची पुर्तता व्हावी अशी विनंती केलेली आहे.

सभा मंडप - २०० x ३०० मॅटींगसह.

साऊंड सिस्टिम

व्यासपीठ- ३० x ४० , उंची ५ फुट

बैठक व्यवस्था - ०१) खुर्ची संख्या - ४,५००, ०२) फॅन व्यवस्था - ३ नग

०३) सोफा - २० नग, ०४) व्हि.आय.पी. खुर्ची - ९ + १

०५) सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्टेज आणि पडदे

प्रवेशद्वार :- दोन मुख्य कमान, कृषी प्रदर्शन द्वार

स्टॉल्स :- ०१) २५० स्टॉल्स - १० x १२ आकाराचे

०२) प्रत्येक स्टॉलगणिक १ - टेबल, २ - खुर्ची सुविधा

०३) विद्युत पुरवठा

०४) नोंदणी कक्ष व्यवस्था

०५) पॅसेजसाठी मॅटींग व्यवस्था

निवास व्यवस्था :- एकूण २०० रुम्स + ५ हॉल्स (दि.०५/०१ ते ०७/०१/२००७ अखेर)

भोजन व्यवस्था :- बफे जेवण - २,००० व्यक्तींसाठी (०६/०१ ते ०८/०१/२००७ अखेर)

वाहन व्यवस्था :- फिल्ड व्हिजीटसाठी २ बसेसची आवश्यकता- दि.०८/०१/२००७ रोजी.

स्वयंसेवक :- श्री साईबाबा औद्योगिक प्र.संस्थेतील सुमारे १५० विद्यार्थी मिळावेत.

उपरोक्तप्रमाणे व्यवस्था संस्थानमार्फत होणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर कार्यक्रम घेणेबाबत दि.२०/११/२००६ रोजी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे यांनी संयुक्तपणे अखिल भारतीय पेरु उत्पादन संघाद्वारे राष्ट्रीय पातळीवरील पेरु परिसंवाद व कृषी प्रदर्शन आयोजनाबाबत विनंती करण्यात आली आहे. ती सर्वांनी मान्य केली आहे. उपरोक्त बाबत चर्चेत खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे.

निवासव्यवस्थेसाठी - २०० रुम्स व ५ हॉल्स - संस्थान नियमानुसार भाडे आकारुन देण्यात यावे.

जेवण व्यवस्था - ५ वेळेस प्रत्येक वेळेस १,५०० ते २,००० व्यक्तींचे संस्थान नियमानुसार सशुल्क देण्यात यावे.

पेंडॉल - स्टॉल - साऊंड सिस्टीम - स्टेज व्यवस्था - आसन व्यवस्था तसेच जनरेटर व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी, त्याकामी अंदाजित रु.१०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लाख मात्र) खर्च येण्याची शक्यता आहे. तसेच खाजगी कामासाठी संस्थानचे बसेस दिल्या जात नाहीत. संस्थानचे आय.टी.आय.मधील १५० विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून कार्यक्रमासाठी देता येईल असा प्रस्तावमा.कार्यकारी यांनी सादर केला होता

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४२. श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी ता.पुरंदर जि.पुणे यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.९८३** श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी ता.पुरंदर जि.पुणे यांनी त्यांचे पत्रान्वये महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवस्थान येथे संपूर्ण महाराष्ट्र राज्यामधूनच नव्हे तर परराज्यातील अनेक भाविक दर्शनाच्या निमित्ताने येत असतात. तसेच दर वर्षी दहा ते बारा मोठ्या यात्रा भरत असतात व या यात्रा काळात लाखोने भाविकांची प्रचंड गर्दी होत असते परंतू या ठिकाणी भक्तांसाठी कोणत्याही प्रकारची सध्या सुविधा नसल्याने भक्तांसाठी श्री मार्तंड देवस्थाने भक्तनिवासस्थान बांधण्याचे योजले असून भक्त निवासाच्या बांधकामासाइी अंदाजे रुपये २ कोटी ५० लक्ष खर्च अपेक्षित आहे असे कळविले असून, याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी ता.पुरंदर जि.पुणे यांना भक्तनिवास बांधकामासाठी रुपये १ कोटी आर्थिक मदत देण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, तसेच सदर भक्तनिवासस्थानास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांव देण्यात यावे अशी अट त्यांना घालण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४३. शिधासामग्री मिळणेबाबत अध्यक्ष, श्री क्षेत्र रांजणगांव देवी, ता.नेवासा, जिल्हा-अहमदनगर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.९८४.** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, श्री क्षेत्र रांजणगांव देवी, ता.नेवासा, जिल्हा-अहमदनगर | दि.०७/१२ ते दि.०९/१२/०६ अखेर तीन दिवस शतचंडी महायज्ञ कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

अध्यक्ष, श्री क्षेत्र रांजणगांव देवी, ता.नेवासा, जिल्हा-अहमदनगर यांनी शिधा मिळणेबाबत पहिल्यांदाच मागणी केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री क्षेत्र रांजणगांव देवी, ता.नेवासा, जिल्हा-अहमदनगर यांना दि.०७/१२ ते दि.०९/१२/०६ अखेर तीन दिवस शतचंडी महायज्ञ कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी रुपये १५,०००/- पर्यन्त शिधास्वरुपात मदत देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४४. दिनांक ३१ डिसेंबर,२००६ रोजी समाधी मंदीर रात्रभर उघडे ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.९८५.** श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी या तीन उत्सवाचे मुख्य दिवशी भक्तांचे दर्शनासाठी मंदीर रात्रभर उघडे ठेवण्यात येते, ही परंपरा जुनी आहे.

मात्र ३१ डिसेबर रोजी हजारोंच्या संख्येने साईभक्त ज्यात अनेक मान्यवरांचा समावेश असतो, नव वर्षाचे स्वागत श्रीसाईबाबांचे सानिध्यात करण्यासाठी येथे येतात. दिवसेंदिवस दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यांची दर्शनव्यवस्था सुलभ व्हावी याकरिता रविवार दिनांक ३१ डिसेंबर,२००६ रोजी समाधी मंदीर रात्रभर उघडे ठेवण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/अधिक्षक,मंदीर विभाग)

वरील निर्णय क्र. ८७४ ते ९८५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत /-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत /-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

<u>दिनांक ६.१.२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-</u>